लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०११-२०१२ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालामधील महिला व बालविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.१) यावरील

बत्तिसावा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक मार्च २०१८ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर.
फेब्रुवारी/मार्च २०१८

लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०११-२०१२ या वर्षाच्या सामान्य आणि
सामाजिक क्षेत्र अहवालामधील महिला व बालविकास विभागाशी
संबंधित (परिच्छेद क्र. ४.१) यावरील

बत्तिसावा अहवाल

लोकलेखा समिती

२०१७-२०१८

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१२) श्री. सुरेश ऊर्फ बाळुभाऊ धानोरकर, वि.स.स.

(१३) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(१४) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१५) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१६) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप वळसे-पाटील, वि.स.स.

(१९) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(२०) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(२१) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(२२) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.

*(२३) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

(२३अ) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

(२५) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

निमंत्रित

(२६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी विधानसभा व दिनांक ६ सप्टेंबर २०१७ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM).

(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(४) श्री. अ.चां.कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(५) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(६) श्रीमती सुषमा पाठक, कक्ष अधिकारी.

(७) श्री. रविंद्र म. मेस्त्री, कक्ष अधिकारी.

*** श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १९ डिसेंबर २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

लोकलेखा समिती

२०१५-२०१६

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(५) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.

(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१२) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१३) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१४) श्री. वैभव नाईक, वि.स.स.

(१५) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.

(१६) श्री. कालिदास कोळंबकर, वि.स.स.

(१७) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.

(१८) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(१९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(२०) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.

(२१) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

*(२२) श्री. सुनिल तटकरे, वि.प.स.

(२३) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

**(२४) श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स.

(२४अ) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

(२५) श्री. संजय दत्त, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक १ मे २०१५ रोजी विधानसभा व दिनांक २१ मे २०१५ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव.

(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(४) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(५) श्रीमती सुषमा पाठक, कक्ष अधिकारी.

(६) श्री. रविंद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी.

***श्री. सुनिल तटकरे, वि.प.स. यांनी दिनांक २८ सप्टेंबर २०१६ रोजी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिलेला असल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.**

****श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स. यांची दिनांक ५ ऑगस्ट २०१६ रोजी उप सभापती, विधानपरिषद पदी निवड झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक ३१ ऑगस्ट २०१६ रोजी समिती सदस्य म्हूणन नामनियुक्ती केली.**

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरून भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०११- २०१२ च्या **सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालामधील महिला व बालविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.१)** यावर विचार करून लोकलेखा समितीचा बत्तिसावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक १२ व २० एप्रिल, २९ मे, १४ जून व ११ जुलै, २०१७ रोजी सचिव, महिला व बालविकास विभाग व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष विधानभवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरून बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचे देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट " अ " मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट " ब " मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक २७ फेब्रुवारी २०१८ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून प्रारुप अहवालाला मान्यता दिली.

विधान भवन,
मुंबई/नागपूर,
दिनांक २७ फेब्रुवारी २०१८.

गोपालदास अग्रवाल,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

अनुक्रमणिका

अ.क्र.	विभाग व तपशील	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)
	प्रस्तावना	
(१)	महिला व बालविकास विभाग	१
	महिला व बालविकास विभागाचे लेखापरिक्षण (परिच्छेद क्र. ४.१)	

महिला व बाल विकास विभाग

१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०११-१२ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ४.१ " महिला व बाल विकास विभागाचे लेखापरिक्षण " यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

१.१ परिच्छेद क्र. ४.१ मुख्य नियंत्रण अधिकारी निहाय शासकीय विभागाचे लेखापरिक्षण :—

मुख्य नियंत्रण अधिकारी निहाय शासकीय विभागाचे लेखापरिक्षण महिला आणि बाल विकास विभागाचे लेखापरिक्षण

महिलांचा विशेषत: ग्रामिण भागातील महिलांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावणे आणि सहा वर्षे वयापर्यंतच्या मुलांमधील मृत्युदर आणि रोगाचे प्रमाण कमी करणे हे या विभागाचे उद्दिष्ट आहे. या विभागाच्या कार्यामध्ये महिला आणि मुलांना पोषण आहार, निवारा, शिक्षण आणि समुपदेशन इत्यादी बाबींचा समावेश होतो. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राज्यातील महिला आणि मुलांच्या विकासासाठी प्रचलित असलेल्या विविध कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी विभागातर्फे अनेक योजना राबविण्यात येतात.

मुख्य नियंत्रण अधिकारी निहाय विभागाचे सन २००७-०८ ते २०११-१२ या कालावधीचे लेखापरिक्षण करण्यात आले असता, सदोष नियोजन, बालगृहांची तपासणी न करणे, बालगृहातील मुलांसाठी व्यवसायाभिमुख प्रशिक्षणाची तरतूद नसणे, निर्धारित केलेल्या दर्जापेक्षा कमी उष्मांक (Calorific value) असलेला आहार पुरविणे, लाभार्थ्यांना पुरविलेल्या आहाराची तपासणी न करणे इत्यादी त्रुटी आढळून आल्या. काही महत्वाचे निष्कर्ष ठळकपणे खाली निर्देशित केले आहेत.

१.२ परिच्छेद क्र. ४.१.१ प्रस्तावना :—

महिला आणि बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन (विभाग) यांचे कार्य जून, १९९३(१) पासून सुरू झाले. महिलांचा विशेषत: ग्रामिण भागातील महिलांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावणे तसेच सहा वर्षे वयापर्यंतच्या मुलांमधील मृत्युदर आणि रोगाचे प्रमाण घटविणे हे या विभागाचे उद्दिष्ट आहे. या विभागाच्या कार्यामध्ये महिला आणि मुलांना पोषण आहार, निवारा, प्रशिक्षण आणि समुपदेशन, तसेच या कार्यामध्ये अशासकीय संघटनांना समाविष्ट करून घेणे इत्यादी कामांचा समावेश होता. विभागाच्या आंतर नियंत्रण संरचनेचा कार्यसिद्धी लेखापरीक्षा अहवाल सन २००६-०७ च्या नागरी लेखापरीक्षा अहवालामध्ये प्रसिद्ध करण्यात आला होता.

महिलांच्या विकासासाठी महिलांवर होत असलेल्या हिंसाचारांचे प्रकारांचे उच्चाटन करणे, त्यांचा आर्थिक स्तर उंचावणे, अशासकीय संघटनांमार्फत शासकीय कार्यामध्ये सामुदायिक सहभाग वाढविणे ही या विभागाची प्रमुख कार्ये आहेत. विभागाच्या बाल विकास कार्यक्रमामध्ये, शुन्य ते सहा वर्षे वयापर्यंतच्या मुलांचे आरोग्य पोषण सुधारणे, शारीरिक आणि सामाजिक विकासासाठी मुलांसाठी योग्य वातावरण तयार करणे, इत्यादी कामांचा समावेश होतो.

मार्च २०१२ पर्यंत, राज्यामध्ये विभागातर्फे १,८४९ मुलांसाठी मध्ये ४६ बालगृहे चालविण्यात येत असुन १,१२४ बालगृहे (मतिमंद मुलांसाठी असलेल्या १९ गृहांसहित) अशासकीय संघटनांमार्फत ६९,८३३ मुलांसाठी चालविण्यात येत होती. याशिवाय महिलांसाठी २२ शासकीय गृहे आणि १३ भिक्षेकरी गृहे आहेत. याखेरीज विभागातर्फे एकात्मिक बाल विकास सेवा योजना (ICDS) राबविण्यात येत असून, मार्च, २०१२ पर्यंत ९५,३३५ अंगणवाडी केंद्रे (AWCs) आणि ९,८९४ छोटी अंगणवाडी केंद्र सहा वर्षे वयापर्यंतच्या ८२,४२,९८३ मुलांसाठी ५५३ प्रकल्पांमार्फत चालविण्यात येत होती. विभागाकडून १६ योजना राबवित आहे आणि महिला व बाल विकासाकरिता बनविलेल्या आठ अधिनियमांची अंमलबजावणी राज्यामध्ये होत आहे ह्याची खातरजमा केला जाते. तपशील **विवरण क्र. १** मध्ये आहे.

१.३ परिच्छेद क्र. ४.१.२. संस्थात्मक संरचना

महाराष्ट्र शासन, महिला आणि बाल विकास विभागाचे प्रधान सचिव हे मुख्य नियंत्रण अधिकारी आणि विभाग प्रमुख आहेत. आयुक्त, महिला आणि बाल विकास हे महिला आणि बाल कल्याण योजनांच्या अंमलबजावणीचे सर्वाधिकारी आहेत. या कामात आयुक्तांना सहआयुक्त (महिला आणि बाल विकास) आणि सहआयुक्त (एकात्मिक बाल विकास सेवा योजना) सहाय्य करतात. सहआयुक्त (महिला आणि बाल विकास) यांना जिल्हा पातळीवर जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी (DWCDOs) सहाय्य करतात. योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी राज्य शासनातर्फे चालविण्यात येत असलेल्या ८१ संस्थांच्या माध्यमातून ३५ DWCDOs करतात. मार्च, २०१२ पर्यंत ICDS योजनांची अंमलबजावणी ५५३ बाल विकास प्रकल्प अधिकारी (CDPOs) करत होते. ग्रामिण विभागातील ICDS योजनांचे नियंत्रण जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत आयुक्त करतात.

१.४ परिच्छेद क्र. ४.१.३ लेखापरिक्षणाची उद्दीष्टे

लेखापरिक्षणाची उद्दीष्ट पुढील गोष्टींची आढावा घेणे हे होते.

- महिला आणि बाल विकासासाठी योग्य धोरण अस्तित्वात आहे
- केंद्रीय आणि राज्य योजनांची अंमलबजावणी काटकसरीने, परिणामकारकरित्या आणि कुशलतेने होत आहे
- पुरेसा निधी उपलब्ध होता आणि वित्तीय नियोजन हे वित्तीय नियम, अर्थसंकल्पीय पद्धतीनुसार होते. वित्तीय अहवाल यंत्रणा परिपूर्ण होती
- परिणामकारक नियंत्रण यंत्रणा आणि अंतर्गत नियंत्रण अस्तित्वात होते आणि
- मनुष्यबळ पुरेसे होते आणि त्याचा वापर विभागाच्या उद्देशांची संपूर्ण अंमलबजावणी करण्यासाठी होत होता.

१.५ परिच्छेद क्र. ४.१.४ लेखापरीक्षा मानके

लेखापरीक्षा मानके पुढील कागदपत्रांच्या आधारे ठरविण्यात आली.

- नियम, अधिसूचना, मार्गदर्शक तत्वे राज्य आणि केंद्र शासनाने वेळोवेळी केलेल्या सूचना
- महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमावली
- महाराष्ट्र कोषागार नियम
- मुबई वित्तीय नियमावली आणि
- महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम.

१.६ परिच्छेद क्र. ४.१.५ लेखापरिक्षणाची व्याप्ती आणि पद्धती :—

लेखापरिक्षणासाठी प्रधान सचिव आणि आयुक्त यांची कार्यालये निवडण्यात आली. राज्याच्या कोकण, मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र या चार विभागातील सोप्या अहेतुपूर्वक निवडलेल्या नमुना व बदलता पद्धतीनुसार (Simple Random Sampling without replacement) नऊ जिल्हे निवडण्यात आले. निवडलेल्या नऊ जिल्ह्यातील १६६ CDPOs पैकी, ३४ CDPOs, जे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून सुद्धा कार्यरत होते, सोप्या अहेतुपूर्वक निवडलेल्या नमुना न बदलता पद्धतीनुसार (Simple Random Sampling without replacement) निवडण्यात आले होते (२० टक्के). या लेखापरिक्षणात निवडलेल्या नऊ जिल्ह्यांमधील जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी (हे आहरण व संवितरण अधिकारी देखील होते) आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अभिलेख्यांची चाचणी तपासणी करण्यात आली. याखेरीज निवडलेल्या जिल्ह्यातील बालगृहे, महिला गृहे आणि भिक्षेकरी गृह (आहरण व संवितरण अधिकारी) यांचे काम पाहणाऱ्या ३२ अधीक्षकांच्या कार्यकक्षेतील १२ संस्थांची निवड लेखापरिक्षणासाठी करण्यात आली होती. तसेच ५४ अंगणवाडी केंद्रांची (AWCs) प्रत्यक्ष पाहणी विभागाच्या प्रतिनिधींसोबत संयुक्तपणे करण्यात आली. १६ पैकी ६ योजना आणि राज्यांमध्ये महिला आणि बाल विकासासाठी असलेल्या आठ पैकी तीन कायद्यांच्या अंमलबजावणीची चाचणी तपासणी करण्यात आली **(विवरण क्र.१).** लेखापरिक्षणांत चाचणी तपासणी केलेल्या कार्यालयांचा तपशील **(विवरण क्र.२)** मध्ये देण्यात आला आहे.

फेब्रुवारी, २०१२ ते जून, २०१२ च्या दरम्यान मुख्य नियंत्रण अधिकारी निहाय विभागाचे लेखापरिक्षण करण्यात आले आणि सन २००७-०८ ते २०११-१२ या कालावधीतील अभिलेख्यांची चाचणी तपासणी करण्यात आली. ११ एप्रिल २०१२ रोजी प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग यांच्या बरोबर झालेल्या प्रवेश परिषद (Entry Conference) लेखापरिक्षणाची उद्दीष्टे, मानके आणि व्याप्ती यांची चर्चा करण्यात आली. १८ ऑक्टोबर २०१२ रोजी प्रधान सचिवांबरोबर झालेल्या निर्गमा परिषद (Exit Conference) लेखापरिक्षणाचे निष्कर्ष चर्चिले गेले व ते विभागाद्वारे मान्य करण्यात आले.

१.७ लेखापरिक्षणाचे निष्कर्ष

संस्थात्मक उणीवा :—

विभागाचे कार्य यशस्वीरित्या होण्यासाठी विभागाची कार्यकक्षा, उद्दीष्टे, लक्ष्य, धोरणीय चौकट आणि नियोजन, अंतर्गत नियंत्रण आणि नियंत्रण यंत्रणा यांची निश्चित व्याख्या ठरविणे याची नितांत आवश्यकता असते. लेखापरिक्षणात आढळलेली विभागाची संस्थात्मक व्यवस्था आणि निदर्शनास आलेल्या उणीवा यांची चर्चा पुढील परिच्छेदांत करण्यात आली आहे.

१.८ परिच्छेद क्र. ४.१.६ नियोजन

१.९ परिच्छेद क्र. ४.१.६.१ " बालगृहांच्या स्थापनेसाठी योजना तयार न करणे " :

राज्यात एप्रिल, २००७ पर्यंत विभागातर्फे ४६ बालगृहे आणि अशासकीय संघटनातर्फे ५३८ बालगृहे चालविण्यात येत होती. लेखापरिक्षणामध्ये असे आढळून आले की, काळजी आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या मुलांची निश्चित संख्या कळण्यासाठी यंत्रणा नसल्यामुळे बालगृहांची स्थापना करण्यासाठी कालबद्ध योजना आखता आली नाही. फेब्रुवारी, २००८ मध्ये झालेल्या बैठकीत मंत्री, महिला आणि बाल विकास यांनी नवीन बालगृह स्थापन करण्यासाठी आणि त्यांना मंजुरी देण्यासाठी कार्यक्षेत्रसीमा (Parameters) ठरवून सर्वंकष योजना तयार झाल्याशिवाय नवीन बालगृहे स्थापण्याचे प्रस्ताव (मतिमंद, एच.आय.व्ही. बाधित मुले सोडून) मान्य न करण्याचे ठरविले. परंतु ऑगस्ट, २०१२ पर्यंत सर्वंकष योजना तयार करण्यात आली नव्हती असे असतांना ही अशासकीय संस्थांनी पाठवलेल्या बालगृहांच्या प्रस्तावाना मंजुरी देण्याचा निर्णय विभागाने मे, २००८ मध्ये घेतला व त्यानुसार ५२७ नवीन बालगृहे स्थापन करण्यासाठी नोव्हेंबर-डिसेंबर, २००८ मध्ये मंजुरी दिली. मार्च, २०१२ पर्यंत विभागातर्फे ४६ बालगृहे आणि अशासकीय संस्थांतर्फे ११२४ बालगृहे राज्यात चालविण्यात येत होती.

राज्यातील ३५ जिल्ह्यांपैकी बीड, नांदेड आणि लातूर जिल्ह्यामध्ये ३७ टक्के बालगृहे आहेत. प्रत्यक्ष गरज आणि सर्वंकष योजने अभावी राज्यातील बालगृहांची स्थापना योग्य पद्धतीने झाली नाही हे ह्यावरुन दिसून येते. १५१ तालुक्यांमध्ये (३५ जिल्हे) आणि ३०९ तालुक्यांमध्ये (११ जिल्हे) अनुक्रमे मुले व मुलींसाठी बालगृहे नव्हती. याखेरीज १३९ तालुक्यांमध्ये (३५ जिल्हे) मुले किंवा मुलींसाठी बालगृहे नव्हती.

मुख्यमंत्र्याच्या सुचनेनुसार कमी बालगृहे असलेल्या जिल्ह्यांच्या क्रमाप्रमाणे बालगृहांना मंजुरी देण्यात येईल असे ऑक्टोबर, २०१२ मध्ये आयुक्त, महिला व बाल विकास यांनी सांगितले. निर्गमन बैठकीत, काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या मुलांची गणना आंगणवाडी कर्मचारी आणि व्यावसायिकांच्या मदतीने करण्यात येणार असल्याचे प्रधान सचिवांनी सांगितले (ऑक्टोबर, २०१२) परंतु शहरी भागात अशा तऱ्हेने गणना करणे कठिण असल्याचे प्रधान सचिवांनी सांगितले.

१.१० ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बाल विकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

एकात्मिक बाल संरक्षण योजना अंतर्गत असलेल्या जिल्हा बाल संरक्षण कक्ष (DCPU) यांचेमार्फत काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांचे सर्वेक्षणाचे काम करण्यात आलेले असून, त्याबाबतची माहिती ICPS कडून प्राप्त होताच सादर करण्यात येईल. तसेच दिनांक ३० एप्रिल २०१४ च्या शासन निर्णयानुसार बालकांच्यासाठीच्या काम करणाऱ्या विभागाची मान्यता घेतलेल्या अशा सर्व निवासी संस्थांची नोंदणी *www.icds.gov.in/wcdchild* या अधिकृत वेबसाईटवर नोंदणी करण्याबाबत सुचित करण्यात आलेले आहे. दिनांक १५ डिसेंबर २०१४ अखेर १८६५ संस्थांनी नोंदणी केलेली आहे. सद्यःस्थितीत शासनस्तरावरुन संपूर्ण महाराष्ट्रातील बाल गृहांची तपासणी त्रयस्थ यंत्रणेकडून करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. मात्र काही संस्थाचालकांनी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका दाखल केलेल्या असून मा. न्यायालयाने तपासणी करण्यास हरकत नसावी, मात्र अंतिम निर्णय घेण्यात येवू नये असे निर्देश दिलेले आहेत. सद्यःस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

१.११ परिच्छेद क्र. ४.१.७ संनियंत्रण :—

विभागीय अधिकाऱ्यांकडून बालगृहे आणि अंगणवाडी केंद्रांची तपासणी करण्यात होत असलेल्या त्रुटी लेखापरिक्षणातून वेळोवेळी मुख्य नियंत्रण अधिकाऱ्यांच्या (CCO) निदर्शनास आणून देण्यात येतात. तरीही, विभागाच्या CCO निहाय लेखापरिक्षणांत पुढील त्रुटी आढळून आल्या. तसेच, तपासणीत आढळलेल्या त्रुटींचा पुरेसा पाठपुरावा विभागाकडून करण्यात येत नसल्याचेही निदर्शनास आले.

१.१२ परिच्छेद क्र. ४.१.७.१ जिल्हास्तरीय पुनर्वसन समिती कार्यरत नसणे :—

विभागाने, जिल्हास्तरीय पुनर्वसन समितीची (DLRC) स्थापना, ज्याचे मुख्य संबंधित जिल्हाधिकारी असतात, जून, २००० मध्ये केली. ही समिती, बालगृह सोडून जाणाऱ्या मुलांना (मुले १८ वर्षांवरील आणि मुली २१ वर्षांवरील), त्यांच्या पुनर्वसनाकरिता व्यवसाय प्रशिक्षण, लघुउद्योग सुरू करण्यासाठी सहाय्य, शासन राबवित असलेल्या विविध योजनांची माहिती, वित्तीय संस्थांकडून आर्थिक सहाय्य/कर्ज मिळविण्यासाठी मदत करणे, इत्यादीसाठी जबाबदार होती. समितीच्या, तीन महिन्यांतून एकदा याप्रमाणे २००७-१२ या कालावधीत २० बैठका व्हायला हव्या होत्या. समिती, मुलांच्या पुनर्वसनाबाबत पाठपुरावा अहवाल, आयुक्तांना सादर करण्यासाठी जबाबदार होती.

परंतु, प्रत्यक्षात सात जिल्ह्यांमध्ये २००७-१२ या कालावधीत फक्त दोन ते अकरा बैठका झाल्याचे लेखापरिक्षणांत आढळले. बीड जिल्ह्यामध्ये सन २००९-१२ या कालावधीत १८ वर्षावरील लाभार्थी नसल्याने बैठका झाल्या नाहीत व अमरावती जिल्ह्यात २० बैठका घेण्यात आल्या. प्रमाणित केलेल्या संख्येपेक्षा कमी बैठका घेणे हे बालगृहातील मुलांच्या पुनर्वसनासाठी असलेली संस्थात्मक व्यवस्था कमकुवत असल्याचे निदर्शक आहे.

निर्देशित केल्याप्रमाणे बैठका घेण्याच्या सूचना DLRC ना जुलै, २०१० आणि ऑगस्ट, २०१२ मध्ये देण्यात आल्याचे आयुक्तांनी सांगितले. DWCDOs ज्यांनी अशा प्रकारच्या बैठका नियमितपणे घेतल्या नाहीत, त्यांना कारणे दाखवा नोटीसा देण्यात आल्या आहेत.

१.१३ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बाल विकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

शासन निर्णय क्र. निरीगृ. २०००/प्र.क्र..३८६/का-३, दिनांक १८ जून २००० मध्ये नमूद केल्यानुसार मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ३५ जिल्ह्यांसाठी जिल्हा पुनर्वसन समिती गठीत करण्यात आलेली आहे.

शासन निर्णय क्र.३८६ दि. १८ जून २००० च्या शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय पुनर्वसन बैठका होतात किंवा नाही याबाबतचा आढावा आयुक्तालयस्तरावरुन घेण्यात आला यावेळी निदर्शनास आलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने शासन निर्णयात नमूद केले नुसार वेळोवेळी जिल्हास्तरीय पुनर्वसन समिती बैठका घेणे बाबत ३५ जिल्ह्यांचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना आयुक्तालयाचे परिपत्रक पत्र क्र. ५२२१ दि. ३१ जुलै २०१० अन्वये कळविण्यात आले आहे.

बालगृहातून १८ वर्षांवरील बाहेर पडलेल्या जास्तीत जास्त प्रवेशितांचे चांगल्या प्रकारे पुनर्वसन होण्यासाठी प्रायोगिक तत्वावर पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक व अमरावती या ५ विभागांमध्ये ५ शासकीय बालगृहांना अनुरक्षणगृहे म्हणून शासनाने दि. १० एप्रिल २०१२ रोजी घोषित केलेले आहे.

महिला व बाल विकास विभागांतर्गत सद्य:स्थितीत शासकीय व स्वयंसेवी अशी एकूण ९ अनुरक्षणगृह कार्यरत आहेत.

१८ वर्ष पूर्ण होत असलेल्या व पूर्ण झालेल्या प्रवेशितांना अनुरक्षणगृहामध्ये प्रवेश देवून त्यांचे पुनर्वसन होण्यासाठी शासन निर्णय दिनांक २७ ऑगस्ट २०१२ नुसार कर्मवीर भाऊराव पाटील स्वावलंबी पुनर्वसन योजनेस मान्यता मिळालेली आहे. यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

आयुक्तालयाचे पत्र क्र. ५२२१, दिनांक ३१ जुलै २०१० पत्र क्र. ६५२५, दिनांक २७ ऑगस्ट २०१२ रोजीच्या परिपत्रकानुसार व दिनांक ६ जुलै २०१२ रोजीच्या मा. आयुक्त महोदयांच्या बैठकीत व वेळोवेळी घेण्यात आलेल्या आयुक्तालयस्तरावरील बैठकीत शासन निर्णय क्र. निरीगृ. २०००/ प्र. क्र.३८६/का-३, दिनांक १८ जून २००० मध्ये नमूद केल्यानुसार मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली निरीक्षणगृह/बालगृहातील मुलां-मुलींच्या पुनर्वसनाकरिता जिल्हास्तरीय तिमाही जिल्हा पुनर्वसन समिती बैठक नियमित घेण्याबाबत सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

१.१४ परिच्छेद क्र. ४.१.७.२ जिल्हा निरिक्षण समिती कार्यरत नसणे :—

केंद्र शासनाच्या, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००२ च्या कलम ६२ अन्वये, राज्य शासनाने प्रमुख समाज सेवक, बालकल्याण क्षेत्रातील स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी, वैद्यकीय व्यवसायिक, राज्य शासनानाचे संबंधित विभाग, इत्यादी सदस्यांचा समावेश असलेल्या राज्य सल्लागार मंडळाची स्थापना करणे बंधनकारक होते. बालगृहांची स्थापना आणि व्यवस्थापन, साधन संपत्तीचा वापर, शिक्षण आणि प्रशिक्षणाच्या सोयी सुविधा, काळजी आणि संरक्षण आवश्यक असलेल्या मुलांचे पुनर्वसन आणि कायद्याविरुद्ध वागणूक असणारे बाल गुन्हेगार इत्यांदींबाबत शासनाला सल्ला देण्याची जबाबदारी राज्य सल्लागार मंडळाची आहे. संबंधित कायद्याच्या कलम ३५ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा निरिक्षण समित्यांनी जिल्हा सल्लागार मंडळ म्हणूनही काम करणे अपेक्षित आहे. महाराष्ट्र बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००२ च्या नियम ११ अन्वये, सल्लागार मंडळाने विविध संस्थांची पहाणी करावी आणि त्यांच्या शिफारशींवर राज्य शासनाने कृती करावी.

लेखापरिक्षणात चाचणी तपासणी केलेल्या नऊ जिल्ह्यांमध्ये निरीक्षण समित्या/सल्लागार मंडळाची विभागाने स्थापन केली नसल्याचे आढळून आले (जुलै, २०१२). जिल्हा निरीक्षण समित्या स्थापन करण्यासाठी जून आणि डिसेंबर, २०११ मध्ये शासनास प्रस्ताव पाठविण्यात आल्याचे आयुक्तांनी सांगितले आणि शासनस्तरावर कारवाई करणे आहे.

कायद्याप्रमाणे बालगृहांची तपासणी करण्याचे महत्वाचे काम जिल्हा निरिक्षण समित्या/सल्लागार मंडळाच्या स्थापने अभावी दुर्लक्षित राहिले.

जिल्हा निरीक्षण समित्या/सल्लागार मंडळाची स्थापना न करणे आणि विभागीय अधिकाऱ्यांनी करावयाच्या बालगृहांच्या तपासणीतील कमतरता, यांच्या परिणामांची चर्चा पुढील परिच्छेदमध्ये करण्यात आली आहे.

बालगृहांच्या तपासणीतील उणीवा :—

आयुक्तांनी, अशासकीय संस्था आणि शासनातर्फे चालविण्यात येणाऱ्या बालगृहांची अचानक पाहणी आणि तपशीलवार पाहणी करण्यासाठी DWCDOs ना, जुलै २००४ मध्ये विहित केले होते.

सन २००८-१२ या कालावधीत केलेल्या बालगृहांच्या तपासणीत (तपशीलवार आणि आकस्मिक) चाचणी तपासणी केलेल्या नऊ पैकी आठ जिल्ह्यांमध्ये महत्त्वाच्या उणीवा असल्याचे लेखापरिक्षणात आढळून आले **(विवरण क्र. ३)** या उणीवांचे प्रमाण, २००८-१२ या कालावधीत, तपशीलवार तपासणीत १८.७५ टक्के (मुंबई उपनगरे) आणि ९७.९२ टक्के (यवतमाळ) व आकस्मिक तपासणीत ४.१७ टक्के (उस्मानाबाद) आणि १०० टक्के (मुंबई उपनगरे) असे होते.

वृत्तपत्रात बालगृहांच्या कार्यक्षमतेसंबधी प्रसिद्ध झालेल्या प्रतिकूल अहवालाची दखल घेत उच्च न्यायालयाने स्वत:हून (suo moto) एक याचिका दाखल करून घेतली. (ऑगस्ट २०१०) त्याप्रमाणे राज्यातील अशासकीय संस्था आणि विभागातर्फे चालवण्यात येणाऱ्या बालगृहांत घेण्यात येणारी काळजी आणि व्यवस्थापन यांचा दर्जा तपासण्यासाठी राज्य शासनाने नोव्हेंबर-डिसेंबर २०१० मध्ये अनुक्रमे एक राज्य समन्वय समिती आणि सहा विभागीय समित्यांची स्थापना केली. बालगृहांची अचानक पाहणी करून बालगृहांच्या कार्यपद्धतीत सुधारणा राज्य समितीला सुचवण्याची जबाबदारी विभागीय समित्यावर होती. विभागीय समित्यांनी, अशासकीय संस्थांतर्फे मतिमंद मुलांसाठी चालविण्यात येणाऱ्या सहा बालगृहांना भेट दिली असता (फेब्रुवारी आणि मार्च, २०११) असे आढळून आले की, बालगृहांमध्ये शिक्षणाची सोय नव्हती, आरोग्य सुविधा अपायकारक होत्या, बालगृहातून बाहेर पडणाऱ्या मुलांसाठी पुनर्वसन आणि पुनर्गठन योजना आखण्यात आली नव्हती. विभागाने प्रमाणित केलेला कर्मचारी आकृतीबंध अनुसरला नव्हता. त्यामुळे आयुक्तांनी सर्व सहा बालगृहांची मान्यता काढून घेतली (जुलै, २०११) विभागीय अधिकाऱ्यांकडून बालगृहावर देखरेख ठेवण्यामध्ये उणीवा असल्याचे सुद्धा समितीने निदर्शनास आणले.

विभागीय समितीच्या अहवालानुसार पुणे जिल्ह्यातील शिरुर येथील मतिमंद मुलांसाठी असणारे बालगृह बंद केल्यावर, त्यात राहणाऱ्या ३० मुलांपैकी १६ मुले शासकीय मोठ्या मुलांचे बालगृह, येरवडा, पुणे येथे दाखल करण्यात आली. उर्वरीत १४ मुले शिवाजीनगर, पुणे येथे विधी संघर्षग्रस्त बालकांच्या पुनर्वसनासाठी असलेल्या निरीक्षण केंद्रामध्ये दाखल करण्यात आली. बीड जिल्ह्यातील मतिमंद मुलांसाठी असलेली दोन बालगृहे बंद झाल्यावर (सप्टेंबर २०११) त्यामधील १०० मतिमंद मुले त्यांच्या आई-वडिलांकडे सोपविण्यात आली. मतिमंद मुलांना विशेष लक्ष व काळजीची आवश्यकता असते. अशा मुलांना निरीक्षण गृह / विधी संघर्षग्रस्त बाल असलेल्या गृहांमध्ये दाखल करणे बरोबर नव्हते, कारण ह्या केंद्रामध्ये / गृहांमध्ये विशेष काळजी / गरज पुरविण्याची तजवीज नसते. अशा मुलांची पर्यायी पुनर्वसन व्यवस्था योग्य वैद्यकीय सुविधा असलेल्या बालगृहात करण्यात विभाग अपयशी ठरला.

आयुक्तांनी सांगितले की, जिल्हा निरीक्षण अधिकारी आणि निरीक्षण अधिकारी यांची पदे रिक्त असल्यामुळे लक्ष साध्य करता आले नाही.

१.१५ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० व सुधारित २००६ कलम ३५(१) मध्ये जिल्हा किंवा यथास्थिती शहराची निरीक्षण समिती असे नमूद केले आहे. तसेच अधिनियम, २००० मधील कलम ६२(३) मध्ये या अधिनियमाच्या कलम ३५ खाली गठीत केलेली जिल्हा किंवा शहर पातळीवरील निरीक्षण समिती, जिल्हा किंवा शहर सल्लागार मंडळ म्हणूनही काम करील असे नमूद केलेले आहे. यासंदर्भात आयुक्तालयाच्या प्रस्तावास अनुसरून ९ जुलै २०१३ च्या अधिसुचनेद्वारे २४ जिल्ह्यांसाठी व दि. १ जानेवारी २०१४ च्या अधिसुचनेद्वारे ८ जिल्ह्यांसाठी असे एकूण ३२ जिल्ह्यांसाठी जिल्हा सल्लागार मंडळ गठीत करण्यात आलेले आहे.

आदिवासी मागासवर्गीय कृषी संस्था, ता. शहापूर, जि. ठाणे संचलित मतिमंद मुला-मुलींचे बालगृह ता. शहापूर, जि. ठाणे या संस्थेमधील प्रवेशित नामे समीर व इतर चार प्रवेशितांचा अशा एकूण पाच प्रवेशितांचा मृत्यु झाला व इतर प्रवेशित औषधोपचारार्थ शासकीय रूग्णालय, उल्हासनगर - ३, जि. ठाणे येथे उपचारार्थ दाखल असल्याबाबतचे वृत्त दैनिक मुंबई मिरर या वृत्तपत्रात दि. २३ ऑगस्ट २०१० व दि. २४ ऑगस्ट २०१० रोजी प्रसिद्ध झाले. त्यान्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र. १८२/२०१० दाखल केली आहे.

मा. उच्च न्यायलयाच्या आदेशान्वये शासनाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका १८२/२०१० दाखल असून मा.उच्च न्यायालयाने बालकांचे संरक्षणाचे दृष्टीकोनातून प्रा. आशा वाजपैयी यांच्या अध्यक्षतेखाली राज्य समन्वय समिती गठीत करणेबाबत निर्देश दिले

आहेत. त्यानुसार शासन निर्णय क्रमांक G.R.No.PIL २०१०/३००/२०१०/D-८ दि. २९ नोव्हेंबर २०१० अन्वये प्रा. आशा वाजपैयी यांच्या अध्यक्षतेखाली राज्य समन्वय समिती गठीत करण्यात आलेली आहे. तसेच शासन निर्णय क्रमांक G.R.NO.PIL२०१० /३००/२०१० /D-८, दि. २९ डिसेंबर २०१० अन्वये राज्य समन्वय समिती अंतर्गत अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक व पुणे या विभागात विभागीय समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत.

सदर समितीने मतिमंद बालगृह संस्थेची तपासणी करून वेळोवेळी मा.उच्च न्यायालयास अहवाल सादर केलेला आहे. सादर केलेल्या अहवालानुसार विभागाने पूर्तता करून वेळोवेळी अहवाल मा. उच्च न्यायालयास सादर केलेला आहे. तसेच संस्था तपासणीत ज्या संस्थांच्या कामकाजात अनियमितता आढळून आलेली आहे, अशा १७ मतिमंद बालगृह संस्थांची मान्यता रद्द करण्यात आलेली आहे.

शासन निर्णय क्र. बालगृ-२०११/प्र. क्र. ३३८/का-८, दि. ३० मे २०१२ व दि. १० मे २०१३ अन्वये महिला व बाल विकास विभागाच्या नियंत्रणाखाली असलेली मतिमंद मुला-मुलींचे बालगृह, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे हस्तातंरित करणेबाबतचा शासन निर्णय झालेला आहे. त्यानूसार महिला व बाल विकास विभागाकडील १९ मतिमंद बालगृह सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरित झालेली आहे.

श्रीराम डेव्हलपमेन्ट ॲन्ड रिहॅबीलीटेशन सेंन्टर फॉर मेन्टल रिटायर्डेशन संस्था दौंड, जि. पुणे येथील पालकांच्या ताफ्यात दिलेल्या एकूण ११ मतिमंद बालकांना कास्प, पुणे या संस्थेमार्फत बाल संगोपन योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. तसेच मुलांचे निरीक्षण गृह/बालगृह, शिवाजीनगर, पुणे येथे तात्पुरत्या कालावधीत वास्तव्यास असलेल्या ३२ बालकांना विविध संस्थेत हस्तांतर करण्यात आलेले आहे. त्यातील पाच बालकांना पुढील उपचाराकरिता मेंन्टल हॉस्पीटल, पुणे येथे दाखल करण्यात आलेले आहे.

महिला व बाल विकास विभागा अंतर्गत बालकांच्या निवासी संस्थामध्ये गैरप्रकार घडू नये व संस्थेतील कामकाजामध्ये सुधारणा होणेसाठी विभागामार्फत करण्यात आलेली सुधारणात्मक कार्यवाही व उपाय योजना.

१. शासनाचे अ. शा. पत्र १२४, दि. १४ मार्च २०११ अन्वये शासनाने सर्व संस्थांची जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे मार्फत सर्व मतिमंद बालगृहांमधील मुलामुलींची वैद्यकीय तपासणी मनोरूग्ण तज्ज्ञ, स्त्रीरोग तज्ज्ञामार्फत करण्याकरिता सर्व संबंधित जिल्ह्यांना कळविण्यात आलेले आहे.

२. आयुक्तालयाचे पत्र क्र.६२७, दि. ६ मे २०११ अन्वये मतिमंद बालगृह असलेल्या जिल्ह्यातील जिल्हा शल्य चिकीत्सक, १ बाल मनोरुग्ण तज्ज्ञ (Child Psycologist), १ स्त्री रोग तज्ज्ञ (Gynecologist) व १ बालरोग तज्ज्ञ (Pediatrician) यांच्या पथकामार्फत सदर मतिमंद मुला-मुलींच्या संस्थेत वैद्यकीय तपासणी करणेसाठी वरीलप्रमाणे तातडीने तज्ज्ञांची समिती गठीत करण्यात यावी. सदर पथकाने बालगृहात जाऊन तपासणी करावी. तसे शक्य नसल्यास इतर तज्ज्ञांमार्फत तपासणी करून उदा. MBBS डॉक्टर मानसोपचार तज्ज्ञ, समुपदेशक इ. कडून वैद्यकीय तपासणी करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच मा.उच्च न्यायालयाच्या दि. २९.३.२०१२ रोजीच्या आदेशान्वये आयुक्तालयाचे पत्र क्रमांक ३५६६, दिनांक २१ एप्रिल २०१२ अन्वये सह संचालक (रूग्णालये) आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना सर्व मतिमंद बालगृहामधील बालकांची वैद्यकीय तपासणी व संबधितांचे प्रशिक्षण घेणे बाबत कळविण्यात आले आहे.

३. शासन निर्णय क्र. बान्याम-२०१०/प्र.क्र. १८१/का-३ दि. २२ जून २०१० अन्वये विधी संघर्षग्रस्त बालकांसाठी राज्यात ३५ जिल्ह्यांमध्ये गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय बाल न्याय मंडळाला सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी रू.३३,३३,०८५/- (इंटरनेट सुविधा, टेलीफोन, स्टेशनरी, फर्निचर, संगणक, प्रिंटर, फॅक्स इ.) इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

४. शासन निर्णय क्र बाकस-२०१०/प्र.क्र.३३८/का-३, दि. ५ जानेवारी २०११ अन्वये राज्यात ३५ जिल्ह्यांमध्ये गठीत करण्यात आलेल्या बाल कल्याण समितीस सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी रू.३५,०८,०८५/- (इंटरनेट सुविधा, टेलिफोन, स्टेशनरी, फर्निचर, संगणक, प्रिंटर, फॅक्स इ.) इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

५. संस्थामधील प्रवेशितांना व्यवसाय प्रशिक्षण देऊन स्वत:च्या पायावर उभे राहण्याकरिता व्यवसाय प्रशिक्षणासाठी सन २०१०-११ व २०११-१२ या करीता स्वतंत्र निधी मिळणेसाठी नियतव्यय प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

६. बाल न्याय अधिनियमातील तरतुदीनूसार राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये विशेष बाल पोलीस पथक नेमण्यांत आलेले आहे. तसेच प्रत्येक पोलीस स्टेशन मध्ये बाल कल्याण अधिकारी व कर्मचाऱ्यासह विशेष बाल पोलीस पथके स्थापन करण्यात आलेली आहे.

७. शासन निर्णय क्र.बालगृ-२०११/प्र.क्र.१५४/का-८, दि. २८ एप्रिल २०११ अन्वये राज्यातील शासकीय, स्वयंसेवी अनुदानित व विनाअनुदानित बालगृह, निरीक्षण गृह आणि अनुरक्षण गृह यांची तपासणी करण्यासाठी आयुक्तस्तरावरील अधिकारी तसेच क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी यांची कर्तव्य व जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयामध्ये प्रत्येक जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी एका महिन्यात

किमान ४ बालकांच्या निवासी संस्थांची सखोल तपासणी करावयाची आहे. सहायक आयुक्त (बाल विकास) यांनी वर्षामध्ये ४८ संस्थांना, तर उप आयुक्त (बाल विकास) यांनी २४ व आयुक्त यांनी १२ बालकांच्या संस्थांना वर्षातून भेटी द्यावयाच्या आहेत. शासन निर्णयामध्ये बालकांच्या निवासी संस्थामध्ये लैंगिक अत्याचाराच्या घटना घडल्या तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत सदर शासन निर्णयामध्ये नमूद केलेले आहे. तसेच राज्यातील शासकीय, स्वयंसेवी अनुदानित व विनाअनुदानित बालगृह, निरीक्षण गृह आणि अनुरक्षणगृह या संस्थेमध्ये गैरप्रकार झाल्याचे आढळून आल्यास, प्रथम सदर बालकांना अन्यत्र स्थलांतरित करण्याबाबत बाल कल्याण समितीचे आदेश प्राप्त करून जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी प्रवेशितांना स्थलांतरित करावे व त्यांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. अशा संस्थाचालका विरूद्ध बाल न्याय अधिनियमां अंतर्गत फौजदारी कारवाई तात्काळ करावी असे नमूद आहे.

८. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, विशेष बाल पोलीस पथक, बाल कल्याण समिती यांचे प्रशिक्षण घेणेबाबतचा आराखडा तयार करण्यात आलेला असून सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, यांचे दि. ५ व ६ नोव्हेंबर २०११ रोजी ज्युडीसीअल अॅकेडमी, उत्तन - गोराई रोड, उत्तन भाईंदर, जि. ठाणे येथे दोन दिवसाचे प्रशिक्षण घेण्यात आलेले आहे.

९. शासन निर्णय क्र.बालग-२०११/प्र.क्र.२५०/का-८, दि. २२ डिसेंबर २०११ अन्वये बाल न्याय अधिनियमाअंतर्गत बालगृह मान्यतेबाबतचे निकष निश्चित करण्यात आले आहेत.

१०. शासन निर्णय क्र.बालग-२०११/प्र.क्र.२५०/का-८, दि. २२ डिसेंबर २०११ अन्वये संस्था व संस्थेतील बालकांची सर्वांगीण काळजी व संरक्षणाचा सर्वसमावेशक आराखडा (Comprehensive Care Plan) निश्चित करण्यात आलेला आहे.

११. शासकीय आणि स्वयंसेवी संस्थामध्ये स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांच्या सहकार्याने व्यवस्थापन समिती ३६८ संस्थामध्ये स्थापन करण्यात आलेली असून उर्वरीत संस्थामध्ये व्यवस्थापन समिती स्थापन करण्याबाबत पाठपुरावा सुरू आहे.

१२. महिला व बाल विकास विभागातंर्गत कार्यरत असलेल्या प्रत्येक शासकीय गृहातील अधीक्षक यांना मनोविकल प्रवेशितांच्या तातडीच्या उपचारासाठी रूपये ५०००/- इतके स्थायी अग्रिम मंजूर करण्यास शासनाने दि. १६ नोव्हेंबर २०११ नूसार मान्यता देण्यात आली आहे. तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे निर्देशानूसार स्वयंसेवी मतिमंद बालगृहांतील प्रवेशितांच्या तातडीच्या वैद्यकीय उपचारासाठी रू. ५०००/- इतके पेटीकॅश अधीक्षक यांच्याकडे कायमस्वरूपी उपलब्ध करून देण्याबाबत आयुक्तालयाचे पत्र क्र. ३२२ दि. १८ एप्रिल २०११ नूसार सुचित करण्यात आले आहे.

१३. ठाणे व पनवेल येथिल ३५ बालकांच्या काळजी आणि पुनर्वसनासाठीचा दोन वर्षांचा आराखडा राज्य समन्वय समितीने तयार केला असून सदर आराखडा शासनास मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. चिल्ड्रेन एड सोसायटी ही स्वायत्त संस्था असल्याने सदर प्रकल्प चिल्ड्रेन एड् सोसायटी मध्ये राबविण्याकरिता शासनाच्या दि. १२ जानेवारी २०१२ च्या पत्रानुसार शिफारस करण्यात आली आहे. सदर प्रकल्प राबविण्याचा निर्णय हा चिल्ड्रेन एड् सोसायटीचा आहे. सदर प्रकल्प राबविण्याबाबत शासनाने शिफारस केल्याचे राज्य समन्वय समितीस कळविण्यात आले आहे.

१४. आयुक्तालयाने पत्र क्र २९७२, दि. १६ ऑगस्ट २०११ अन्वये जिल्ह्यातील समाज कार्य (MSW) महाविद्यालयांमार्फत बालकांच्या निवासी संस्थांची सामाजिक तपासणी करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार चाईल्ड लाईन उस्मानाबाद, कर्वे समाज सेवा संस्था पुणे, निर्मला निकेतन मुंबई या संस्थांना विनंती करण्यात आली आहे.

१५. महिला व बाल विकास विभागाकडील मतिमंद बालगृहे सामाजिक न्याय विभागाकडे अपंग विकास आयुक्तालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विकलांग व्यक्तीसाठी (समान संधी, हक्कांचे संरक्षण पूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ अंतर्गत कार्यरत असणाऱ्या संस्थाकडे मतिमंद व्यक्तीसाठी सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे मतिमंद बालकांच्या संस्था सामाजिक न्याय विभागाकडे वर्ग करण्याबाबत शासनाने **दिनांक ३० मे २०१२** च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेतलेला आहे. त्याची अंमलबजावणी सुरू आहे.

१६. संस्थेतील लैंगिक अत्याचाराच्या दुर्घटना टाळण्यासाठी मदत होईल याकरीता सर्व बाल विकासाच्या निवासी संस्थांची तपासणी करणेबाबत आयुक्तालयाचे पत्र क्र. ९६५३, दि. ९ डिसेंबर २०११ अन्वये सर्व जिल्हा महिला दक्षता समिती यांना विनंती करण्यात आलेली आहे.

१७. संस्थेतील बालकांची व कर्मचाऱ्यांची उपस्थिती नोंदविण्यासाठी शासनाने मान्यता दिलेल्या बाल विकासाच्या ९६९ संस्थामध्ये बायोमेट्रीक यंत्र बसविणेबाबतची कार्यवाही अंतिम टप्यात आहे.

१८. शासन परिपत्रक क्र.बालगृ-२०१२/प्र.क्र.१२३/का-८, दि. २ मे २०१२ अन्वये बालगृहाची मान्यता तसेच नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यासंदर्भात पाळावयाचे शिष्टाचाराबाबत (Exit Plan / Crisis Management Protocols) तयार करण्यात आलेला आहे.

१९. बालकांच्या व्यक्तिमत्व विकास घडवून आणण्यासाठी आयुक्तालयाचे आदेश क्र ७७४६, दि. १२ ऑक्टोबर २०१२ अन्वये राज्यातील सर्व बालगृहामध्ये Art of Living चे प्रशिक्षण देण्याची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे.

२०. आयुक्तालयाचे परिपत्रक क्र.७१७७, दि. २९ सप्टेंबर २००६ अन्वये निवासी संस्थातील बालकांना पुरेसा आहार न देणे, मारहाण करणे, अत्याचार करणे, त्यांचे शोषण करणे अथवा बालकांस गैर प्रयोजनासाठी राबविणे, वापर करणे असे प्रकार निदर्शनास आल्यास त्यासंबंधित संस्था प्रमुख, कर्मचारी, व्यक्ती यांचेविरूद्ध बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमातील तरतुदीनूसार तात्काळ संबंधित पोलीसाकडे तक्रार दाखल करणेबाबत सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना कळविण्यात आलेले आहे.

२१. आयुक्तालयाचे परिपत्रक क्र. २३३१, दि. ३१ मार्च २००६ अन्वये संस्थांमधील कामकाजाबाबत मार्गदर्शक सूचना सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना कळविण्यात आलेल्या आहेत.

२२. आयुक्तालयाचे पत्र क्र. ५६५३, दि. ९ डिसेंबर २०११ अन्वये सर्व पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक यांना शासकीय व स्वंयसेवी संस्था मार्फत सुरू असलेल्या निवासी मुलींच्या संस्थांना पोलीस विभागा अधिनस्त महिला दक्षता समिती मार्फत तपासणी करणे बाबत कळविण्यात आलेले आहे.

२३. आयुक्तालयाचे परिपत्रक क्र. ८०२, दि. २३ जानेवारी २०१२ अन्वये बाल कल्याण समितीची बैठका बालगृहाच्या जागेमध्ये बोलविण्याबाबत तसेच अशा बैठका विविध बालगृहात घेण्याबाबत कळविण्यात आले आहे.

२४. महिला व बाल विकास विभागामार्फत बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमांतर्गत मान्यताप्राप्त (अनुदानित/ विनाअनुदानित) संस्थामध्ये दाखल असलेल्या मुलांना **अनाथ** असल्याचे प्रमाणपत्र देण्यास शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०११/प्र.क्र.२०९/का-३, दि. १६ जून २०१२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्याचा उपयोग अनाथ मुलांना शैक्षणिक संस्था, व्यवसाय प्रशिक्षण संस्था, रोजगार, नोकरी यामध्ये प्राधान्य मिळण्यासाठी होणार आहे. त्यानूसार कार्यवाही करण्यात येत आहे.

२५. महिला व बाल विकास विभागाअंतर्गत सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या ६ शासकीय व ३ स्वयंसेवी अशा एकूण ९ अनुरक्षणगृहामधील १८ वर्ष पूर्ण होत असलेल्या व पूर्ण झालेल्या प्रवेशितांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील स्वावलंबी पुनर्वसन हया योजनेस शासन निर्णय क्र. क्रमशि-२०११/प्र.क्र. ३३९/का-३, दि. २७ ऑगस्ट २०१२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

२६. शासकीय बालगृहांमधील प्रवेशितांचे पुनर्वसन कार्यक्रमास मदत करण्यासाठी **साथी** या संस्थेस आयुक्तालयाचे पत्र क्र. ७८०१, दि. १५ ऑक्टोबर २०१२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

२७. आयुक्तालयाचे पत्र क्र. ७९७५, दि. २२ ऑक्टोबर २०१२ अन्वये महिला व बाल विकास अधिनस्त संस्थांना जिल्हा परिषद / महानगरपालिका / नगरपालिका मधील महिला व बाल कल्याण समितीचे सभापती यांच्या मार्फत तपासणी करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

२८. एकात्मिक बाल संरक्षण योजनेअंतर्गत Child Tracking and Missing Children याबाबतीत बाल कल्याण समिती, बाल न्याय मंडळ, पोलीस विभागाचे अधिकारी व संस्था प्रमुख यांचे एक दिवसीय कार्यशाळा दि. २७ नोव्हेंबर २०१२ रोजी सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे घेण्यात आली. तसेच बाल कल्याण समिती, बाल न्याय मंडळ, पोलीस विभागाचे अधिकारी व संस्था प्रमुख यांचे प्रशिक्षण वर्ग Child Tracking and Missing Children याबाबतीत सुरू करण्यात आलेले आहेत.

२९. राज्यातील सर्व मुले व प्राधान्याने बाल कल्याण क्षेत्रात कार्यरत असलेल्या शासकीय व स्वयंसेवी संस्थांमध्ये पुनर्वसनासाठी दाखल झालेल्या अनाथ, निराधार, उन्मार्गी मुलांमधील सुप्त गुणांना वाव देऊन त्यांच्यात एकमेकाविषयी बंधुभाव, सांघिक भावना निर्माण होण्यासाठी दरवर्षी ३५ जिल्ह्यांमध्ये ६ विभागीय स्तरावर प्रत्येक नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात चाचा नेहरू बाल महोत्सव आयोजित करण्यास शासन निर्णय क्र. बालगृ-२०१२/प्र.क्र.१६४/का-३, दि. ४ डिसेंबर २०१२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

३०. १२३१ बालकांच्या निवासी संस्थांची एक दिवसीय सखोल तपासणी ६१६ पथकांनी करण्यासाठी निर्णय घेण्यात आला.

३१. सर्व बालकांच्या निवासी संस्थांमध्ये लैंगिक शोषणाच्या घटनांना आळा घालण्यासाठी CCTV कॅमेरे बसविणेसाठी शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे.

३२. बालकांच्या निवासी संस्थामध्ये असलेल्या मुलींशी जास्तीत जास्त संवांद साधल्या शिवाय त्या मोकळ्यापणे बोलू शकणार नाहीत. या करीता या संस्थामध्ये मुख्यसेविका (अंगणवाडी), यांनाही नियमित तिमाही भेटी देणेसाठी आयुक्तालयाचे दि. ३ जुलै २०१३ रोजीच्या परिपत्रकानुसार सूचित करण्यात आलेले आहे. तसेच सर्व संस्थामध्ये सुपदेशकाच्या सेवा उपलब्ध करून देण्याबाबतही सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना कळविलेले आहे जेणेकरून मुलींच्या संदर्भातील शोषणाच्या घटनांना आळा बसेल.

१.१६ परिच्छेद क्र. ४.१.७.३ ICDS मधील कार्यक्षेत्र कर्मचाऱ्यांच्या तपासणीतील उणीवा :-

केंद्र शासनाचे समाजकल्याण मंत्रालयाने जारी केलेल्या (जून आणि नोव्हेंबर १९७६) मार्गदर्शक तत्वांप्रमाणे प्रत्येक CDPO ने दरमहा किमान १८ दिवसांचे दौरे करून अंगणवाडी केंद्रांतील अभिलेख्यांची छाननी, अन्नाचा दर्जा, मुलांची उपस्थिती इ. माहिती घेणे आवश्यक आहे. चाचणी तपासणी केलेल्या ३४ पैकी ३१ केंद्रांमध्ये CDPO नी केलेल्या दौऱ्याचा तपशील पाहता २००७-१२ या कालावधीत अपेक्षित प्रमाणात दौरे झाले नसून एक ते नव्वद टक्के इतकी तूट होती **(विवरण क्र. ४)** दौऱ्यासाठी वाहने उपलब्ध नसणे. तसेच अतिरिक्त कार्यभार यामुळे दौरे कमी झाले असे CDPO नी सांगितले (एप्रिल ते जून २०१२).

ऑगस्ट १९८४ मध्ये केंद्र शासनाने असे विहित केले की, ICDS पर्यवेक्षकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व अंगणवाडी केंद्रांना महिन्यातून एकदा भेट देणे बंधनकारक आहे. याखेरीज या परिवेक्षकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व अंगणवाडी केंद्रांची तपासणी तीन महिन्यांतून एकदा करणे आवश्यक आहे, असे विभागाने नमूद केले आहे (जानेवारी २०१०) २००७-१२ मध्ये पर्यवेक्षकांनी केलेल्या तपासणीतील कमतरता ०.४२ टक्के ते १०० टक्के असल्याचे लेखापरिक्षणात आढळले. अशा तऱ्हेने कार्यक्षेत्र कर्मचाऱ्यांच्या तपासणीमधील कमतरतेमुळे अंगणवाड्यांवरची देखरेख अल्प प्रमाणात होती. विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबर लेखापरिक्षकांनी केलेल्या पाहणीत अंगणवाडी केंद्रांच्या कामकाजात आढळलेल्या उणीवा प्रभावहीन निरीक्षणामुळे झालेल्या प्रतिकुल परिणामाचे निदर्शक असून परिच्छेद ४.१.१३.२ मध्ये याबाबत चर्चा करण्यात आली आहे.

संबंधित CDPo यांनी असे उत्तर दिले (एप्रिल ते जून २०१२) की, पर्यवेक्षकांवर सोपविलेले निवडणुकांचे काम, इतर शासकीय योजनांची अंमलबजावणी या अतिरिक्त कामामुळे निरीक्षणामध्ये कमतरता राहिली.

केंद्र शासनाने ICDS प्रकल्प आणि अंगणवाडी केंद्रांच्या देखरेख व नियंत्रणासाठी निरनिराळ्या पातळीवर ICDS च्या पर्यवेक्षकांपासून ते विभागाच्या सचिवांपर्यंत सुधारित प्रमाणके सांगितले आहेत. (ऑक्टोबर २०१०) सुधारित प्रमाणकांनुसार CDPo ने दरमहा किमान २० आणि सर्व अंगणवाडी केंद्रांना वर्षातून किमान एकदा भेट देणे आवश्यक आहे. तसेच पर्यवेक्षकांनी सर्व अंगणवाडी केंद्रांना दर दोन महिन्यांतून किमान एकदा भेट देणे आवश्यक आहे. या सुधारित प्रमाणकांच्या अंमलबजावणीसाठी विभागाने सप्टेंबर, २०१२ मध्ये म्हणजे जवळ जवळ दोन वर्षांनंतर शासन निर्णय जारी केला.

CDPo आणि पर्यवेक्षकांची पदे रिक्त असल्यामुळे लक्ष्य साध्य करता आले नसल्याचे आयुक्तांनी सांगितले. पुढे असे सांगण्यात आले की, शासनाने विविध स्तरांवर संनियंत्रण आणि आढावा समितीची स्थापना (सप्टेंबर, २०१२) केली आहे ज्यामुळे प्रकल्पाचे प्रभावी रितीने संनियंत्रण करणे शक्य होईल.

१.१७ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

एकात्मिक बाल विकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत कार्यरत असणाऱ्या अंगणवाडी केंद्रांचे कामकाजावर देखरेख ठेवणे तसेच अंगणवाडी सेविकांचा गरोदर महिला, स्तनदा माता, तीव्र कमी वजनाची बालके असलेल्या घरी जाऊन त्यांना या योजनेअंतर्गत लाभ घेणे तसेच घरी घ्यावयाच्या आहार व आरोग्यविषयक घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन करतात.

मुख्यसेविकेच्या बीटमध्ये साधारणत: २५ अंगणवाडी केंद्राचा समावेश असतो. मुख्यसेविकेने प्रत्येक महिन्यातून किमान एकदा तरी प्रत्येक अंगणवाडी केंद्राला भेट देणे अपेक्षित असते. परंतु सद्यस्थितीत राज्यात ग्रामीण/अदिवासी व नागरी प्रकल्पअंतर्गत मुख्यसेविकेचे एकूण ३,८९८ मंजूर पदांपैकी ५७२ पदे रिक्त असून या रिक्त पदांचा कार्यभार नजिकच्या मुख्यसेविकेकडे सोपविण्यात येतो. त्यामुळे उदिष्टपूर्तीमध्ये अडचण निर्माण होते. अशीच परिस्थिती प्रकल्प अधिकाऱ्यांचे बाबतीत असून एकूण ५५३ मंजूर पदांपैकी सद्यस्थितीत १३८ पदे रिक्त आहेत. त्यामुळे एकूण उद्दिष्टपूर्तीसाठी अडचण ठरते.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क) यांचे पद केवळ एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या अंमलबजावणीसाठी असून त्यांचेकडे जिल्हा परिषदेच्या महिला व बाल कल्याण समितीच्या सर्व योजना राबविण्याची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. त्यामुळे उद्दिष्टपूर्तीवर थोडाफार परिणाम होतो.

ज्या प्रकल्पांमध्ये मुख्यसेविकांची पदे पूर्ण भरलेली आहेत, त्या प्रकल्पांमधील सर्व अंगणवाडी केंद्रांची तपासणी प्रत्येक महिन्यातून एकदा करण्यात येते.

तसेच शासनाने आता शासन निर्णय क्र. २७७/का-६, दि. २५ सप्टेंबर २०१२ अन्वये विविध स्तरांवर संनियंत्रण व आढावा समिती गठीत केलेली आहे. राज्य पातळीवर, जिल्हा पातळीवर, प्रकल्प पातळीवर व गाव पातळीवर संनियंत्रण व आढावा समितीची स्थापना केलेली आहे.

राज्यस्तरीय संनियंत्रण व आढावा समितीमध्ये खालील सन्माननीय सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे.

(१)	मुख्य सचिव	- अध्यक्ष
(२)	लोकसभा सदस्य (पाच सदस्य)	- सदस्य
(३)	विधानसभा सदस्य (पाच सदस्य)	- सदस्य
(४)	अपर मुख्य सचिव, शिक्षण	- सदस्य
(५)	अपर मुख्य सचिव, आरोग्य व कुटुंब कल्याण	- सदस्य
(६)	अपर मुख्य सचिव, कृषी व फलोद्यान	- सदस्य
(७)	प्रधान सचिव, नियोजन	- सदस्य
(८)	प्रधान सचिव, वित्त	- सदस्य
(९)	प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज	- सदस्य

त्याचप्रमाणे भरारी पथकाची स्थापना करण्यात आली आहे. माता समितीची स्थापना प्रत्येक अंगणवाडी केंद्रामध्ये करण्यात आली आहे. त्यामुळे अंगणवाडी केंद्राच्या कामावर नियंत्रण ठेवता येणे शक्य होते.

वरील बाबींमुळे आता प्रकल्पाच्या कामकाजावर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे.

बालविकास प्रकल्प अधिकारी (ना.) गट 'अ' संवर्गातील विभागनिहाय रिक्त पदांचा तपशील दिनांक १ मे २०१५ ची सद्य:स्थिती व बालविकास प्रकल्प अधिकारी (ग्रा.), जिल्हापरिषद यांचे वर्ग २ पदावरील माहिती दिनांक ३० नोव्हेंबर २०१५ अखेर याबाबतची माहिती **(विवरण क्र.५)** मध्ये समाविष्ट आहे.

१.१८ परिच्छेद क्र. ४.१.७.४ दक्षता पथकांची स्थापना न करणे :

शासन निर्णयानुसार (सप्टेंबर, २००२) शासन स्तरावर सहसचिव, ICDS यांच्या अध्यक्षतेखाली पथकाची स्थापना करणे आवश्यक होते. या संबंधीचा उल्लेख सन २००६-२००७ च्या नागरी लेखापरीक्षा अहवालाच्या परिच्छेद ५.१.१०.४ मध्ये करण्यात आला होता. ICDS प्रकल्प आणि अंगणवाडी केंद्रांमधील लाभार्थींना मिळणाऱ्या सेवा, जशा पोषण आहार आणि आरोग्य तपासणी, ICDS च्या अंमलदारांची कार्ये इ. साठी दक्षता पथक स्थापन करणे आवश्यक होते.

प्रत्यक्षात सहसचिव ICDS, WCD याच्या अध्यक्षतेखाली दक्षतापथकांची स्थापना ऑगस्ट, २०११ मध्येच करण्यात आली त्यांना दरवर्षी किमान सहा अंगणवाडी केंद्रांना भेटी देऊन या भेटीचा अहवाल विभागाच्या प्रधान सचिवांना बंधनकारक करण्यात आले. त्याचप्रमाणे दक्षतापथकांनी ऑगस्ट, २०११ ते मार्च, २०१२ या कालावधीत चार अंगणवाडी केंद्रांना भेटी देऊन या भेटीत निदर्शनास आलेल्या त्रुटी दूर करण्याच्या सूचना संबंधित केंद्रांना दिल्या. या भेटीचा अहवाल प्रधान सचिवांना सादर करण्यात आला.

मधल्या काळात CDPOs आणि DyCEOS यांच्या द्वारे दक्षतापथकांचे कार्य सुरू ठेवल्याचे आयुक्तांनी सांगितले.

१.१९ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

राज्य शासनाकडून सन २००२ मध्ये सहसचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय भरारीपथक नेमण्यात आलेले असून सदर पथक जरी उशिरा स्थापन झाले असले तरी या योजनेच्या कामकाजाचे संनियंत्रणावर कोणताही परिणाम झालेला नाही. कारण अंगणवाडीच्या कामकाजाचे नियमितपणे सनियंत्रण करण्यासाठी बीट स्तरावर मुख्यसेविका, प्रकल्पस्तरावर प्रकल्प अधिकारी तथा जिल्हास्तरावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) ही यंत्रणा काम करीत आहे. त्यामुळे राज्यस्तरीय समितीची स्थापना उशिरा झाल्यामुळे संनियंत्रण योग्य झाले नाही असे म्हणणे उचित वाटत नाही.

शा.नि. क्र. एबावि-२०११/प्र. क्र.२०१/का-५, दिनांक ४ ऑगस्ट २०११ अन्वये एकात्मिक बाल विकास सेवा योजनेची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी विभागीय स्तरावर भरारीपथकाची स्थापना करण्यात आलेली आहे. या विभागीय स्तरावरील सहा भरारीपथकामध्ये सहा उप आयुक्त दर्जाचे अधिकारी, संबंधित प्रकल्पाचे बाल विकास प्रकल्प अधिकारी, मुख्य सेविका व इतर कर्मचारी यांचा समावेश केलेला

आहे. सदर विभागीय स्तरावरील भरारी पथकाने महिन्यातून किमान एकदा भेटीचा कार्यक्रम आयोजित करून किमान दोन अंगणवाड्यांची अचानक तपासणी करण्याचे अपेक्षित आहे व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णयानुसार राज्यस्तर, आयुक्तस्तर, जिल्हास्तर, प्रकल्पस्तर यावर भरारी पथकाची स्थापना करण्यात आलेली आहे.

राज्यातील एकूण ९७,४६२ अंगणवाडी केंद्र मंजूर असून जून, २०१२ च्या मासिक प्रगती अहवालानुसार राज्यात एकूण ९५,६७३ अंगणवाडी केंद्र ग्रामीण, आदिवासी व नागरी भागांत कार्यरत आहेत. सदर अंगणवाडी केंद्रांमध्ये शा.नि. क्र. एबावि-२००४/प्र.क्र.०२/का-५, दिनांक १८ ऑगस्ट २००६ अन्वये अंगणवाड्यातील ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील मुले, गर्भवती व स्तनदा माता, तीव्र कमी वजनाची बालके यांना शासनाने ठरवून दिलेल्या प्रमाणात आहार पुरविण्यात येतो किंवा नाही तसेच आहाराचा दर्जा लाभार्थ्यांना खाण्यायोग्य आहे किंवा नाही हे तपासणेसाठी (१) गर्भवती स्त्री (२) स्तनदा माता (३) अंगणवाडीतील १ ते ३ वयोगटातील लाभार्थ्यांची माता (४) अंगणवाडीतील ३ ते ६ वयोगटातील लाभार्थ्यांची माता (५) अंगणवाडी कार्यकर्ते (६) A.N.M. उपलब्ध (असल्यास) (७) स्त्री शिक्षिका (असल्यास) (८) स्थानिक सेवाभावी संस्थेची स्त्री सदस्य (असल्यास) (९) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांची माता यांचा समावेश असलेली ग्रामपातळीवर व नागरी विभागातील अंगणवाडी परिक्षेत्रात माता समिती गठीत करण्यात आलेली आहे. त्यामुळे एकूण कामकाजावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यात येत आहे.

१.२० परिच्छेद क्र. ४.१.७.५ मुख्य नियंत्रण अधिकाऱ्याकडे विवरणपत्रे न पाठविणे :

अंगणवाडी केंद्राद्वारे ICDS च्या विविध घटकांच्या प्रगतीचे मासिक अहवाल मुख्य नियंत्रण अधिकाऱ्याकडे CDPO च्या मार्फत ऑनलाईन पद्धतीने पाठविण्यात येतात. आवश्यकतेप्रमाणे उष्मांक असलेला आहार अंगणवाडी केंद्रांतील मुलांना न पुरविणे, बालगृहांचे निरीक्षण, निरीक्षणगृहे, महिलागृहाची तपासणी, लाभार्थींना पुरविण्यात येणाऱ्या आहाराचा दर्जा अशा महत्वाचे त्रुटीचे अहवाल मुख्य नियंत्रण अधिकाऱ्याला पाठविण्याची पद्धत अस्तित्वात नाही.

असा सर्वंकष अहवाल सादर करण्याच्या पद्धतीमुळे मुख्य नियंत्रण अधिकाऱ्यांना कार्यक्रमाच्या परिणामाचा आढावा घेऊन योग्य ते निर्णय घेणे शक्य झाले असते.

या संदर्भात ऑक्टोबर, २०१२ मध्ये झालेल्या निर्गमन बैठकीत प्रधान सचिवांनी लेखापरीक्षणाचे निष्कर्ष मान्य केले आणि संगणकीकृत नियंत्रण आणि मूल्यांकन पद्धत विकसित करण्यात येत असून यापुढे अहवालांचा आयुक्त, CDPOs आणि सचिव पातळीवर एकत्रित विचार करण्यात येईल असे सांगितले.

१.२१ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

महिला आणि बाल विकास :

वरील परिच्छेदाचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक मबाआ-२००३/प्र.क्र. २४४/का-७, दिनांक १० जानेवारी २०१२ अन्वये महसुली विभागाचे धर्तीवर सहा विभागीय कार्यालये निर्माण करण्यात आली असून, शासन निर्णय क्रमांक मबाआ-२०१२/प्र.क्र.१३८/का-७, दिनांक १२ सप्टेंबर २०१२ नुसार विभागांतर्गत नव्याने निर्माण करण्यात आलेल्या विभागीय कार्यालयातील कामास गती येण्याच्या दृष्टीने विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास यांचे अधिकार, जबाबदाऱ्या शासन निर्णयासोबतचे परिशिष्टानुसार निश्चित केल्या आहेत. सदर परिशिष्टामध्ये शासकीय संस्था, अनुदानित संस्था, हॉस्टेल यांना भेटी देऊन तपासणी करणे, तसेच भेटीचे दौरे व त्यांची माहिती वरिष्ठांना देणेबाबतची जबाबदारी निश्चित केलेली आहे.

ICDS :

या योजने अंतर्गत प्रकल्प स्तरावरून प्रत्येक महिन्याला मासिक प्रगती अहवाल इंटरनेटद्वारे प्रकल्पस्तरावरून ऑनलाईन भरण्यात येतात. आयुक्तालयस्तरावरून इंटरनेटद्वारे सर्व अहवाल प्राप्त करून केंद्रशासनाकडून ठरवून दिलेल्या विहित नमुन्यात प्रकल्पनिहाय माहिती संकलित करून असे अहवाल प्रत्येक महिन्याला केंद्रशासनास व राज्यशासनास नियमितपणे पाठविले जातात.त्याचप्रमाणे जनतेसाठी 'आमची अंगणवाडी' हे मासिक सुरू करण्यात आले आहे. मासिक प्रगती अहवाल या विभागाचे संकेतस्थळ *www.icds.gov.in* वर प्रत्यके महिन्याला ठेवण्यात येतात.

ऑनलाईन रिपोर्टींगमुळे कोणत्या प्रकल्पाने माहिती भरली नाहीत, कोणत्या प्रकल्पात कोणती पदे रिक्त आहे, मुलांच्या उपस्थितीचे प्रमाण किती आहे, आहाराचे लाभार्थी किती आहेत, स्तनदा माता, गरोदरमाता यांचे प्रमाण किती आहे, याबाबत त्वरित माहिती उपलब्ध होते व त्यानुसार पुढील कार्यवाही करता येणे शक्य होते.

१.२२ परिच्छेद क्र. ४.१.८ अंतर्गत नियंत्रण :

प्रभावी अंतर्गत नियंत्रण पद्धतीमुळे संपूर्ण व्यवस्थापन प्रक्रियेची विश्वासार्त वाढते आणि संस्थेतर्फे चालविण्यात येणाऱ्या कार्याची व्याप्ती समजते. विभागातील अंतर्गत नियंत्रण पद्धतीवरून आर्थिक अभिलेख आणि अंतर्गत लेखापरिक्षणात पुढील त्रुटी आढळून आल्या.

१.२३ परिच्छेद क्र. ४.१.८.१ रोखवही ठेवणे :

महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ च्या नियम ९८ (२)(iv) अन्वये प्रत्येक महिन्याच्या अखेरीस, विभागप्रमुखाने रोखवहीत नोंदविलेली रोख शिल्लक तपासणे, शब्द आणि आकड्यांमध्ये तारीख आणि स्वाक्षरीसह नोंदविणे आवश्यक आहे. चाचणी तपासणी केलेल्या ३४ पैकी १७ CDPOs च्या कार्यालयांमध्ये असे निदर्शनास आले की, CDPOs नी पाच वर्षांमध्ये देयक क्रमांक, रक्कम काढण्याची तारीख यांची नोंदणी न केल्याने दिर्घकाळ वाटप न केलेल्या रकमांची निश्चिती करता आली नाही.

संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना रोखवही योग्यतऱ्हेने ठेवण्याच्या तपशीलवार सूचना देण्यात आल्याचे आयुक्तांनी सांगितले. २००७ ते २०१२ या कालावधीत रोखवही सदोष ठेवल्याचे क्षेत्रीय कार्यालयांच्या केलेल्या वार्षिक लेखापरीक्षणात आढळल्यावर, ही बाब वेळोवेळी मुख्य नियंत्रण अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणण्यात आली होती. रोखवही ठेवण्यातील अनियमिततांचे सातत्य हे विभागातील अंतर्गत नियंत्रण नसल्याचे द्योतक आहे.

१.२४ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बाल विकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

१. महिला व बाल विकास विभागाच्या सर्व कार्यालयांतील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना रोख नोंदवही लिहिण्याबाबतच्या सविस्तर सूचना परिपत्रक क्र. मबाविआ/पुणे/खर्चमेळ/का. ९/२००९-१०/१०२२२, दिनांक २४ डिसेंबर २००९ व दिनांक २१ जानेवारी २०१३ अन्वये देण्यात आल्या आहेत.

२. तसेच सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी रोख नोंदवही पूर्णपणे लिहिलेली आहे किंवा नाही याबाबत आढावा बैठक दिनांक १६ एप्रिल २०१३ रोजी सहा विभागांत घेण्यात आली. त्यामध्ये ४ कार्यालयांची रोख नोंदवही अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :—

अ. क्र.	कार्यालयाचे नाव	कालावधी
(१)	(२)	(३)
१	बाल विकास प्रकल्प अधिकारी, कल्याण	दि. १.१०.२००९ ते दि. २१.२.२०११
२	बाल विकास प्रकल्प अधिकारी, लालबत्ती	दि. २९.८.२००७ ते दि. २३.३.२००८
३	बाल विकास प्रकल्प अधिकारी, अंधेरी-३	मागील एक वर्षापासून
४	बाल विकास प्रकल्प अधिकारी, अकोला क्र. १	दि. ११.११.२००५ ते दि.१.११.२००६ पर्यंत स्वाक्षरी नाही.

३. ज्या कार्यालयाने अद्याप रोख नोंदवही पूर्ण लिहिलेली नाहीत व ज्यांनी रोख नोंदवहीची माहिती सादर केलेली नाहीत व त्याचेवर प्रशासकीय कार्यवाही करणेस्तव कळविण्यात आलेले आहे.

शासन निर्णय क्र. मबाआ-२०११/प्र.क्र.१९९/का.७, दिनांक २३ एप्रिल २०१३ अन्वये लेखा शाखेच्या कामाकरिता सर्व जिल्ह्यांमध्ये एक सहायक लेखाधिकारी व सहा विभागामध्ये प्रत्येकी एक लेखाधिकारी याप्रमाणे पदे नव्याने निर्माण करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

त्यामुळे रोखवही लिहिण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

१.२५ परिच्छेद क्र ४.१.८.२ रोखवहीचा बँक खात्याबरोबर ताळमेळ न घालणे

CDPOs, Dy.CEOs आणि DWCDOs हे आहरण आणि संवितरण अधिकारी (DDOs) म्हणून काम पाहत होते. आहार, मानधन, विविध योजनांची अंमलबजावणी आणि कर्मचाऱ्यांचे वेतन इत्यांदिसाठी मिळणारा निधी कोषागाराच्या इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सिस्टिम (ECS) द्वारे संबंधित DDOs च्या बँक खात्यात परस्पर जमा होत होता.

११ CDPOs, दोन DWCDOs (मुंबई उपनगरे आणि यवतमाळ) आणि दोन Dy.CEOs (बीड आणि उस्मानाबाद) यांच्या रोखवह्यांची छाननी केली असता, बँक खाते आणि रोखवही यामध्ये दाखविलेल्या शिल्लक रकमेत रु. १७.४१ कोटींची तफावत आढळली **(विवरण क्र.६)** व तफावतीचा ताळमेळ घातला नसल्याचे निदर्शनास आले. (मार्च-एप्रिल २०१२).

आयुक्तांनी सांगितले की, लेखा अधिकारी व सहायक लेखा अधिकारी ही पदे मंजूर करण्यासाठी प्रस्ताव शासनास सादर केला आहे. पदे मंजूर झाल्यावर, ताळमेळ घालण्यात येईल.

१.२६ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बाल विकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

आयुक्तालयाचे परिपत्रक क्रमांक ४०५, दि. २१.१.२०१३ अन्वये सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना रोख नोंदवहीतील शिल्लक रकमेचा बँक खात्यातील शिल्लक रकमेबाबत ताळमेळ घालणेबाबत सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच शासन निर्णय क्रमांक मबाआ-२०११/प्र.क्र.१९५/का.७, दिनांक ८.४.२०१३ अन्वये सर्व विभागीय/जिल्हा महिला व बाल विकास कार्यालयात लेखाधिकारी व सहायक लेखाधिकारी यांची पदे नव्याने निर्माण करण्यात आलेली आहेत. सद्यःस्थितीत नवनिर्मीत पदावर हजर झालेल्या लेखाधिकारी व सहायक लेखाधिकारी यांची बैठक दिनांक १२.११.२०१३ रोजी घेण्यात आली व सदर बैठकीत रोखवहीचा बँक खात्याबरोबर ताळमेळ घालणेबाबत सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे उपरोक्त रु. १७.४१ कोटीच्या तफावतीचा ताळमेळ घालण्यात येऊन भविष्यात अशा प्रकारची तफावत निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे. रोखनोंदवही व बँक खाते यातील तफावतीचा शोध घेऊन ताळमेळ घालण्याबाबत व तसा अहवाल आयुक्तालयास सादर करण्याबाबत आयुक्तालयाचे पत्र क्र. ८१३, दिनांक ३१.१.२०१४ अन्वये संबंधितांना कळविण्यात आले आहे.

१.२७ परिच्छेद क्र. ४.१.८.३ अंतर्गत लेखापरिक्षण :—

आयुक्तांच्या अभिलेख्यांची छाननी केली असता असे आढळून आले की, १९९३ मध्ये, महिला व बाल विकास शाखेत एक सहायक लेखा अधिकारी, एक परिविक्षा अधिकारी, एक वरिष्ठ कारकून अशा कर्मचाऱ्यांचा समावेश असलेला अंतर्गत लेखापरिक्षा कक्ष स्थापन करण्यात आला. २००७-१२ या कालावधीत नियोजित १५६ युनिटपैकी, या लेखापरीक्षा कक्षाने फक्त २३ युनिटचे लेखापरिक्षण केले. या काळात या कक्षाने संबंधित युनिटना ३६१ लेखापरिक्षण परिच्छेद पाठविले. ३२३ परिच्छेदांचे अनुपालन संबंधित युनिटकडून आले नव्हते (एप्रिल, २०१२). ICDS चे कार्य महाराष्ट्रात १९७५ पासून सुरू झाले होते, तरी अंतर्गत लेखापरीक्षा कक्ष ऑगस्ट, २०११ मध्ये स्थापन करण्यात आला, ज्याचे कार्य मार्च, २०१२ पर्यंत सुरू झाले नव्हते.

निर्गमन बैठकीत विभागाने आयुक्त कार्यालयाअंतर्गत लेखापरीक्षा कक्ष सुरू करण्यासाठी परवानगी घेतली होती, असे प्रधान सचिवांनी सांगितले.

१.२८ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बाल विकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

(अ) एकात्मिक बाल विकास सेवा योजनाकडील :— (मुख्य लेखाशिर्ष-२२३६)

(१) सन २०१२-१३ मध्ये २१ प्रकल्पांचा अंतर्गत लेखापरिक्षणचा दौरा कार्यक्रम प्रस्तावित केलेला आहे. यांपैकी खालील कार्यालयांचे लेखापरिक्षण डिसेंबर, २०१३ अखेर पूर्ण केलेले आहे.

(१) बाल विकास प्रकल्प अधिकारी, हडपसर, पुणे,

(२) बाल विकास प्रकल्प अधिकारी, कोथरुड,

(३) बाल विकास प्रकल्प अधिकारी, कल्याण, ठाणे,

(४) बाल विकास प्रकल्प अधिकारी, घोरपडी कोंढवा,

(५) बाल विकास प्रकल्प अधिकारी, सांगली,

(६) बाल विकास प्रकल्प अधिकारी, दापोडी - बोपोडी,

(७) बाल विकास प्रकल्प अधिकारी, अंधेरी - ३.

(२) आयुक्तालयातंर्गत मा. महालेखापाल यांचेकडील प्रलंबित परिच्छेद, नागरी अहवाल, स्थानिक संस्था अहवाल, प्रलंबित तपशीलवार देयके, जिल्हा परिषदांना दिलेले अनुदानाचे निर्धारण, खर्च ताळमेळ, विनीयोजन लेखे व लोकलेखा समितीच्या अनुषगांने सुद्धा कामकाज पहावे लागते त्यामुळे अंतर्गत लेखापरिक्षणासाठी स्वतंत्र पथक असणे अत्यावश्यक आहे.

(ब) महिला व बाल विकासकडील :—(मुख्य लेखाशिर्ष - २२३५)

(१) सन २००७-२०१२ या कालावधीत २३ कार्यालयांचे अंतर्गत लेखापरिक्षण करण्यात आलेले आहे. त्यापैकी ३२३ परिच्छेद प्रलंबित असल्याचे अहवालात नमूद केलेले आहे. त्यापैकी १४ परिच्छेद मान्य करण्यात आले असून सद्यस्थितीत ३०९ परिच्छेद प्रलंबित आहेत.

(२) सन २०१२.१३ मध्ये २८ जिल्हा महिला व बाल विकास कार्यालये व शासकीय संस्थांचा अंतर्गत लेखापरिक्षणाचा दौरा कार्यक्रम प्रस्तावित केलेला आहे. त्यापैकी—

(१) शासकीय पुरुष भिक्षेकरी गृह, चेंबूर,

(२) शासकीय पुरुष भिक्षेकरी गृह, सातारा,

(३) शासकीय पुरुष भिक्षेकरी स्विकार केंद्र, फुलेनगर, पुणे,

(४) शासकीय महिला राज्य गृह, मुंढवा,

(५) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, सोलापूर,

(६) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, नासिक या कार्यालयांचे अंतर्गत लेखापरिक्षण पूर्ण झालेले आहे.

(२) स्वतंत्र पथक निर्मितीसाठी आयुक्तालयामार्फत लेखाधिकारी व सहायक लेखाधिकारी दर्जाची पदे मिळण्याबाबत पाठपुरावा केलेला आहे. शासन निर्णय क्र. मबाआ-२०११ /प्र.क्र.१९९/का.७, दि. २३.४.२०१३ अन्वये लेखापरिक्षणासाठी १४ पदे नव्याने मंजूर झाली असून त्यापैकी १ पद भरले असून १३ पदे रिक्त आहेत. रिक्त पदे भरल्यानंतर पूर्ण क्षमतेने अंतर्गत लेखापरिक्षण करण्यात येईल.

१.२९ परिच्छेद क्र. ४.१.८.४ प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा) यांच्या निरिक्षण अहवालांस दिलेला प्रतिसाद :—

विभागाचे वैधानिक (Statutory) लेखापरिक्षण प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा) I, महाराष्ट्र, मुंबई आणि महालेखाकार (लेखापरीक्षा) II, नागपूर या कार्यालयांकडून केले जाते. दोन्ही कार्यालयांनी पाठविलेल्या २४२ निरीक्षण अहवालातील ४९३ परिच्छेद जून, २०१२ पर्यंत विभागाकडे प्रलंबित होते. ३१ डिसेंबर २०११ पर्यंत पाठविलेल्या, परंतु ३० जून २०१२ रोजी प्रलंबित असलेल्या निरीक्षण अहवाल आणि परिच्छेदांची वर्षनिहाय स्थिती **(विवरण क्र.७)** मध्ये दाखविली आहे.

वरील प्रलंबितावस्था, निरनिराळ्या घटकांकडून लेखापरिक्षणाला मिळालेला अल्प प्रतिसाद आणि आयुक्त विभागाकडून झालेला अपुरा पाठपुरावा हे दर्शविते.

या संदर्भात प्रलंबित परिच्छेदांचा विचार करण्यासाठी ऑगस्ट, २०१२ मध्ये राज्यस्तरीय लेखापरिक्षण समितीची बैठक घेतल्याचे आयुक्तांनी सांगितले.

१.३० ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बाल विकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

अहवालात नमूद केल्यानुसार २४२ निरीक्षण अहवालातील ४९३ परिच्छेद जुन, २०१२ अखेर प्रलंबित आहेत. सदर प्रलंबित परिच्छेदांचा त्वरित निपटारा होण्याच्या दृष्टीने शासन निर्णय क्र. लेपस-२०१२/प्र.क्र.३३/का.४, दि. १३.३.२०१२ नुसार लेखापरिक्षण समिती गठीत करण्यात आली. सदर लेखापरिक्षण समितीच्या महालेखापाल, मुंबई यांचे समवेत मुंबई व पुणे येथे बैठका आयोजित करण्यात आल्या. तसेच महालेखापाल नागपूर यांचेकडेही बैठकीसाठी तारखेची मागणी करण्यात आली.

बैठक आयोजित करण्यापुर्वी सर्व प्रलंबित परिच्छेदांचा अनुपालन अहवालांचे विभागनिहाय बूकलेट महालेखापाल, मुंबई/नागपुर यांना सादर करण्यात आले. त्यानुसार लेखापरिक्षण समितीच्या बैठकांमध्ये सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे परिच्छेद वगळण्यात आले. तसेच वेळोवेळी अनुपालन सादर करून व पाठपुरावा करून एकूण ६२ निरीक्षण अहवाल व १५७ परिच्छेद वगळण्यात आलेले आहेत. दिनांक ३०.६.२०१३ अखेर १८० निरीक्षण अहवालामधील ३३६ परिच्छेद प्रलंबित आहेत. म्हणजेच या विभागाने महालेखाकार यांच्या निरीक्षण अहवालास दिलेला प्रतिसाद निश्चितपणे उत्तम असल्याचे दर्शविते.

१.३१ परिच्छेद क्र. ४.१.९ कायदे नियम, ठराव आदेश, नियमावली इत्यादींचे अनुपालन निधीची वाटणी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन :—

दरवर्षी १० सप्टेंबरला आहरण व संवितरण अधिकारी स्तरावर अंदाजपत्रक तयार करून ते आयुक्तांकडे पाठविणे आवश्यक होते. आयुक्तांनी अंदाजपत्रक एकत्रित करून दरवर्षी १ ऑक्टोबरला शासनाकडे पाठविणे आवश्यक होते. विभागाने केलेला खर्च २२३५ आणि २२३६ या मुख्य लेखाशिर्षाखाली वर्ग केला जातो. महिला आणि बाल विकासासाठी असलेल्या योजनांच्या खर्चासाठी मुख्य लेखाशिर्ष २२३५ तसेच सहा वर्षापर्यंतच्या मुलांना पूरक पोषण आहार देण्यासाठी झालेल्या खर्चासाठी मुख्य लेखाशिर्ष २२३६ वापरण्यात येते.

अंदाजपत्रकातील २२३५ आणि २२३६ या मुख्य शिर्षाखाली करण्यात आलेल्या तरतुदी आणि केलेल्या खर्चाचा तपशील संक्षिप्तपणे **तक्ता-१** मध्ये दाखविण्यात आला आहे.

तक्ता १ : २००७-१२ मधील अंदाजपत्रकातील तरतूद व खर्च २००७-१२

वर्ष	मुळ तरतूद	सुधारित तरतूद	खर्च	शिल्लक	शिलकीची टक्केवारी (रु.कोटीत)
२००७-०८	८७६.२८	१०७५.३७	९६५.६४	१०९.७३	१०.२०
२००८-०९	१०६४.३४	११२८.४०	९७१.५७	१५६.८३	१३.९०
२००९-१०	६८४.२९	१७८४.५३	१३६४.२३	४२०.३०	२३.५५
२०१०-११	१९४९.३६	२०५५.४९	१७०९.४३	३४६.०६	१६.८४
२०११-१२	२४५१.६८	२४००.५८	२३२१.२४	७९.३४	३.३१
	७०२५.९५	**८४४४.३७**	**७३३२.११**	**१११२.२६**	**१३.१७**

स्त्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज, विनियोजन लेखे आणि व्हीएलसी डेटा अंदाजपत्रक आणि खर्च व्यवस्थापनातील त्रुटींची चर्चा पुढे करण्यात आली आहे.

- महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमावलीनुसार, खर्च करणाऱ्या विभागांनी शिल्लक राहणाऱ्या रकमेचा अंदाज आल्यावर, अनुदाने /विनियोजने किंवा त्यांचा काही भाग वित्त विभागाला सर्मपित करणे आवश्यक आहे. परंतु सन २००८-०९ आणि २००९-१० या वर्षात, शिल्लक राहिलेले अनुदान अनुक्रमे रु.८९.९७ कोटी आणि रु.५०.१४ कोटी सर्मपित करण्यात आले नाही.
- सन २००९-१० मध्ये जिल्हा परिषदांना देय असलेले रुपये ४५६.२८ कोटीचे अनुदान (केंद्राचा हिस्सा : रु. ४४३.२८ कोटी आणि राज्याचा हिस्सा : रु. १३ कोटी) (जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाच्या कलम १२३ आणि २६१ अन्वये) ICDS अंतर्गत आस्थापनांच्या खर्चासाठी वापरण्यात आले. यापैकी, रु. ४८.०१ कोटीचे अनुदान, १५,५२८ अंगणवाडी केंद्रांच्या स्थापनेचे लक्ष ठरले असताना, प्रत्यक्षात १०,९३२ केंद्रे उघडण्यात न आल्याने, सर्मपित करण्यात आले.
- विभागाने सन २००९-१० मध्ये अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे मानधन आणि अंगणवाडी केंद्रातील मुलांच्या पोषण आहारासाठी जिल्हा परिषदांसाठी रु.५१४.२२ कोटीची तरतूद योजना बाह्य निधीतून केली होती. यापैकी रु. १३५.९१ कोटी, अंगणवाडी केंद्रे सुरू करण्यास झालेला विलंब आणि आहार खर्चासाठी सुधारित दर लागू न केल्याने, मार्च, २०१० मध्ये सर्मपित करण्यात आले.

- ग्रामीण भागातील प्रकल्पांसाठी, राज्य आणि केंद्र शासनाच्या हिश्श्यापोटी, पोषण आहारासाठी प्रत्येकी रु. ५० कोटीची तरतूद, २००९-१० या कालावधीत केली होती. यापैकी अनुक्रमे रु. १९.२० कोटी आणि रु. २९.७३ कोटीची तरतूद, १०२ नवीन CDPO कार्यालयांतर्गत नवीन अंगणवाडी केंद्रे सुरू करण्यास झालेला विलंब आणि आहार खर्चासाठी सुधारित दर लागू न केल्याने, मार्च-२०१० मध्ये समर्पित करण्यात आली.

२००७-१२ या कालावधीत मुख्य लेखाशिर्षनिहाय प्राप्त निधी व त्यातून केलेला खर्चाचा तपशील **(विवरण क्र. ८)** मध्ये देण्यात आला आहे.

अंगणवाडी केंद्रामधील लाभार्थींच्या मतांचा विचार करून आयुक्त कार्यालय आणि यशदा संस्थेच्या माध्यमातून अंदाजपत्रक तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आल्याचे आयुक्तांनी सांगितले. याखेरीज शासनाने DWCDO आणि विभागीय उपायुक्त कार्यालयांमध्ये महाराष्ट्र वित्त आणि लेखा संवर्गातील द्वितीय आणि तृतीय श्रेणीची पदे मंजूर केली असून ती भरल्यावर अचूक अर्थसंकल्प अंदाजपत्रक तयार करता येईल. असेही आयुक्तांनी सांगितले.

१.३२ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बाल विकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महिला व बाल विकास विभागामार्फत महिला व बालकांचे कल्याण तसेच पुनर्वसन व एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालके, गरोदर व स्तनदा माता, किशोरवयीन मुलींसाठी पोषण आहार, अंगणवाडी सेविका व मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांना मानधन या योजना राबविण्यासाठी २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण या अंतर्गत १५१ आहरण व संवितरण अधिकारी व २२३६-पोषण आहार या अंतर्गत एकूण ६१९ आहरण व संवितरण अधिकारी असे एकूण ७७० आहरण व संवितरण अधिकारी यांना या दोन मुख्य लेखाशीर्षाखाली योजना राबविण्यासाठी तरतुदी वितरित केल्या जातात.

सन २००८-०९ आणि २००९-१० मध्ये रुपये ८९.९७ कोटी व रु. ५०.१४ कोटी अपेक्षित बचत वित्त विभागास समर्पित करण्यांत आली नसल्याच्या आक्षेपाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की,

शासन निर्णय क्र.बीजीटी-२००९/प्र.क्र.९६/का-४, मंत्रालय, मुंबई दि. ३१ मार्च २००९ अन्वये मुख्य लेखाशिर्ष-२२३६ पोषण आहार मागणी क्रमांक एक्स-१ या लेखाशिर्षाखाली सन २००८-२००९ च्या तरतूदीतील एकूण शिल्लक रक्कम रु.९६.४९ कोटी समर्पित करण्यात आली आहे.

सन २००९-१० मध्ये केंद्र हिस्सा व राज्य योजनांतर्गत जिल्हा परिषदांना व पी.एस.ॲक्ट अधिनियम १२३ आणि २६१ अन्वये रु. ४४३.२८ कोटी व १३ कोटी तरतूद मिळाली. तथापि, रक्कम रु. ४६.०१ कोटी व रु. २ कोटी समर्पित करण्यात आले या आक्षेपाचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, सन २००९-१० मध्ये केंद्र हिस्सा व राज्य योजनांतर्गत जिल्हा परिषदांना व पी.एस.ॲक्ट अधिनियम १२३ आणि २६१ अन्वये रु.४४३.२८ कोटी व १३ कोटी तरतूद मिळाली. तथापि, मार्च, २०१० अखेर १०९३२ अंगणवाडी केंद्र सुरू न झाल्याने रक्कम रु. ४६.०१ कोटी व रु. २ कोटी समर्पित करण्यात आले.

यापूर्वीच्या अर्थसंकल्पीय अंदाज, योजनेत्तर व योजनांतर्गत योजनांकरिता तयार करण्याच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्यात आली असून, सन २०११-१२ पासून प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या अंगणवाड्यांकरिता अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये मागणी करण्यात आलेली आहे. या अगोदरच्या बचतीची टक्केवारी लक्षात घेता खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

१. सन २०१३-१४ चे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्याकरिता दि. १०.०९.२०१२ च्या परिपत्रकान्वये दि. १७.०९.२०१२ ते २६.०९.२०१२ या कालावधीमध्ये प्रत्यक्ष विभागीय स्तरावर सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या बैठका आयोजित करून त्यांचेकडून प्रत्यक्ष माहितीच्या आधारे अर्थसंकल्पीय अंदाज प्राप्त करून घेवून सादर करण्यात येत आहेत.

२. योजनांचे लाभार्थी मंजूर व रिक्त पदे, कार्यरत अंगणवाड्या इ. बाबी लक्षात घेऊन अंदाजपत्रक तयार करण्याबाबतचे प्रशिक्षण आयुक्तालय व यशदा मार्फत सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना दिलेले आहे.

३. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी व विभागीय उप आयुक्त स्तरावर महाराष्ट्र वित्त व लेखा संवर्गातील अनुक्रमे वर्ग-३ व वर्ग - २ ची पदे प्रस्तावित केलेनुसार मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदर पदे वित्त विभागामार्फत भरण्यात येत आहेत. त्यामुळे अंदाजपत्रक तयार करताना अचूकता येईल.

१.३३ परिच्छेद क्र. ४.१.९.१ उपयोगिता प्रमाणपत्र पाठविण्यातील विलंब :—

मार्च, २०१२ पर्यंत, रु.१,११५.५३ कोटी निधीची २१३८२ उपयोगिता प्रमाणपत्रे (Utilisation Certificates) पाठविण्यात आली नव्हती. हे अनुदानित संस्थांनी द्यावयाच्या प्रमाणपत्रांवर विभागाचे नियंत्रण नसल्याचे द्योतक आहे **(विवरण क्र.९).** अशा तऱ्हेने वेळेवर निधी वापराचे प्रमाणपत्र न पाठवल्यामूळे निधीचा चुकीचा वापर होऊ शकतो.

उपयोगिता प्रमाणपत्रे प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १ , मुंबई आणि महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयत्ता) २, नागपूर यांच्याकडे पाठविण्यात आली असून निपटारा प्रमाणपत्र (Clearance Certificate) अद्याप प्राप्त झाले नसल्याचे आयुक्तांनी सांगितले.

१८,७०४ प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रांपैकी १४,०२४ बाबींची प्रमाणपत्रे प्राप्त न झाल्याचे (नोव्हेंबर, २०१२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १ , मुंबई यांच्या कार्यालयातून खातरजमा केल्यामुळे हे उत्तर स्विकारार्ह नाही.

१.३४ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्राया संदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महिला व बालविकास आयुक्तालयस्तरावरून विशेष मोहिम राबवून प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रे प्राप्त करून घेऊन महालेखापाल, मुंबई/नागपूर यांचेकडे सादर करण्यात आलेले आहे.

यापुढे नियमितपणे उपयोगिता प्रमाणपत्रे पाठविण्याची दक्षता घेण्यात येईल.

१.३५ परिच्छेद क्र. ४.१.९.२ जिल्हा परिषदांनी शिल्लक निधी ठेवून घेणे.

महाराष्ट्र शासन, वित्त विभागाने जिल्हा परिषदांना निधीचा वापर पुढील आर्थिक वर्ष अखेर पर्यंत करण्याची परवानगी दिल्याचे निर्देश दिलेले (जून-२००८) आहेत. त्यानंतर शिल्लक निधी शासन खात्यात त्वरेने जमा करावयाचा होता. सात पैकी पाच उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अभिलेख्यांची तपासणी करतांना असे आढळून आले की, २००७-०८ ते २००९-१० या कालावधीत, पुरक पोषण आहार योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या निधी पैकी रु.५.८३ कोटी इतका निधी अखर्चित राहिला. परंतु संबंधित उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अखर्चित रक्कम जून २०१२ पर्यंत शासन खात्यात जमा केली नव्हती.

आयुक्तांनी सांगितले की विभागीय आयुक्तांना निधी वापराचा आढावा घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

१.३६ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्राया संदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

विभागीय उप आयुक्त कार्यालयामध्ये लेखाअधिकारी हे पद नव्याने निर्माण करण्यांत आले असून सदर कामे विभागीय उप आयुक्त यांनी लेखाअधिकारी यांचेकडून पूर्ण करून घेणे तसेच निधी वापराबाबतचा आढावा घेण्याच्या सूचना देखिल दिलेल्या आहेत.

१.३७ परिच्छेद क्र. ४.१.९.३ जिल्हा परिषदांना दिलेल्या अर्थसहाय्याची निर्धारणा न करणे—

महाराष्ट्र शासन, जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत केलेल्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी किंवा अभिकरणासाठी राबविलेल्या योजना, जसे वैयक्तिक लाभ योजना, याकरिता अर्थसहाय्य देते.

ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या सूचनांप्रमाणे (मे, २०००) नियंत्रण अधिकाऱ्यांने जिल्हा परिषदांना दिलेल्या अर्थसहाय्याचा वापर नियोजित प्रयोजनासाठी केल्याची खात्री करण्याकरिता, प्रतिवर्षी १० एप्रिल ते १५ जुलै दरम्यान, दिलेल्या निधीची निर्धारणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार खर्चातील अधिक्य/बचतीचे वार्षिक तत्वावर समायोजन करण्यात यावे.

तपासणीत असे आढळून आले की, जिल्हा परिषदांना दिलेल्या अनुदानाची निर्धारणा १९९५-९६ पासून प्रलंबित होती. तपशील तक्ता २ मध्ये दिलेला आहे.

तक्ता २- जिल्हा परिषदांना दिलेल्या अर्थसहाय्याची प्रलंबित निर्धारणा, मार्च २०१२ रोजी.

अ.क्र.	जिल्हा परिषदेचे नांव	निर्धारण प्रलंबित पासून	
		मुख्य शीर्ष २२३५ (सामाजिक सुरक्षा आणि कल्याण)	मुख्यशीर्ष २२३६ (पोषणआहार)
(१)	(२)	(३)	(४)
१	२ (जालना, परभणी)	१९९९-२०००	१९९५-९६
२	१ (हिंगोली)	२००१-०२	१९९५-९६
३.	२ (ठाणे,वाशिम)	२००६-०७	१९९५-९६
४	१ (पुणे)	२००७-०८	१९९५-९६
	२ (कोल्हापूर, सिंधुदूर्ग)	२००७-०८	२००९-१०
५	७ (नाशिक, नंदुरबार, जळगांव, गडचिरोली, वर्धा, नांदेड, लातूर)	२००७-०८	१९९५-९६
६	९ (रायगड, रत्नागिरी, अहमदनगर, अमरावती, नागपूर, भंडारा, चंद्रपूर, औरंगाबाद, बीड)	२००८-०९	१९९५-९६
७	१ (सातारा)	२००९-१०	२००८-०९
८	१ (बुलढाणा)	२००९-१०	२००९-१०
९	४ (सांगली, अकोला, यवतमाळ, गोंदीया)	२०१०-११	१९९५-९६
१०	३ (सोलापूर, धुळे, उसमानाबाद)	२०११-१२	१९९५-९६

स्त्रोत : आयुक्तांनी दिलेल्या माहितीनुसार

आयुक्तांनी सांगितले की, जिल्हा परिषदांना अखर्चित अर्थसहाय्याचा तपशील देण्यांच्या सूचना देण्यात आल्या (सप्टेंबर २००९) असून तपशील न दिल्यास पुढील अर्थसहाय्य रोखून धरण्यात येईल.

उत्तर स्विकारार्ह नाही. नियंत्रण अधिकाऱ्यांनी योग्यवेळी निर्धारणा न केल्यामुळे, विभाग, इतक्या उशीराने, अर्थसहाय्याचा वापर नियोजित प्रयोजनासाठी केल्याची खात्री करू शकत नाही.

१.३८ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

ICDS

एकात्मिक बालविकास सेवा योजनेचा कार्यविस्तार खूप मोठा आहे. एकूण ५५३ प्रकल्प कार्यरत आहे. त्यामुळे मूल्यनिर्धारण करणे शक्य झाले नाही. तसेच मूल्यनिर्धारणाचे कामासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्याने मूल्यनिर्धारणाचे काम प्रलंबित राहीले आहे.

आता शासनाने मूल्यनिर्धारणासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे मूल्यनिर्धारणाचे प्रलंबित काम पूर्ण करण्यात येत आहे.

महिलाविकास

जालना, परभणी, हिंगोली, ठाणे, वाशिम, पुणे कोल्हापूर, सिंधुदूर्ग, नाशिक, नंदुरबार, जळगांव, गडचिरोली, वर्धा, नांदेड, लातूर, रायगड, रत्नागिरी, अहमदगनर, अमरावती, नागपूर, भंडारा, चंद्रपूर, औरंगाबाद, बीड, सातारा, बुलडाणा, सांगली, अकोला, यवतमाळ, गोंदिया, सोलापूर, धुळे, उस्मानाबाद, याप्रमाणे सर्व जिल्हा परिषदांचे **मुख्य शीर्ष २२३५ (सामाजिक सुरक्षा आणि कल्याण)** दिलेल्या अनुदानाची निर्धारणा १९९५-९६ पासून प्रलंबित कालावधीचे मूल्यनिर्धारणाची सद्यस्थितीतील माहिती तात्काळ सादर करणेबाबत सर्व विभागीय उपआयुक्त यांना आयुक्तालयाचे पत्र क्र. ७७७१, दिनांक ३०.११.२०१३ अन्वये कळविणेत आले आहे.

मुख्यलेखाशिर्ष - २२३५

महिला व बाल कल्याण जिल्हा परिषदांची अनुदान मूल्यनिर्धारणाची ०२.०५.२०१३ अखेरची सद्यस्थिती

सन १९९२ ते २०११ पर्यंत

अ. क्र.	जिल्हा परिषद	यापूर्वी शासनास सादर करणेत आलेला मूल्य निर्धारण अहवाल		आक्षेप पुर्ततेसाठी जिल्हा परिषदांना परत पाठविलेले	अद्याप मूल्यनिर्धारण न झालेले
		कालावधी	पत्र क्र. व दिनांक		
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	**ठाणे**	१९९४-९५ ते १९९८-९९	पत्र क्र.बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते ९८-९९/का-२/७२, दिनांक २७/३/२०००	१९९९-२००० ते २००५-०६ क्र. ०९ , दिनांक ०१/०४/२०११	सन २००६-०७ ते २०११-१२
२	**सिंधुदुर्ग**	१९९४-९५ ते १९९८-९९	पत्र क्र.बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते ९८-९९/का-२/७२, दिनांक २७/३/२०००	१९९९-२००० ते २००६-०७ दि. २८/४/२००९	सन २००७-०८ ते २०१०-११ व २०११-१२
३	**सातारा**	१९९४-९५ ते १९९८-९९	पत्र क्र.बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते ९८-९९/का-२/७२, दिनांक २७/३/२०००		सन २००९-१०ते २०१०-११
		९९-२००० ते २००६-०७	क्र.४६८७, दि. ३१/१०/२०११		
		सन २००७-०८ व २००८-०९	जा.क्र.मबाविआ/का-६/प्र-५/२०१२-१३/ ८२७०, दिनांक ०३/११/२०१२		
४	**सोलापूर**	१९९४-९५ ते १९९८-९९	पत्र क्र.बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते ९८-९९/का-२/७२, दिनांक २७/३/२०००	सन १९९९-२००० ते २०१०-११ १) १९९९-२००० , २०००-०१, २००१-०२ व २००२-०३ व २००८-०९ ते २०१०-११ चे अहवाल तपासले परंतु अखर्चित रकमांबाबतचे चलन व यादी यात तफावत आढळली असल्याने संबंधित कर्मचाऱ्यास आयुक्तालयास पाठवून देणेबाबत कळविले तसेच सन २००३-०४ ते २००७-०८ चे अहवाल आक्षेप पूर्तता करून सादर करणेबाबत कळविले. पत्र क्र.८१४, दिनांक २३/१/२०१२	सन २०११-१२
५	**कोल्हापूर**	१९९३-९४ १९९८-९९	पत्र क्र.बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते ९८-९९/का-२/७२, दिनांक २७/३/२०००	१९९९-२००० ते २००६-०७ १) सन १९९९-२०००ते २००६-०७ आक्षेप पूर्ततेसाठी पाठविले क्र.६०१५, दि. ३/९/२०१० पैकी २००३-०४ ते २००६-०७ चे प्राप्त दि.२७/१२/२०१०	२००७-०८ ते २०१०-११ व २०११-१२
		सन २००३-२००४ ते २००६-२००७	जा.क्र.मबाविआ/का-६/प्र-५/२०१२-१३/ ८२७०, दिनांक ०३/११/२०१२		
६	**नाशिक**	१९९४-९५ ते १९९८-९९	पत्र क्र.बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते ९८-९९/का-२/७२, दिनांक २७/३/२०००	१) १९९९-२००० ते २००६-०७ दिनांक ९/७/२००८ २) सन २००३-०४ ते २००६-०७ क्र.९००३, दि. ९/११/२००९ ३) स्मरणपत्र क्र.१४२१,	१) १९९९-२००० ते २००६-०७ २) २००७-०८ ते २००९-१०

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
				दिनांक २३/२/२०१० ४) आक्षेप पूर्तता न झालेले १९९९-२००० ते २००६-०७ व अद्याप मूल्य निर्धारण न झालेले २००७-०८ ते २००९-१० चे अहवाल मागविले पत्र क्र.७४४२, दिनांक ९/४/२०१०	
७	**नंदुरबार** १ जुलै, १९९८ पासून नव्याने निर्मिती			१) २००२-०३ ते २००६-०७ दि. ८/४/२००८ २) २००७-०८ ते २०११-१२ तसेच सन १९९८-९९ ते २००६-०७ या कालावधीचे अहवाल आक्षेप पूर्तता करून सादर करणेबाबत पत्राने कळविले. दिनांक २७/०६/२०१२	१९९८-९९ ते २००१-०२ व २००७-०८ ते २०११-१२.
८	**जळगांव**	१९९४-९५ ते १९९८-९९	पत्र क्र.बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते ९८-९९/का-२/७२, दिनांक २७/३/२०००	२००७-०८ ते २००९-१० चे अहवाल मागविले पत्र क्र.७४३८, दि. ९/१०/२०१०	२००७-०८ ते २०१० ११ व २०११-१२.
		१९९९-२००० ते २००६-०७	क्र.४६८७, दि. ३१/१०/२०११		
९	**अहमदनगर**	१९९४-९५ ते १९९८-९९	पत्र क्र.बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते ९८-९९/का-२/७२, दिनांक २७/३/२०००		२००८-०९ ते २०१०-११
		१९९९-२००० ते २००७-०८	पत्र क्र.मबाविआ/का-६/प्र.५/२०१२-१३/ ५१४४, दिनांक ५ जुलै २०१२		
१०	**अकोला**	१९९४-९५ ते १९९८-९९	पत्र क्र.बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते ९८-९९/का-२/७२, दिनांक २७/३/२०००	९९-२००० ते २००९-२०१० पत्र क्र.४२१८, दिनांक २५/०६/२०१२	सन २०१०-११ व २०११-१२
११	**बुलडाणा**	१९९६-९७ ते १९९७-९८	पत्र क्र.बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते ९८-९९/का-२/७२, दिनांक २७/३/२०००	२००४-०५ ते २००९-१० क्र.४३४०, दिनांक ४/६/२०१२	१) १९९४-९५, १९९५-९६ व १९९८-९९ ते २००३-०४ अद्याप मूल्यनिर्धारण न झालेले.
		सन २००४-०५ ते २००९-१०	जा.क्र.मबाविआ/का-६/प्र-५/२०१२-१३/ ८२७० दि. ३/११/२०१२		
१२	**नागपूर**	१९९४-९५ ते १९९८-९९	पत्र क्र.बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते १९९८-९९/का-२/७२, दिनांक २७/३/२०००	१९९९९-२००० ते २००७-०८, दि. १०/८/२००९	२००८-०९ ते २०१०-११ व २०११-१२
१३	**गोंदीया**	सन २००३-०४ पासून नव्याने निर्मिती. २००३-०४ ते २००६-०७	जा.क्र.मबाविआ/का-६/प्र.५/२०११.१२/ ४६८७, दिनांक ३१/१०/२०११	२००८-०९ व २००९-१० पत्र क्र. २२८१ दिनांक १४/०३/२०१२ अन्वये जिल्हा परिषदेस पाठविले	२०१०-११, २०११-१२
		सन २००७-०८	जा.क्र.मबाविआ/का-६/प्र-५/२०१२-१३/५१४४ दि. ०५/०७/२०१२		
१४	**गडचिरोली**	१९९४-९५ ते १९९८-९९	पत्र क्र.बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते १९९८-९९/का-२/७२, दिनांक २७/३/२०००	९९-२००० ते २००६-०७ आक्षेप कळविले पत्र क्र. ८२९, दिनांक २३/०१/२०१२ आक्षेप पूर्ततेबाबत पत्र दिनांक २७/६/२०१२ देण्यांत आले.	१) आक्षेप पूर्ततेसाठी पाठविलले सन १९९९-२००० ते २००६-०७

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
					(२) अद्याप मूल्य निर्धारण न झालेले सन २००७-२००८ ते २०१०-२०११ चे अहवाल.
१५	**वर्धा**	सन १९९४-९५ ते २००६-०७	जा.क्र.मबाविआ/का-६/प्र-५/२०१२-१३/५१४४ दि. ०५/०७/२०१२		मूल्य निर्धारण न झालेले २००७-२००८ ते २०११-१२
१६	**औरंगाबाद**	१९९४-९५ ते १९९८-९९	पत्र क्र.बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते ९८-९९/का-२/७२, दिनांक २७/३/२०००	१९९९-२००० ते २००७-२००८ क्र.८९२१, दि.४/११/२००९ अन्वये आक्षेप पूर्ततेकरिता परत पाठविले स्म. पत्र क्र.२९६३, दि. २३/४/२०१० अन्वये मागविले.	सन २००८-२००९ ते २०१०-२०११ व २०११-२०१२
१७	**जालना**	१९९४-९५ ते १९९८-९९	पत्र क्र.बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते ९८-९९/का-२/७२, दिनांक २७/३/२०००	– पत्र क्र. ३११७, दि. १४/७/२००८ क्र.२९६५, दि. २३/४/२०१० अन्वये मू.नि. करून अहवाल सादर करणेबाबत कळविले आहे.	सन १९९९-२००० ते २०११-२०१२
१८	**परभणी**	१९९४-९५ ते १९९८-९९	पत्र क्र.बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते ९८-९९/का-२/७२, दिनांक२७/३/२०००	पत्र क्र. ३११७, दि. १४/७/२००८ व क्र.४४, दि. २/१/२००९, क्र.२९६४ दि.२३/४/२०१०, क्र.२९६४, दि.२३/४/२०१० अन्वये मू.नि. करून अहवाल सादर करणेबाबत कळविले.	सन १९९९-२००० ते २०११-२०१२
१९	**हिंगोली**	सन २००१ पासून नव्याने निर्मिती		क्र.३११८,दि.१४/७/२००८, क्र.३१०४, दि.२८/४/२०१० अन्वये मूल्य निर्धारण करून अहवाल सादर करणेबाबत कळविले. **कारणे दाखव नोटीस दिली आहे. क्र.१४१६,दि.८/२/१२ मू.नि. झाल्याचे जि.प.ने कळविले आहे त्यानुसार जि.म.बा.वि.अ. याना अहवाल आयुक्तालयास पाठविणेबाबत कळविले. पत्र क्र.४३६९, दि.५/६/१२**	२००१-२००२ ते २०११-२०१२ चे अहवाल
२०	**नांदेड**	१९९५-९६ ते १९९७-९८	पत्र क्र.बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते ९८-९९/का-२/७२, दिनांक २७/३/२०००	२००३-०४ ते ०५-०६. पत्र क्र. ८५, दिनांक ५/१/२०१० स्मरणपत्र क्र. २९६८, दि.२३/४/२०१०	सन १९९८-१९९९ ते २००२-२००३ व सन २००६-२००७ ते २०११-२०१२
२१	**उस्मानाबाद**	१९९४-९५ ते १९९८-९९	क्र. बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते ९८-९९/२५३, दिनांक ५/१/२००१		२०११-२०१२
		९९-२००० ते २००६-०७	जा.क्र.मबाविआ/का-६/प्र.५/२०११.१२/ ४६८७, दिनांक ३१.१०.२०११		
		२००८-२००९ ते २०१०-२०११	जा.क्र.मबाविआ/का-६/प्र-५/२०१२.१३/५१४४ दि. ५/७/२०१२		
२२	**लातूर**	१९९४-९५ ते १९९८-९९	पत्र क्र.बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते ९८-९९/का-२/७२, दिनांक२७/३/२०००	१९९९-२००० ते २००६-०७ आक्षेप पूर्ततेसाठी पाठविले पत्र क्र.२०३, दि.	सन २००७-२००८ ते २०१०-२०११ चे अहवाल.

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
२३	**अमरावती**	१९९६-१९९७ ते १९९७-१९९८	पत्र क्र.बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते ९८-९९/का-२/७२, दिनांक २७/३/२०००	१९९८-१९९९ ते २००७-०८ आक्षेप पूर्ततेसाठीपाठविले पत्र क्र.९००४, दि ९.११.२००९	सन २००८-२००९ ते २०१०-२०११
२४	**चंद्रपूर**	१९९४-१९९५ ते १९९८-१९९९	पत्र क्र.बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते ९८-९९/का-२/७२, दिनांक२७/३/२०००	२००३-०४ ते २००७-०८ आक्षेप पूर्ततेसाठी पाठविले पत्र क्र.९५३१, दि २५.११.२००९	सन १९९९-२००० ते २००२-२००३ व २००८-२००९ ते २०११-२०१२
२५	**धुळे**	१९९४-१९९५ ते १९९८-१९९९	पत्र क्र.बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते ९८-९९/का-२/७२, दिनांक२७/३/२०००	२००८-२००९ ते २०१०-११ आक्षेप पूर्ततेसाठी पाठविले पत्र क्र.४३५०, दि ५.६.२०१२	सन २००८-२००९ ते २०१०-२०११
		१९९९-२००० ते २००६-२००७	पत्र क्र. ४६८७, दि. ३१.१०.२०११		
		२००७-२००८ व २०११-१९१२	पत्र क्र. मबाविआ/का.६/प्र.५/१२.१३/८२७०, दि. ३.११.२०१२		
२६	**पुणे**	१९९४-१९९५ ते १९९८-१९९९	पत्र क्र.बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते ९८-९९/का-२/७२, दिनांक२७/३/२०००		सन २००७-२००८ ते २०११-२०१२
		१९९९-२००० ते २००६-२००७	पत्र क्र. ४६८७, दि. ३१.१०.२०११		
२७	**रत्नागीरी**	१९९४-१९९५ ते १९९८-१९९९	पत्र क्र.बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते ९८-९९/का-२/२५३, दिनांक ५.१.२००१	१९९९-२०००० ते २००७-२००८ आक्षेप पूर्ततेसाठी पाठविले पत्र क्र. , दि २२.६.२०१२	२००८-२००९ ते २००९-२०१०
२८	**रायगड**	१९९४-१९९५ ते १९९८-१९९९	पत्र क्र.बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते ९८-९९/का-२/७२, दिनांक २७/३/२०००	१९९९-२०००, २०००-२००१ व २००३-२००४ ते २००७-२००८	२००१-२००२, २००२-२००३, २००८-२००९ ते २०१०
२९	**सांगली**	१९९३-१९९४ ते १९९७-१९९८	पत्र क्र.बीयूडी-३९९/मुनि/९४-९५ ते ९८-९९/का-२/७२, दिनांक २७/३/२०००	२००१-०२ ते २००९-१० आक्षेप पूर्ततेसाठी पाठविले पत्र क्र. ५८५४, दि १७.१२.२०११	२०१०-२०११ व २०११-२०१२
		१९९८-१९९९ व १९९९-२०००	पत्र क्र. मबाविआ/का.६/प्र.५/१२.१३/८२७०, दि. ३.११.१२		

वरीलप्रमाणे अहवाल शासनास सादर केले असून, त्या अनुषंगाने जिल्हा परिषद व शासन यांच्यामधील येणे-देणेच्या रकमा निश्चित करून पुढील कार्यवाही करणे सोईचे होणेकरिता मार्गदर्शक तत्वे व पुढील आदेश शासन स्तरावरुन प्राप्त होणेसाठी या कार्यालयाने पुढील प्रमाणे वारंवार ग्रामविकास विभागास पत्राद्वारे विनंती केली आहे.

अ.क्र. (१)	या कार्यालयाचे पत्र क्र. व दिनांक (२)
१	बीयूडी-३/ २०००-२००१/९४-९५ ते ९८-९९/मुनि/का-२/१९५, दिनांक ४/९/२०००
२	बीयूडी-३/९४-९५ ते ९८-९९ /मुनि/२०००-२००१/का-२/२२५/दिनांक ८/११/२०००
३	बीयूडी-३/९४-९५ ते ९८-९९/निर्धारण/का-२/६२, दिनांक ११/६/२००१
४	बीयूडी-३/९४-९५ ते ९८-९९/मुनि/का-२/७८, दिनांक २०/६/२००१
५	बीयूडी-३/९४-९५ ते ९८-९९/मुनि/का-२/१५९, दिनांक ३/९/२००१
६	मवबाविआपु/नियो/ मुनि/२००३-०४/का-२/९४२ (अ), दिनांक १२/९/२००३
७	मवबाविआपु/नियो/ मुनि/जिप/२००३-०४/का-२/१०११, दिनांक १५/१२/२००३
८	मवबाविआपु/नियो/९४-९५ ते ९८-९९/मुनि/का-२/५२, दिनांक ४/३/२००४
९	मवबाविआपु/नियो/९४-९५ ते ९८-९९/मुनि/का-२/१७९, दिनांक २०/६/२००५
१०	मवबाविआपु/नियो/९४-९५ ते ९८-९९/मुनि/का-२/१०९५०, दिनांक १९/९/२००५
११	मबाविआ/का-६/प्र-५/२०११-१२/४६८७, दिनांक ३१/१०/२०११

वरील प्रमाणे सदर परिच्छेदात नमूद केलेल्या २९ जिल्हा परिषदांचे सन १९९२ ते २०१०-२०११ या कालावधीतील मूल्य निर्धारण बऱ्यापैकी झालेले असून त्याची सद्यःस्थिती दर्शविण्यात आलेली आहे.

मुख्यलेखाशिर्ष २२३६ अंतर्गत खालीलप्रमाणे जिल्हा परिषदांचे मुल्य निर्धारण झालेले आहे.

अ. क्र. (१)	जि. प. नाव (२)	मूल्य निर्धारण कालावधी (३)	अखर्चित रक्कम कोषागारात भरल्याचा दिनांक (४)
१	बुलढाणा (बा. क.)	२००३-०४ ते २००८-०९	–
२	पुणे (बा. क.)	२००३-०४ ते २००७-०८	३०-१-२०१०
३	सिंधूदूर्ग (बा. क.)	२००५-०६ ते २००८-०९	५-१-२०११
४	सातारा (बा. क.)	२००३-०४ ते २००७-०८	जानेवारी, २०१०
		२००१-०२ ते २००३-०४	७-३-२०१०
		१९९९-२००० ते २००४-०५	२४-५-२००६
		२००५-०६	३-१-२००७
		२००६-०७ ते २००७-०८	६-१०-२००८
		२००७-०८	२७-१-२०१०
५	कोल्हापूर (बा. क.)	२००३-०४ ते २००८-०९	३-२-२०१०

अ. क्र. (१)	जि. प. नाव (२)	मूल्यनिर्धारण कालावधी (३)
१	पुणे	सन २००७-०८ ते २०११-१२
२	सातारा	सन २००७-०८ ते २०११-१२
३	सोलापुर	सन २००७-०८ ते २०१२-१३

अनुदान निर्धरणाकरिता लेखाधिकारी, सहायक लेखाधिकारी व लिपिक अशी ३ पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. कालबद्ध कार्यक्रम आखून अनुदान निर्धारणाचे प्रलंबित काम त्वरित पूर्ण करण्यात येत आहे.

१.३९ परिच्छेद क्र. ४.१.१० सेवा पुरविणे

महिलांच्या सबलीकरणासाठी योजना आणि कायद्याची अंमलबजावणी

विभागातर्फे वैयक्तिक लाभाच्या योजना उदा. स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य, मुलींना व्यवसायाभिमुख प्रशिक्षणासाठी विद्यावेतन, निराधार महिलांच्या मुलीच्या विवाहासाठी विवाहभत्ता, शेतकऱ्यांच्या मुलीच्या सामुदायिक विवाहासाठी अर्थसहाय्य, देवदासींना निर्वाह भत्ता, शहरी भागातील महिला मंडळांना अर्थसहाय्य आणि ग्रामीण भागातील मंडळांसाठी जिल्हा परिषदांमार्फत अर्थसहाय्य राबविण्यात येतात. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील महिलांचा स्तर उंचावणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. या खेरीज विभाग कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ आणि हुंडा प्रतिबंधक अधिनियम, १९६१ या कायद्यांची अंमलबजावणीही करते.

लेखा परिक्षणात चाचणी तपासणी केलेल्या अधिनियम आणि योजनांच्या अंमलबजावणीची स्थिती खालील परिच्छेद क्र. ४.१.१०.१, ४.१.१०.२, ४.१.१०.३ यामध्ये सविस्तर अभिप्राय देण्यात आलेले आहेत.

१.४० परिच्छेद क्र. ४.१.१०.१ महिलांना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य योजना

ऑक्टोबर, १९८५ मध्ये महाराष्ट्र शासनाने महिलांना स्वयंरोजगार यासाठी अर्थसहाय्य ही योजना सुरू केली. या योजनेखाली लघुउद्योग सुरू करण्यासाठी प्रत्येक महिलेला रु.५०० इतके अर्थसहाय्य एकदा केले जाते. ही योजना शहर आणि ग्रामीण भागात अनुक्रमे DWCDOs आणि Dy.CEO यांच्या मार्फत राबविण्यात येते. शासनाने २००७-१२ या कालावधीमध्ये दिलेल्या रु. ३.३६ कोटी पैकी रु.२.५७ कोटी खर्च झाले. चाचणी तपासणी केलेल्या नऊ जिल्ह्यांत २००७-१२ या कालावधीत १८,३१४ लाभार्थींना रु. ९१.५७ लाख अर्थसहाय्य देण्यात आले.

असे आढळून आले की, ऑक्टोबर, १९८५ मध्ये निश्चित केलेली लाभार्थींना द्यावयाची रु.५०० इतकी अर्थसहाय्याची रक्कम सुधारित करण्यात आली नव्हती. या खेरीज योजनेचे परिणाम तपासण्याची यंत्रणा अस्तित्वात नव्हती. लाभार्थींना लघुउद्योग सुरू करण्यासाठी देण्यात येणारे अर्थसहाय्य अल्प असल्याने विभागाला संनियंत्रण आणि परिणाम निर्धारणा करण्यास खूप कमी वाव होता. अर्थसहाय्याची मर्यादा विश्वासार्हता आणि यशस्वितेच्या पातळीपर्यंत न वाढविता योजना पुढे चालू ठेवणे म्हणजे जनतेच्या पैशाचा अपव्यय आहे आणि योजनेची उद्दिष्टे असफल होण्याचे द्योतक आहे.

आयुक्तांनी वस्तुस्थिती मान्य करतांना असे सांगितले की अर्थ सहाय्याची रक्कम नगण्य आहे आणि ही रक्कम सुधारित करण्यासाठी प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

१.४१ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

स्वयंरोजगार योजनेमध्ये बदल होण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून योजनेतील बदलांच्या अनुषंगाने सामाजिक न्याय व आदिवासी विकास विभागाकडून अभिप्राय प्राप्त झाले आहेत. सदर प्रस्ताव नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहेत.

१.४२ परिच्छेद क्र. ४.१.१०.२ विविध हस्तकालांत व्यवसाय प्रशिक्षण घेणाऱ्या मुलींना विद्यावेतन देण्याची योजना

महाराष्ट्र शासनाने विविध हस्तकलांत व्यवसाय प्रशिक्षण घेणाऱ्या मुलींना विद्यावेतन देण्याची योजना सुरू केली (ऑक्टोबर, १९८५) ज्यामध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी मंजूर केलेले कोर्सेस जसे की, परिचारिका, टेलीफोन ऑपरेटर इ. घेण्यासाठी रु. १०० प्रति महिला इतके अर्थसहाय्य देण्यात येते. सदर योजना शहरी आणि ग्रामीण भागात राबविण्यासाठी DWCDOs आणि Dy.CEO जबाबदार असतील.

२००७-१२ या कालावधीत विभागाने अनुक्रमे रु.१.१५ कोटी व रु.३४.६४ लाख इतका खर्च राज्यात आणि नऊ चाचणी तपासणी केलेल्या जिल्ह्यात केला होता परंतु विभागात पाठपुरावा यंत्रणा नसल्यामुळे, सदरील योजनेच्या परिणामांची निर्धारणा लेखापरीक्षणात करता आली नाही.

आयुक्तांनी सांगितले की, सदरील योजनेखाली देण्यात येणारे रु.१०० इतके विद्यावेतन मागील २७ वर्षांपासून सुधारीत न केल्यामुळे सदरील योजनेस अल्प प्रतिसाद होता. पुढे असे सांगितले की, विद्यावेतन सुधारित करण्यासाठी प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

१.४३ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

विद्यावेतन योजनेमध्ये बदल होण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून याबाबत सामाजिक न्याय/आदिवासी विकास विभागाचे अभिप्राय प्राप्त करून घेण्यात आले आहेत. सदर प्रस्ताव नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

१.४४ परिच्छेद क्रमांक ४.१.१०.३ कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ ची अंमलबजावणी

शारीरिक इजा, मानसिक छळ, लैंगिक छळ, आर्थिक पिळवणूक इत्यादींपासून महिलांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी , कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम,२००५ (DV Act) ची अंमलबजावणी राज्यात ऑक्टोबर, २००६ मध्ये सुरू करण्यात आली. सदर अधिनियमाच्या कलम ८(१) अन्वये कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडणाऱ्यांना मदत/आधार देण्यासाठी आवश्यक संरक्षण अधिकाऱ्यांची प्रत्येक जिल्ह्यांत अधिसूचनेद्वारे नेमणूक करायची होती. कौटुंबिक प्रासंगिक अहवाल (DIR) तयार करण्यासाठी संरक्षण अधिकारी जबाबदार असतील आणि त्यांनी सदरील अहवाल दंडाधिकाऱ्यांना सादर करायचा होता. प्रत्येक अर्ज/प्रकरणावर पहिल्या सुनावणीपासून ६० दिवसांच्या आत कार्यवाही करण्याची जबाबदारी दंडाधिकाऱ्यांची होती.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, संरक्षण अधिकारी, ज्यांची जबाबदारी DIR बनविणे व दंडाधिकाऱ्यांना मदत करणे आहे. त्यांची नेमणूक करण्यात आली नव्हती आणि संरक्षण अधिकाऱ्यांची जबाबदारी सर्व शहरी CDPOs, महसूल आणि ग्रामविकास विभागाच्या अधिकाऱ्यावर सोपविण्यात आली होती. पुढे असेही आढळून आले की, राज्यात DV Act खाली १२,४८४ प्रकरणे २००७-१२ या कालावधीत नोंदविण्यात आली. ज्यापैकी ३,२५८ प्रकरणांवर सुनावणी करण्यात आली व बळी पडलेल्यांना मदत करण्यात आली. नऊ चाचणी तपासणी केलेल्या

जिल्ह्यांपैकी ७ जिल्ह्यांत २००८ ते २०११ या कालावधीत ५८४९ प्रकरणे नोंदविण्यात आली. ज्या पैकी १,५०३ प्रकरणांत (२५.६९ टक्के) सुनावणी व मदत करण्यात आली परंतु ४,३४६ प्रकरणे (७४.३१ टक्के) ६० दिवसांच्या वर प्रलंबित होती.

आयुक्तांनी असे सांगितले की,१११ जागांवर संरक्षण अधिकारी, कायदेशीर सल्लागार, माहिती नोंदविणारे (data entry) ऑपरेटर्स यांची भरती करण्यास शासनाने मंजुरी दिली (फेब्रु.२०१२) आणि भरती प्रक्रिया सुरू होती. DV Act खाली दाखल केलेल्या प्रकरणांचा त्वरित निपटारा होण्यासाठी एक अथवा दोन न्यायालये, विशेष न्यायालये म्हणून घोषित करण्यासाठी विधी व न्याय विभागाला विनंती करण्यात यावी असा प्रस्ताव विचाराधीन आहे.

१.४५ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

कौटुंबिक प्रासंगिक अहवाल (DIR) तयार करण्यासाठी संरक्षण अधिकारी जबाबदार असतील आणि त्यांनी सदरील अहवाल दंडाधिकाऱ्यांना सादर करायचा होता. प्रत्येक अर्ज / प्रकरणावर पहिल्या सुनावणीपासून ६० दिवसांच्या आत कार्यवाही करण्याची जबाबदारी दंडाधिकाऱ्यांची होती. याबाबत अधिनियमात खालीलप्रमाणे तरतूद आहे.

Sec. 12 (5) The magistrate shall endeavour to dispose of every application made under sub-section (*1*) within a period of sixty days from the date of its first hearing.

संरक्षण अधिकारी, ज्यांची जबाबदारी DIR बनविणे व दंडाधिकाऱ्यांना मदत करणे आहे. त्यांची नेमणूक करण्यात आली नव्हती याबाबत संरक्षण अधिकाऱ्यांची स्वतंत्रपणे स्वतत्र कार्यभार असलेले संरक्षण अधिकारी यांची नेमणूक केलेली नव्हती. परंतु संरक्षण अधिकारी यांच्या सेवा उपलब्ध व्हाव्यात यासाठी सुरुवातीला राज्यातील जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, प्रांत अधिकारी, गटविकास अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार यांना त्यांची जबाबदारी सांभाळून संरक्षण अधिकारी या पदाची कर्तव्ये बजावण्यासाठी घोषीत करण्यात आले होते. सद्यस्थितीत राज्यातील सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आणि शहरी व ग्रामीण बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना संरक्षण अधिकारी म्हणून घोषीत करण्यात आले आहे.

जिल्हास्तरावर पूर्ण वेळ संरक्षण अधिकारी उपलब्ध व्हावेत यासाठी शासन निर्णय क्रं. मबाआ-२०११/प्र.क्र.१७३/का-७, दि. १५.२.२०१२ अन्वये संरक्षण अधिकाऱ्यांची ३७ पदे निर्माण केली आहेत. सदरची पदे भरण्याची कार्यवाही होऊन सद्यस्थितीत जिल्हास्तरावर पूर्ण वेळ स्वतंत्र जबाबदारी असलेले ३० संरक्षण अधिकारी कर्तव्यावर रुजूही झालेले आहेत.

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमांतर्गत न्यायालयात प्रकरणे दाखल झाल्यावर न्यायालयात सुनावणी करण्यात येते. सदर प्रकरणांवर ६० दिवसांच्या आत निकाल होत नाहीत निकालास विलंब होतो ही बाब सर्वस्वी मा. न्यायालयाच्या अखत्यारीतील आहे.

No special court has been constituted for prompt disposal of cases held under Domestic Violence Act.

१.४६ परिच्छेद क्र. ४.१.११ वृद्ध, विकलांग आणि निराधारांचे कल्याण

भीक मागणे हा मोठा सामाजिक प्रश्न आहे. ग्रामीण भागातील जनता,औद्योगिकरण व शहरीकरणामुळे, शहरी भागात स्थलांतरीत होत आहे. ज्या लोकांना नोकरी मिळत नाही, असे लोक जगण्यासाठी सोप्या रितीने पैसा मिळविण्यासाठी भिक्षेचा मार्ग अवलंबतात. ह्याचा विचार करून भिकाऱ्यांना अन्न, निवारा, व्यवसाय प्रशिक्षण इत्यादी सुविधा देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी मुंबई भिक्षा प्रतिबंधक अधिनियम, १९५९ बनविण्यात आला. मार्च, २०१२ रोजी, राज्यात १,५६० प्रवेश क्षमता असलेली नऊ भिक्षेकरी गृहे होती. नोव्हेंबर, २०११ पर्यंत, भिक्षेकऱ्यांची संख्या ६३८ होती.

सन २००७-१२ मध्ये सदर अधिनियमांच्या अंमलबजावणीसाठी रु ४३.५५ कोटी इतकी तरतूद राज्याच्या अर्थसंकल्पात करण्यात आली होती. त्यापैकी रु ४२.१० कोटी इतका खर्च २००७-१२ मध्ये करण्यात आला. वेतनावर रु २६.९६ कोटी, रु. १०.१४ कोटी लाभार्थी आहार देण्यासाठी, रु.२.३९ कोटी साधनसामुग्री आणि पुरवठा आणि उरलेला रु२.६१ कोटी इतका खर्च भाडे आणि कर इत्यादी वर करण्यात आला. यावरुन हे सिद्ध होते की, २००७-१२ या कालावधीत केलेल्या रु ४२.१० कोटी खर्चापैकी, रु २९.५७ कोटी (७० टक्के) इतका खर्च वेतन आणि आस्थापनेवरच करण्यात आला, भिक्षेकरी गृहातील लाभार्थ्यांवर रु १२.५३ कोटी (३० टक्के) इतकाच खर्च करण्यात आला.

१.४७ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

भिक्षेकरीगृहात दाखल होणारे भिक्षेकरी हे पोलीस विभागामार्फत पकडून न्यायालयापूढे दाखल केले जातात सदरची कार्यवाही पोलीस विभागामार्फत प्रभावीपणे होणेसाठी मा. प्रधान सचिव यांचे अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत करणेत आलेली आहे. सदर समितीत पोलीस विभागाचे प्रतिनिधीचा समावेश आहे. सदर समितीच्या दि. १८ फेब्रुवारी २०१३ रोजी पार पडलेल्या बैठकित राज्यातील भिक्षेकरी गृहातील प्रवेशिताची रिक्त जागांची माहिती तिमाही मा. पोलीस महासंचालक, मुंबई यांना थेट कळविणे विषयी निश्चीत करणेत आलेले होते. त्यानुसार पोलीस विभागास माहिती कळविण्यात आलेली आहे. त्यामूळे भिक्षेकरी गृहातील प्रवेशितांची संख्या वाढणार आहे. पर्यायाने भिक्षेकरी गृहातील लाभार्थ्यांच्या खर्च सुद्धा वाढणार आहे.

१.४८ परिच्छेद क्र. ४.१.११.१ मुंबई भिक्षा प्रतिबंध अधिनियम, १९५९ - सुधारित न करणे

याचिका क्र.१६३९/१९९० वर उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार, राज्यातील भिक्षेकरी गृहाच्या कामाकाजाचा अभ्यास करण्यासाठी शरदचंद्र गोखले यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात (जुलै १९९०) आली होती. समितीने शिफारशी केल्या (डिसेंबर १९९०) की:

- निराधारांना स्वेच्छेने निवाऱ्यासाठी प्रवेश करण्याची तरतूद करून भिक्षेकरी गृहे कल्याणकारी गृहांमध्ये रुपांतरित करण्यात यावी:
- भिकाऱ्यांचे प्रशिक्षण आणि पुनर्वसन.

पुढे, न्यायमूर्ती धर्माधिकारी प्रमुख असलेल्या दुसऱ्या एका समितीने (जुलै २०१०) अशी शिफारस केली (ऑगस्ट २०१०) की, पात्र पुरुष/महिला भिकाऱ्यांकरिता, जिल्हा उद्योग केंद्र आणि व्यवसाय प्रशिक्षण संस्था यांच्या समन्वयाने, योग्य पुनर्वसन योजना आखण्यांत यावी आणि नवीन अधिनियम पुढील सहा महिन्यांत बनविण्यात यावा :

परंतु, अधिनियमांत सुधारणा आणि भिक्षेकरी गृहातील लाभार्थ्यांसाठी योग्य पुनर्वसन योजना तयार करणे, ह्या शिफारशी दोन समित्यांनी करून देखील पुढे या प्रकरणात काहीही प्रगती झाली नाही (एप्रिल २०१२). आयुक्तांनी सांगितले की, सध्याच्या नियमांत सुधारणा करण्यासाठी आणि आधीच्या समित्यांच्या शिफारशी अंमलात आणण्यासाठी, एक समिती जून २०१२ मध्ये स्थापन करण्यात आली आहे.

१.४९ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मुंबई भिक्षा प्रतिबंधक अधिनियम, १९५९ मध्ये सुधारणा करणे कामी शासन निर्णय क्र भिक्षाप्र-२००९/प्रक्र१५२/का-९/दि.२२ फेब्रुवारी २०१३ नुसार अभ्यास समिती गठीत झालेली आहे. सदर अभ्यास समितीची दि. ६ मार्च २०१३ रोजी बैठक पार पडली आहे. त्यामध्ये यापूर्वीच्या शिफारशी विचारात घेऊन अधिनियमात सुधारणा करणेची कार्यवाही सुरू आहे.

१.५० परिच्छेद क्र. ४.१.११.२ भिकाऱ्यांच्या पुनर्वसनासाठी अपुरे प्रयत्न

महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंधक नियम, १९६४ च्या नियम २५ अन्वये, भिक्षेकरी गृहातील वर्तणूक पाहून आणि भिक्षा मागण्याची त्यांची सवय सुटल्याची शक्यता पडताळून भिक्षेकरी गृहातील भिकाऱ्यांची अटकाव अवधी आधी सुटका करण्यात येते. या संदर्भात भिक्षेकरी गृहांच्या अधीक्षकांच्या हाताखाली काम करणारे परिवीक्षा अधिकारी भिकाऱ्यांच्या दैनंदिन वर्तवणुकीवर लक्ष ठेवणे, त्यांच्या नातेवाईकांचा शोध घेणे, त्यांच्या प्रशिक्षणाची गरज इत्यादीं करिता जबाबदार आहेत.

अधीक्षक, भिक्षेकरी गृह, घायपतवाडी, जिल्हा अहमदनगर यांच्या अभिलेख्यांची तपासणी करता असे आढळून आले की, २००७-१२ मध्ये, १५० लाभार्थ्यांची क्षमता असुन देखील फक्त सरासरी ६९ लाभार्थी प्रति महिना उपलब्ध होते. परंतु, अटकाव अवधी संपण्यापूर्वी, एकाही भिकाऱ्याचे पुनर्वसन करण्यांत आले नव्हते.

आयुक्तांनी, हे सत्य मान्य करून, असे सांगितले की, सप्टेंबर २०१२ पासून २३ नवीन परिवीक्षा अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे, जे भिकाऱ्यांचे पुनर्वसन लवकर करण्यासाठी मदत करतील.

१.५१ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

भिक्षेकरीगृहाच्या अधीक्षकांच्या हाताखाली काम करणारे परिवीक्षा अधिकारी भिक्षेकऱ्यांच्या दैनंदिन वर्तूणूकीवर लक्ष ठेवणे, त्यांच्या नातेवाईकांचा शोध घेणे, त्यांच्या प्रशिक्षणाची गरज इत्यादी करिता जबाबदार आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत भिक्षेकरीगृहातील परिविक्षा अधिकाऱ्याची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करणेत आलेली आहे.

तसेच भिक्षेकरींना त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात देणे कामी अधिनियमातील तरतुदी प्रमाणे त्यांच्या नातेवाईकांकडे मूळ गावी येण्या-जाण्यासाठी भिक्षेकऱ्यांना प्रवासभाडे देण्यात येते. सन २०१३-१४ मध्ये पुरवणी मागणी मध्ये रु. ६.०० लक्ष तरतुदीची मागणी केली आहे.

त्याच प्रमाणे भिक्षेकऱ्यांचे प्रशिक्षणासाठी Vocational training Provides (VTP) च्या माध्यमातून व्यावसायीक प्रशिक्षण देता येईल व त्यांना AVTS (Advanced Vocational Scheme) योजनेमध्ये सामावून घेता येइल किंवा कसे? याबाबत मा. प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समितीने दि. २० जून २०१३ च्या बैठकीत आयुक्त, महिला व बाल विकास यांना संचालक, व्यावसायिक प्रशिक्षण यांचेशी चर्चा करणेसाठी सूचित केलेले आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे.

१.५२ परिच्छेद क्र. ४.१.११.३ भिकाऱ्यांना उपयुक्त प्रशिक्षण देण्यात आले नाही

मुंबई भिक्षा प्रतिबंधक अधिनियम, १९५९ च्या कलम १३ आणि महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंधक नियम, १९६४ च्या नियम २६ अन्वये, भिक्षेकऱ्यांना शेतीविषयक, औद्योगिक आणि इतर उद्योगांचे प्रशिक्षण देणे अभिप्रेत आहे. आयुक्तांनी, भिक्षेकरी गृहातील भिकाऱ्यांच्या पुनर्वसनासाठी जिल्हा लघुउद्योग केंद्र, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अशासकीय संस्था इत्यादींच्या समन्वयाने प्रशिक्षण कार्यक्रम आखून त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंच्या विपणनाची व्यवस्था करण्याच्या सूचना (सप्टेंबर २००५ आणि जानेवारी २००६) दिल्या.

अधीक्षक, भिक्षेकरी गृह, घायपतवाडी, जिल्हा अहमदनगर जिल्ह्यांतील आणि चेंबूर, मुंबई उपनगर यांच्या अभिलेख्यांची चाचणी तपासणी करण्यात आली. असता, लेखापरिक्षणांच्या निदर्शनास आले की, घायपतवाडी भिक्षागृहाकडे २२४.८८ हेक्टर जमीन होती. जरी शेतीविषयक प्रशिक्षण देण्यात वाव होता, तरीही भिक्षंकऱ्यांना असे प्रशिक्षण देण्याचे प्रयत्न करण्यात आले नाहीत.

आयुक्तांनी वास्तविक मान्य करून असे सांगितले की, भिक्षागृहातील उद्योग कालबाह्य झालेले आहेत. प्रशिक्षण देण्यासाठी उपलब्ध नाहीत. ज्या कार्यालयांत प्रशिक्षक उपलब्ध आहेत, तिथे प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक साधनसामुग्री उपलब्ध नव्हती. शेती सहायक उपलब्ध नसल्याने शेतीविषयक प्रशिक्षण देता आले नाही.

१.५३ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

भिक्षेकऱ्यांचे प्रशिक्षणासाठी Vocational training Provides (VTP) च्या माध्यमातून व्यावसायीक प्रशिक्षण देता येईल व त्यांना AVTS (Advanced Vocational Scheme) योजनेमध्ये सामावून घेता येईल किंवा कसे? याबाबत मा.प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समितीने दि. २०/६/२०१३ च्या बैठकित आयुक्त, महिला व बाल विकास यांना संचालक, व्यावसायीक प्रशिक्षण यांचेशी चर्चा करणेसाठी सूचित केलेले आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे. तसेच दि. ११/७/२०१३ रोजीच्या आयुक्तालयातील बैठकीत सर्व अधीक्षकांना कमीत कमी २ कोर्सेस व्यवसाय प्रशिक्षणाचे सुरू करणे करिता प्रस्ताव सादर करणे बाबत सूचित केलेले आहे.

त्याच प्रमाणे घायपतवाडी, जांभुळ, पिंपळगाव पिसा येथे फुलशेती,फळबाग नर्सरी प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्याचे आयुक्तालयातील बैठकीत निश्चित झालेले आहे त्यानुसार पुढील कार्यवाही करणेत येत आहे.

१.५४ परिच्छेद क्र. ४.१.११.४ भिक्षागृहातील भिकाऱ्यांना कमी दराने उपदान देणे

महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंधक नियम, १९६४ च्या नियम २७ अन्वये, भिक्षागृहातील चांगली वर्तणूक असलेल्या प्रशिक्षित भिकाऱ्यांना जास्तीत जास्त रु ५०० दरमहा उपदान देणे आवश्यक आहे.

अधीक्षक, भिक्षेकरी गृह, घायपतवाडी यांच्या अभिलेख्यांच्या तपासणीत असे निदर्शनास आले की, २००७-११ या कालावधीत, भिकाऱ्यांनी केलेल्या शेतीविषयक कामे, स्वयंपाक, स्वच्छता इत्यादी कामाबद्दल दरमहा फक्त रु. ५ देण्यात आले. मार्च २०११ नंतर पैसे देणेच बंद करण्यात आले. काहीही मोबदला न देता भिकाऱ्यांच्या सेवा घेतल्याचा परिणाम त्यांची अवाजवी पिळवणूक करण्यात झाला. तसेच हे महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंधक नियम, १९६४ च्या तरतुदींचे उल्लंघन होते.

निर्गमन बैठकीत प्रधान सचिवांनी, सुधारित तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी योग्य ती कार्रवाई करण्याचे मान्य केले.

१.५५ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मुंबई भिक्षा प्रतिबंध अधिनियम, १९५९ मध्ये सुधारणा करणेकामी शासन निर्णय दिनांक २२ फेब्रुवारी २०१३ अन्वये अभ्यास समिती गठित झालेली आहे. त्यानुसार भिक्षेकऱ्यांच्या उपदानात वाढ करणे विषयीची बाब त्यामध्ये घेण्यात येत आहे.

१.५६ परिच्छेद क्र. ४.१.११.५ महिला वसतिगृहात अपूरी सुरक्षा व्यवस्था आणि आवश्यक सुविधांचा अभावः-

सामाजिक व नैतिक आरोग्य विषयक स्वच्छता कार्यक्रम १९७३ या कार्यक्रमांतर्गत राज्य शासनाने १०० मतिमंद महिलांना सामावून घेण्याची क्षमता असलेले वसतिगृह नागपूरमध्ये स्थापन केले, मे २०१२ पर्यंत १०० क्षमता असलेल्या या वसतिगृहात ५८ महिला रहात होत्या. मे, १२ मध्ये लेखा परीक्षकांनी संबंधित विभागाच्या प्रतिनिधींसह या वसतिगृहाची संयुक्त पाहणी केली असता पुढील त्रुटी आढळल्या

- २४०० चौ.फु. क्षेत्रफळ असलेली एकच खोली होती जी ५८ महिलांसाठी अपुरी होती.
- स्वच्छतागृहे अस्वच्छ होती आणि त्यांना दरवाजे नव्हते.
- थेट पाणीपुरवठा वसतिगृहास नव्हता
- स्वयंपाकासाठी आणि गरम पाण्यासाठी सप्टेंबर, २०११ पासून सरपण वापरण्यात येत होते.
- अग्निप्रतिबंधक यंत्रणा कार्यरत नव्हती.
- गंभीर परिस्थितीत तातडीने उपचार करण्यासाठी रुग्णांना हॉस्पिटलमध्ये नेण्यासाठी वाहन व्यवस्था नव्हती.
- महिलांवर उपचार करण्यासाठी मनोविकारतज्ञ/ व्यावसायिक रोगोपचार तज्ञांच्या सेवा उपलबध नव्हत्या.
- ३,१४८ चौ. मीटर क्षेत्रात असलेल्या महिलागृह आणि शासकीय बालगृहासाठी (कनिष्ठ व वरिष्ठ) या साठी सुरक्षा रक्षकाचे एकच पद मंजूर होते. मुख्य प्रवेशद्वाराजवळ सुरक्षा रक्षकासाठी सुरक्षा खोली नव्हती, सध्याचा सुरक्षा रक्षक फक्त दिवसपाळीसाठी कार्यरत होता. तसेच सुरक्षा रक्षकाला कोषागार कार्यालयात जाणे हे अतिरिक्त कामही होते आणि
- मुख्य प्रवेशद्वाराजवळची कुंपणाची भिंत जुलै, २०११ मध्ये कोसळली होती आणि ती पुन्हा न बांधता त्या जागी तात्पुरते पत्रे बसविले होते. तसेच मुख्य प्रवेशद्वाराजवळच्या भिंतीच्या पायाशी दोन मोठी भोके होती व त्यातून कोणीही अनधिकृतपणे प्रवेश करणे शक्य होते.

महिला वसतिगृहाच्या अधीक्षकांनी या त्रुटी मान्य करुन (मे आणि डिसेंबर, २०१२) असे सांगितले की, विभागाने पहिल्या मजल्यावर अतिरीक्त जागा मंजूर केली (जून, २००१ असली तरी मे, २०१२ पर्यंत पहिल्या मजल्याचे बांधकाम सुरु झाले नाही, सुरक्षा रक्षकाचे एकच पद मंजूर आहे आणि सार्वजनिक खात्याला कोसळलेल्या कुंपण भिंतीची दुरुस्ती करण्याची विनंती करण्यात(ऑगस्ट, २०११) आल्याचे अधीक्षकांनी सांगितले, वसतिगृहाची स्वतःची वाहन व्यवस्था नसल्याने वसतिगृहातील महिलांना ऑटोरिक्षाने हॉस्पिटल मध्ये नेण्यात येते.

विभागाने वसतिगृहाच्या नुतनीकरण व विस्ताराच्या रु.४.६० कोटीच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता दिली असून (डिसेंबर,२०११) यासाठी आर्थिक तरतूद उपलब्ध झाल्यावर हे काम सुरु करण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी सांगितले. तरीही मुलभूत सुविधा, स्वच्छतागृहांचा अभाव व अपुरी सुरक्षा व्यवस्था यांचा त्रास मतिमंद महिलांना होत असल्याचे वास्तव कायम राहतेच.

१.५७ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

शासकीय प्रियदर्शनी महिला वसतिगृह, नागपूर इमारतीच्या नवीन बांधकाम व कर्मचारी निवासस्थाने, या बांधकामासाठीच्या रु.४२५.०० लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१०/प्र.क्र.४१६/का-२,दि.१९ जानेवारी २०११ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

शासकीय करुणा महिला वसतिगृह व सरस्वती महिला वसतिगृह, नागपूर इमारतींचे बांधकाम/सुधारणाबाबतच्या रु.४६०.०० लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१०/प्र.क्र.३६२/का-२,दि.३० जानेवारी २०१२ चे शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

नागपूर जिल्हातील उपरोक्त नमूद संस्थांचे बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता दिल्यानुसार, सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात पुरवणी मागणीद्वारे मंजूर निधी, सार्वजनिक बांधकाम विभाग, ज्ञापन क्र.अनिवि-२०१३/प्र.क्र.९६/अर्थ-२, दिनांक १९/३/२०१३ अन्वये, प्रमुख बांधकामे (४२३५ ०२५१) या लेखाशिर्षाखाली रु.१६८.३५ लक्ष इतका निधी ठेव अंशदान खाली जमा न करता, संगणकीय वितरण प्रणालीवर अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर, यांना उपलब्ध करुन देण्यात आलेला होता. त्यामुळे आर्थिक वर्षाच्या शेवटी, उर्वरित शिल्लक कालावधीत नमूद बांधकामांसाठीची निविदा प्रक्रिया करणे शक्य नसल्यामुळे, सदरचा निधी शासनाकडे समर्पित करण्यात आला आहे.

शासकीय प्रियदर्शनी महिला वसतिगृह, नागपूर इमारतीच्या नवीन बांधकाम व कर्मचारी निवासस्थाने बांधकाम त्याचप्रमाणे, शासकीय करुणा महिला वसतिगृह व सरस्वती महिला वसतिगृह, नागपूर इमारतींचे बांधकाम/सुधारणाबाबतच्या दोन्ही बांधकामांसाठी चालू आर्थिक वर्षात प्रत्येकी रु.२५०.०० लक्ष प्रमाणे एकूण रु.५००.०० लक्ष इतक्या निधीची आवश्यक आहे. सदरचा निधी उपलब्ध करुन दिल्यास नमूद कामांकरीताच्या निविदा काढण्याची प्रक्रिया करण्यात येईल, असे अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर, यांनी त्यांचे पत्र क्र.५७६७/दि.२१/५/२०१३ चे पत्रान्वये कळविलेले आहे. त्यानुसार आयुक्तालय स्तरावरुन दि.२१/६/२०१३ रोजी चालू आर्थिक वर्षात, निधी उपलब्ध होणेस्तव पुरवणी मागणी नियोजन विभाग व वित्त विभागास सादर करण्यात आलेली होती. परंतु प्रस्ताव मान्य झालेला नाही. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीय तरतूद केली आहे. अधिक तरतुदीसाठी दि. २६.५.२०१४ रोजी वित्त विभागास पूरक मागणी प्रस्ताव सादर केला आहे.

१.५८ परिच्छेद क्र. ४.१.१२ एकात्मिक बालविकास सेवांची अंमलबजावणी

एकात्मिक बालविकास सेवांची अंमलबजावणी :- एकात्मिक बालविकास सेवा योजना (ICDS) ही विभागाची एक महत्वाची योजना आहे. केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाने १९७५ मध्ये सुरू केलेल्या या योजनेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:

- शून्य ते सहा वर्षे वयापर्यंतच्या मुलांचे पोषण आणि आरोग्याचा दर्जा सुधारणे;
- मुलांच्या मानसिक, शारीरिक आणि सामाजिक विकासाचा पाया घालणे;
- मुलांमधील मृत्यूदर, दुर्बलता, कुपोषण आणि शाळासोडण्याचे प्रमाण कमी करणे;
- मुलांच्या विकासासाठी निरनिराळ्या विभागांमध्ये शासकीय धोरण आणि त्यांची अंमलबजावणी यांचा परिणामकारक समन्वय साधणे ; आणि
- मुलांचे आरोग्य आणि पोषण विषयक गरजा समजून घेऊन त्यांचे संगोपन करण्यासाठी योग्य आरोग्याविषक योग्य आणि आहारविषयांचे शिक्षण देऊन माता क्षमता वाढवणे.

ICDS योजनेची उद्दिष्टे, पोषण आहार, लसीकरण, आरोग्य तपासणी, संदर्भित सेवा, शालेयपूर्व अनौपचारिक शिक्षण, पोषण आणि आरोग्य/ शिक्षण ह्या सेवा एकत्र करुन साध्य करता येतील.

लेखापरीक्षा कालावधीमध्ये (२००७-१२) या योजनेसाठी मंजूर केलेल्या रु. ७,४९४.९८ कोटींपैकी, रु. ६५१४.३८ कोटी खर्च झाले होते. पूरक पोषण आहाराचा खच केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाने ५०:५० टक्के वाटून घेणे अपेक्षित होते.

मार्च, २०१२ रोजी, ५५३ प्रकल्प, ९५,३३५ आंगणवाडी केंद्र व १०,९०१ लघु अंगणवाडी केंद्रांसहित, शुन्य ते सहा वर्षे वयापर्यंतच्या मुलांसाठी राबविण्यात येत होते.

१.५९ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्राया संदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

न्युट्रेशन व्हॅल्यू चेक करणे

बचतगट सुरु करणे पेमेंट देणे

तपासणी माता समितीने करणे.

तपासणी रिपोर्ट माता समितीने दिल्याशिवाय देयक पास करण्यात येऊ नये.

अंगणवाडीची तपासणी नियमित करणे, अंगणवाडी मासिकात माहिती देणे.

एकात्मिक बालविकास सेवा योजना ही केंद्रपुरस्कृत योजना असून या योजनेचा पूर्ण खर्च ५०. ५० या प्रमाणे करण्यात येत आहे. केंद्र शासनाकडून उपलब्ध होण्याच्या तरतुदी बाबत शासनस्तरावरुन प्रतिपूर्ति करण्यात येते.

१.६० परिच्छेद क्र. ४.१.१२.१ कुपोषण :–२००९-१० पर्यंत, सहा महिने ते सहा वर्षे या वयोगटातील मुलांमधील कुपोषणाची स्थिती समजण्यासाठी चार निकष लावण्यात आल होते–प्रथम श्रेणी : सामान्यपणे कमी वजनाची ; व्दितीय श्रेणी : तीव्र कमी वजनाची ; तृतीय श्रेणी : कुपोषित आणि चतुर्थ श्रेणी-अतिकुपोषीत. परंतु २०१०-११ पासून जागतिक आरोग्य संघटनेच्या शिफारशींनुसार हे निकष बदलण्यात आले. सुधारीत निकषांप्रमाणे, कमी वजनाच्या मुलांचे, सामान्यपणे कमी वजनाची आणि अतिशय कमी वजनाची असे दोन गट पाडण्यात आले. राज्यातील कुपोषित मुलांचा २००७-१२ या कालावधीतील तपशील तक्ता ३ मध्ये दाखविला आहे.

तक्ता ३:२००७-या कालावधीतील कुपोषणाचे प्रमाण

वर्ष	मुलांचे वजन	श्रेणी III आणि IV (कुपोषित)	कुपोषित मुलांची टक्केवारी
२००७-०८	७५,२४,०२२	१७,३५२	०.२३
२००८-०९	७५,३२,१६५	१३,१३०	०.१७
२००९-१०	८३,०५,४३७	११,९४०	०.१४
सुधारीत निकष		सामान्यपणे आणि अतिशय कमी वजन	सामान्यपणे आणि अतिशय कमी टक्केवारी
२०१०-११	६३,३५,८४९	१४,३२,३९६	२२.६१
२०११-१२	६२,३५,८१४	११,७५,१९०	१८.८५

स्रोतः WWW.icds.gov.in

भारतात कमी वजनाच्या मुलांच्या संदर्भात महाराष्ट्र हा पाचव्या क्रमांकावर आहे. (२.३३%). नऊ जिल्ह्यांची चाचणी तपासणी करताना आढळलेल्या कुपोषीत मुलांची माहिती. **(विवरण क्र. १०)** मध्ये दिलेली आहे. २०११-१२ मध्ये चाचणी तपासणी केलेल्या नऊ जिल्ह्यांतील कुपोषीत मुलांचे प्रमाण २०१०-११ तुलनेत २०११-१२ मध्ये घटले असल्याचे आढळले. परंतु आमरावती (१९.५२) आणि मुंबई (२६.४८) या दोन जिल्ह्यांमध्ये, हे प्रमाण २०११-१२ मधील राज्याच्या एकूण कुपोषित मुलांच्या टक्केवारी पेक्षा (१८.८५) अधिक असल्याचे आढळले.

आवश्यक उष्मांक (कॅलरी) असलेल्या पोषण आहारातील उणीवा पुढील परिच्छेदांमध्ये चर्चिल्या आहेत.

१.६१ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महाराष्ट्रामध्ये कुपोषण कमी करण्यासाठी नियमितपणे विविध उपक्रम राबविण्यात येत असून दरवर्षी तिव्र कमी वजनाच्या बालकांच्या संख्येत घट होत असल्याचे उपलब्ध आकडेवारी वरुन निदर्शनास येते. त्यासाठी राजमाता जिजाऊ माता, बाल आरोग्य व पोषण मिशन स्थापन करण्यात आले आहे.

सध्या कुपोषणाचे प्रमाण २०% असून सन २०१७ पर्यंत १५% वर आणावयाचे आहे.

राज्य शासना मार्फत राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनेमुळे राज्यातील कुपोषणाचे प्रमाण घटत आहे.

युनिसेफने केलेल्या अभ्यासावरुन असे दिसून येते की, राज्यातील कुपोषण ८% ने कमी झाले आहे.

कुपोषण निर्मूलन करण्यासाठी शासनाचे प्रयत्न चालू आहेत.

१.६२ परिच्छेद क्र. ४.१.१२.२ साठवणुकीची सोय नसताना आरोग्य सुधारण्यास आवश्यक सामुग्री घेणेः-

उपायुक्त, ICDS, पुणे यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांनुसार द्रवरुप प्रथिने बहुजिवनसत्वे असलेली सिरप, पुरक अन्न इत्यादी औषधे सहा वर्षे वयापर्यंतच्या कुपोषित मुलांना, गरोदर महिला, स्तनदा मातांना पुरविणे आवश्यक होते. ही सामुग्री २५ डिग्री पेक्षा कमी तापमानात साठविणे आवश्यक होते.

लेखापरीक्षणांत असे आढळून आले की, मार्च २००८ आणि जानेवारी २०११ या कालावधीत विभागाने एकूण ३५,१३५ अंगणवाडी केंद्रातील (२०० प्रकल्प) १७,२४,८३९ लाभार्थ्यांसाठी आरोग्यसामुग्रीची खरेदी करण्यासाठी रु. १३.६६ कोटींचा खर्च केला परंतु ही सामुग्री साठविण्यासाठी पुरेशी सोय CDPOs पातळीवर किंवा अंगणवाडी केंद्रामध्ये नसल्याने, उद्दीष्टांप्रमाणे मुलांमधील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी गरोदर महिला आणि स्तनदा मातांसाठी कितपत उपयोग झाला, हे निश्चित करता येत नाही.

आरोग्यरक्षक सामुग्रीचा पुरवठा यापुढे आक्टोबर-फेब्रुवारी मध्ये करण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी सांगितले. निर्गमन परिषदेत, प्रधान सचिवांनी सांगितले की, सदरील औषधे उन्हाळयात जास्त खराब होण्याची शक्यता गृहीत धरुन, सिरप इत्यादींचा पुरवठा आक्टोबर ते फेब्रुवारी दरम्यान करण्यासंबंधीचा शासन निर्णय जारी करण्यात येणार आहे.

१.६३ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

आयुक्तालयामार्फत सहा वर्षांखालील मुले स्तनदा व गरोदर माता यांच्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी तसेच त्यांची रोग प्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी आणि त्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी पोषणयुक्त मुल्य असलेले व औषधी गुंणधर्म असलेले टॉनिक, बिस्किट, मायक्रोन्युट्रीएट चिक्की इ. वस्तूंचा पुरवठा करण्यात येतो.

अंगणवाडी केंद्रात सदर साहित्य ठेवण्यात येते आणि त्यांचे वाटप लाभार्थ्यांना करण्यात येते. ग्रामिण भागातील अंगणवाडी केंद्रासाठी पुरेशी जागा असते. त्या तुलनेत शहरी भागातील अंगणवाडी केंद्रासाठी पुरेशी जागा नसते. परंतु सेविका दिलेले साहित्य व्ययस्थितपणे ठेवतात.

वरील सर्व पुरविलेल्या साहित्याचा कुपोषण निर्मुलनासाठी चांगला परिणाम झाला आहे. कॅगच्या अहवालामध्ये देखील याची नोंद घेण्यात आली आहे. गुजरात, उत्तर प्रदेश इ. सहा राज्यांच्या तुलनेत कुपोषणाचे प्रमाण कमी आहे. राज्याचे कुपोषणाचे प्रमाण २९ वरुन २२ वर आणले आहे. विविध अहवालामध्ये याची नोंद झाली आहे.

तसेच पुरविलेल्या साहित्याच्या उपयुक्ततेबाबत बाल विकास प्रकल्प अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा. क.), मुख्यसेविका यांचे कडून अभिप्राय घेण्यात येतात. तसेच खरेदी समितीच्या बैठकीमध्ये देखील याबाबत आढावा घेण्यात येतो. एकूण पुरविण्यात आलेले साहित्य हे लाभार्थ्यांसाठी उपयुक्त ठरले आहे.

तसेच औषधे, टॉनिक इ. चा पुरवठा फेब्रुवारी अखेरपर्यंत करण्याबाबत खबरदारी घेण्यात येईल.

१.६४ परिच्छेद क्र. ४.१.१२.३ घरपोच आहाराचा पुरवठाः-

कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी केंद्र शासनाने कुपोषित मुलांना देण्यात येणाऱ्या पोषण आहाराच्या उष्मांकामध्ये बदल केला (फेब्रुवारी २००९). सहा महिने ते तीन वर्षे वयापर्यंतच्या प्रत्येक मुलाला ५०० किलो उष्मांक (KCal) ऊर्जामुल्य असलेला पुरक आहार आणि प्रति दिन १२ ते १५ ग्रॅम प्रथिने देण्याचे घरपोच आहार (THR) योजनेंतर्गत ठरविले. तसेच, गरोदर आणि स्तनदा मातांनाही ६०० किलो ऊर्जामुल्य आणि १८ ते २० ग्रॅम प्रथिने असलेले THR दरदिवशी देण्याचे ठरविण्यात आले आहे.

विभागाने सांगितलेल्या (ऑगस्ट, २००९) निकषांप्रमाणे, तीन ते सहा वर्षे वयापर्यंतच्या सर्वसामान्य मुलांना प्रतिदिवशी ५०० किलो उष्मांक असलेला पोषण आहार व कुपोषित मुलांना ८०० किलो उष्मांकाचा पोषण आहार दयावयाचा होता. आदिवासी विभागात, हे प्रमाण प्रतिदिन ६०० किलो व ९५० किलो ऊर्जामुल्य असे अनुक्रमे सर्वसामान्य व कुपोषित मुलांना देण्याचे ठरविण्यात आले होते.

पोषण आहार अंगणवाडी केंद्रामध्ये न्याहारी व जेवणातून पुरवावयाचा होता. विभागाने सुचविलेल्या (ऑक्टोबर, २००५ आणि सुधारित ऑगस्ट, २००९) पाककृती प्रत्येक जिल्हा पोषण आहार समितीने (DNCs) मान्य करुन बचत गटांना (३२) (Self Help Group) कळवावयास हवे होते व बचत गटांना असा आहार पुरविणे शक्य नसल्यास, महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक फेडरेशन मर्यादित या राज्य पातळीवरील ग्राहक संस्थेकडून, पाककृतीप्रमाणे कच्चा माल (धान्य) घेऊन अन्न शिजवायला हवे होते. याखेरीज आपल्या क्षेत्रातील भौगोलिक परिस्थिती व खाण्याच्या सवयी यांचा विचार करुन पाककृती मध्ये योग्य ते बदल करण्याचे अधिकार संबंधित जिल्हा पोषण आहार समित्यांना महाराष्ट्र शासनाने दिले होते. (ऑगस्ट, २००९)

शिफारस केलेल्या आहारत आणि दिल्या जाणाऱ्या आहारातील उष्मांकात आणि प्रथिनात फरक होता. शिवाय खाद्य नमुन्यांची चाचणी केली असता त्यात त्रुटी आढळल्या. ह्या संर्दभात खालील परिच्छेदांत चर्चा केली.

अंगणवाडी केंद्रातील अतिकुपोषित मुलांसाठी पूरक पोषण आहाराचा पुरवठाः-

सहा महिने ते सहा वर्षे वयापर्यंतच्या गटातील अतिकुपोषित मुलांना पूरक पोषण आहार देणे गरजेचे होते. लेखापरिक्षणांत असे आढळून आले की, अतिकुपोषित मुलांना देण्यात आलेला आहार प्रमाणित उष्मांकाचा नव्हता. तपशील **तक्ता ४ मध्ये** देण्यात आलेला आहे.

तक्ता ४: अतिकुपोषित मुलांना दिलेल्या पोषण आहारातील कमतरता

वयोगट	मंजुरीचा /आहाराचा तपशील	पुरविलेल्या उष्मांकाचे प्रमाण	कमतरता
सहा महिने ते तीन वर्षे (THR)	आयुक्तांच्या सूचनांप्रमाणे (मे २०१०) अंगणवाडी केंद्रामार्फत मुलांना महिन्यातील नऊ दिवस १३० ग्रॅम सातू व त्याखेरीज ६० ग्रॅम शिरा २५ दिवस दिला पाहिजे होता.	१३० ग्रॅम सातू : ५०४.८९ उष्मांक + ६० ग्रॅम शिरा : २७२.४८ उष्मांक = ७७७.३७ उष्मांक (३४) महाराष्ट्र शासनाने प्रतिदिन ८०० उष्मांकाचे प्रमाण ठरविले होते (ऑगस्ट २००९), त्यासापेक्ष	प्रतिदिन २२.६३ उष्मांक
	आयुक्तांनी दिलेल्या सुचनेनुसार सुधारित पाककृती (नोव्हेंबर २०११).	१३० ग्रॅम सातू : ५१८.३९ उष्मांक + ६० ग्रॅम शिरा : २७५.९३ उष्मांक = ७९४.३२ उष्मांक महाराष्ट्र शासनाने प्रतिदिन ८०० उष्मांकाचे प्रमाण ठरविले होते (ऑगस्ट २००९), त्यासापेक्ष	प्रतिदिन ५.६८ उष्मांक
तीन ते सहा वर्षे (आहार आणि शिजवलेले अन्न)	आयुक्तांच्या सुचनांप्रमाणे (मे २०१०) अंगणवाडी केंद्रातील मुलांना शिजविलेल्या अन्ना बरोबरच अतिरिक्त प्रतिदिन ६० ग्रॅम शिरा २५ दिवस दिला पाहिजे होता.	शिजविलेले अन्न : ५०० उष्मांक प्रतिदिन + अधिक शरा (THR) २७२.४८ उष्मांक प्रतिदिन = ७७२.४८ उष्मांक प्रतिदिन, महाराष्ट्र शासनाने ८०० उष्मांक प्रतिदिन ठरविला होता (ऑगस्ट २००९), त्यासापेक्ष	प्रतिदिन २७.५२ उष्मांक
	आयुक्तांच्या दिलेल्या सुचनेनुसार सुधारित पाककृती (नोव्हेंबर २०११).	शिजविलेले अन्न: ५०० उष्मांक प्रतिदिन + अधिक शिरा (THR) २७५.९३ उष्मांक प्रतिदिन = ७७५.९३ उष्मांक प्रतिदिन महाराष्ट्र शासनाने ८०० उष्मांक प्रतिदिन ठरविला होता (ऑगस्ट २००९), त्यासापेक्ष	प्रतिदिन २४.०७ उष्मांक
		नवसंजीवनी क्षेत्रातील अतिकुपोषित मुले	
	आयुक्तांच्या सुचनांप्रमाणे (मे २०१०) नवसंजीवनी क्षेत्रातील (अमरावती जिल्हयातील धारणी आणि चिखलदरा) अंगणवाडी केंद्रातील मुलांना प्रतिदिन ६५० उष्माकांचा आहार आणि २७२.४८ उष्मांक असलेला ६० ग्रॅम शिरा दिला पाहिजे.	६५० उष्मांक प्रतिदिन + २७२.४८ उष्मांक प्रतिदिन (शिरा) = ९२२.४८ उष्मांक प्रतिदिन, ठरविलेल्या ९५० उष्मांक प्रतिदिनाच्या सापेक्ष	२७.५२ उष्मांक

निर्देशित केलेल्या उष्मांकांपेक्षा कमी उष्मांकांचा पूरक पोषण आहाराचा पुरवठा हे विभागातील कमकुवत देखरेख यंत्रणेचे निर्देशक आहे.

पुरवठादारांना THR तील उष्मांकाचे प्रमाण नियमानुसार ठेवण्याच्या सुचना दिल्या असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

अंगणवाडी केंद्रातील मुलांना पूरक पोषण आहाराचा पुरवठा :—

चाचणी तपासणी केलेल्या ३४ पैकी आठ CDPOs आणि सात पैकी दोन Dy. CEOs (अमरावती आणि बीड) या कार्यालयांचे अभिलेख तपासले असता असे आढळून आले की, जिल्हा पोषण समितीने स्विकारलेला आहार तक्ता हा विभागाने ऑगस्ट २००९ मध्ये ठरविलेल्या निकषांप्रमाणे नव्हता. उष्मांकांची कमतरता १२.०२ किलो उष्मांक (धारणी,अमरावती जिल्हा) ते ३१५.२० किलो उष्मांक (तुळजापूर ग्रामीण, उस्मानाबाद जिल्हा) अशी होती. तपशील **(विवरण क्र. ११** मध्ये) देण्यात आला आहे.

बचत गट / महिला मंडळांनी पुरविलेल्या अन्नातील उष्मांक आणि प्रथिनांची कमतरताः-

लाभार्थींना किमान उष्मांक आणि प्रथिनेयुक्त आहाराचे निकष विभागाने ठरविले होते (ऑगस्ट २००९). आयुक्तांनीही लाभार्थींना देण्यात येणाऱ्या पाककृती व अन्नासंबंधी सूचना दिल्या होत्या (सप्टेंबर २००९).

३४ पैकी तीन (बोरवली २, धारावी आणि रेड लाईट एरिया) CDPOs च्या अभिलेख्यांची तपासणी केली असता असे आढळून आले की, आहार तपासणीत अहवालानुसार (डिसेंबर २००८ - डिसेंबर २०११), निरनिराळया बचत गट/महिला मंडळांनी लाभार्थींना पुरविलेल्या आहारात, **(विवरण क्र. १२)** मधील तपशीलाप्रमाणे, उष्मांक मूल्य कमी होते. उष्मांकाच्या कमतरतेचे प्रमाण धारावीत ४.५६ टक्के (मार्च २०१०) ते ४८.२७ टक्के (फेब्रुवारी २०१०) आणि प्रथिनांच्या कमतरतेचे प्रमाण ०.१६ टक्के रेड लाईट एरियात (मे २००९) ते ८७.१२ टक्के धारावीत (जून २०११) असे होते.

पुरवठादारांवर कारवाई करण्याचे आदेश CDPOs ना देण्यात आल्याचे आयुक्तांनी सांगितले.

आहाराचे नमुने तपासण्यातील उणीवा :-

विभागाच्या नियंत्रणाखालील क्षेत्रातील कार्यालयांच्या नियमित तपासणीत, १९ प्रसंगी लाभार्थींना अन्नपदार्थ न तपासताच देण्यात आल्याचे लेखापरीक्षणांत निदर्शनास आणण्यात आले होते. तरीही विभागाच्या CCO निहाय लेखापरीक्षणांत, आहाराचे नमुने न तपासता लाभार्थ्यींना आहार देणे सुरुच असल्याचे आढळले.

शासन निर्णय (ऑक्टोबर, २००५) च्या परिच्छेद १० नुसार, प्रत्येक पुरवठादाराच्या आहाराचे प्रत्येकी दोन नमुने दरवर्षी पोषण मूल्य तपासण्यासाठी प्रयोगशाळेकडे पाठविणे आवश्यक होते. चाचणी तपासणी केलेल्या ३४ पैकी १९ CDPOs नी, २००७-१२ या कालावधीत, आहाराचे नमुने एकदाही तपासण्यासाठी पाठविण्यात आले नसल्याचे आढळले. एक CDPO (खेड) ह्यांच्याकडे माहिती उपलब्ध नव्हती आणि पुरंदर येथील CDPO नी नमुने तपासून घेतले होते. उर्वरीत १३ CDPOs चे, २००७-०८ ते २०११-१२ या कालावधीतील, आहाराचे नमुने न तपासण्याचे प्रमाण १.२ ते ९९ टक्के असे होते.

पुरवठादारांशी केलेल्या करारानुसार, पुरवठदारांनी शासनाशी संलग्न असलेल्या प्रयोगशाळेतून, बॅच निहाय, घरपोचआहाराच्या नमुन्याचे तपासणी अहवाल सादर करणे आवश्यक होते. आयुक्तांनी पुढे अशाही सूचना दिल्या (मे २०१०) की, सर्व Dy.CEO (बालकल्याण) आणि CDPOs (शहरी) यांनी THR चे नमुने शासनाशी संलग्न असलेल्या प्रयोगशाळांकडून तपासून घ्यावेत.

लेखापरीक्षणांत असे निदर्शनास आले की, पुरवठादारांनी, शासनाने शिफारस केलेल्या अन्न स्वच्छता आणि आरोग्य प्रयोगशाळा, पुणे (FHHL) यांच्याकडून आहार नमुने तपासणी आहवाल सादर केले होते. परंतु, पाच Dy.CEO आणि दोन CDPOs (शहरी) यांनी आहाराचे नमुने याच प्रयोगशाळेकडून (FHHL) तपासून घेतले होते. आहाराचे नमुने त्याच प्रयोगशाळेकडून विभागाने तपासून घेणे, हे कार्यक्रमाच्या दृष्टीने हितावह नव्हते, कारण ती प्रयोगशाळा पुरवठादारांना दिलेल्या तपासणी अहवालासारखाच अहवाल विभागाला देणे शक्य होते. पुढे सात CDPOs आणि दोन Dy. CEOs (नागपूर आणि पुणे) यांनी नमुने तपासणीसाठी पाठविले नाहीत, कारण पुरवठादारांनी तपासणी अहवाल सादर केले होते आणि नमुना तपासणीसाठी विभागीय अर्थसंकल्प तरतूद उपलब्ध नव्हती.

जरी CDPO, यवतमाळ (शहरी) यांच्याकडे, आहाराच्या निकृष्ट दर्जाबद्दल (पुरवठा कालावधी जानेवारी - फेब्रुवारी, २०११) वैयक्तिक तक्रारी लाभार्थ्यांनी नोंदविल्या होत्या, तरीसुद्धा नमुने प्रयोगशाळेकडून तपासून घेण्यासाठी कार्यवाही करण्यात आली नाही. भारत सरकार, अन्न आणि पोषण मंडळ यांनी एप्रिल, २०११ मध्ये दोन नमुन्यांची अचानक तपासणी करता असे आढळले की, नमुने प्रमाणित निकषांप्रमाणे नव्हते. दोन ग्रामीण CDPOs (धामगाव रेल्वे, अमरावती जिल्हा आणि अहमदनगर ग्रामीण-१,अहमदनगर जिल्हा) यांनी THR च्या नमुन्यांची जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत तपासणी केली असता, असे आढळून आले की THR प्रमाणित उष्मकांच्या दर्जाप्रमाणे नव्हते. तपशील **तक्ता ५** मध्ये खाली देण्यात आला आहे:

तक्ता ५ : आहारासाठी प्रमाणित केलेला दर्जा आणि THR ची गुणवत्ता (प्रति १०० ग्रॅम)

आहार	कराराप्रमाणे आवश्यक उष्मांक मूल्य (कि.उष्मांक) शासन निर्णय दिनांक २४ ऑगस्ट २००९.	तपासणीचे निष्कर्ष (CDPO) धामणगाव रेल्वे दिनांक २८/१०/ २०१०	उष्मांक मूल्याची कमतरता (किलो उष्मांक)	तपासणीचे निष्कर्ष (CDPO) अहमदनगर ग्रामीण-१ दिनांक १९/११/२०१०)	उष्मांक मूल्याची कमतरता (किलो उष्मांक)	तपासणीचे निष्कर्ष (CDPO, अहमदनगर ग्रामीण-१ दिनांक १७/०१/२०११)	उष्मांक मूल्यांची कमतरता (किलो उष्मांक)
सुखडी	४८०.८९	४०३.६६	७७.२३	३८६.९० (बॅच क्र. SKP-1)	९३.९९	३८०.२६ (बॅच क्र. 4-561)	१००.६३

शिरा	४५४.१३	४०४.२२	४९.९१	३९२.१४ (बॅच क्र. SHC-P2)	६१.९९	३८८.३८ (बॅच क्र. SHW P-3)	६५.७५
उपमा	४९०.९८	४०५.३६	८५.६२	३८३.३० (बॅच क्र. UPC-PO-1)	१०७.६८	३७६.५४ (बॅच क्र. UPC-P-6)	११४.४४

वर दर्शविलेल्या उणीवा व दंडात्मक कारवाईची तरतूद करारनाम्यात असताना देखील, विभागाने, कमी उष्मांक असलेला आहार पुरविल्याबद्दल, पुरवठादारांना कोणताही दंड आकारला नाही. Dy. CEOs नी दिलेल्या समाधानकारक कार्यसिद्धी अहवालांवर विसंबून, विभागाने कंत्राटाची मुदत दोन वर्षांनी वाढविली. विभागाने कंत्राटाची मुदत वाढविण्यापूर्वी पुरवठादारांच्या कामाचा पुरेसा आढावा न घेतल्याचे स्पष्ट होते, कारण यास पुरवठादाराने ज्या प्रयोगशांळाकडून नमुने तपासले, त्यापेक्षा अन्य प्रयोगशाळांच्या तपासणी अहवालांचा आधार नव्हता. तसेच वरीलप्रमाणे नमुन्यातील उणीवा विचारात घेतल्या नव्हत्या.

आयुक्तांनी सांगितले की, राज्यात जवळ-जवळ एक लाख आंगणवाडी केंद्रे आहेत आणि अन्न तपासणीसाठी पुरेशा प्रयोगशाळा उपलब्ध नाहीत. आंगणवाडी केंद्रांना पुरविलेले गरम आणि ताजे अन्न नाशिवंत असते आणि १२ तासानंतर तपासणी करणे शक्य नसते. राज्यातील काही प्रयोगशाळांनी अन्न तपासणीसाठी पुरेशा सुविधा नसल्याचे कळविले आहे. आयुक्तांनी पुढे असेही सांगितले की, पुरवठादारांच्या संघटनेला आहारातील प्रथिने आणि उष्मांकाकरिता शासकीय निकषांचे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

घरपोच आहार अथवा चावण्याजोगे अन्न न पुरविणेः-

चाचणी तपासणी केलेल्या नऊ पैकी (आठ गट) चार जिल्ह्यांमध्ये असे निदर्शनास आले की, घरपोच आहार पुरवठ्याची मागणी उशीरा केल्याने, सप्टेंबर २०१० ते मार्च २०१२ या कालावधीत, तीन ते ७० दिवस आहार पुरविण्यात आला नाही **(विवरण क्र.१३).** धामणगाव रेल्वे, उरळीकांचन, वडगाव मावळ,जुन्नर आणि बीड ग्रामीण I या प्रकल्पांना पुरविलेल्या आहाराच्या पावत्यांवर पुरवठयाच्या तारखेची नोंद नसल्याने, आहार पुरविण्यास उशीर झाला की नाही, हे लेखापरीक्षणांत निश्चित करता आले नाही.

आयुक्तांनी सांगितले की, तक्रारी व खटल्यांच्या केसेसमुळे, THR पुरविण्यास उशीर झाला. परंतु, आता शून्य ते सहा वर्षे वयापर्यंतच्या लाभार्थ्यांना THR चा पुरवठा नियमितपणे करण्यात येतो.

मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार (मे २०११), मेळघाट प्रकल्प, धारणी,जिल्हा अमरावती येथील THR चा पुरवठा जुलै, २०११ पासून थांबविण्यात आला आणि लाभार्थ्यांना (सहा महिने ते सहा वर्षे) गरम व शिजविलेले अन्न देण्यात आले.

लेखारीक्षणांत निदर्शनास आले की, CDPO, धारणी यांनी सहा महिने ते सहा वर्ष या वयोगटातील २४,०३२ मुलांना वरील आदेशाप्रमाणे ऑगस्ट आणि सप्टेंबर, २०११ मध्ये शिजवलेले अन्न देण्यासाठी विलंबाने (३ सप्टेंबर २०११ रोजी) कच्च्या मालाची मागणी नोंदविली. प्रत्यक्षात कच्च्या मालाचा पुरवठा ८ सप्टेंबर आणि १८ सप्टेंबर २०११ दरम्यान करण्यात आला, ज्यामुळे आहार पुरवठ्यात ३८ ते ४७ दिवसांचा अडथळा निर्माण झाला. या काळात लाभार्थ्यींना पूर्वीचा आहार ही मिळाला नाही व शिजविलेले अन्नही मिळाले नाही.

सहा महिने ते वर्ष वयाच्या मुलांकरिता आहाराचा तक्ता बनविण्यास झालेल्या विलंबामुळे मुलांना शिजवलेले अन्न देण्यास विलंब झाल्याचे आयुक्तांनी सांगितले.

अभिलेख्यांच्या तपासणीत पुढे असे आढळून आले की, मेळघाट प्रकल्प, धारणी येथे ६ महिने ते ६ वर्ष वयापर्यंतच्या वयोगटातील सर्व मुलांसाठी एकसारखाच आहाराचा तक्ता बनविण्यात (ऑगस्ट, २०११) आला होता. मुलांच्या वयाप्रमाणे वेगवेगळा आहार / पाककृतीचे प्रावधान करण्यात आले नव्हते.

१.६५ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या लाभार्थ्यांना दिला जाणारा पोषण आहार हा जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली पोषण आहार समितीच्या शिफारसीप्रमाणे देण्यात येतो.

स्थानिक आहार व तेथील आवड लक्षात घेवुन रेसीपी ठरविण्यात येते.सर्वसाधारण मुंलाना ५०० कॅलरी व १२ ते १५ ग्रॅम प्रथिने देण्यात येतात.

ज्या ठिकाणी बचतगटाने आहार पुरवठा बंद केला आहे.त्या ठिकाणी स्थानिक स्तरावरुन पर्यायी व्यवस्था करण्यात येते.

कोणत्याही परिस्थितीत लाभार्थी आहारापासून वंचित राहू नये याची दक्षता घेण्यात येते. पोषण आहार पुरवठयामध्ये काही त्रृटी दिसून आल्यास पुरवठादारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येते. याप्रमाणे पोषण आहार पुरवठ्याबाबत दक्षता घेण्यात येते. वेळोवेळी अधिकाऱ्यामार्फत आहाराची तपासणी करण्यात येते.

THR घरपोच पुरविण्यात येणा-या आहारामध्ये शिरा, उपमा, सत्तु इ. फॅक्टरी मध्ये तयार केल्यानंतर प्रत्यक्ष पुरवठा करण्याच्या वेळेपर्यंत यामध्ये काही प्रमाणात तूट येते. पुरवठादराशी करण्यात आलेल्या करारनाम्या मध्ये ५% तूट ग्राहय धरण्यात आली आहे.

तरी पण नियमानुसार आहारपुरवठा करण्या विषयी सर्व संबधितांना कळविण्यात आले आहे. शासनाने दिलेल्या निर्देशाप्रमाणेच आहारामध्ये उष्मांक व प्रथिने असणे आवश्यक आहे.त्याची तपासणी शासनमान्य व NABL मान्य प्रयोगशाळेकडून करण्यात येते.

तसेच पुरवठादार संस्था याचेशी केलेल्या करारनाम्या प्रमाणे उष्मांक मध्ये ५% तूट ग्राहय धरण्यात आली आहे.

तरी परंतु शासन निर्देशाप्रमाणे उष्मांक व प्रथिने असावे यासाठी विभाग व शासन स्तरावरुन दक्षता घेण्यात येते.

शासन निर्णयाप्रमाणे दिनांक २४ ऑगस्ट २००९ आहाराची तपासणी वर्षातून २ वेळा करणे आवश्यक आहे. तसेच THR पुरविताना त्या बॅचचा प्रयोगशाळा तपासणी अहवाल सोबत जोडने आवश्यक आहे. त्याप्रमाणे अहवाल जोडण्यात येतो.प्रयोगशाळा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच तो लाभार्थ्यांना देण्यात येतो या शिवाय आहार पुरवठयाची देयक सद्धा अदा करण्यात येते नाही.

गरम ताजा आहाराच्या बाबतीत दिनांक २४ ऑगस्ट २००९ च्या शासननिर्णया प्रमाणे दररोज पुरविण्यात येणारा गरम ताजा आहार अंगणवाडयाच्या वेळा पर्यंत जतन करून ठेवणे आवश्यक आहे.

तसेच तपासणी मध्ये ज्या अधिका-यानी नियमानुसार कार्यवाही केली नसेल त्यांना नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात येईल.

तसेच तपासणी अधिका-याने दिलेल्या सूचनेप्रमाणे भविष्यात दक्षता घेण्यात येईल.

पुरक पोषण आहार राज्यातील १ लाख अंगणवाडी केंद्रामधील ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील ३१ लाख लाभार्थी ३ ते ६ वर्षे वयोगटातील ३० लाख लाभार्थी व १२ ते १३ लाख स्तनदा व गरोदर माता यांना दररोज आहार पुरविण्यात येतो.

आहार तपासणीसाठी पुरेशा प्रयोगशाळा नाही ही वस्तुस्थिती आहे.तसेच आहाराचे नमुने तपासण्यासाठी बराचसा कालावधी लागतो.

आहार पुरवठयास मुदतवाढ देताना प्रकल्प स्तरावरील अभिप्राय व प्रत्यक्ष लाभार्थी यांचेशी चर्चा केल्यानंतरच निर्णय घेण्यात आला

.

घरपोच आहार अथवा चावण्याजोगे अन्न न पुरविणे याबाबत सादर करण्यात येते की, ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णया प्रमाणे कार्यवाही करण्यात आली नव्याने THR पुरवठा करावयाचा असल्याने निविदा काढणे त्यास शासनाची मंजुरी घेणे काही संस्था न्यायालयात गेल्याने मा.न्यायालयाचा निर्णय लागल्या नंतर त्याप्रमाणे कार्यवाही करणे याकरिता थोडा कालावधी लागला आहे.

या कालावधी मध्ये पुरवठा वेळेवर झाला नाही हे खरे आहे. तरी पण वर्षातून किमान ३०० दिवस आहार पुरवठा करणे आवश्यक असल्याने त्याप्रमाणे आहार पुरवठयात पडलेला खंड भरून काढण्यात आलेला आहे.

मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे मेळघाट क्षेत्रातील धारणी व चिखलदरा या प्रकल्पात THR ऐवजी गरम ताजा आहार देण्याचा निर्णय झाल्याने आचानक चालू करावा लागला. THR बंद करावा लागला व त्या ठिकाणी गरम ताजा आहार चालू करावा लागला.

तसेच बचत गटानेही आहार पुरवठा बंद केल्याने माहिला संस्था मार्फत कच्चा माल पुरवठा करावा लागला या सर्व प्रक्रियेमुळे आहार पुरवठयास विलंब झाला. तरी पण सुट्टीच्या दिवसात आहारपुरवठा करुन ३०० दिवस भरुन काढण्यात येतो.

वरीलप्रमाणे खंड पडल्यानंतर नियमित आहार पुरवठा करुन पडलेला खंड भरून काढण्यात येतो.

१.६६ परिच्छेद क्र. ४.१.१३ अंगणवाडी केंद्राचे बांधकाम :

मार्च, २०१२ पर्यंत ICDS, योजनेखाली ९७४६२ केंद्रांना मंजूरी देण्यात आली होती. त्यापैकी ९५,३३५ केंद्रे कार्यरत होती. शुन्य ते सहा वर्षे वयोगटातील मुलांसाठी असलेली अंगणवाडी केंद्रे, पिण्यासाठी नळाचे पाणी, अन्न साठविण्यासाठी जागा, भांडी, खेळणी, बसण्यासाठी योग्य व्यवस्था इत्यादी सोयी असलेल्या बांधकाम केलेल्या जागेत कार्यरत असणे आवश्यक होते. २००७-०८ पर्यंत ग्रामीण भागात अंगणवाडी केंद्रे बांधण्याचे काम जिल्हा परिषदा करत होत्या. अंगणवाडी केंद्रे बांधण्याच्या कामासाठी २००८-२०१२ मध्ये उपलब्ध निधी व केलेला खर्च यांचा तपशील तक्ता क्र. ६ मध्ये दिला आहे.

तक्ता ६ : आंगणवाडी केंद्राच्या बांधकामासाठी दिलेल्या निधीचा तपशील :

मुख्य लेखाशीर्ष २२३६- पोषण आहार (रु. कोटीत)

वर्ष	अर्थसंकल्पीय तरतुद	खर्च
२००८-२००९	४३.८३	३८.३४
२००९-२०१०	९८.५७	९८.५४
२०१०-२०११	३६४.२५	४११.५१
२०११-२०१२	१७३.७८	७३.४९
एकूण	६८०.४३	६२१.८८

स्त्रोत : नागरी अर्थसंकल्पीय अंदाज आणि प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई यांनी दिलेल्या माहितीनुसार (२०१०-२०१२) मधील आकड्याचा / खर्चाचा ताळमेळ घालण्यात आला नव्हता.

१.६७ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

अंगणवाडी बांधकामासाठी अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार बांधकामे प्रस्तावित करण्यात येतात. काही ठिकाणी अंगणवाडी केंद्राच्या बांधकामांना जागा उपलब्ध न होणे त्यामुळे तरतूद खर्च न होणे .तसेच केंद्राची बांधकामे अपूर्ण असणे तसेच ठराविक कालावधीनंतर मंजूर निधी खर्च करण्यास परवानगी नसणे इ. कारणामुळे पूर्ण रक्कम खर्च होऊ शकत नाही. त्यामुळे अर्थसंकल्पीय तरतूद व झालेला खर्च यामध्ये तफावत दिसून येते.

१.६९ परिच्छेद क्र. ४.१.१३.१ खुल्या जागेत कार्यरत असणारी अंगणवाडी केंद्रे :

आयुक्तांच्या अभिलेख्याच्या तपासणीत ७,६५८ अंगणवाडी केंद्रे खुल्या जागेत, झाडाखाली इत्यादि ठिकाणी चालविण्यात येत असल्याचे आढळले. स्वत:च्या, दान केलेल्या व खुल्या जागेत चालविण्यात येत असलेल्या अंगणवाडी केंद्रांचा तपशील तक्ता क्र. ७ मध्ये दिला आहे.

तक्ता क्र. ७ स्वत:च्या मोकळ्या जागेत इत्यादी ठिकाणी चालविण्यात येणा-या अंगणवाडी केद्रांचा तपशील :

मंजूर आं.वाडी केंद्र	कार्यरत असलेली आं. वाडी केंद्र	कार्यरत आंगणवाडी केंद्रांच्या जागेची स्थिती				
		स्व:तची जागा	भाड्याची जागा	दान केलेली जागा	खुल्या जागेत	एकूण
९७,४६२	९५,३३५	४३,५०१	२१,७८६	२२,३९०	७,६५८	९५,३३५

स्त्रोत : आयुक्तांनी दिलेल्या मासिक प्रगती अहवालाप्रमाणे (मार्च-२०१२)

अंगणवाडी केद्रांच्या बांधकामाचा नमुना आराखडा (Type plan) आणि बांधकामासाठीचे प्राधान्य विभागातर्फे निश्चित करण्यात आले होते. (संप्टेबर, २००९ आणि जानेवारी, २०१०), त्याप्रमाणे, खुल्या जागेत चालविल्या जाणा-या अंगणवाड्यांच्या बांधकामाला अग्रक्रम

देण्यात आला होता. प्राधान्यक्रमानुसार सर्व अंगणवाडी केंद्रांचे बांधकाम पूर्ण झाल्यावर आयुक्ताकडे प्रमाणपत्र पाठविणे आवश्यक होते. त्यानंतर भाड्याच्या जागेतील इत्यादी अंगणवाडी केंद्रांच्या बांधकामाला प्राधान्य देण्यात येणार होते असे असताना आयुक्त व CCO ना आवश्यक प्रमाणपत्र न पाठविल्याने उर्वरीत ७,६५८ खुल्या जागेत चालविल्या जाणाऱ्या अंगणवाड्याचे बांधकाम प्राधान्यक्रमानुसार सुरू झाले की नाही, हे लेखापरीक्षणात निश्चित करता आले नाही.

अंगणवाडी केंद्रांच्या बांधकामासाठी जमीन उपलब्ध नसल्याचे आयुक्तांनी सागितले तरीही खुल्या जागेवरील अंगणवाड्यांच्या बांधकामास प्राधान्य देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

१.७० ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

ज्या अंगणवाड्या उघड्यावर भरत आहेत अशा ७,६५८ अंगणवाडीचे बाधकामाबाबत जिल्हा परिषदस्तरावर व शहरी प्रकल्पस्तरावर अंगणवाडीचे बांधकाम करण्याचे प्रयत्न सुरू असून नाबार्ड, मानव विकास मिशन, १३ वा वित्त आयोग, जिल्हा नियोजन व विकास मंडळ नवीन अंगणवाडी बांधकामास रु. ४.५० लाखप्रमाणे निधी उपलब्ध करून घेण्यात येत आहे. ज्या जिल्हा परिषदांना निधी वितरित करण्यात आला आहे. त्यांचेकडून उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यात घेण्यात आले असून उपयोगिता प्रमाणपत्र शासनास प्राप्त झाले आहे. तसेच ज्या अंगणवाड्यांची बांधकामे पूर्ण झालेली आहेत. त्याची माहिती शासनास वेळोवेळी प्राप्त झाली आहे.

अंगणवाडी बांधकामासाठी केंद्र शासनाची आतापर्यंत कोणतीही योजना नव्हती. यापुर्वी जिल्हा परिषदांना त्यांचेस्तरावर विविध स्त्रोतातून यापुर्वी बांधकाम करण्यात आले आहेत. सद्यःस्थितीत राज्यस्तरावरून मागील सन २०१०-२०११ पासून विविध निधी अंर्तगत तरतूद करण्यात येऊन बांधकांम सुरू आहे. याबाबतचे **(विवरणपत्र १४)** सोबत जोडण्यात येत आहे.

१.७१ परिच्छेद क्र. ४.१.१३.२ अंगणवाडी केंद्रांना भेट :

लेखापरीक्षकांनी ५४ अंगणवाड्यांची विभागाच्या प्रतिनिधीसोबत संयुक्त पाहणी केली या पाहणीचे तपशीलवार निष्कर्ष **(विवरण क्र. १५)** मध्ये दिले आहेत लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले आहे की,—

* मुंबईतील नऊ व नागपूर शहरी भागातील (तास बाग क्र. १४८ आणि १५३) दोन अंगणवाडी केंद्रांसह एकूण ३० अंगणवाडी केंद्रांत स्वच्छतागृहाची सोय नव्हती.

* मुंबईतील अकरा आणि नागपूर शहर (तास बाग क्र. १४८ आणि १५३) भागातील दोन अंगणवाडी केंद्रांसह एकूण २४ आंगणवाडी केंद्रांमध्येबाहेरील कार्यक्रमासाठी मोकळी जागा नव्हती.

* मुंबईतील १३ अंगणवाडी केंद्रांसह एकूण २१ अंगणवाडी केंद्रे भाड्याच्या जागेत सुरू होती. मुंबईतील चार अंगणवाडी केंद्रांमध्ये २८, ५०, ३० आणि २० लाभार्थ्यांसाठी अनुक्रमे ८०, ८५, २४० आणि २४० चौरसफूट जागा उपलब्ध होती .

* ११ अंगणवाडी केंद्रांमध्ये संदर्भित सेवांची नोंदवही ठेवली नव्हती. आहाराचा तक्ता दोन अंगणवाडी केंद्रांमध्ये पाळण्यात येत नव्हता. सहा अंगणवाडी केंद्रांमध्ये आहार मिळाल्याची पोचपावती घेण्यात आली नव्हती. नऊ अंगणवाडी केंद्रांमध्ये औषधे / सिरप मिळाल्याची पोचपावती घेण्यात आली नव्हती.

शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये पुरेशा जागे अभावी, खेळाच्या मैदानासाठी व स्वंतत्र स्वच्छतागृहाची सोय अंगणवाडी केंद्रांसाठी करणे शक्य नसल्याचे आयुक्तांनी सांगितले. तरीही ग्रामीण भागांमध्ये आवश्यक सोयी न पुरविण्याबाबत कोणतेही कारण उत्तरात दिले नाही.

१.७२ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

* मुंबई व नागपूर शहरी भागांतील अंगणवाडी केंद्रांत जागेअभावी स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध होऊ शकत नाही स्थानिक पातळीवर आजुबाजुच्या घराजवळ असणा-या स्वच्छतागृहाचा उपयोग केला जातो.

* मुंबई व नागपूर शहरी भागांतील अंगणवाडी केंद्रांत २४ अंगणवाडी केद्रामध्ये अंगणवाडी सर्व्हेनुसार अंगणवाडी मुलांना अंगणवाडीत येण्यास जवळ पडेल अशा ठिकाणी जागा निश्चित केली जाते. त्यामुळे बाहेरील कार्यक्रमास जागा उपलब्ध नसल्याने अंगणवाडीत कार्यक्रम घेतले जातात. याशिवाय महत्त्वाच्या कार्यक्रमास अंगणवाडीचे कार्यक्रम एकत्रितरित्या घेतले जातात.

* ११ अंगणवाडी केंद्रांमधील कामकाजाबाबत संबंधित बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी उपरोक्त बाबीबाबत ११ अंगणवाडी केंद्रांमधील त्रुटीची पूर्तता करून घेतली आहे. तसेच संबंधित रजिस्टरमधील नोंदी संस्थांना वेळोवेळी अद्यायावत करण्याबाबत सूचना देण्यात येत आहेत.

ग्रामीण भागांत जिल्हा परिषदस्तरावर स्थानिक पातळीवरील सामाजिक कार्यकत्यांची मदत घेऊन सोयी-सुविधांची पूर्तता केली जाते. तसेच शहरी भागातदेखील स्थानिक पातळीवरील सामाजिक कार्यकत्यांची मदत घेऊन सोयी-सुविधांची पूर्तता केली जाते तसेच शहरी भागात देखील पातळीवरील सामाजिक कार्यकर्त्याची मदत घेऊन सोयी सुविधाची पूर्तता केली जाते मोठया प्रमाणावर लोकवर्गणीचे माध्यमातून अंगणवाडी रंगरंगोटी, मुलांसाठी गणवेश, खुर्च्या, खेळणी, साहित्य उपलब्ध करून देण्यात येत आहे. औरंगाबाद जिल्ह्यात लोकवर्गणीतून अंगणवाड्या ISO प्रमाणित केलेल्या आहेत.

१.७३ परिच्छेद क्र. ४.१.१४ बाल न्याय कायद्याची अंमलबजावणी :

विधी संघर्षग्रस्त बालकांस न्याय देणे आणि काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांची मैत्रीपूर्ण संवाद तसेच त्यांच्या विकासाच्या दृष्टीने पुनर्वसन करणे यामूळ उद्देशाने बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम, २०००, एप्रिल २००१ मध्ये पारित करण्यात आला.

१.७४ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

विधी संघर्षग्रस्त बालकांस न्याय देणे आणि काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांशी मैत्रीपूर्ण संवाद तसेच त्यांच्या विकासाच्या दृष्टीने पुनर्वसन करणे या मूळ उद्देशाने बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम, २०००, एप्रिल २००१ अन्वये या अधिनियमांतर्गत काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी, बालकांचे निर्णय घेण्यासाठी ३५ जिल्ह्यांमध्ये बाल कल्याण समिती व विधी संघर्षग्रस्त बालकांसाठी ३५ जिल्ह्यांमध्ये बाल न्याय मंडळ गठीत करण्यात आलेले असून सदरहू बालकांच्या काळजी व संरक्षण व पुनर्वसनाकरिता राज्यामध्ये एकूण १,३५९ संस्था कार्यरत असून या संस्थांमार्फत अशा बालकांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, व्यवसाय प्रशिक्षण, वैद्यकीय सुविधा व समुपदेशन इत्यादी सोयी सुविधा पुरविल्या जाऊन त्यांचे योग्य ते पुनर्वसन केले जाते.

- जिल्हास्तरीय बाल न्याय मंडळ / बाल न्याय समितीला इंटरनेट सुविधा, टेलीफोन, स्टेशनरी, फर्निचर संगणक प्रिंटर फॅक्स सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

- प्रत्येक बालगृहामध्ये व्यवस्थापन समित्या तात्काळ स्थापन करण्याबाबत आयुक्तालयाचे परिपत्रक क्र. ९७२२, दिनांक २५ फेब्रुवारी २०११ अन्वये सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना कळविण्यात आलेले आहे.

- बाल न्याय अधिनियमातील तरतुदींनुसार राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये विशेष बाल पोलीस पथक नेमण्यात आलेले आहे तसेच प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये बालकल्याण अधिकारी व कर्मचा-यांसह विशेष बाल पोलीस पथक स्थापन करण्यात आलेली आहेत.

- राज्यातील स्वयंसेवी व शासकीय बालगृह, निरीक्षणगृह व अनुरक्षण गृह यांची तपासणी करण्यासाठी आयुक्तस्तरावरील अधिकारी यांची कर्तव्य व जबाबदारी निश्चित केलेली आहे.

- दि. २२.१२.२०११ अन्वये बाल न्याय अधिनियमांतर्गत बालगृहबाबतचे निकष निश्चित करण्यात आलेले आहेत. तसेच संस्था व संस्थेतील बालकांची सर्वांगीण काळजी व संरक्षणाचा सर्वसमावेशक आराखडा (Comprehensive Care Plan) निश्चित करण्यात आलेला आहे.

- जिल्ह्यातील समाजकार्य (MSW) महाविद्यालयामार्फत बालकांच्या निवासी संस्थांची सामाजिक तपासणी करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

- संस्थेतील लैंगिक अत्याचाराच्या दुर्घटना टाळण्यासाठी मदत होईल याकरिता बाल विकासच्या सर्व निवासी संस्थांची तपासणी करणेबाबत आयुक्तालयाने पत्र क्र. ९६५३, दिनांक ९ डिसेंबर २०११ अन्वये सर्व जिल्हा महिला दक्षता समिती यांना विनंती करण्यात आली आहे. त्यानुसार कार्यवाही सुरू आहे.

- संस्थेतील बालकांची व कर्मचा-यांची उपस्थिती नोंदविण्यासाठी शासनमान्य बाल विकासाच्या ९६९ संस्थांमध्ये बायोमॅट्रीक यंत्र बसविण्यासाठी संबंधित वर्कऑर्डर देण्यात आलेली आहे.

- दिनांक २ मे २०१२ अन्वये बालगृहाची मान्यता तसेच नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यासंदर्भात पाळावयाचे शिष्टाचाराबाबत (Exit Plan / Crisis Management Protocols) तयार करण्यात आलेला आहे.

- बालकांचा व्यक्तिमत्व विकास घडवून आणण्यासाठी राज्यातील सर्व बालगृहांमध्ये Art of Living चे प्रशिक्षण देण्याची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे.

निवासी संस्थातील बालकांना पुरेसा आहार न देणे मारहाण करणे, अत्याचार करणे, शोषण करणे अथवा बालकांस गैर प्रयोजनासाठी राबविणे, वापर करणे असे प्रकार निदर्शनास आल्यास त्या संबंधित संस्थाप्रमुख, कर्मचारी, व्यक्ती यांचेविरूध्द बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमातील तरतुदींनुसार तात्काळ संबंधित पोलीसांकडे तक्रार दाखल करणेबाबत सर्व जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांना कळविण्यात आलेले आहे.

- बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमांतर्गत मान्यताप्राप्त (अनुदानित / विनाअनुदानित) संस्थांमध्ये दाखल असलेल्या मुलांना अनाथ असल्याचे प्रमाणपत्र देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्याचा उपयोग अनाथ मुलांना शैक्षणिक संस्था, व्यवसाय प्रशिक्षण संस्था यामध्ये प्रवेश तसेच रोजगार नोकरी मिळण्यासाठी होणार आहे.

- या विभागांतर्गत सद्यःस्थितीत कार्यरत असलेल्या ६ शासकीय व ३ स्वयंसेवी अशा एकूण ९ अनुरक्षण गृहांमधील १८ वर्षे पूर्ण होत असलेल्या व पूर्ण झालेल्या प्रवेशितांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील स्वावलंबी पुनर्वसन या योजनेस मान्यता देण्यात आलेली आहे.

- राज्यातील सर्व मुले प्राधान्याने बालकल्याण क्षेत्रात कार्यरत असलेल्या शासकीय व स्वयंसेवी संस्थांमध्ये पुनर्वसनासाठी दाखल झालेल्या अनाथ निराधार, उन्मार्गी मुलांमधील सुप्त गुणांना वाव देऊन त्यांच्यात एकमेकांविषयी बंधुभाव सांघिक भावना निर्माण होण्यासाठी दरवर्षी ३५ जिल्ह्यांमध्ये ६ विभागीयस्तरावर नोव्हेंबर महिन्याच्या दुस-या आठवडयात बाल महोत्सव साजरा केला जातो.

- मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी, उच्च शिक्षणासाठी मदत करण्यासाठी एकलव्य व ज्ञानसुर्य या नवीन योजना प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. त्यांच्या मान्यतेची कार्यवाही सुरू आहे.

- राज्याचा बालकांच्या निवासी संस्थांचा आराखडा ठरविण्यासाठी अंगणवाडी सेविका यांचे मार्फत राज्याचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. सर्व बालकांच्या निवासी संस्थांमध्ये लैंगिक शोषणाच्या घटनांना आळा घालण्यासाठी CCTV कॅमेरे बसविणेसाठी प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

- बालविकासच्या निवासी संस्थांमध्ये असलेल्या मुलींशी जास्तीत जास्त संवाद साधल्याशिवाय त्या मोकळ्यापणे बोलू शकणार नाहीत यासाठी या संस्थांमध्ये मुख्यसेविका (अंगणवाडी) यांनाही नियमित तिमाही भेटी देणेसाठी आयुक्तालयाचे परिपत्रक दि. ३.७.२०१३ अन्वये सुचित करण्यात आलेले आहे. तसेच सर्व संस्थांमध्ये समुपदेशकाच्या सेवा उपलब्ध करून देण्याबाबत सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना कळविण्यात आलेले आहे ज्यामुळे मुलींच्या संदर्भातील शोषणाच्या घटनांना आळा बसेल.

बालकांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण करण्यासाठी तसेच बालकांना याबाबत माहिती होण्यासाठी युनिसेफ व FACSE या संघटनांनी तयार केलेली वेगवेगळी पोस्टर सर्व संस्थांमध्ये व इतरत्रही लावण्याबाबत आयुक्त ालयामार्फत सुचना दिलेल्या आहेत.

१.७५ परिच्छेद क्र. ४.१.१४.१ बालगृहातील मुलांकरिता व्यावसायिक शिक्षणाची तरतूद नव्हती :

बाल न्याय नियमांच्या नियम १६(८), १६(९) आणि २९(४) अन्वये बालगृहातील मुलांना उपयुक्त आधुनिक आणि खुल्या बाजारात उपयोगी पडणारे व्यावसायिक शिक्षण देणे आवश्यक आहे. विभागाने बालगृहातील मुलांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमार्फत व्यावसायिक प्रशिक्षण देण्याचे ठरविले (ऑगस्ट २००७) त्यानुसार १६ ते १८ वर्षे वयोगटांतील मुलांसाठी प्रत्येकी रू. ५,००० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक शिक्षण देण्यावर खर्च करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे नऊ जिल्ह्यांत सुरूवातीला मार्गदर्शक तत्त्वावर असे प्रशिक्षण देण्याचे निश्चित करण्यात आले.

आयुक्तांच्या अभिलेख्यांच्या तपासणीत असे आढळून आले की, नऊपैकी सात जिल्ह्यांत ४५६ पात्र मुलांना तक्ता ८ मधील तपशीलाप्रमाणे व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात (२००७-०८) आले.

तक्ता ८ : मुलांच्या व्यावसायिक शिक्षणाचा जिल्हा निहाय तपशील

अ.क्र.	जिल्हयाचे नाव	बालगृहातील मुलांची संख्या ज्यांना २००७-०८ मध्ये प्रशिक्षण देण्यात आले		औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना दिलेली रक्कम (रू. लाखामध्ये)	
		शासकीय	अशासकीय संस्था	शासकीय	अशासकीय संस्था
१	औरंगाबाद	५८	३३	२.९०	१.६५
२	अमरावती	७०	—	३.५०	—
३	मुंबई शहर	—	६४	—	३.२०
४	नाशिक	४०	५३	२.००	२.०५
५	नागपूर	१९	—	०.९५	—
६	पुणे	४१	२८	१.६३	०.८३
७	ठाणे	३२	१८	२.३७	०.३८
८	मुंबई उपनगर		माहिती उपलब्ध नाही.		
९	लातूर				
	एकूण	२६०	१९६	१३.३५	८.११

स्त्रोतः आयुक्त आणि संबंधित घटकांकडून मिळालेली माहिती

परंतु, शासकीय व अशासकीय संस्थाकडून रू.२१.४६ लाख इतके शुल्क न मिळाल्याने सन २००८-०९ पासून औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी प्रशिक्षण बंद केले. विभागाने रू.१३.३५ लाख इतकी रक्कम मार्च २०१० मध्ये दिली. शिवाय मुलांना दिलेल्या प्रशिक्षणाचा अपेक्षित लाभ झाला याची खात्री आयुक्त करू शकले नाहीत.

आयुक्तांनी राज्यातील सर्व DWCDOs बालगृहातील मुलांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना दिल्या.(मार्च २००८) आयुक्तांनी प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने २००८-०९ या वर्षासाठी एक वार्षिक योजना तयार केली व विभागाला पाठविली. परंतु, सन २०११-१२ पर्यंत अर्थसंकल्पीय तरतूद न केल्यामुळे सदरील वार्षिक योजना राबविता आली नाही.

आयुक्तांनी सांगितले की, व्यावसायिक प्रशिक्षणासाठी स्वतंत्र अनुदान नसल्यामुळे योजना राबविण्यात आली नाही.

१.७६ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

शासन निर्णय क्र.जेजेए-२००६/प्रक्र.४२१/का.३, दि. ४.८.२००७ अन्वये महिला व बालविकास विभागांतर्गत कार्यरत संस्थेमधील प्रवेशितांना व्यावसायिक प्रशिक्षण औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमार्फत (आयटीआय) प्रशिक्षण देण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण योजना सुरू करण्यांत आली आहे. सदर शासन निर्णयानुसार प्रवेशितांना शिक्षण व प्रशिक्षण तसेच इतर बाबींकरिता होणारा खर्च हा संस्थेला प्राप्त होणाऱ्या अनुदानातून खर्च करण्यांत यावा अशा सूचना देण्यांत आलेल्या आहेत. तथापि, शासकीय संस्थांना तसेच स्वयंसेवी संस्थांना देण्यांत येणारे सहाय्यक अनुदान हे आहार, वेतन, तसेच प्रवेशितांना पुरविण्यांत येणाऱ्या सोयी सुविधा यासाठी खर्च करावा लागत आहे. सदर बाबीकरिता तरतूद अपुरी असल्याने आणि उपरोक्त निर्देशित बाबीसाठी संस्थांना स्वतंत्र अनुदान देण्यांत येत नसल्याने संस्था अशा प्रकारचे कार्यक्रम तरतुदी अभावी संस्थेमध्ये राबविण्यास तयार होत नाहीत.

तरी सुद्धा संस्थास्तरावर काही ठिकाणी देणगीदार/दानशूर व्यक्तींमार्फत व्यवसाय प्रशिक्षण दिले जाते. तसेच जिल्हा नियोजन समिती मार्फत नाविन्यपूर्व योजना म्हणून बालकांना व्यवसाय प्रशिक्षण देणेसाठी नियतव्यय मंजूर केला जातो. तसेच शासन निर्णय क्र.कमाशी-२०११/प्रक्र.३३९/का.३, दिनांक २७ ऑगस्ट २०१२ नुसार १८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रवेशितांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने कर्मवीर भाऊराव पाटील स्वावलंबी पुनर्वसन योजना राबविण्याबाबत निर्णय झालेला असून, अंमलबजावणीची कार्यवाही सुरू झालेली आहे.

१.७७ परिच्छेद क्र. ४.१.१५ मानवी साधन संपत्तीचे व्यवस्थापन

१.७८ परिच्छेद क्र. ४.१.१५.१ मनुष्यबळाचे व्यवस्थापन :—

मंजूर पदे व प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या कर्मचा-यांचा मार्च २०१२ रोजीचा तपशिल तक्ता ९ मध्ये देण्यात आलेला आहे.

तक्ता क्र. ९ मंजूर पदे व कार्यरत कर्मचा-यांचा तपशिल

पदाचे नांव	मंजूर पदे	प्रत्यक्ष कार्यरत कर्मचारी	रिक्त पदे टक्केवारी	रिक्त पदांची
जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी	२९	१८	११	३७.९३
जिल्हा परिविक्षा अधिकारी/ अधिक्षक	६१	४२	१९	३१.१४
परिविक्षा अधिकारी	२६३	१६१	१०२	३८.७८
वरिष्ठ लिपीक/ सांख्यिकी सहाय्यक	१८४	११८	६६	३५.८६
कनिष्ठ लिपीक	२८३	२२८	५५	१९.४३
परिचारीका	५२	४०	१२	२३.०७
वाहन चालक	४६	२६	२०	४३.४७
शिपाई	१६५	१६०	५	३.०३
वरिष्ठ काळजी वाहक, जमादार	२१६	१९४	२२	१०.१८
कनिष्ठ काळजी वाहक	२६७	२६१	६	२.२४
आचारी/परिचर/ वॉर्डबॉय/ कक्षसेवक/आया	२१	१८	३	१४.२८

राज्यातील महिला व बाल विकासाच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत महत्वाची भूमिका बजावणारे जिल्हा परीवीक्षा अधिकारी (३१.१४ टक्के) व परिवीक्षा अधिकारी (३८.७८ टक्के) ही पदे लक्षणीयरित्या रिक्त असल्याचे वरील तपशीलावरुन दिसून येते.

ICDS मधील मनुष्यबळाचा तपशील तक्ता १० मध्ये दाखविला आहे.

तक्ता १० : ICDS योजनेच्या अंमलबजावणीत गुंतलेल्या कर्मचा-यांची रिक्त पदे

पदनाम	मंजूर पदे	प्रत्यक्ष कार्यरत कर्मचारी	रिक्त पदे	रिक्त पदांची टक्केवारी
CDPOs	५५३	४४७	१०६ (शहरी ३८, ग्रामीण आणि आदिवासी ६८)	१९.१६
पर्यवेक्षक (ICDS)	३८९८	३२५९	६३९ (शहरी ५४, ग्रामीण आणि आदिवासी ५८५)	१६.३९
आंगणवाडी कार्यकर्ते	९७४६२	९५३३५	२१२७	२.१८
अंगणवाडी मदतनिस	९७४६२	८९६१८	७८४४	८.०४

स्त्रोत : आयुक्तांनी दिलेली माहिती.

CDPO सारखे महत्वाचे पद रिक्त असण्याचे प्रमाण १९.१६ टक्के असल्याचे दिसून येते. रिक्त पदे भरण्यासाठी पदोन्नती समितीची बैठक घेण्यात येईल असे आयुक्तांनी सांगितले.

१.७९ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्राया संदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

महिला व बाल विकास

पदाचे नांव	मंजूर पदे	प्रत्यक्ष कार्यरत कर्मचारी	रिक्त पदे टक्केवारी	रिक्त पदांची
जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी	२९	२७	२	७%
जिल्हा परिविक्षा अधिकारी/ अधिक्षक	६१	५२	९	१५%
परिविक्षा अधिकारी	२६३	१८२	८१	३१%
वरिष्ठ लिपीक/ सांख्यिकी सहाय्यक	१८४	१२०	६४	३५%
कनिष्ठ लिपीक	२८३	२३३	५०	१८%
परिचारीका	५२	३८	१४	२७%
वाहन चालक	४६	२५	२१	४६%
शिपाई	१६५	१५९	०६	४%
वरिष्ठ काळजी वाहक, जमादार	२१६	२११	०५	२%
कनिष्ठ काळजी वाहक	२६७	२१५	५२	१९%
आचारी/परिचर/ वॉर्डबॉय/कक्षसेवक/आया	२१	१२	०९	४३%

ICDS योजनेच्या अंमलबजावणीत गुंतलेल्या कर्मचा-यांची रिक्त पदे

पदाचे नांव	मंजूर पदे	प्रत्यक्ष कार्यरत कर्मचारी	रिक्त पदे टक्केवारी	रिक्त पदांची
CDPOs	५५३	४२०	१३३	२४.०५
पर्यवेक्षक (ICDS)	३८९८	३३२२	५७६	१४.७७
आंगणवाडी कार्यकर्ते	९७४६२	९४२१२	३२५०	३.३३
अंगणवाडी मदतनिस	९७४६२	९०४६९	६९९३	७.१७

महिला व बाल विकास

पदाचे नांव	मंजूर पदे	प्रत्यक्ष कार्यरत कर्मचारी	रिक्त पदे टक्केवारी	रिक्त पदांची
जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी	२९	२७	२	७%
जिल्हा परिविक्षा अधिकारी/ अधिक्षक	६१	५२	९	१५%
परिविक्षा अधिकारी	२६३	१८२	८१	३१%
वरिष्ठ लिपीक/ सांख्यिकी सहाय्यक	१८४	१२०	६४	३५%
कनिष्ठ लिपीक	२८३	२३३	५०	१८%
परिचारीका	५२	३८	१४	२७%
वाहन चालक	४६	२५	२१	४६%
शिपाई	१६५	१५९	०६	४%
वरिष्ठ काळजी वाहक, जमादार	२१६	२११	०५	२%
कनिष्ठ काळजी वाहक	२६७	२१५	५२	१९%
आचारी/परिचर/ वॉर्डबॉय/कक्षसेवक/आया	२१	१२	०९	४३%

ICDS योजनेच्या अंमलबजावणीत गुंतलेल्या कर्मचा-यांची रिक्त पदे

पदाचे नांव	मंजूर पदे	प्रत्यक्ष कार्यरत कर्मचारी	रिक्त पदे टक्केवारी	रिक्त पदांची
CDPOs	५५३	४२०	१३३	२४.०५
पर्यवेक्षक (ICDS)	३८९८	३३२२	५७६	१४.७७
आंगणवाडी कार्यकर्ते	९७४६२	९४२१२	३२५०	३.३३
अंगणवाडी मदतनिस	९७४६२	९०४६९	६९९३	७.१७

१.८१ परिच्छेद क्र. ४.१.१६ निष्कर्षः-

राज्यातील संगोपन व सरंक्षणाची आवश्यकता असलेल्या मुलांची संख्या निश्चित करता येणाऱ्या यंत्रणे अभावी बालगृहांच्या स्थापनेसाठी कालबध्द योजना आखता आली नाही. जिल्हापातळीवरील पुनर्वसन समित्यांच्या बैठकांची संख्या अल्प होती व जिल्हा निरीक्षण समित्यांची स्थापना करण्यात आली नव्हती, विभागाच्या संनियंत्रणात ढिलेपणा होता. आंगणवाडी केंद्रांच्या कार्यावर देखरेख ठेवण्यासाठी दीर्घ कालावधीपर्यंत दक्षता पथकांची स्थापना करण्यात आली नव्हती DWCDOs आणि CDPOs यांनी बालगृहांच्या करावयाच्या निरीक्षणात कमतरता होत्या. मतिमंद मुले, ज्यांना विशेष संगोपन आणि गरजांची आवश्यकता होती, त्यांचे योग्य पुनर्वसन करण्यात आले नाही. महिलांच्या सबळीकरणाकरिता विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या वैयक्ति क लाभ योजना ज्यांच्यावर बराच मोठा खर्च केला जातो, आढावा व परिणाम निर्धारणा यंत्रणे अभावी, विशेष परिणामकारक नव्हत्या.कौटुंबिक हिंसाचार कायद्याखाली, २००८-११ कालावधीत नोंदविण्यात आलेल्या ७० टक्क्यापेक्षा जास्त प्रकरणांत अद्याप सुनावणी झाली नव्हती आणि पिडीतांना मदत करण्यात आली नव्हती. विभागाने, बालगृह व भिक्षेकरी गृहातील लाभार्थ्यांच्या व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षणाद्वारे पुनर्वसनाकरिता केलेली संस्थात्मक रचना समाधानकारक नव्हती. पुरक पोषण आहार योजेनेखाली (ICDS), प्रस्तावित केलेल्या आहार भत्यात आणि लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष आहारात तफावत होती. घरपोच आहाराच्या पौष्टीक दर्जाची नियमितपणे तपासणी करण्यात आली नाही. घरपोच आहार व इतर कच्च्या मालाची मागणी नोंदविण्यात विलंब होता, त्यामुळे लक्षणीय कालावधीसाठी आहार पुरविण्यात अडथळे निर्माण झाले होते.

१.८२ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

भिक्षेकऱ्यांच्या पुनर्वसनाकरीता शासन स्तरावर दि.५.५.२०१४ च्या शासन निर्णयान्वये पुनर्वसन समिती गठित करण्यात आली आहे.

त्याच प्रमाणे भिक्षेकऱ्यांचे प्रशिक्षणासाठी Vocational Training Provides (VTP) च्या माध्यमातून व्यावसायीक प्रशिक्षण देता येईल व त्यांना AVTS (Advanced Vocational Scheme) योजनेमध्ये सामावून घेता येइल किंवा कसे ? याबाबत मा.प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समितीने दिनांक २० जून २०१३ च्या बैठकित आयुक्त, महिला व बाल विकास यांना संचालक, व्यावसायीक प्रशिक्षण यांचेशी चर्चा करणेसाठी सूचित केलेले आहे. त्यानुसार आयुक्तालयामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

बाल विकासः-

१. राज्यातील संगोपन व संरक्षणाची आवश्यकता असलेल्या मुलांची संख्या निश्चित करता येण्यासाठी आयुक्तालयाचे पत्र क्रमांक ४६७ दिनांक ३ सप्टेंबर २०१३ नुसार सर्व विभागीय उप आयुक्त , जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी / ग्रामीण आदिवासी यांना त्यांच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या सर्व अंगणवाडी सेविका मार्फत काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या सर्वेक्षणाबाबत आयुक्तालयाचे आदेश दिनांक ३० सप्टेंबर २०१३ अन्वये आदेशित केलेले आहे.

२. जिल्हा पातळीवरील पुनर्वसन समितीच्या नियमित बैठका होण्यासाठी आयुक्तालय स्तरावरुन आढावा घेण्यात आलेला असून आयुक्तालयाचे पत्र क्रमांक ६५२५ दिनांक २७ ऑगस्ट २०१२ नुसार सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना सुचित करण्यात आलेले आहे.

३. बाल गृहातील मतिमंद बालकांच्या संस्था शासन निर्णय क्रमांक बालगृ-२०११/प्र.क्र.३३८/का-८, दिनांक ३० मे २०१२ व १० मे २०१३ अन्वये महिला व बाल विकास विभागाच्या नियंत्रणाखाली असलेली मतिमंद मुलामुलींचे बालगृह सामाजिक न्याय व विशेष न्याय विभाग यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आलेली आहेत.

४. काही ठिकाणी संस्थास्तरावर देणगीदार / दानशूर व्यक्तींमार्फत व्यवसाय प्रशिक्षण दिले जाते. शासन निर्णय कमाशी-२०११/ प्र.क्र.३३९/का-३, दिनांक २७ ऑगस्ट २०१२ अन्वये १८ वर्ष पूर्ण झालेल्या प्रवेशितांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने कर्मवीर भाऊराव पाटील स्वावलंबी पुनर्वसन योजना कार्यान्वित झालेली असून सदर संस्थेमार्फत वेगवेगळे प्रशिक्षण देणे सुरू आहे.

अंगणवाडी:-

अंगणवाडी केंद्रात माता समितीची स्थापना करण्यात आली आहे. तसेच भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. तसेच जिल्हा प्रकल्प व अंगणवाडी स्तरावर सनियंत्रण समितीची स्थापना करण्यात आली आहे. त्यामुळे अंगणवाडी केंद्रांच्या कामावर नियंत्रण ठेवता येणे शक्य आहे.

पोषण आहार:- याप्रमाणे शासनाने माता समितीची स्थापना प्रत्येक अंगणवाडी केंद्रामध्ये करण्यासाठी स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्याप्रमाणे माता समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच सनियंत्रण समितीचीही स्थापना करण्यात आलेली आहे.

१.८३ परिच्छेद क्र.४.१.१७ शिफारशी:-

- शासनाने काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या मुलांच्या संस्थेची प्रत्यक्ष निर्धारणा करुन बालगृहांच्या स्थापनेसाठी कालबद्ध योजना आखावी.

- बालगृहे, निरीक्षण गृहे, महिला वसतिगृहे, भिक्षेकरी गृहे इत्यादींची नियमितपणे तपासणी करण्यात यावी आणि अहवाल मुख्य नियंत्रण अधिकाऱ्याकडे योग्यवेळी उपाययोजना करण्याकरिता पाठविण्यात येतील, याची दक्षता शासनाने घ्यावी.

- शासनाने अशी यंत्रणा विकसित करावी ज्याद्वारे संस्थेव्दारे काळजी घेण्यात येणाऱ्या महिला व मुलांचे, राज्याच्या विविध योजनांच्या योग्य अंमलबजावणीद्वारे, योग्य पुनर्वसन करण्यात येईल आणि

- आहारातील उष्मांकाचा दर्जा प्रमाणित निकषांप्रमाणे अनुरुप ठेवण्याकरिता, आंगणवाडयांना देण्यात येणाऱ्या आहाराच्या तपासणीसाठीची यंत्रणा मजबूत करण्यात यावी.

हे प्रकरण ऑगस्ट २०१२ मध्ये शासनाकडे संदर्भीत केले असुन, उत्तर प्रतिक्षाधिन आहे (जानेवारी २०१३).

१.८४ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

बाल विकास:-

सर्वेक्षण आदेशानुसार राज्यातील सर्व बालगृहांची तपासणी करणेसाठी आयुक्तालयाचे आदेश क्रमांक ३८९८, दिनांक २७ सप्टेंबर २०११ अन्वये ५९ तपासणी पथकांनी तपासणी केलेली आहे.

आदेश दिनांक ७ ऑक्टोबर २०१२ अन्वये १०० पथकांनी संस्थेची तपासणी केलेली आहे. सदर तपासणीतून बाल न्याय अधिनियमांतर्गत असमाधानकारक कामकाज असलेल्या १८६ संस्थांची मान्यता रद्द करण्यात आलेली आहे. उर्वरित त्रुटी आढळून आलेल्या संस्थांना कारणे दाखवा नोटीस देऊन संस्थेचा खुलासा मागविण्यात आलेला आहे. काही संस्थांमध्ये ज्या त्रुटी आढळून आल्या आहेत, त्यांना त्रुटी पत्र देण्यात आलेले आहे. संस्थेच्या तपासणी मधील सद्यस्थितीनुसार बाल न्याय अधिनियमानुसार कार्यवाही सुरू आहे. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास वेळोवेळी सादर करण्यात आलेला आहे.

पूरक पोषण आहार:-

आहाराचे निकष ठरविताना रेसीपीज ठरविल्या जातात. अन्न घटकांमधील प्रथिने व उष्मांक याचा अभ्यास करूनच आहाराचे प्रमाण ठरविले जाते. या प्रमाणात धान्य / कडधान्य घेतल्यास त्यात पोषणाचे प्रमाण योग्य असते. वेळोवेळी प्रयोगशाळेकडून आहाराची तपासणी करण्यात येते. याप्रमाणे शासनाने आता माता समितीची स्थापना प्रत्येक अंगणवाडी केंद्रांमध्ये करण्यासाठी स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्याप्रमाणे माता समित्यांची स्थापना करण्यात आली आहे

तसेच सनियंत्रण समितीचीही स्थापना करण्यात आली आहे.

२ साक्ष :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १२, २० एप्रिल, २९ मे, १४ जून व ११ जुलै, २०१७ रोजी विभागीय सचिव व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली.

२.१ परिच्छेद क्रमांक ४.१.६.१ "बालगृहाच्या स्थापनेसाठी योजना तयार न करणे".

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले की, सन २०१५ मध्ये नवीन कायदा अस्तित्वात आलेला असून त्यानुसार काळजी आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या गरजू मुलांना, संस्था, व्यक्ती, पोलीस अधिकारी, नर्सिंग रुग्णालय, प्रसुतीगृहे, एनजीओ यांचेमार्फत सीडब्ल्यूसी समोर प्रस्ताव सादर करण्यात येतो. त्यानंतर योग्य अशा मुलांना बालगृहामध्ये ठेवण्यात येते. आता नवीन कायद्यानुसार संरक्षणाची गरज नाही. पूर्वी आयसीपीएस मार्फत सर्व्हे चालू केलेला होता. मध्यंतरीच्या काळात करार तत्त्वावर कर्मचारी नसल्यामुळे सर्व्हेक्षण पूर्ण केलेले नव्हते. आता नवीन कर्मचारी भरती करून सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे. कायद्यानुसार सर्वेक्षणाची गरज नाही.

सन २००७ चा हा मुद्दा महालेखाकारांनी काढलेला आहे, परंतु विभागाने आता सन २०१५ च्या कायद्याचा आधार घेतलेला आहे. त्यामुळे विभागीय प्रतिनिधींनी सन २००७ साली झालेल्या मुद्यावर माहिती देण्यात यावी. संदर्भात अधिकाऱ्यांनी समितीला इतके गृहित धरुन चालू नये. अधिकाऱ्यांनी स्वतः अशा पद्धतीने चुकीच्या गोष्टींचे समर्थन करणे संयुक्तिक नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ११०८१ मुलांचे सर्वेक्षण झालेले असून वेळोवेळी सीडब्ल्यूसी पुढे प्रस्ताव सादर केलेला आहे.

विभागाने सन २०१५ कायद्याचा आधार घेतला, परंतु हा कायदा सन २००६ साली लागू होता काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सन २०१५ च्या कायद्यामध्ये अशी तरतूद आहे आणि यापूर्वीच्या कायद्यामध्ये सुद्धा अशाच तरतुदी होत्या.

२.२ फेब्रुवारी, २००८ मध्ये झालेल्या बैठकीत माननीय महिला व बालविकास मंत्र्यांनी नवीन बालगृहे स्थापन करण्यासाठी, त्यांना मंजुरी देण्यासाठी कार्यक्षेत्र सीमा ठरवून सर्वंकष योजना तयार झाल्याशिवाय नवीन बालगृहे स्थापन्याचे प्रस्ताव मान्य न करण्याचे ठरविले, असा निर्णय सदरहू बैठकीत झाला होता. यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, यापूर्वी जास्त प्रमाणात बालगृहे वाढविण्याची संकल्पना होती. जास्त मुले मिळतील, अशी संकल्पना त्यावेळी होती. सर्व्हेक्षण करून जास्तीत जास्त बालगृहे वाढवून काळजी व संरक्षणाची गरज असलेल्यांना बालगृहे उपलब्ध करून देण्याचा विषय होता. परंतु त्यानंतर मुलांची संख्या कमी कमी होत चालली असून आता मुले मिळत नाहीत.

"परंतु ऑगस्ट २०१२ पर्यंत सर्वंकष योजना तयार करण्यात आली नव्हती. असे असताना या शासकीय संस्थांनी पाठविलेल्या बालगृहांच्या प्रस्तावांना मंजुरी देण्याचा निर्णय विभागाने मे २००८ मध्ये घेतला" असे महालेखाकारांनी आक्षेपात नमूद केले आहे. पण फेब्रुवारी २००८ मध्ये निर्णय घेतला की, बालगृहे मंजूर करण्यात येऊ नये. त्यानंतर सन २००८ मध्येच अधिकची बालगृहे वाढवून दिली. एकाच वर्षात असे दोन निर्णय विभाग कसे काय घेऊ शकतो? दुसरा निर्णय पहिल्या निर्णयाला डावलून का झाला? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, केंद्र सरकारकडून आपल्याला सूचना आल्या होत्या की, महाराष्ट्र राज्यातील बालगृहातील मुलांची संख्या एका बाजूला आणि देशातील संख्या एका बाजूला आहे, त्यामुळे ही बाब तपासून पाहिली. तपासणी झाल्यानंतर मुलांची संख्या कमी करण्यात आलेली आहे. आता बरीचशी बालगृहे बंद करण्यात आलेली आहेत.

२.३ जेथे नव्याने बालगृहे उघडली आहेत, त्या जिल्ह्यात ३७ टक्के बालगृहे होती. अनेक तालुक्यात बालगृहे उघडलीच नाहीत. हा असमतोल कसा काय आहे? ३०९ तालुक्यांमध्ये मुले व मुलींसाठी बालगृहे नव्हती. फक्त ठराविक विभागामध्ये बालगृहे उघडली आहेत. पण त्याला समितीचा विरोध नाही, परंतु बाकीच्या ठिकाणी देखिल लक्ष द्यायले पाहिजे होते, ते दिले गेले नाही. येथे समितीने लक्ष वेधले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, बालगृहे उघडण्यासंदर्भात असमतोलपणा झालेला आहे. बऱ्याचशा तालुक्यांमध्ये बालगृहे नव्हती, ही त्याकाळी वस्तुस्थिती होती. जिल्हास्तरावर सीडब्ल्यूसी आहे. जिल्ह्यातील एखाद्या तालुक्यात बाळाला संरक्षणाची, काळजीवाहूची गरज असेल तर दुसऱ्या तालुक्यातील बालगृहात त्याला पाठविले जाते.

शासनाचे काम किंवा विभागाचे काम कसे चालते याची माहिती घेण्यासाठी समिती साक्ष लावत नाही. तर समिती महालेखाकारांनी काढलेल्या परिच्छेदासंदर्भात समिती काम करते. त्यामुळे समिती विचारीत असलेल्या मुद्यासंदर्भात विभागाने योग्य ते उत्तर द्यावे असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले.

सन २०१२ मध्ये नवीन बालगृहे मंजूर होणार नाहीत, असे शासनाचे धोरण होते, परंतु त्यानंतर ४६ बालगृहे आणि १००० बालगृहे मंजूर केलेली आहेत. त्यानंतर सर्वेक्षण करून मास्टर प्लॅन तयार केला का? विभागाने त्यावेळी महालेखाकारांच्या परिच्छेदाच्या उत्तरामध्ये म्हटले होते की, यापुढे जेथे प्राथमिकता सर्वात जास्त आहे तेथे बालगृहे मंजूर करण्यात येतील.

२.४ सन २०१२ नंतर ज्या ठिकाणी बालगृहे अजिबात नव्हती अशा ठिकाणी व शहरी भागात किती होती, याची अद्ययावत माहिती समितीस सादर करावी असे महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, शहरी भागातील सर्वेक्षणासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. आयसीपीएस संस्था निर्माण केलेली आहे. शहरी स्तरावर, ब्लॉक स्तरावर समिती निर्माण केलेली आहे. त्यामध्ये त्या प्रभागाचे नगरसेवक हे अध्यक्ष असून त्यांच्या अध्यक्षतेखाली सर्वेक्षण करता येऊ शकतो.

ऑर्डरमध्ये सर्वेक्षण करा म्हणून सांगितले होते. विभागाने ऑर्डरनुसार सर्वेक्षण केला का? तसेच सर्वेक्षण झाले असेल तर ते सर्वेक्षण शहरी भागाचा झाले की, ग्रामीण भागाचे झाले की फक्त महानगरपालिकेचा झाला? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सन २०१३-२०१४ मध्ये सर्व्हेक्षण झाले आहे व ११०८१ इतकी मुले आहेत.

२.५ महालेखाकारांचा आक्षेप हा सन २०१२ मधला आहे. आणि त्यापूर्वी बालगृहे मंजूर केलेली आहे असा समितीचा आक्षेप आहे. विभागीय प्रतिनिधींनी पुन्हा मूळ मुद्दा सोडून समितीस माहित देत असे ही बाब समितीने पुन्हा विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी याबाबत खुलासा केला की, यामध्ये महालेखाकारांचा मुख्य आक्षेप असा होता की, संपूर्ण राज्यासाठी ही योजना राबवायची होती, त्यासाठी पूर्ण महाराष्ट्राचे सर्वेक्षण करायचे होते. सन २०१३-२०१४ मध्ये केलेल्या सर्वेक्षणामध्ये ११ हजार मुले सापडली होती. त्यांना संरक्षण देण्याची गरज असल्यामुळे त्यासंबंधीचा प्रस्ताव सीडब्ल्यूसी समोर सादर करून निर्णय घ्यावयाचा होता. विभागाने जिल्हानिहाय माहिती सीडब्ल्यूसी समोर आणली होती. यात ११०० बालगृहांपैकी शासनाची ४६ बालगृहे आहेत. यांचे कॉन्सन्ट्रेशन नेमके तीन जिल्ह्यांमध्ये आहे. इतर जिल्ह्यांमध्ये बालगृहे कमी आहेत, ही बाब विभागाने मान्य केलेली आहे. सन २०१४ मध्ये केंद्र सरकारने आक्षेप घेतला होता कारण की, ICDS has been established as per the Statute of Govt. of India. जेव्हा त्यांनी आक्षेप घेतला की, महाराष्ट्रातील अनेक संस्थांतील संख्या ही देशातील संख्येच्या प्रमाणात जास्त असल्याने, नवीन बालगृहे उघडण्यापूर्वी सीडब्ल्यूसीने ज्या मुलांची शिफारस केली आहे, त्याबाबत अगोदर निर्णय घ्यावा and then you think about more schools. त्यामुळे ही नवीन बालगृहे उघडण्याचा प्रस्ताव बाजूला ठेवण्यात आलेला आहे. विभागीय असमतोलपणा असला तरी उर्वरित महाराष्ट्रामध्ये नवीन बालगृहांना मंजुरी मिळालेली नाही, ही वस्तुस्थिती आहे. लातूर जिल्ह्यामध्ये १००, बीड जिल्ह्यात १२३, नांदेड जिल्ह्यात १२२ बालगृहे आहेत. यामध्ये मुलांची एकूण उपस्थिती ही १९००० आहे.

२.६ तीन जिल्ह्यात ४०० बालगृहे आहेत. एकूण बालगृहांची संख्या किती आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, एकूण ११०५ बालगृहे आहेत.

ज्याप्रमाणे या तीन जिल्ह्यात मुलांची संख्या जास्त आहे, त्याप्रमाणे बाकीच्या जिल्ह्यांचा सर्वेक्षण विभागाने केला आहे काय? ज्या जिल्ह्यांमध्ये बालगृहांची आवश्यकता आहे त्याची पूर्ण माहिती तसेच तीन जिल्ह्यांमध्ये ३४५ बालगृहे आहेत. या बालगृहांमध्ये कठोर तपासणीनंतर किती विद्यार्थी आढळूल आले? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, आकडेवारी खूप कमी आहे, कारण बरीच बालगृहे रिकामी आहेत. बीड जिल्ह्यात ११ हजार, नांदेड जिल्ह्यामध्ये १० हजार मंजूर विद्यार्थी संख्या आहे. पण या जिल्ह्यामध्ये १००-२०० मुले बालगृहात शिक्षण घेत आहेत. यामधील बरेचसे बालगृहे बंद आहेत.

समितीने पुढे विचारणा केली की, या बालगृहांची शासन मान्यता रद्द केली आहे का? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षामध्ये या बालगृहांची तपासणी करण्यात आली होती, त्याला ए,बी,सी, अशा प्रकारची ग्रेडींग केली होती, according to the infrastructure and according to the care they were providing to the children. यामध्ये अ दर्जाच्या संस्थांची मान्यता ठेऊन ब व क दर्जाच्या संस्थांना बंद करण्याची कारवाई शासन स्तरावर सुरू झाली पण मध्यंतरी हायकोर्टाच्या औरंगाबाद खंडपीठाने याकरिता स्थगिती दिलेली आहे म्हणून विभागाकडून ही कारवाई पूर्ण करू शकली नाही.

२.७ खर तर ही बालगृहे का बंद करण्यात येत आहेत याबाबतची वस्तुस्थिती हायकोर्टाच्या निदर्शनास विभागाने आणली पाहिजे. एखाद्या बालगृहात १-२ मुले असतील तर हायकोर्ट कधीही स्थगिती देणार नाही. सर्व सविस्तर माहिती हायकोर्टाला दिली पाहिजे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरहू कोर्ट केस अंतिम टप्प्यावर आलेली आहे.

कोर्टाने विभागास बालगृहांचा सर्वेक्षण करण्याची परवानगी दिली आहे. अ,ब,क ग्रेडींगप्रमाणे विभागाकडे काही निरीक्षणे (ऑब्झर्वेशन) आलेले आहेत, कोर्टाच्या परवानगीने सर्व्हेक्षण केले आहे. असे विभागाच्या उत्तरामध्येही आले आहे. त्यांच्यावर कारवाई करू नका असे कोर्टाने सांगितले आहे का? हा सर्वेक्षणाचा अहवाल विभागाने कोर्टासमोर सादर केला आहे का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, ॲफेडेव्हीटच्या स्वरुपात कोर्टात माहिती सादर केलेली आहे.

या विषयावर शासनाची भूमिका सांगताना विभागीय सचिवांनी खुलासा केला की, कोर्टाची परवानगी मिळाल्यानंतर किंवा केसचा निकाल आल्यानंतर ब व क ग्रेडच्या बालगृहांना अनुदानातून वगळून अ ग्रेडच्या बालगृहावर विभागाला जास्त कॉन्स्ट्रेशन करावयाचे आहे. सर्वेक्षणानंतर अ ग्रेडच्या बालगृहांची संख्या ४४३ आहे.

२.८ ही ४४३ संख्या सर्व जिल्ह्यांमध्ये सामावून घेता येईल का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ४४३ या संख्येमध्ये प्रादेशिक असमतोलपणा राहणार आहे कारण यांचे जास्तीत जास्त कॉन्स्ट्रेशन मराठवाडयामध्ये आहे. इतर विभागामध्ये बालगृहे नाहीत.

सर्व्हेक्षणाप्रमाणे बाकीच्या विभागामध्ये या बालगृहाची आवश्यकता आहे का, सर्व्हेक्षण सन २०१२ पूर्वी केले आहे की नंतर केले आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, कायद्याप्रमाणे जेथे मुलांना संरक्षणाची गरज आहे, याबाबत शासनाचे काही धोरण आहे. जे ४६ बालगृहे सध्या अंडर युटीलाईज्ड आहेत, या मुलांना शासकीय बालगृहामध्ये ठेवता येईल.

नवीन बालगृहे उघडावीत हा समितीचा मुद्दा नाही. समिती ती बालगृहे बंद करण्याबाबत सांगत आहोत. समितीचा मुद्दा आहे की, सर्व्हेनुसार ४४३ बालगृहामध्ये ही मुले सामावून जातील का? यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, या बालगृहामध्ये ही मुले सामावून जातील.

अनुदानित बालगृहात मुलेच उपलब्ध नाहीत. ४६ शासकीय बालगृहे रिकामी आहेत, त्यांचे अनुदान तत्काळ थांबवावे. असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यामधील अनुदान देण्याचे प्रावधान हे प्रतिविद्यार्थी व दरमहा अशा प्रकारे आहे. ज्या बालगृहात मुले नाहीत त्यांना अनुदान देण्याचा काही विषयच नाही.

ज्या लोकांची चांगल्या प्रकारे बालगृहे चालविण्याची क्षमता आहे त्यांना मान्यता दिली पाहिजे, त्यांना प्रमोट करू दिले पाहिजे. ज्यांची क्षमता नाही त्यांना बालगृहे देउन ठेवले आहेत. ही कोणती पद्धत आहे? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता वित्त सचिवांनी (त्या पूर्वी महिला व बालविकास विभागात कार्यरत होत्या) समितीस अवगत केले की, बालगृहाची योजना मिस-अंडरस्टूड झाली आहे. महिला व बालविकास विभागाने फक्त अनाथ व निराश्रीत मुलांसाठी बालगृहे चालविणे अपेक्षीत आहे. रेल्वे स्टेशनवर सापडलेली मुले, अनाथ मुले, पोलिसांनी पकडलेली मुले, पालक नसलेली मुले अशा बालकांची संख्या मर्यादीत आहे. पोलीस त्यांना चाईल्ड वेलफेअर कमिटीसमोर आणते, आजच्या परिस्थितीत उपलब्ध शासकीय बालगृहे त्यांना ॲकॉमॉडेट करण्यासाठी पुरेशी आहेत. आज अशा बालगृहांची संख्या पुरेशी आहे. कारण अशा बालकांची संख्या राज्यात जास्त नाही. बाकीची वसतीगृहे व आश्रमशाळा या सर्वसाधारण मुलांसाठी आहेत. मराठवाडयात विशेषतः बीड, नांदेड व लातूर जिल्ह्यात मोठ्या संख्येने बालगृहे उघडण्यात आलेले आहेत, खरे तर ते उघडण्याची आवश्यकता नव्हती.

बालगृहे उघडण्याचा शासनाच्या मुख्य उद्देशापासून शासन डायव्हर्ट होत आहे. सद्यःस्थितीत त्यामध्ये दुरुस्ती करण्यात येणार आहे का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, यातील महत्वाचा भाग असा आहे की, अंडर युटीलाईज्ड शासकीय संस्थेमध्ये मुलांची भरती करून आवश्यकता असेल तर इतर जिल्ह्याचा विचार करता येईल. आजच्या परिस्थितीत असे प्रस्ताव अंडर कन्सीडरेशन आहे.

सर्व्हेक्षणाचा अहवालानुसार अशी किती मुले आहेत? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, सर्व्हेक्षणामध्ये ११ हजार मुले सापडली होती. बालगृहामध्ये मुले पाठविण्यासाठी, we have to produce them before the CWC प्रामुख्याने तीन प्रकारच्या मुलांना ते वेटेज देतात. कॉन्फीक्ट वुईथ लॉ म्हणजे ज्यांना पोलीस पकडून आणतात अशी मुले, अनाथ किंवा निराश्रीत मुले, अबँनडेंट चिल्डेन अशी तीन प्रकारची मुले आहेत. If the child is abandoned and left to his own resources or pushed into difficult situation like begging, अशा मुलांना सीडब्ल्यूसीसमोर ठेवले जाते, त्यांना इन्स्टीटयूशनल करायचे की नाही हा पूर्णपणे त्यांचा निर्णय असतो.

ब व क ग्रेडची बालगृहे निकषाप्रमाणे नाहीत. ती बालगृहे बंद करण्याची कारवाई कोर्टाची परवानगी घेऊन विभाग करणार आहे का? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरील कोर्ट केस शेवटच्या टप्प्यावर आलेली आहे. कोर्टाच्या निर्णयाच्या अधिन राहून अशी बालगृहे बंद करण्याची विभागाची भूमिका आहे.

२.९ परिच्छेद क्र.४.१.७ "संनियंत्रण" :

२.१० परिच्छेद क्रमांक ४.१.७.१ "जिल्हास्तरीय पुनर्वसन समिती कार्यरत नसणे" :

उक्त परिच्छेदासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले की, यामध्ये प्रत्येक जिल्ह्यात प्रत्येक वर्षी चार बैठका होणे अपेक्षीत होते. त्यानुसार ज्या जिल्ह्यात कमी प्रमाणात बैठका झालेल्या आहेत. त्यांना नोटीसा दिल्यानंतर लक्षात आले की, १८ वर्षावरील जी मुले अनुरक्षण गृहामध्ये राहात आहेत त्या मुलांची संख्या महाराष्ट्रात फक्त आज १८६ आहे. काही जिल्ह्यात अशी मुले नसल्यामुळे त्यांच्या पुनर्वसनासाठी अशा प्रकारच्या बैठका घेण्याचा विषय येत नाही अशा प्रकारची उत्तरे आलेली आहेत. त्याची अजून छाननी करण्यात येईल. जेथे मुले उपलब्ध आहेत, तेथे नियमित मिटींग होत आहेत. तसेच कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या नावाने एक योजना सुरू केलेली आहे. त्यानुसार या मुलांना प्रशिक्षण देऊन त्यांना आयटीआयचे कोर्सेस किंवा नोकरी देण्याचे प्रयत्न केले जातात.

२.११ मुळ मुद्दा असा आहे की, नियमित बैठका होतात का? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, आजपर्यंतच्या अहवालाप्रमाणे व नियमाप्रमाणे ८५ मिटींग झाल्या पाहिजेत. प्रत्येक जिल्ह्यात दरवर्षी ४ मिटींग झाल्या पाहिजेत. पण ८५ पैकी १९ मिटींग झाल्या आहेत, इतर मिटींग झालेल्या नाहीत. याबाबत विभागाने सर्व जिल्ह्यांना कारणे दाखवा नोटीस इश्यू केल्या आहेत. विश्लेषण केले आहे. ८६ मुले १८ वर्ष पूर्ण करून ते या निरीक्षण गृहातून बाहेर पडलेले होते. अनेक जिल्ह्यांनी अशी सूचना केली आहे की, त्यांच्याकडे अशी मुले उपलब्ध नसल्यामुळे बैठका घेण्यात आलेल्या नाहीत.

काही जिल्ह्यांनी विभागाला कोणत्या आधाराशिवाय सांगितले आहे की, त्यांच्याकडे मुले उपलब्ध नाहीत. पण ती वस्तुस्थिती नाही. म्हणजे त्याच्याकडील समित्या सक्रीय नाहीत. त्यांनी जबाबदारीने हे केले पाहिजे. वास्तविक प्रत्येक ठिकाणी अशी बेवारस मुले आहेत. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, बालगृहामध्ये राहणाऱ्या मुलाचे १८ वर्षे वय पूर्ण झाल्यानंतरही त्यांचे पुनर्वसन करावयाचे आहे. बालगृहात राहणाऱ्या १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर त्यांना बालगृहातून बाहेर काढून टाकत असाल तर त्यानंतर ती मुले कुठे राहतात? अशी विचारणा समितीने केली जाते असे विभागीय सचिवांनी सांगितले. महाराष्ट्रात एकूण ९ आफ्टर केअर होम्स होते त्यापैकी २ बंद आहेत. उर्वरित ७ आफ्टर केअर होम्स सुरू असून तेथे एकूण १८० मुले आहेत. ती मुले २१ वर्षांपर्यंत तेथे राहू शकतात.तसेच बैठका घेण्यात आलेल्या नाहीत त्याबाबत संबंधित कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांच्याकडून स्पष्टीकरण मागवून घेण्यात येईल. त्यांचे उत्तरही आल्यानंतर यामधील सत्यता तपासून १५ दिवसात अहवाल सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले. त्यानुसार विभागाकडून प्राप्त झालेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

२,१२ "शासन निर्णय निरीग २०००/प्र.क्र.३४६/का-३, दि.१८ जून, २००० अन्वये जिल्हास्तरीय पुनर्वसन समिती, जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठित करण्यात आल्या आहेत. सदर समितीचे सदस्य सचिव या नात्याने सदर समिती अस्तित्वात आणण्याची जबाबदारी संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांची आहे. राज्यातील ३४ जिल्ह्यात समिती स्थापित असून वर्ष २००० पासून आजअखेर पर्यंत एकूण ५५१ बैठका घेण्यात आल्या आहेत. यापैकी वर्ष २००७ ते २०१२ या कालावधीत घेण्यात आलेल्या बैठकांची संख्या १७२ इतकी आहे. जिल्हानिहाय तपशील सोबत जोडला आहे.

बैठकांच्या अनुषंगाने विचारण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसीला अनुलक्षून बहुतांश जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडून प्राप्त खुलासा लक्षात घेता खालीलप्रमाणे कारणे निदर्शनास आली आहेत :—

- बैठकीचा दिनांक जिल्हाधिकारी यांच्या कार्यकक्षेत येत असल्याने जिल्हाधिकारी यांचेकडून स्थानिक निवडणुका, आचार संहिता व इतर कामाची व्यस्तता लक्षात घेऊन बैठकांसाठी दिनांक प्राप्त होतो. त्यांनी दिनांकानुसार बैठका घेण्यात येतात.
- स्वयंसेवी संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या बालगृहांमध्ये पुनर्वसन योग्य वयोगट १६ ते १८ चे प्रमाण कमी असते."

जिल्हास्तरीय पुनर्वसन समितीची बैठकांबाबतची माहिती

अ.क्र.	जिल्हा	समिती गठन (दिनांक/वर्ष)	समितीच्या एकुण बैठका	एकूण बैठकांपैकी वर्ष २००७ ते २०१२ मध्ये झालेल्या बैठका
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	पुणे	उ.ना.	५	३
२	सातारा	२५.७.२००५	१५	१०
३	सांगली	१०.१०.२००३	२६	११
४	सोलापूर	३.२.२००१	२३	३
५	कोल्हापूर	१८.१०.२०००	१६	५
६	मुंबई	उ.ना.	१३	३
७	उपनगर	१४.९.२००५	१७	३
८	ठाणे	सप्टेंबर, २०००	४०	३
९	रायगड	जून, २०००	१६	७

(१)	(२)	(३)	(४)	(५)
१०	सिंधुदूर्ग	उ.ना.	५	३
११	रत्नागिरी	जून, २००४	२७	१०
१२	नाशिक	२७.१२.२०००	२७	१४
१३	जळगाव	१२.७.२००१	१८	४
१४	अहमदनगर	५.३.२००१	२१	७
१५	धुळे	२१.११.२०००	५०	८
१६	नंदूरबार	२.११.२००४	११	२
१७	अमरावती	५.१०.२००४	१४	६
१८	अकोला	२.८.२०००	२२	८
१९	वाशिम	८.७.२००३	६	१
२०	यवतमाळ	२७.११.२०००	२०	११
२१	बुलढाणा	जून, २००२	२१	५
२२	नागपूर	१६.९.२००४	१६	६
२३	वर्धा	६.६.२००५	७	१
२४	भंडारा	१७.५.२००२	१३	३
२५	चंद्रपूर	२०.४.२००९	९	१
२६	गडचिरोली	उ.ना.	२	५
२७	गोंदिया	१४.११.२००५	१२	१०
२८	औरंगाबाद	२४.११.२००५	८	४
२९	जालना	२६.१०.२००४	१३	२
३०	परभणी	२२.६.२००९	२२	३
३१	हिंगोली	उ.ना.	१	२
३२	लातूर	२१.१२.२००४	१५	२
३३	नांदेड	२६.८.२००२	७	१
३४	उस्मानाबाद	उ.ना.	१३	५
३५	बीड	उ.ना.	उ.ना.	उ.ना.
३६	पालघर	नवीन जिल्हा	-	-
		एकूण	**५५१**	**१७२**

तसेच यासोबत विभागाकडून प्राप्त झालेली सहपत्रे **(विवरण क्र.१६)** मध्ये आहेत.

२.१३ विभागाकडून प्राप्त झालेल्या उक्त विवरणपत्रावरून असे निदर्शनास येते की, सन २००७ ते २०१२ या कालावधीत काही ठिकाणी केवळ १ बैठक घेण्यात आली. काही ठिकाणी एकूण बैठक-१ आणि घेतलेली बैठक-२ असे नमूद केले आहे. वाशिममध्ये एकूण बैठका-६ नमूद केल्या असून, ५ वर्षांच्या कालावधीत केवळ एकच बैठक घेण्यात आल्याचे नमूद केलेले आहे. वर्ध्यामध्ये एकूण बैठका-७ नमूद केल्या असून ५ वर्षांच्या कालावधीत केवळ एकच बैठक घेण्यात आली. हिंगोली जिल्ह्यात एकूण बैठका-१ असून, २००७ ते २०१२ या कालावधीत झालेल्या बैठका २ नमूद केल्या आहेत. नांदेड विभागीय स्तरावरील जिल्हा असताना तेथे उक्त ५ वर्षांच्या कालावधीत केवळ १ बैठक घेण्यात आल्याचे नमूद केले आहे. तसेच विवरणपत्र समिती गठीत (दिनांक/वर्ष) या कालावधीत काही ठिकाणी "उ.ना." म्हणजे उपलब्ध नाही असे नमूद केले आहे. पण तेथे सन २००७-२०१२ या कालावधीमध्ये झालेल्या बैठकांची संख्या नमूद केली आहे. विभागाने जे विवरण दिलेले आहे त्यामध्ये एकूण बैठका ५५१ नमूद केल्या आहेत. या माहितीमध्ये विसंगती दिसून येते. सदर माहिती अपुरी वाटते. विभागाने ही माहिती तपासून पहावी असे समितीने निदेश दिले.

२.१४ केवळ एकच बैठक घेण्याचे विभागाने कसे समर्थन करेल, इतक्या कमी प्रमाणात बैठका घेण्याचे कारण काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, या संदर्भात संबंधित जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस दिल्या होत्या. त्यांच्याकडून लेखी खुलासे प्राप्त झालेले आहेत. समितीला जी माहिती अपेक्षित आहे त्याबाबत स्पेसिफिक खुलासा विभागाकडे नाही. बालगृहातील १८ ते २१ वयोगटातील मुलांचे पुनर्वसन करण्यात येते. परंतु काही जिल्ह्यांतील बालगृहांमध्ये या वयोगटातील मुले नाहीत. त्यामुळे बैठक झालेली नाही, अशा प्रकारचे काही खुलासे आलेले आहेत. खुलाशांची छाननी करून काही खुलासे मान्य करण्यासारखे आहेत. उर्वरित खुलाशांची छाननी सुरू करून पुढील प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे. तसेच या विषयाच्या अनुषंगाने विभागीय सचिवांकडून असे देखिल सांगण्यात आले की, बहुतेक वेळा जिल्हाधिकाऱ्यांकडे बैठक आयोजित करण्यासाठी फाईल सादर करण्यात येत होती. परंतु त्यांच्याकडून बैठकीसाठी वेळ देण्यात येत नाही.

वास्तविक पाहता वर्षातून चार बैठका घेण्याचा नियम आहे. त्यामुळे समितीची अपेक्षा आहे की, वर्षातून किमान दोन-तीन बैठका व्हावयास पाहिजे होत्या. जिल्हाधिकाऱ्यांनी बैठकीसाठी वेळ दिला नाही असे उत्तर दिले आहे. जिल्हाधिकाऱ्यांना संपूर्ण वर्षभर बैठकीसाठी वेळच नव्हता काय? यावर विभागीय सचिवांकडून उत्तर प्राप्त झाले नाही.

उर्वरित खुलाश्यांची छाननी सुरू करून पुढील प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे असे विभागीय सचिवांकडून सांगण्यात आले पण पुढची प्रक्रिया म्हणजे काय? याबाबत समितीचे स्पष्ट मत आहे की, ज्यांचे खुलासे मान्य करण्याजोगे नाहीत त्यांना कारणे दाखवा नोटीस द्यावयास पाहिजे. त्यांच्यावर कारवाई करावी.

समितीने या विषयी अनेकदा साक्ष घेतलेली आहे. परंतु अद्यापपर्यंत विभाग निर्णयाप्रत येत नाही. असे असेल तर विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचा उपयोग काय? त्यामुळे समितीने जी माहिती विचारलेली आहे त्या बाबतचा लेखी खुलासा विभागाने सादर करावा असे निदेश असता विभागीय सचिवांनी त्यास होकाराचे उत्तर दिले.

कर्मवीर भाऊराव पाटील स्वावलंबी योजनेमध्ये किती जणांना रोजगार दिला आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की,

२५ जणांना रोजगार देण्यात आला आहे. यामधील ८० मुले १२ वी चे शिक्षण घेत आहेत. ६७ जणांना नोकऱ्या लागल्या आहेत. १४ जणांनी आयटीआयचे कोर्स केलेले आहेत असे एकूण १८६ मुले आहेत.

२.१५ परिच्छेद क्रमांक ४.१.७.२ "जिल्हा निरीक्षण समिती कार्यरत नसणे" :

शासनाने विभागीय स्तरावर समिती स्थापन केल्यानंतर या समितीने बालगृहांना भेटी दिल्या व शुल्क रद्द करण्याचे काम केले, ही वस्तुस्थिती आहे. विभागीय समितीने ६ अशासकीय बालगृहांना भेट दिली असता असे आढळून आले की, शिक्षणाची सोय नव्हती, पुनर्वसन व पुनर्गठण योजना आखण्यात आली नव्हती. त्या विरोधात विभागाने कारवाई केली. त्या नंतरच्या कार्यकाळात विभागीय समितीने पुन्हा किती भेटी दिल्या होत्या, अशा प्रकारे विभागीय समितीने भेटी देण्याची पद्धत सुरू होती का आणि भेटी दिल्या असल्यास, कोणत्या त्रुटी समितीच्या निदर्शनास आल्या आहेत? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, क्षेत्रीय स्तरावर तपासणी करून बालगृहांची 'अ', 'ब', 'क' व 'ड' अशी वर्गवारी करण्यात आली आहे. 'अ' वर्गात ४७६, 'ब' वर्गात २७३ व 'क' आणि 'ड' वर्गात २१३ संस्था आहेत. त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याचा शासनाचा विचार असताना काही संस्था उच्च न्यायालयात गेल्या व न्यायालयाने स्थगिती दिली. न्यायालयाने दिलेली स्थगिती उठविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

न्यायालयाने स्थगिती कधी दिली आहे? उच्च न्यायालयात विभागाने काय बाजू मांडली या समितीच्या प्रश्नाबाबत विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, न्यायालयाने जून, २०१६ मध्ये स्थगिती दिली आहे. संस्थांची तपासणी करून वर्गवारी करण्यात आली व पुढील कारवाई करावयाची होती. परंतु, तत्पूर्वी काही संस्था न्यायालयात गेल्या.

संस्थांच्या दर्जानुसार विभागाने वर्गवारी केल्याच्या संदर्भात संस्था चालक न्यायालयात गेले आहेत का व त्यासंदर्भात विभागाने कोर्टासमोर बाजू कशा पद्धतीने मांडली आहे? अशी विचारणा समितीने केली असता यामध्ये ३ मुद्दे लक्षात घेऊन ही वर्गवारी करण्यात आली आहे. संस्थांनी पुरवावयाच्या मूलभूत सुविधा, शिक्षण व इतर व्यवस्था आणि बायोमॅट्रिक पद्धत, असे तीन मुद्दे वर्गवारी करीत असताना लक्षात घेण्यात आले होते. तपासणी करीत असताना या तिन्ही मुद्यांचा विचार करण्यात आला होता असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शासनाकडून प्रति लाभार्थी किती खर्च करण्यात येतो? अशी विचारणा समितीने केली असता प्रति लाभार्थी, प्रति महिना १२१५ रुपये खर्च करणे अभिप्रेत आहे. यामधील ९० टक्के रक्कम शासनाकडून दिली जाते व १० टक्के रक्कम लाभार्थ्याने स्वउत्पन्नातून देणे अपेक्षित आहे. त्यामुळे ९० टक्के खर्च भागविण्याची जबाबदारी शासनाने उचलली आहे.

२.१६ याचा अर्थ, प्रति लाभार्थी १३५० रुपये संस्थांनी खर्च करणे अभिप्रेत आहे. विभागाने दिलेल्या माहितीत असा उल्लेख करण्यात आला आहे की, "संबंधित कायद्याच्या कलम ३५ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा निरिक्षण समित्यांनी जिल्हा सल्लागार मंडळ म्हणूनही काम करणे अपेक्षित आहे. महाराष्ट्र बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००२ च्या नियम ११ अन्वये सल्लागार मंडळाने विविध संस्थांची पहाणी करावी आणि त्यांच्या शिफारशींवर राज्य शासनाने कृती करावी." अशा प्रकारचे पहाणी अहवाल शासनाला प्राप्त झाले आहेत का? अशी विचारणा समितीने केली असता जिल्हा सल्लागार समित्या सन २०१३-२०१४ मध्ये स्थापन झाल्या आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

केंद्र शासनाचा कायदा सन २००२ मधील आहे व त्या कायद्यातील कलमानुसार तातडीने जिल्हा समित्या स्थापन करणे अपेक्षित आहे. विभागाने त्याच वेळी या समित्या गठीत केल्या नाहीत? सन २००२ ते सन २०१३ या कालावधीत समित्या स्थापन न होण्याची कारणे काय आहेत? कारण जिल्हा स्तरावरील समित्या स्थापन करण्यास जवळ जवळ १२ वर्षाचा काळ लागला आहे. केंद्र शासनाचा बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००२ मधील कलम ६२ अन्वये राज्य शासनाने प्रमुख समाज सेवक, बालकल्याण क्षेत्रातील स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, वैद्यकीय व्यावसायिक, राज्य शासनाचे संबंधित विभाग, इत्यादी सदस्यांचा समावेश असलेल्या राज्य सल्लागार मंडळांची स्थापना करणे बंधनकारक होते. अशा प्रकारचा कायदा केंद्र शासनाने केला आहे व तो सर्व राज्यांना लागू आहे. मग महाराष्ट्र राज्याने या कायद्याची अंमलबजावणी एवढ्या विलंबाने करण्याचे कारण काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता काही जिल्ह्याच्या समित्या सन २०१३ मध्ये तर काही जिल्ह्यांच्या समित्या सन २०१४ मध्ये स्थापन झाल्या आहेत. सुधारित कायदा सन २०११ ला झाला आणि त्यामध्ये तरतूद झाली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

२.१७ केंद्र सरकारच्या कायद्यातील कलम स्वयंस्पष्ट आहे. त्यानुसार राज्यांनी जिल्हा सल्लागार समित्या स्थापन करावयाच्या होत्या व ते बंधनकारक आहे. सन २००२ ते सन २०११ पर्यंत राज्य शासनाने राज्याचा कायदा केला नाही का? अशी विचारणा समितीने केली असता सन २००२ ला केंद्र सरकारने कायदा केला व सन २०११ ला सुधारणा केली आहे असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

सन २००२ ला केंद्र सरकारने कायदा केला. हा कायदा थेट राज्यांना लागू होतो का? या समित्या राज्य शासनाने सन २००२ मध्येच का नेमल्या नाहीत? केंद्रीय कायदा जर राज्यांना लागू होत असेल तर राज्य सरकारने त्याची अंमलबजावणी का केली नाही? अशी विचारणा समितीने केली असता राज्याने नियम केले नव्हते. केंद्राचे नियम होते असा खुलासा सचिवांनी केला.

राज्याने नियम करणे बंधनकारक नव्हते का? एखादी सिस्टिम चालविण्यासाठी कायदा व नियम असतात. परंतु, ते जर राज्याने तयारच केले नसतील तर सिस्टिम कशी चालेल? त्यामुळे संस्था जर कोर्टात गेल्या असतील आणि जर विभागाचे नियमच तयार नसतील तर कोर्ट स्थगिती देणारच आहे. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००२ मधील कलम ६२ अन्वये राज्य शासनाने प्रमुख समाज सेवक, बालकल्याण क्षेत्रातील स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, वैद्यकीय व्यावसायिक, राज्य शासनाचे संबंधित विभाग, इत्यादी सदस्यांचा समावेश असलेल्या राज्य सल्लागार मंडळांची स्थापना करणे बंधनकारक होते. हे राज्य शासनावर बंधनकारक होते. बालगृहांची स्थापना आणि व्यवस्थापन, साधन संपत्तीचा वापर, शिक्षण आणि प्रशिक्षणाच्या सोयी-सुविधा, काळजी आणि संरक्षण आवश्यक असलेल्या मुलांची पुनर्वसन आणि कायद्याविरुद्ध वागणूक असणारे बाल गुन्हेगार इत्यादींबाबत शासनाला सल्ला देण्याची जबाबदारी राज्य सल्लागार मंडळाची आहे.

परंतु, विभागाने ही समिती सन २०११ मध्ये स्थापन केली आहे. राज्य सल्लागार समितीची स्थापना कधी केली आहे? अशी विचारणा समितीने केली असता सन २००५ मध्ये राज्य सल्लागार समितीची स्थापना झाली आहे. मात्र, जिल्हा स्तरावरील समित्यांची स्थापना झाली नव्हती. सन २०१३ मध्ये राज्य शासनाने सुधारित कायदा केला आणि त्या अनुषंगाने जिल्हा स्तरावरील समित्या स्थापन केल्या आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२.१८ सन २००५ मध्ये राज्य सल्लागार समितीची स्थापना झाली. सदर समिती स्थापन झाल्यानंतर जिल्हास्तरीय समित्या स्थापन करणे बंधनकारक होते. त्या स्थापन न झाल्यामुळे पुढील गोष्टी घडल्या आहेत. जिल्हा स्तरावरील समित्या स्थापन करण्याची जबाबदारी किंवा तशा प्रकारचे आदेश निर्गमित करण्याची जबाबदारी कोणाची होती? कारण विभागाने जे काही करावयास निघाला आहात ते संस्था चालकांना अडचणीचे वाटत असेल म्हणून ते कोर्टात गेले आहेत. परंतु, जिल्हास्तरीय समित्या गठीत करणे आणि आवश्यक बाबींची पूर्तता करण्याची जबाबदारी विभागाची होती. सन २०१२ मध्ये महालेखाकार यांनी आक्षेप काढल्यामुळे नंतर राज्य सरकारने या समित्या गठीत केल्या आहेत. परंतु, सन २००५ पासून ते सन २०११ पर्यंत राज्य सरकारने याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही. केंद्राचा कायदा असला तरी तो राज्य सरकारवर बंधनकारक आहे. अशी विचारणा समितीने केली असता समिती स्थापन करण्याची जबाबदारी राज्य शासनाची म्हणजे संबंधित विभागाची होती. सन २००३ मध्ये कायदा स्वीकारला गेल्यानंतर सन २००५ मध्ये राज्यस्तरीय मंडळ स्थापन झाले आहे. परंतु, जिल्हास्तरीय समित्या सन २०१३ मध्ये स्थापन झाल्या, ही वस्तुस्थिती आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२.१९ जर केंद्र सरकारला ही बाब निदर्शनास आली असती तर केंद्र सरकारने विभागाचा निधी बंद केला असता. कायदा असताना जिल्हास्तरीय समित्या गठीत करण्यास फार मोठा विलंब झाला आहे. वास्तविक पाहता, ही एक्झिक्युशनची बाब आहे. संबंधित विभागाने ही कार्यवाही केली नाही. समिती गठीत न करण्यास कोण जबाबदार आहे तसेच संबंधितांवर जबाबदारी निश्चित न करता त्यांना सोडण्यात येणार आहे का? या प्रकरणी विभागाने कायद्याची अंमलबजावणी केलेली नाही. राज्यस्तरीय समिती गठीत केली असली तरी जिल्हास्तरीय समित्या गठीत करण्याची कार्यवाही विभागाने करणे आवश्यक होते. ही कार्यवाही न होणे हा एक गुन्हा आहे. त्यामुळे या प्रकरणी सुद्धा कठोर कारवाई होण्याची आवश्यकता आहे. सन २०१० मध्ये महालेखाकार यांनी ही बाब शासनाच्या लक्षात आणून दिलेली आहे. त्यानंतरही शासनाने कार्यवाही केलेली नाही. त्यानंतर उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्रमांक १८२/२०१० या दाव्यात बालकांचे संरक्षणाच्या दृष्टीकोनातून प्रा.आशा वाजपेयी यांच्या अध्यक्षतेखाली राज्य समन्वय समिती गठीत करण्याबाबत निदेश दिल्यानंतर शासनाने राज्यस्तरीय समिती गठीत करण्याचे निदेश दिले. त्यामुळे हेही लक्षात येत आहे की, न्यायालयाने निदेश दिल्यानंतर मग ही सर्व कार्यवाही झाली आहे. न्यायालयाने सुमोटो याचिका दाखल करून घेतली होती. विधिमंडळ आणि न्यायालय यांच्यामधील संघर्षाला प्रशासन कारणीभूत आहे. प्रशासन योग्य पद्धतीने काम करीत नसल्यामुळे हा संघर्ष उद्‌भवतो आहे. प्रशासन बेजबाबदारपणे वागत असल्यामुळे न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागत आहे असे मत समितीने व्यक्त केले.

२.२० जिल्हास्तरीय समित्या गठीत करण्यात झालेल्या विलंबाची कारणे व त्यास कोण जबाबदार आहेत याबाबतची माहिती विभागाकडून प्राप्त झाली आहे ती खालीलप्रमाणे आहे :—

बाल न्याय अधिनियम, २००० च्या अनुषंगाने राज्याचे बाल न्याय नियम २००२ मध्ये तयार करण्यात आले. त्यानुसार सदर अधिनियम व नियमामध्ये राज्य व जिल्हा सल्लागार मंडळ गठीत करण्याबाबतची तरतूद विहीत करण्यात आलेली आहे. त्यानुसार जिल्हा सल्लागार मंडळ गठीत करणेसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली होती :—

(१) शासन निर्णय दि.२७.०३.२००३ अन्वये जिल्हा सल्लागार मंडळ गठीत करणेबाबतचा निर्णय घेण्यात आला.

(२) शासन निर्णय दि.२४.०६.२००३ अन्वये जिल्हा सल्लागार मंडळाच्या सदस्यांची नियुक्ती व अर्हता याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.

(३) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, दिनांक ३१.१०.२००३ अन्वये राज्य सल्लागार मंडळ गठीत करण्यात आले आहे. सदर राज्य सल्लागार मंडळास जिल्हा सल्लागार मंडळाकरीता प्राप्त नामांकनाची शिफारस करण्याचे अधिकार आहेत.

(४) आयुक्त कार्यालयाकडून जिल्हा सल्लागार मंडळावर अध्यक्ष पदासाठी नामांकने प्राप्त झाली. त्यानुसार दिनांक १२.०७.२००५ रोजी शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

(५) तथापि, सदर प्रस्तावास मान्यता मिळू शकली नाही. त्यामुळे दिनांक १९.१०.२००५ रोजी फेरप्रस्ताव सादर करण्यात आला असता, राज्य सल्लागार मंडळाच्या अध्यक्षांकडून फेरतपासणी करून प्रस्ताव सादर करावा. या निदेशांसह २१.११.२००६ रोजी प्रस्ताव विभागास प्राप्त झाला. त्यानुसार प्रस्ताव फेरसादर करणेबाबत आयुक्त कार्यालयास शासनाच्या दिनांक २९.११.२००६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले व त्यानुसार आयुक्त कार्यालयाने दिनांक ३१.०५.२००७ च्या पत्रान्वये २२ प्रस्ताव शासनास सादर केले. तदनंतर दिनांक ०६.०१.२००८, दिनांक १३.०२.२००८ व दिनांक २०.०९.२००८ रोजी राज्य सल्लागार मंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती. तथापि, दिनांक २७.०६.२००९ च्या राज्य सल्लागार मंडळाच्या बैठकीमध्ये यापुर्वी शासनास सादर करण्यात आलेल्या प्रस्तावात त्रुटी असल्याने सुधारित प्रस्ताव मागविण्याचा निर्णय झाला.

(६) दरम्यानच्या कालावधीत बाल न्याय अधिनियम, २००० मध्ये सन २००६ मध्ये केंद्र शासनाने सुधारणा केल्यानुसार राज्याचे बाल न्याय नियम तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले. सदर नियमातच जिल्हा सल्लागार मंडळाचे अध्यक्ष यांची अर्हता निश्चित करण्याचे काम सुरू असल्याने सदर नियमाचे काम पुर्ण होताच जिल्हा सल्लागार मंडळाची नामांकने मागविण्यात यावीत असा निर्णय राज्य सल्लागार मंडळाच्या दिनांक २२.०८.२००९ च्या बैठकीत घेण्यात आला.

(७) तद्‌नंतर राज्य सल्लागार मंडळाच्या शिफारशीनुसार आयुक्त, महिला व बाल विकास यांनी शासनास नामांकने सादर केली आहेत. तथापि, सदर कालावधी दरम्यान सुधारित बाल न्याय नियम तयार करण्याची कार्यवाही सुरू होती. बाल न्याय नियम २०११ राज्यात ११.०१.२०११ रोजी राज्यात लागू करण्यात आले व सुधारित नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात आली आहे.

(८) राज्य सल्लागार मंडळाच्या दिनांक १८.०६.२०११ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने एकूण ३४ जिल्ह्यांची नामांकने तर १९.११.२०११ रोजीच्या बैठकीन्वये १ नामांकन शासनास सादर करण्यात आले होते.

(९) शासनास प्राप्त झालेल्या नामांकनांच्या अनुषंगाने राज्य सल्लागार मंडळ नियुक्तीसाठी शासन अधिसूचना दिनांक ०९ जुलै २०१३ अन्वये २४ जिल्ह्यांसाठी, शासन अधिसूचना दिनांक ०१ जानेवारी २०१४ अन्वये ८ जिल्ह्यासाठी, शासन अधिसूचना दिनांक २४ जुलै २०१४ अन्वये २ जिल्ह्यांसाठी तर शासन अधिसूचना दिनांक १४ नोव्हेंबर २०१४ अन्वये एका जिल्ह्यासाठी जिल्हा सल्लागार मंडळ (एकूण ३५) गठित करण्यात आले आहे.

तसेच यासोबत विभागाकडून प्राप्त झालेली सहपत्रे **(विवरण क्र. १७)** वर आहेत.

२.२१ उपरोक्त माहिती संदर्भात समितीने पुढील बैठकीत चर्चा केली त्यावेळी जिल्हास्तरीय समित्या घटित करण्यास झालेल्या विलंबाची कारणे व त्यास कोण जबाबदार आहे या बाबतची माहिती विभागाने दिलेली आहे. तसेच सन २०००, २००२, २००३, २००५ व २००६ या वर्षांमध्ये केलेले नियम सादर केलेले आहेत. विभागाने असेही नमूद केले आहे की, २०१६-१७ मध्ये सर्व नियम आणि कायदे बदलले आहेत. समिती जाणून घेऊ इच्छिते की, या संदर्भातील सद्यःस्थिती काय आहे? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०१५ च्या कायद्यामध्ये अशा समित्यांची तरतूद नाही. त्यामुळे अशा समित्या स्थापन करण्याची गरज नाही.

परंतु ज्या समित्या अस्तित्वात आहेत त्या आपोआप रद्दबातल झाल्या आहेत काय? विभागाने सन २०१६ व २०१७ मध्ये शासनाला पत्र पाठविले होते त्यात असे नमूद केले की, या समितीने घेतलेल्या निर्णयांना वैध आधार नाही. या दृष्टीने शासनाने कोणता निर्णय घेतला? कारण या संदर्भातील निर्णय समितीसमोर आलेला नाही. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, केंद्र शासनाने नवीन कायद्यामध्ये मार्गदर्शक सूचना नमूद केलेल्या आहेत. त्यामध्ये तरतूद अशी आहे की, केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे प्रत्येक राज्याने या संदर्भात सूक्ष्म नियम किंवा प्रशासकीय निर्णय करावेत. विभागाची एक व्यक्ती सल्लागार म्हणून घेतली व या संदर्भातील पूर्ण नियमावली तयार करून घेतली. महिला व बालकल्याण आयुक्तांनी ती नियमावली मंत्रालयस्तरावर सादर केली होती. विभागाने ती नियमावली मंत्री महोदयांच्या मान्यतेसाठी सादर केलेली आहे. दरम्यानच्या कालावधीत अस्तित्वात असलेल्या समित्या कार्यान्वित आहेत. जेव्हा नवीन नियमावलीला मान्यता मिळेल आणि ती जाहीर करण्यात येईल त्यावेळी अस्तित्वात असलेल्या समित्या व्यपगत होतील. परंतु आजच्या परिस्थितीत त्या समित्या अस्तित्वात आहेत आणि त्यांनी घेतलेले सर्व निर्णय वैध आहेत.

असे असेल तर विभागाने पाठवलेल्या पत्रात नमूद केले आहे की, केंद्र शासनाच्या नियमामुळे त्याला वैधानिक आधार राहणार नाही. येथे समितीने लक्ष वेधले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्या वेळी नवीन नियमाबाबत राज्य शासन स्वीकृत करून अधिसूचना काढली जाईल. आज सध्याचे नियम लागू आहेत. नवीन नियम लागू झाल्यावर समिती व्यपगत होईल कारण नवीन नियमात समिती समाविष्ट नाही.

२.२२ नवीन नियम जोपर्यंत होत नाही तोपर्यंत राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय मंडळ नेमलेले आहेत ते कार्यरत राहतील व नंतर नवीन नियमानुसार कार्यवाही होईल असे विभागाने पाठवलेल्या पत्रात स्पष्ट होत नाही. या संदर्भात सूचना आयुक्तांना द्यावी असे समितीने निदेश दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, नवीन नियम लागू होईपर्यंत, जुने नियम लागू आहेत. नवीन नियमांची अधिसूचना काढेपर्यंत जुनेच नियम राहतील.

कमिटी फॉर्मेशनमध्ये विलंब झाला. राज्य मंडळाने नावे निश्चित केल्या नंतर मान्यता देण्यास ३-४ वर्षे लागली. सन २०११ मध्ये प्रस्ताव आला. सन २०१४ मध्ये देखील नोटीफिकेशन काढले नाही, याचे कारण काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, शासनस्तरावर मान्यता न मिळाल्यामुळे विभागाला नोटीफिकेशन काढता आले नाही.

राज्यस्तरावर स्टेट ॲडव्हायजरी बोर्ड आहे, जिल्हा पातळीवर इन्स्पेक्शन कमिटी आहे. There were two issues. The State Government was required to constitute State Advisory Board under the Juvenile Justice Care. ते कार्यरत आहे काय? असे महालेखकारांनी समितीच्या माध्यमातून विचारले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सद्यःस्थितीनुसार डव्हायजरी बोर्ड आहे. मात्र सीडब्ल्यूसीकरिता सिलेक्शन कमिटीसाठी नवीन अध्यक्षांच्या मागणीची प्रक्रिया देखील सोबतच सुरू केली आहे.

शासन स्तरावर कमिटयांचा प्रस्ताव मंजूर करण्यास विलंब झाला याचे कारण आयुक्तांचा प्रस्ताव मंत्री महोदयांकडे पाठवला व त्यांनी मंजूर केला नाही हे आहे काय अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विहित मान्यता घ्यावयाची होती. विधि विभागाला प्रस्ताव पाठवला होता. त्यांची मान्यता घेऊनच मंत्री महोदयांकडे प्रस्ताव पाठवावयाचा होता. इतर विभागांच्या कोऑर्डिनेशनमध्ये वेळ लागलेला आहे.

प्रत्येक जिल्ह्याच्या समितीला शासनाकडून मंजुरी घ्यावी लागते. मंजुरी न मिळाल्यामुळे हे झाले नाही. आता रद्द करण्याची पाळी आली आहे. असे मत समितीने व्यक्त केले.

२.२३ शिरुर, जिल्हा पुणे येथील १६ मतिमंद मुले कोठे वर्ग करण्यात आली? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, समाजकल्याण विभागाकडे कल्याण आयुक्तालय असून त्यांच्याकडे ती मुले वर्ग करण्यात आली आहेत. या संदर्भात स्पेशल शिक्षक, थॉरिटीज आवश्यक असतात. या सर्व गोष्टी अंपग कल्याण आयुक्तालयाकडे असल्यामुळे सदर स्कीम त्यांच्याकडे वर्ग करण्यात आली.

२.२४ पुणे जिल्ह्यातील शिरुर येथील मतिमंद मुलांसाठी असणारे बालगृह बंद केल्यावर, त्यात राहणाऱ्या ३० मुलांपैकी १६ मुले शासकीय मोठ्या मुलांचे बालगृह, येरवडा, पुणे येथे दाखल करण्यात आली. उर्वरित १४ मुले शिवाजीनगर, पुणे येथे विधी संघर्षग्रस्त बालकांच्या पुनर्वसनासाठी असलेल्या निरीक्षण केंद्रांमध्ये दाखल करण्यात आली. शॉटफॉलबाबत विषय होता. यामध्ये यवतमाळमधील सर्वात जास्तीचा शॉर्टफॉलचा विषय होता. त्याठिकाणी कोणतेही इन्सपेक्शन झालेलेच नाही. या परिच्छेदामध्ये विषय असा होता की, शिरुर येथील चिल्ड्रन होम असून, ते डिव्हीजनल कमिटीच्या ऑब्झर्व्हेशनमुळे बंद झालेले आहे. हे शिवाजीनगर, पुणे येथे पाठविण्यात आले होते. येरवडा येथील चिल्ड्रन होममध्ये पाठविण्यात आली होती. Actually, those homes are for rehabilitating juveniles who commit offences. उर्वरित बीडमधील १०० मुले ही पाल्यांकडे सोपविलेली आहे. विभागाने अशी कार्यवाही केलेली असून, ती बरोबर आहे काय? याबाबत विभागाचे अभिप्राय काय आहेत? अशा मुलांची देखरेख करण्यासाठी वेगळा विभाग असतो. इ.बाबी महालेखाकारांनी निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ही अपंग मुले असल्यामुळे ती अपंग आयुक्त कार्यालयाकडे वर्ग केली होती. सन २०१२ आणि २०१३ मध्ये शासन निर्णयानुसार कार्यवाही केलेली आहे. महिला व बालकल्याण विभागांतर्गत मतीमंद मुलांना सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरित करण्यात यावे आणि त्यानुसार महिला व बालकल्याण विभागांतर्गत १९ मतीमंद मुलांची बालगृहे होती ती आता सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरित केलेली आहे.

अशी कार्यवाही सन २०१४ मध्ये केलेली आहे. याबाबतीत असे निदर्शनास येते की, विभाग आपल्या जबाबदारीतून मुक्त झालेला आहे. सदर घटना ही त्यावेळी घडलेली आहे. त्यानुसार विभागाने हा विषय सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरित केलेला आहे. असे समितीने नमूद केले असता याबाबत महालेखाकारांनी समितीस अवगत केले. मुद्दा असा आहे की, ज्या विभागाकडे मुले हस्तांतरित केलेली आहे, तो विभाग अशा मुलांची देखभाल करण्यासाठी योग्य आहे काय? तसेच १०० मुले ही संबंधित पालकांकडे दिलेली आहेत. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, ३२ बालकांना विविध संस्थांमध्ये हस्तांतरित केले होते. तसेच ११ बालकांना संबंधित पालकांकडे सोपविलेले आहे. काही बालगृहे चांगल्या पद्धतीने सुरू नसल्यामुळे त्यांची मान्यता रद्द करण्यात आली होती. त्यावेळी १७ मतीमंद बालगृहाची मान्यता रद्द केली होती. जी बालगृहे व्यवस्थित सुरू होती, ती सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरित केलेली आहे.

महालेखाकार यांचे असे म्हणणे आहे की, पुणे जिल्ह्यातील शिरुर तालुक्यातील एक चिल्ड्रन होम बंद झालेले असून, त्यामध्ये ३० मुले होती. 16 out of 30 mentally deficient children residing in Children Home, Shirur, on its closure, based on the observation made by the Commissioner Committee, were transferred to Government Senior boys children Home, Yerwada. While the remaining 14 children were transferred to Pune at Homes for rehabilitating Juvenile in conflict with law. ज्युवेनाईल होममध्ये मुले ट्रान्सफर केली आहे. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, पुणे जिल्ह्यातील शिरुर तालुक्यातील एक चिल्ड्रन होम बंद झालेले असून, ही सत्यपरिस्थिती आहे.

पुणे जिल्ह्यातील शिरुर तालुक्यातील १६ लोकांना ट्रान्सफर केलेले आहे, याबाबत कोणताही आक्षेप नाही. १४ लोकांना ज्युवेनाईल होम्समध्ये पाठविली आहे. हे आक्षेपार्ह आहे. अशी कार्यवाही करणे योग्य नव्हती, असा महालेखाकारांचा आक्षेप होता. बीड जिल्ह्यातील १०० बालकांना संबंधित पालकांकडे सोपविले आहे. असा विषय आहे. ज्युवेनाईल कसे काय पाठविले? बीड जिल्ह्यातील १०० बालकांना संबंधित पालकांकडे सोपविले आहे. याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, मूळ विषय तोच आहे. शिरुरमधील संस्थेला मतीमंद मुलांची काळजी घेण्यासाठी शासनाकडून अनुदान दिले जात होते. सदर संस्थेत काम व्यवस्थित सुरू नव्हते. यामधील मुलांची योग्य प्रकारे देखभाल केली जात नव्हती. शिरुर येथील चिल्ड्रन होम असून, ते डिव्हीजनल कमिटीच्या ऑब्झर्व्हेशनमुळे बंद झालेले आहे.

शिरुर येथील चिल्ड्रन होम असून, ते डिव्हीजनल कमिटीच्या ऑब्झर्व्हेशनमुळे बंद केलेले असून, त्याबाबत समितीला कोणताही आक्षेप नाही असे समितीने नमूद केले.

विभागीय सचिवांनी याबाबत समितीस अवगत केले की, ज्युवेनाईल होम्समध्ये दोन विभाग केले आहेत. यात जो ज्युवेनाईल होम होता, तेथे दोन डीव्हीजन करून मतिमंद मुलांचा एक वेगळा वॉर्ड करून तेथे त्यांना हस्तांतरित केले. तेथे १०० मुलांचे अकॉम्डेशन करण्यासाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या आई-वडिलांकडे त्या मुलांना हॅण्डओव्हर केले. मतिमंद मुलांना ज्युवेनाईलसोबत ठेवलेले नाही. आमच्या अधिपत्याखाली तेथे जागा उपलब्ध असल्यामुळे त्यांची तेथे मतिमंद मुलांसाठी तात्पुरत्या स्वरुपात वेगळी व्यव्यस्था करण्यात आली होती.

दूरदृष्टीचा विचार करून विभागाने १०० मुलांना त्यांच्या पालकांकडे देऊन टाकले असे समितीने नमूद केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, शिरुरचे बालगृह बंद होत असल्यामुळे १०० मुलांना त्यांच्या पालकांकडे देण्यात आले. तसेच सदर मुलांना इतरत्र हलविण्याची वेळ आल्यानंतर त्या संस्थेने ही गोष्ट नाकारली. यामुळे शिरुरची संस्था बंद केल्यामुळे सदर मुलांना त्यांच्या आई-वडिलांकडे हस्तांतरित करावे लागले. सद्य:स्थितीत शिरुरची संस्था बंद असून मतिमंद मुलांचे जेवढ्या इन्स्टिटयूट आहेत त्या शासनाच्या नियमानुसार सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरित केलेल्या आहेत.

२.२५ मतिमंद मुलांच्या इन्स्टिट्युट सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरित करण्यासंबंधी काही प्रश्न नाही. समितीचा मूळ प्रश्न असा आहे की, एका बाजूला शिरुरचे बालगृह काही कारणास्तव बंद केले. तेथील ३० मुलांपैकी १६ मुलांची ज्युवेनाईल मुलांच्या होस्टेलमध्ये वेगळी व्यवस्था केली. तसेच बालगृह बंद झाल्यामुळे बालगृहाची व्यवस्था नसल्यामुळे १०० मुलांना त्यांच्या पालकांकडे सोपविण्यात आले. परंतु मतिमंद मुलांची विशेष काळजी घेऊन त्यांच्याकडे लक्ष देण्याची सामाजिक जबाबदारी आपली असताना ती जबाबदारी आपण पार पाडली नाही असे महालेखाकार यांचे आक्षेप आहे. तसेच ज्युवेनाईल मुलांच्या होस्टेलमध्ये मतिमंद मुलांची राहण्याची व्यवस्था केली तरी ते धोकादायक आहे. ज्युवेनाईल होस्टेलमध्ये ज्युवेनाईलची किती मुले होती? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मतिमंद मुलांसाठी हॉस्पीटलसारखे वेगळे वॉर्ड करावे लागते. तेथे २४ तास त्यांना अटेंडन्स द्यावे लागते. तेथे रोज वैद्यकीय अधिकाऱ्याला भेट करावी लागते. विभागाने ही सर्व व्यवस्था केली आहे. विभागाने फक्त तेथील जागेचा वापर केला. मतिमंद मुलांचा आणि ज्युवेनाईल मुलांचा कोणताही संपर्क आला नाही व त्यांना एकमेकांना भेटण्याची परवानगी दिलेली नाही. अशाप्रकारे ज्युवेनाईल मुले आणि बालगृहातील मतिमंद मुलांची वेगळी व्यवस्था केली होती. ज्युवेनाईल जस्टीसचा विभागाकडे असलेल्या बालगृहाचा विभागाने वापर केला. विभागास ही व्यवस्था नाईलाजास्तव करावी लागली.

We can't justify otherwise also. I can understand that as a temporary adjustment you have done this. However, what is the status today? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, we can verify it from the Social Welfare Department and let you know. मतिमंद मुलांचे सर्व बालगृह सामाजिक न्याय विभागाच्याकडे हस्तांतरित केलेली आहेत. यामुळे ही गोष्ट त्यांच्याकडून तपासून घेण्यात येईल. त्या १०० मुलांना त्यांच्या पालकांकडे हस्तांतरित केलेले आहे. त्यांची प्राथमिक जबाबदारी असल्यामुळे विभागाने १०० मुलांना त्यांच्या पालकांकडे हस्तांतरित केलेले आहे.

२.२६ परिच्छेद क्रमांक ४.१.७.३ "ICDS मधील कार्यक्षेत्र कर्मचाऱ्यांच्या तपासणीतील उणीवा"

उक्त परिच्छेदासंदर्भात आक्षेप असा आहे की, "सीडीपीओ यांनी दरमहा १८ दिवसांचा दौरा करून अंगणवाडी केंद्रातील अभिलेख्यांची छाननी, अन्नाचा दर्जा, मुलांची उपस्थिती इत्यादी माहिती घेणे आवश्यक आहे. परंतु, महालेखाकार यांनी तपासणी केली तेव्हा त्यांना अशा प्रकारचा दौरा केल्याचे आढळून आले नाही. ३४ पैकी ३१ केंद्रांमध्ये सीडीपीओ यांनी सन २००७ ते २०१२ या कालावधीत अपेक्षित प्रमाणात दौरे केले नसून १ ते ९० टक्के एवढी तुट आहे" याबाबत सीडीपीओ यांनी महालेखाकारांना असा खुलासा केला आहे की, "दौऱ्यासाठी वाहने उपलब्ध नसणे, तसेच अतिरिक्त कार्यभार यामुळे दौरे कमी झाले आहेत. "पण असे करून चालणार आहे का? न्यायालयाने निदेश दिल्यानंतरही त्यांच्या निर्णयाची विभागाकडून अंमलबजावणी होत नाही. केंद्र सरकारने कायदा केला आहे. त्या कायद्याचीही अंमलबजावणी विभाग करीत नाही. कोर्टाने सांगितल्यानंतरसुद्धा ही स्थिती आहे. विभागाने स्पष्टीकरण दौरा करणे बंधनकारक असताना दौरा का केला नाही, याबाबत विभागाची भूमिका काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, या विषयासंदर्भात माहिती देण्यात आधी रिक्त पदांसंदर्भातील माहिती समितीस अवगत करणे आवश्यक आहे. अहवालकाळात ५५३ पैकी १३८ पदे रिक्त होती. त्यामुळे उद्दिष्ट पूर्तीसाठी अडचण ठरते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अहवालकाळात ५५३ पैकी १३८ पदे रिक्त होती पण ३४ पैकी ३१ जिल्ह्यात दौरा केला नाही असा आक्षेप आहे. उपलब्ध मनुष्यबळाचा विचार करता किमान ७५ टक्के रेशिओ असावयास हवा होता. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शवली.

तपासणी केलेल्या ३४ पैकी ५-६ जिल्ह्यांच्या ठिकाणी गेले नसते आणि असे स्पष्टीकरण दिले असते की, सीडीपीओ नव्हते म्हणून जाणे शक्य झाले नाही तर समितीने मान्य केले असते. मात्र ३४ पैकी ३१ ठिकाणी अशी परिस्थिती आढळून आली. या संदर्भात केंद्र सरकारने मार्गदर्शक दिल्या आहेत, केंद्र सरकार अनुदानही देते, त्यामध्ये राज्य शासन मॅचिंग ग्रँट देते आणि तो निधी लोकांसाठी वापरण्यात येतो. केंद्र सरकारला जाऊन कोणी सांगितले की, केंद्र शासनाने दिलेल्या गाईडलाईन्सप्रमाणे राज्य शासन वागत नाही तर विभागाला ग्रँट मिळेल का, राज्य शासनाने अंमलबजावणी केली नाही अशी कोणी तक्रार केली तर काय होईल? अशी विचारणा समितीने केली असता सन २०१४ मध्ये सीडीपीओंची सर्व पदे डब्ल्यूसीडी विभागाकडे हस्तांतरित झाली आहेत. अगोदर ही सर्व पदे पदोन्नतीने भरण्यात यायची, त्यावेळी ही पदे ग्रामविकास विभागाकडे होती असे विभागाकडून सांगण्यात आले.

पदे रिक्त होती हे मान्य आहे. २५ टक्के पदे रिक्त होती, त्यावर समिती चर्चा करीत नाही. पण जे ७५ टक्के अधिकारी पदावर होते, त्यांनी का दौरे केले नाहीत? १५१ पदे कमी होती, ते मान्य आहे. ५५३ पैकी १३८ पदे भरली नव्हती. पण जे ७५ ते ८० टक्के सीडीपीओ होते, त्यांनी या सर्व जिल्ह्यांत जाणे आवश्यक होते. महालेखाकारांनी सांगितले की, फक्त ३४ केंद्राना भेट दिली, ३४ पैकी ३१ ठिकाणी त्यांना असे आढळून आले की, गाईडलाईन्सप्रमाणे दौरे केले नाहीत. ३४ पैकी ४ किंवा ५ ठिकाणी अधिकारी नसल्यामुळे तसे झाले, असे स्पष्टीकरण देणे शक्य आहे. मात्र येथे ३४ पैकी ३१ ठिकाणे अशी आहेत की तेथे अपेक्षेप्रमाणे दौरे झाले नाहीत असे समितीने निदर्शनास आणले असता १८ दिवस प्रति महिना दौरे करायचे होते. उद्दिष्ट असे आहे. मात्र यावेळी त्यांनी १८ पेक्षा कमी दौरे केले आहेत असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

२.२७ सीडीपीओंनी १८ दिवस दौरे केले पाहिजेत. मात्र त्यांचे १ किंवा २ दिवस देखील दौरे झालेले नाहीत. ही सर्व महालेखाकारांची निरीक्षणे आहेत. १५-१६ दौरे केले असते तर मान्य केले असते. महालेखाकारांचे म्हणणे आहे की, १ ते ९० टक्क्यांपर्यंत दौरेच केलेले नाहीत, म्हणजे १८ पैकी २ दौरे केले आहेत. मग त्यांना घरी बसून पगार देऊन विभाग चालविण्यात येतो का, लोक पोसण्यासाठी हा विभाग आहे का, यामुळे बालकल्याण होणार आहे का? सीडीपीओ ज्या कामांसाठी नियुक्त केले आहेत ते काम त्यांनी केलेच पाहिजे, त्यांची ती जबाबदारी आहे. ते ती जबाबदारी पार पाडत नसतील आणि विभाग त्या बाबीचे समर्थन करणार असेल तर ते योग्य नाही असे मत समितीने खेदाने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी समितीच्या मताशी सहमती दर्शविली व समितीस अवगत केले की, सन २०१४ पर्यंत ही पदे ग्रामविकास विभागाकडे असल्यामुळे सीडीपीओंचे, जिल्हा परिषदांचे संनियंत्रण त्यांच्याकडे होते. मात्र आता सन २०१४ पासून डब्ल्यूसीडीने स्वत:कडे त्यांचे संनियंत्रण घेतले आहे.

ही बाब विभागाने उत्तर पाठविले, त्यावेळी हे सांगितले पाहिजे होते. विभागाने वेळीच ही बाब समितीच्या निदर्शनास आणून दिली असती तर समितीने ग्रामविकास विभागाच्या सचिवांना देखील बोलाविले असते. हे योग्य नाही. You do not divert the issue. As a CDPO he has to perform certain duties. We are not asking who was controlling the Department. That is not the question at all. This is not acceptable at all. साक्षीसाठी ग्रामविकास विभागाच्या सचिवांना बोलाविले पाहिजे होते. विभागाच्या सचिवांनी विषय डायव्हर्ट करण्याचे कारणच काय. हे स्वीकारार्ह नाही. संबंधित दोषींना पाठिशी घालण्याचे कारणच काय आहे? त्यांनी त्या काळात जे कर्तव्य बजवायचे होते, ते बजावले नाही, असे महालेखाकारांचे निरीक्षण आहे, कोण संनियंत्रण करीत होते, ती नंतरची बाब आहे. ज्यांनी दौरे केलेले नाहीत, त्यांच्या विरूद्ध विभाग काही कारवाई करणार आहे की नाही की हे मान्य करून पुढे जायचे? परिच्छेद काढावा एवढे म्हणून समिती पुढे जाणार नाही. आणि विभागानेसुद्धा तोच ॲप्रोच घेतला पाहिजे, जो घेणे गरजेचे आहे असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले.

२.२८ सद्य:स्थितीत दौऱ्यांची परिस्थिती काय आहे? आज निकषाप्रमाणे भेटी देण्यात येतात का? प्रति माह १८ वेळा भेटी दिल्या पाहिजेत, त्यानुसार सीडीपीओ नॉर्म्स मेंटेन करतात का? सुट्टीचे ५-६ दिवस सोडले तर अल्टरनेट वर्किंग डेज व्हिजिटला जातील म्हणून १८ दिवस केले आहेत. मतिमंद मुलांना संरक्षणाची माहिती नसते, सेक्स्युअल हॅरेसमेंट संदर्भात त्यांना काहीही कळत नाही, अशा गोष्टी घडू नयेत हे पाहण्यासाठी, त्यांना जेवण्यास वेळेवर दिले जाते का, त्यांची स्वच्छता व्यवस्थित केली जाते का, अशा सर्व गोष्टी बरोबर होतात का ते पाहण्यासाठी दौरे केले जात असतात. तसेच १३५० रुपयांमध्ये त्यांना सर्व काही वेळेवर मिळते का हाही एक पाहण्याचा भाग झाला. मतिमंद मुलांना विशेष काळजीची गरज असते. त्यामुळे सीडीपीओंना दौऱ्यासाठी दिवस ठरवून दिले आहेत. तत्संदर्भात आजची स्थिती काय आहे, अशी विचारणा समितीने केली असता आजची परिस्थिती अशी आहे की, वर्ग-२ मधील ५५३ पदांपैकी ३८२ पदे रिक्त आहेत. वर्ग-१ मधील १०४ पदांपैकी ३३ पदे रिक्त आहेत. सध्या कामावर असणाऱ्यांकडे २ किंवा ३ प्रकल्पांचा चार्ज असून सर्व प्रकल्प मिळून त्यांच्यावर १८ दिवस दौरे करण्याचे प्रावधान आहे. किती लोकांनी दौरे केले आहेत, या संदर्भातील ३१ मार्चपर्यंतची माहिती घेतली असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

एकूण ५५३ कर्मचाऱ्यांपैकी ६० टक्के कर्मचारी नसल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले आहे. समितीला ते मान्य आहे. पण उर्वरित कर्मचाऱ्यांनी काय काम केले याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले. उपलब्ध असलेल्या सीडीपीओंकडे २-३ प्रकल्पांचा चार्ज आहे, त्यांचे नियमित दौरे म्हणजे प्रति माह १८ दौरे असले पाहिजेत. सर्व प्रकल्प मिळून १८ दौरे केले पाहिजेत, अशी अपेक्षा आहे. ३१ मार्चला आर्थिक वर्ष संपले आहे, चाचणी करण्याचा अधिकार डेप्युटी सीईओंना दिला आहे, त्यांच्याकडून अहवाल आल्यानंतर या संदर्भातील माहिती मिळेल.ल

समिती सदस्य हे तळागाळात काम करणारे सदस्य आहोत. त्यांच्या मतदारसंघात सुधारगृहे असतात. सीडीपीओंनी दौरे केले की नाही, गावात गेले की नाही, काम केले की नाही, ते समजले पाहिजे, त्यामुळे अशी सिस्टिम उभी करण्यात यावी की कागदावर सर्व काही मिळेल. त्यामुळे खरोखर दौरे केले की नाही, हे समजेल.

आजच्या स्थितीत देखील किती तरी पदे रिक्त आहेत. ती पदे कधी भरण्यात येणार आहेत? ही कार्यवाही किती दिवसांत पूर्ण होईल? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यासंदर्भात १४९ जणांची यादी प्राप्त झाली होती. विभागाकडे चक्राकार पद्धत आहे, त्यामध्ये सवलत मिळून अगोदर ट्रायबल एरियामध्ये प्राधान्याने भरण्याबाबत मंत्रिमंडळाकडे प्रस्ताव गेला होता. मंत्रिमंडळाने त्यास मान्यता दिली आहे. महिला व बालविकास विभागाने प्रस्ताव तयार करून सामान्य प्रशासन विभागाकडे चाचणीसाठी पाठविला आहे. कारण नियमाप्रमाणे त्यांची मान्यता घेणे गरजेचे आहे. तिकडून आल्यानंतर, माननीय मंत्र्यांची स्वाक्षरी झाल्यानंतर आदेश निघतील. सदर कार्यवाही १५ दिवसांत पूर्ण होईल.

विभागाकडे १४९ जणांची यादी आहे. १८३ जण राहिले आहेत, त्यांच्या संदर्भात काय करण्यात येणार आहे? या समितीच्या प्रश्नाबाबत विभागीय सचिवांनी अवगत केले की, १४९ जरी मिळाले तरी परिस्थिती सुधारते. रिक्त पदे सरळसेवेने भरायची आहेत, हे सोडून १४९ भरायचे आहेत. विभागाने त्या संदर्भात एमपीएससीला कळविले आहे, त्याची प्रोसिजर त्यांनी सुरू केली आहे.

न्यायालयाचा स्टे उठला तर कित्येक सुधारगृहे बंद करण्याची परिस्थिती सुद्धा येईल. न्यायालयाचा स्टे उठला की, जे सी किंवा डी ग्रेडमध्ये आहेत, ते मोठ्या प्रमाणात बंद होण्याच्या स्थितीत राहतील असे मत समितीने व्यक्त केले असता हे विषय सीडीपीओंचे आहेत. सीडीपीओ

आयसीडीएस अंतर्गत अंगणवाड्यांसाठी काम करतात. समितीचे म्हणणे बरोबर आहे की, न्यायालयाने आदेश दिले तर सी ग्रेडमध्ये आलेल्या सुधारगृहांच्या बाबतीत शासनाला निर्णय घेण्याची वेळ येणार आहे. कारण त्यांची सुविधा नियमाप्रमाणे नाही, त्यांनी त्या स्तराची सुविधा दिली पाहिजे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२.२९ आता सीएसआर असणाऱ्या लोकांना काम करण्यास मोठा वाव आहे. शासन स्तरावर हे प्रयत्न झाले तर सीएसआरद्वारे काम करता येईल. सुधारगृहे किंवा मतिमंद मुलांना सांभाळण्यासाठी असणाऱ्या संरक्षणगृहांच्या संदर्भात ते काम होऊ शकेल. त्यासाठी पैसे उपलब्ध आहेत, आता अवघड असे काय आहे, विभागाच्या अर्थसंकल्पाला कात्री लागत नाही, अधिकचे करायचे आहे ते बरोबर आहे. ४० रुपये रोज झाला आहे. सकाळी आंघोळीपासून झोपण्यापर्यंत २ वेळचा नाश्ता, जेवण, साबण, तेल अशा सुविधा ४० रूपयांत देणे शक्य नाही, हे सर्वांना माहित आहे. सीएसआर स्तरावर प्रयत्न केले, सीएसआर असणारे लोक जोडले तर बरे होईल. ते नियंत्रण करण्यास खूप चांगले आहेत. बजेटला कात्री लागत नाही हे बरोबर आहे. मात्र ४० रुपयांमध्ये करणे अवघड आहे. मतिमंद मुलगा सामान्य मुलापेक्षा जास्त जेवतो, कारण त्यास त्याला किती जेवायचे हे समजत नाही असे समितीने नमूद केले.

विभागाला न्यायालयाने कोणत्या मुद्यावर स्थगिती दिली आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, विभागाने ज्या मुद्यांवर चाचणी केली होती, त्या मुद्यांवरच आक्षेप नोंदविला आहे. मुद्दे तपासले पाहिजे होते की नाही, या गोष्टीवरून न्यायालय प्रकरणाची सुरुवात झाली आहे. न्यायालयाने शासनाचे मुद्दे बऱ्यापैकी स्वीकारले आहेत.

विभागाकडे संस्थेच्या संदर्भात नियम नसतात, एका संस्थेची काय जबाबदारी आहे याची पूर्ण डिफाईन्ड डेफिनिशिन नसते. न्यायालयात गेल्यानंतर ज्या मुद्यांवर नोटीस दिली जाते, त्या मुद्यांची कागदपत्रे नसतात की, एका संस्थेने काय केले पाहिजे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००२ च्या कायद्यामध्ये अगदी स्पष्ट दिले आहे. सन २०१३ ला सुधारणा आली, त्यामध्ये अगदी स्पष्ट दिले आहे. सन २०१५ मध्ये भारत सरकारने ब्रॉड गाईडलाईन्स देऊन प्रत्येक राज्याला या संदर्भात कायदा करण्याची मूभा दिली आहे.

२.३० याबाबत समितीने सुचित केले की, विभागाने न्यायालयाला विनंती केली पाहिजे की, हा महत्त्वाचा मुद्दा आहे.यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सदर प्रकरण हे शेवटच्या टप्प्यावर आले आहे. यासंदर्भात २-३ सुनावण्यांमध्ये या निकाल येईल, अशी अपेक्षा आहे. सन २०१५ मध्ये भारत सरकानरने गाईडलाईन्स देऊन राज्याला कायदा करायला सांगितले आहे. We have hired Tata Institute of Social Sciences (TISS). एक समिती गठीत केली आहे. समितीच्या ३ बैठका झालेल्या आहेत. बैठकांमध्ये सखोल नियमावली तयार करून शासनाला सादर करण्यात येणार आहे. पुढच्या १ महिन्यात ती नियमावली तयार होऊन मंत्रिमंडळापुढे सादर करण्यात येणार आहे. त्या शिवाय त्यांचे दौरे होणार नाहीत. कार्यालयात बसूनच काहीच होणार नाही. अचानक भेट दिली तरच खर चित्र दिसेल. समितीने आताच सांगितले की, ४० रुपयांत भागत नाही. वास्तविक पहाता ४० रुपयांत देखिल भागेल. मात्र त्यांना ४० रुपये देखील देण्यात येत नाही. त्यातील १०-२० रुपयेच देण्यात येतात. ४० रुपये देखील त्यांच्यापर्यंत पोहचत नाही. त्यामुळे रँडमली युनिट तयार करून ॲक्शन घेण्यात यावी. विभागाचा दबदबा असला पाहिजे. राज्यात ही पद्धत तयार झाली आहे. या सर्व तरतुदी कायद्यात सुद्धा आहेत. कोठल्याही विभागाच्या संस्था आहेत त्यांच्या वर कोणतीही ॲक्शन घेतली की, त्यांची असणारी संघटना घेतलेल्या क्शनच्या विरूद्ध न्यायालयात जातात आणि विरोधात स्टे आणतात. ही प्रॅक्टिस झाली आहे. त्याकरिता कनिष्ठ अधिकारीच सल्ला देतात. अधिकारीच त्यातील लूपहोल्स निदर्शनास आणून देतात आणि त्यामुळे स्टे मिळतो. राज्याचा, देशाचा कायदा सुस्पष्ट आहे, मग स्टे मिळण्याचे काही कारण नाही. इ.बाबी समितीने निदर्शनास आणून दिल्या असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सर्व बालगृहांच्या संदर्भात स्ट्रिक्ट ॲक्शन घेतली आहे. सन २०१२ ते सन २०१५ अशा तीन वर्षांत त्यांनी देयके सादर केली होती, निरीक्षणे झाली, त्यावेळीच त्यांचे पेमेंट थांबविले होते. विभागाने त्या संदर्भात वित्त विभागाला विनंती करून वित्त विभागाकडूनच एक शासन निर्णय काढून घेतला. ३-३ टप्प्यांची निरीक्षणे सुरू केली. First was physical verification, second whether they are in accordance with the Financial Rules आणि उप संचालक, वित्त विभाग यांनी नियमावलीप्रमाणे व इतर ॲक्टप्रमाणे सर्व तपासणी केली. ११०० बालसुधारगृहांची निरीक्षणे होऊन आता शेवटच्या टप्प्यावर आले आहे. ११०० बालगृहांपैकी १८२ बालगृहांनी कागदपत्रे सादर केली, इतरांनी कागदपत्रे सादर केली नाहीत. ३१ मार्चपर्यंत शेवटची मुदत होती. विभागाने सांगितले की, कागदपत्रे सादर केली नाहीत म्हणजे तुमचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरून सदर प्रकरण बंद करण्यात येईल. १८२ बालगृहांच्या निरीक्षणांमध्ये त्यांच्या स्तरावर खूप त्रुटी निघाल्या आहेत. त्यांच्यावर ॲक्शन घेतली नाही असे नाही. विभागाने नियमाप्रमाणे जे अपेक्षित आहे ते केले आहे, पेमेंट थांबविले आहे आणि त्यांच्या मान्यता रद्द करण्याबाबतचे प्रस्ताव आणि शासन स्तरावरील कार्यवाही विभागामार्फत सन २०१४ पासून आतापर्यंत सुरूच आहे.

सद्य:स्थितीत तरी विभागाच्या धोरणाप्रमाणे सीडीपीओ दौरे करतात का, ते मॉनिटरिंग करण्यासाठी काही सिस्टिम आहे का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यांच्या दौऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याचे काम डेप्युटी सीईओ करतात. डेप्युटी सीईओंकडून टूर डायरी संदर्भातीललअहवाल आयुक्त स्तरावर येतो, डेप्युटी सीईओ व कमिशनर स्तरावर याचे मॉनिटरिंग असते.

२.३१ जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारीकडे किती विभाग असतात, किती काम असते हे समितीस माहीत आहे, त्यांना सर्व सीडीपीओंना घेऊन काम करणे शक्य नाही. सिस्टम तयार करावी तरच ते समजेल नाही तर सीडीपीओ कागदांवर एवढे दौरे केले आहेत असे लिहून पाठवतील आणि डेप्युटी सीईओ देखील तसेच सांगतील. वस्तुस्थिती कधीच पुढे येणार नाही. ही वस्तुस्थिती समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता याबाबत विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले की, यासाठी पुढील ६ महिन्यांत आयटी बेस्ड टेक्नॉलॉजी घेऊन इलेक्ट्रॉनिक सिस्टिम उभी करण्यात येईल.

जोपर्यंत सिस्टिम उभी करणार नाही, तोपर्यंत काहीच होणार नाही. महालेखाकारांनी विषय काढला म्हणून समितीसमोर हे प्रकरण आले. सिस्टिम असेल तरच हे नियंत्रित होईल नाही तर होणार नाही असे मत समितीने व्यक्त केली.

आजच्या स्थितीत राज्यातील जिल्ह्यांत किती भेटी देण्यात आल्या आहेत, या संदर्भातील अहवाल डेप्युटी सीईओंकडून मागवून घ्यावा. १८ पैकी सरासरी किती इन्स्पेक्शन करीत आहेत. तथापि, विभागीय सचिवांकडे यासंदर्भातील नक्की संस्था नसल्याने त्याबाबतची माहिती समितीला सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी अश्वस्त केले. त्याप्रमाणे विभागाकडून प्राप्त झालेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

२.३२ सदरच्या कालावधीमध्ये बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांची बरीच पदे रिक्त असल्यामुळे एका अधिकाऱ्यांकडे एक किंवा एकापेक्षा जास्त प्रकल्पाचा अतिरिक्त कार्यभार असल्यामुळे कार्यभाराचा प्रकल्पामध्ये भेटी झाला नसल्याचे दिसून आले आहे. तसेच ज्या ठिकाणी गट विकास अधिकारी यांचेकडे प्रकल्पाचा अतिरिक्त कार्यभार असल्यामुळे त्याचे मूळ पदाचे काम सांभाळून प्रकल्पामध्ये दौरे होऊ शकले नाहीत. सद्य:स्थितीमध्ये ५५३ पैकी ३९८ पदे रिक्त असून लोकसेवा आयोगाकडून १४७ उमेदवारांची नावे विभागास प्राप्त झाली असून त्यांची नियुक्ती अंतिम टप्प्यात आहे. तसेच ज्या ठिकाणी बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत, अशा ठिकाणी मुख्यसेविकास यांना अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला असून त्यांचेमार्फत नियमितपणे अंगणवाडी भेटी देण्यात येत आहे. त्यामुळे सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी केलेल्या दौऱ्याची माहिती यासोबत जोडली आहे. **(विवरण क्र. १८)**

उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने विचारणा केली की, सीडीपीओची ३९८ पदे रिक्त होती यामुळे भेटी देण्याचे काम करता आले नाही. त्यामुळे संबंधितांनी आपली डयुटी पार पाडली नाही असे समितीने नमूद केले असे विभागीय सचिवांनी सांगितले.ेशोकॉज नोटीससत्यांना दिली असून पुढील कार्यवाही केली जात आहे.उपमुख्यकार्य अधिकारी यांना जिल्ह्याचे ज्युरिस्डीक्शन आहे. सुरू केलेले आहे व सन २०११-१२ मधील सर्व संबंधितांना नोटीसेस देऊन त्याचा अहवाल समितीस सादर करण्यात येईल.

एखादा सीडीपीओ अंगणवाडीमध्ये भेटीसाठी जातो, तेव्हा तेथे शेरापुस्तिका असते, त्यामुळे भेटीची नोंदही असते. हे क्रॉस व्हेरिफाय देखिल करू शकतो. अहवाल दिला आहे की, अमूक ठिकाणी भेट दिली आहे अशी शेरे पुस्तिकेत नोंद असणे अभिप्रेत आहे. भेटीच्या वेळी शेरा लिहायचा असतो. सीडीपीओंना वरिष्ठ अधिकारी हे डेप्युटी सीईओ, महिला बालविकास अधिकारी, जिल्हा परिषद त्यावरच्या स्तरावर असतात. त्यांच्या वरच्या स्तरावर सीईओ, जिल्हा परिषद ते काम पाहतात. सीईओ, डेप्युटी सीईओ यांच्या व्यतिरिक्त महिला व बालविकास विभागाचे आयुक्त, आयसीडीएस असतात, त्यांच्याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे काम आहे.

जसे इन्कम टॅक्स रेडच्या वेळी कोणाला माहीत नसते की, कोणत्या ठिकाणी जायचे आहे, तसे केले तरच हे होईल. समितीला हेच अपेक्षित आहे. जर पूर्ण माहिती दिली तर संबंधित रेकॉर्ड लावून सर्व काही समोर देतील. त्यामुळे पूर्व कल्पना न देता व्यवस्थित चौकशी करावी, जेणेकरून वस्तुस्थिती समजेल असे समितीने सुचित केले.

आयुक्त, आयसीडीएस यांना सांगावे की, त्यांनी प्रत्येक विभागात एक टीम करावी. व रॅडमली १० जागावर तरी रेड करून नक्की काय वस्तुस्थिती आहे हे लक्षात येईल असे निदेश समितीने दिले असता विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती खालीलप्रमाणे आहे.

राज्यातील ६ महसूल विभागामार्फत विभागीय उप आयुक्त महिला व बालविकास यांच्या अध्यक्षतेखाली एक भरारी पथकाची निर्मिती करण्यात आली असून त्यांचेमार्फत प्रकल्प कार्यालय तसेच अंगणवाडयांना भेटी देऊन तपासणी करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत बाल विकास प्रकल्प अधिकारी हे नियमितपणे दौरे करत असल्याचे दिसून येते.

२.३३ परिच्छेद क्र. ७.१.७.४ दक्षता पथकाची स्थापना न करणे :

दक्षता पथकाची स्थापना करण्याबाबत सन २००२ चे शासन परिपत्रक आहे. परंतु विभागाने दक्षता पथकाची स्थापना सन २०११ मध्ये केली. सन २००२ च्या परिपत्रकानुसार विहित मुदतीत दक्षता पथकाची स्थापना न करण्याची कारणे काय आहेत? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाच्या माध्यमातून आयसीडीएस अंतर्गत राज्यस्तरीय समितीची स्थापना सन २०११ मध्ये करण्यात आली आहे. विभागीय स्तरावर भरारी पथकांची स्थापना करण्यात आली होती.

२.३४ परिच्छेद क्र.४.१.७.५ मुख्य नियंत्रण अधिकाऱ्याकडे विवरणपत्र न पाठविणे :

मुख्य नियंत्रण अधिकाऱ्याकडे विवरणपत्र न पाठविण्याबाबतचा हा मुद्दा आहे. ज्या अधिकाऱ्यांनी मुख्य नियंत्रण अधिकाऱ्याकडे विवरणपत्र पाठविले नाही त्यांच्यावर काय कारवाई केली? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, अधिकाऱ्यांनी मुख्य नियंत्रण अधिकाऱ्याकडे विवरणपत्र सादर केले नाही, असा महालेखाकार यांचा आक्षेप होता. ही बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर विभागाने सर्वसमावेश सॉफ्टवेअर तयार करून घेतले आहे. वास्तविक पाहता हा विषय आयसीडीएस अंतर्गत येत असून तो अंगणवाडीनिहाय आहे. राज्यात १ लाख ८ हजार अंगणवाड्या आहेत. या अंगणवाड्यांमध्ये जेवढी मुले तेथील सुविधा घेतात त्या मुलांचा डेटाबेस नवीन सॉफ्टवेअरनुसार तयार करून घेण्यात आला आहे. ६ महिने ते ३ वर्षे आणि ३ वर्षे ते ६ वर्षे वयाच्या मुलांचा पूर्ण डेटा बेस तयार करून घेतलेला आहे. हा डेटाबेस दरमहा अद्ययावत होत असतो. पूर्वी डेटाची माहिती मिळत नव्हती. माहिती गोळा करण्याचे जे धोरण होते ते आतापर्यंत पूर्णपणे कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. पूर्वी विभागाला लेखी स्वरुपात माहिती मिळत होती, आता इलेक्ट्रॉनिक पद्धतीने माहिती मिळत आहे.

या कामी नवीन सॉफ्टवेअर विभागाने विकसित केल्याबद्दल समितीने विभागाचे अभिनंदन केले. परंतु या विषयाच्या अनुषंगाने महालेखाकार यांनी जो आक्षेप घेतला, त्याबाबत विभागाने सांगावे यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, तत्कालीन अधिकाऱ्यांकडून लेखी माहिती घेऊन, त्या कालावधीतील माहिती अद्ययावत करून घेण्यात आलेली आहे.

ज्या गोष्टी नियमानुसार झाल्या नाहीत त्या महालेखाकारांनी विभागाच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. या कामात आता सुधारणा केली असली तरी तत्कालीन अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी पार पाडली नाही म्हणून त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करणार की नाही? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, तत्कालीन अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस दिली असून, त्यांच्याकडून या संदर्भातील सर्व माहिती प्राप्त करून घेतली आहे.

महालेखाकार काही मुद्यांचे सॅम्पल ऑडीट करतात. त्या मुद्यांपैकी काही मुद्दे समितीच्या माध्यमातून साक्षीला घेण्यात येतात. तरी सुद्धा त्या मुद्यांच्या संदर्भात संबंधितांवर कारवाई होत नसेल तर ते योग्य नाही. तत्कालीन अधिकाऱ्यांकडून माहिती मागवून घेतल्यानंतर त्यांच्यावर कारवाई न करता सोडून देणे योग्य नाही. अशाच प्रकारे विभागाचा कारभार राहिल्यास कायदा, सुशासन, शासन हे काहीच राहणार नाही असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, पूर्वी असा प्रकार घडल्यामुळेच नवीन सॉफ्टवेअर तयार करून घेतले आहे. त्यामुळे आता काम पाहणाऱ्यांची यातून सुटकाच होऊ शकत नाही.

पण ज्यांनी अगोदर चूक केली त्यांच्यावर कारवाई न करता, विभाग त्यांना तसेच सोडून देणार काय? असे विचारणा समितीने पुन्हा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, तत्कालीन अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन ताकीद दिली आहे. हा प्रकार पुन्हा होऊ नये म्हणून सॉफ्टवेअर तयार करण्यात आले आहे.

२.३५ परिच्छेद क्र. ४.१.८.१ रोखवही ठेवणे :

वास्तविक पाहता प्रचलित पद्धतीमध्ये रोखवही ठेवणे अपेक्षित आहे. चाचणी तपासणी केलेल्या ३४ पैकी १७ सीडीपीओ च्या कार्यालयांमध्ये असे निदर्शनास आले की, सीडीपीओ यांनी ५ वर्षांमध्ये देयक क्रमांक, रक्कम काढण्याची तारीख, याची नोंदणी न केल्यामुळे दीर्घकाळ वाटप न केलेल्या रकमांची निश्चिती करता आली नाही. ही अतिशय गंभीर बाब आहे. परंतु या संदर्भात केलेल्या कारवाईची नोंद करण्यात आलेली नाही. या प्रकरणी नॉन रिकन्सीलेशनचा सुद्धा परिच्छेद होता. विभागाने नमूद केले आहे की, लेखा अधिकारी आणि सहायक लेखा अधिकारी यांची रिक्त पदे भरण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे. यामध्ये काय प्रगती झाली आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, महालेखाकार यांनी आक्षेप काढल्यानंतर विभागाने सर्व सीडीपीओंचे कॅम्प घेऊन त्यांना या बाबतची माहिती देण्यात आली आहे.

विभागाने महालेखाकार यांना सांगावे की, संपूर्ण विभागाचे लेखापरीक्षण करून द्यावे. महालेखाकार यांनी सांगितल्यानुसार विभागाने सुधारणा करावी. कारण महालेखाकार जोपर्यंत काही सांगत नाही तोपर्यंत विभाग सुधारणाच करीत नाही. त्यामुळे समितीचे म्हणणे एवढेच आहे की, ज्यांनी रोखवही ठेवली नाही, अकाऊंट बुक्स ठेवले नाही, पैशाचा पाच-पाच वर्षे हिशेब दिला नाही त्यांना केवळ कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांना तसेच सोडून देणार काय, याबाबत विभागाची काही सिस्टीम आहे की नाही? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, निश्चितपणे सिस्टीम अस्तित्वात आहे. ज्यावेळी १८ सीडीपीओ चा विषय विभागाच्या निदर्शनास आला त्यावेळी संपूर्ण मोहिम हाती घेऊन ५५३ प्रकल्पांतर्गत हा सर्व हिशेब करून घेतला आहे.

महालेखाकार यांना १७ सीडीपीओ यांच्या कार्यालयात जे निदर्शनास आले आहे त्या संदर्भात त्यांच्यावर काय कारवाई करणार? त्यांना केवळ शो कॉज नोटीस देऊन भागणार नाही. असे मत समितीने व्यक्त केले.

महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणले की, deficiency was that there has to be a closing of Cash Book every month. This was not done in Commissioner Office, ICDS, Navi Mumbai. You have to give

dated certificate regarding cash balance in words and figures, ही बाब आयुक्त, आयसीडीएस नवी मुंबई आणि सीडीपीओ, सेंट्रल पुणे येथे आढळली नाही. कॅशियरने फिजिकल कॅश बॅलन्स व्हेरिफाय करायचा असतो. ते सुद्धा तेथे आढळले नाही. अशा त्या त्रुटी होत्या. विभागाने लेखी माहितीमध्ये नमूद केले आहे की, विभागाकडे अकाऊंट ऑफीसर आणि असिस्टंट अकाऊंट ऑफीसर ही पदे पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. ही पदे भरण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केल्याचे नमूद केले आहे. बँक अकाऊंट आणि कॅश बुक्सच्या रिकन्सीलेशनमध्ये तफावत होती. काही ठिकाणी रिकन्सीलेशन केले नव्हते.

२.३६ या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, विभागामध्ये अकाऊंट ऑफिसर्सच्या पद भरतीच्या संदर्भात काही सुधारणा झाली आहे काय? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरहू लेखापरीक्षण २०११-१२ मध्ये झाले होते. त्यावेळी संपूर्ण आयसीडीएस आणि डब्ल्यूसीडीएस हे एकाच आयुक्तालयांतर्गत पुणे येथे कार्यरत होते. तद्नंतर सन २०१४ मध्ये विभाजन होऊन आयसीडीएस आणि डब्ल्यूसीडीएस हे स्वतंत्र आयुक्तालय झालेले आहे. सन २०१४ पर्यंतचे ५५३ डीडीओ, सीडीपीओ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी या सर्वांच्या रोखवहीचे रिकन्सीलेशन केलेले आहे. आता सन २०१५ पर्यंतचे आयसीडीएसचे रिकन्सीलेशनचे काम पूर्ण झालेले आहे. महालेखाकार यांचा मुख्य मुद्दा आहे की, कॅश रिकन्सीलेशन करण्यात आले नाही, बँक रिकन्सीलेशन केले नाही आणि दरमहा जे क्लोजिंग करावयास पाहिजे होते ते केले नाही. परंतु आता संपूर्ण कॅश फ्लो सन २०१५ पर्यंत करून घेतलेला आहे.

विभागाने कॅश फ्लो करून घेतला आहे, असे म्हणू शकत नाही. महिन्याच्या शेवटी सर्व व्यवहार करणे ही संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारीच आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी रोखवही मेंटेन करणे, रोखवही क्लोज करणे ही त्यांची जबाबदारीच आहे. हा सिस्टीमचा भाग आहे. ही दैनंदिन सिस्टीम आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०१४ मध्ये जेव्हा आयसीडीएस आणि डब्ल्यूसीडीएस यांचे विभाजन होऊन स्वतंत्र संचालनालय अस्तित्वात आले. त्यावेळी अकाऊंट सेक्शन सुद्धा वेगवेगळे झाले. आयसीडीएस ला उप संचालक स्तरावरील अधिकारी मिळाले. त्यानंतर विभागाला आयसीडीएस अंतर्गत पूर्ण फायनान्शियल ब्रांच मिळाली. यामध्ये वर्ग-१ चे ३ अधिकारी आणि संलग्नित कर्मचारी आले. त्यांच्या माध्यमातून विभागाने सर्व काम करून घेतले आहे. तसेच आयुक्त स्तरावर अंतर्गत लेखापरीक्षणासाठी १४ पदांचे पथक निर्माण करण्यात आलेले आहे. सन २०१३-१४ मध्ये विभागीय स्तरावर लेखाधिकारी आणि जिल्हा स्तरावर सहायक लेखाधिकारी ही पदे निर्माण केली आहेत.

महालेखाकार यांना विभागाच्या आर्थिक बाबींमध्ये अनियमितता आढळून आली. परंतु तरी सुद्धा दोषींवर कारवाई केली नाही. हा मुद्दा समितीने पुन्हा उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी सांगितले की, नंतरच्या काळात रिकन्सीलेशन केल्यावर त्यामध्ये आर्थिक अनियमिततेचा विषय आढळून आला नाही. ही बाब त्यावेळी निदर्शनास आली असती तर संबंधितांना निश्चित निलंबित करण्यात आले असते. After the reconciliation was completed, there was no such problem. पण ज्यावेळी या बाबी ए.जी. यांच्या निदर्शनास आल्या त्यावेळी कार्यालयातील सर्व व्यवहार अपूर्ण होते. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली जसा विभागीय सचिवांनी पुस्तके अपूर्ण ठेवणे ही त्यांची सर्वात मोठी चूक होती. ही बाब मान्य केली.

बुक्स मेंटेन न करणे ही चूकच आहे. हे विभागाने मान्य केले पण मधल्या सर्व चुकांच्या बाबतीत संबंधितांना केवळ ताकीद देऊन सोडणार काय? त्या अधिकाऱ्यांना केवळ ताकीद देऊन सोडत असाल तर ते योग्य नाही. पैशाचा व्यवहार ज्या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून होतो त्याच ठिकाणी पारदर्शकता नाही, असाच मुख्य आक्षेप आहे असे मत समितीने नमूद केले.

२.३७ परिच्छेद क्र. ४.१.८.२ रोखवहीचा बँक खात्याबरोबर ताळमेळ न घालणे :

अकरा CDPOs, दोन DWCDOs (मुंबई उपनगरे आणि यवतामळ) आणि दोन Dy.CEOs (बीड आणि उस्मानाबाद) यांच्या रोखवह्यांची छाननी केली असता बँक खाते आणि रोखवही यामध्ये दाखविलेल्या शिल्लक रकमेत रु. १७.४१ कोटींची तफावत आढळली. या तफावतीबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, आता पूर्ण ताळमेळ करण्यात आलेला आहे.

आता पूर्ण ताळमेळ झालेला आहे. महालेखाकार यांनी तफावत निदर्शनास आणून दिल्यानंतर संबंधितांनी वापरलेले पैसे आणून पुन्हा जमा केले असतील तर त्यांना कारवाई केल्याशिवाय सोडून द्यायचे काय? विभागाने लेखी उत्तरात नमूद केले आहे की, ताळमेळ घालण्यात येऊन भविष्यात अशा प्रकारची तफावत निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे. याचाच अर्थ विभाग मान्य करीत आहे की, त्यावेळी तफावत होती. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यावेळी रिकन्सीलेशन झाले नसल्यामुळे ट्रेझरीला जे चेक्स दिले होते ते डीडीओ अंतर्गत समाविष्ट होते. बँक रिकन्सीलेशन त्यावेळी नव्हते. ३१ मार्च रोजी रिकन्सीलेशन अंतिम करून शासनाकडे रकमेचा भरणा केला. जो खर्च झालेला आहे तो रोख वहीमध्ये अंतर्भूत केला आहे. Every single penny which was drawn from the Government Treasury has been accounted for. या संदर्भातील अकाऊंटींग पूर्ण केल्यानंतर समजले की, कोणता निधी कुठे खर्च झाला आहे. या बाबतचा संपूर्ण तपशील अंतर्भूत केलेला आहे. तसेच रिकन्सीलेशन सुद्धा करून घेतले आहे.

विभागीय सचिव हे भविष्यात काय केले त्या बाबत सांगत आहोत. परंतु ज्यांची रिकन्सीलेशन करण्याची जबाबदारी होती त्यांच्यावर कारवाई करण्याच्या बाबतीत काहीच बोलत नाही. ही बाब समितीने पुन्हा निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी मान्य केले की, त्यांची सर्वात मोठी चूक अशी आहे की, त्यांनी वेळेवर रिकन्सीलेशन केले नाही.

२.३८ वेळेवर रिकन्सीलेशन करणे ही संबंधितांची जबाबदारी होती. उदाहरणार्थ एस.टी. महामंडळाच्या तपास पथकाने एस.टी. ची तपासणी केल्यानंतर वितरित केलेले तिकीट आणि कंडक्टर जवळील रोख रक्कम यामध्ये थोडा जरी फरक आढळून आला तर त्या कंडक्टरला तत्काळ निलंबित केले जाते. परंतु या ठिकाणी मात्र संबंधित अधिकाऱ्यांच्या बाबतीत सर्व गोष्टी सिद्ध झालेल्या असताना सुद्धा त्यांना मोकळे सोडून दिले गेले. महालेखाकार यांनी तारीखनिहाय आणि रक्कमनिहाय १७ कोटी ४१ लाख रुपयांची तफावत नमूद केली आहे. ही तफावत ठेवणाऱ्या लोकांच्या बाबतीत काय कारवाई करणार आहात? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, १७ कोटी ४१ लाख रुपयांच्या रिकन्सीलेशन संदर्भातील संपूर्ण सविस्तर तपशील सादर करण्यात येईल.

सदर तपशिल महालेखाकार यांच्या मान्यतेने सादर करावा. त्यांनी विभागाचा खुलासा मान्य केल्यास त्यावर समितीचे काही म्हणणे राहणार नाही.

२.३९ त्यानुसार विभागाकडून प्राप्त झालेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

खालील कार्यालयाचा (विवरण क्र.६ मध्ये दर्शविण्यात आलेले) फरकाबाबतचा ताळमेळ (रिकन्सीलेशन) खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	कार्यालयाचे नाव	या तारखेप्रमाणे शिल्लक	रोखवहीनुसार अखेरची शिल्लक	बँक विवरण/पासबुक प्रमाणे अखेरची शिल्लक	फरक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
१	उप CEO जिल्हा परिषद, बीड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी	३०.०४.२०१२	१८,४००	१,०५,४६७	८७,०६७ ताळमेळ पूर्ण ताळमेळानंतर फरक निरंक आहे.	प्रतिमहा ताळमेळ घेतला जात आहे.
२	उप CEO, जिल्हा परिषद, उस्मानाबाद, उप मुख्य कार्यकारी अधिकारी	३०.०३.२०१२	३,६३,४९४	६,१०,०१९	२,४६,५९७ ताळमेळ पूर्ण ताळमेळानंतर फरक निरकं आहे.	प्रतिमहा ताळमेळा घेतला जात आहे.
३	CDPO तालुका तुळजापूर	३०.०३.२०१२	०	३१,३०,५६६	३१,३०,५६६ ताळमेळ पूर्ण ताळमेळानंतर फरक निरकं आहे.	प्रतिमहा ताळमेळा घेतला जात आहे.
४	CDPO, ICDS जिल्हा उस्मानाबाद	३०.०४.२०१२	०	९८,५११	९८,५११ ताळमेळ पूर्ण ताळमेळानंतर फरक निरकं आहे.	प्रतिमहा ताळमेळा घेतला जात आहे.
५	CDPO तालुका धारणी	३१.०३.२०१२	३४,६५,५९०	१,०८,९५,५९७	७४,३०,०० ताळमेळ पूर्ण ताळमेळानंतर फरक निरकं आहे.	प्रतिमहा ताळमेळा घेतला जात आहे.

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
६	CDPO तालुका धामणगाव रेल्वे	३१.०३.२०१२	०	४३,६६,७१०	४३,६६,७१० ताळमेळ पूर्ण ताळमेळानंतर फरक निरकं आहे.	प्रतिमहा ताळमेळा घेतला जात आहे.
७	CDPO, बोरीवली-२ मुंबई	३१.०३.२०१२	०	५४,९७,६४६	५४,९७,६४ ताळमेळ पूर्ण ताळमेळानंतर फरक निरकं आहे.	प्रतिमहा ताळमेळा घेतला जात आहे.
८	CDPO धारावी मुंबई	३१.०३.२०१२	१,३७,०६,२६२	४३,४०,३६७	५३,६५,८९५ ताळमेळ पूर्ण ताळमेळानंतर फरक निरकं आहे.	प्रतिमहा ताळमेळा घेतला जात आहे.
९	CDPO रेड लाईट मुंबई	३१.०३.२०१२	२४,२२,२८४	२२,५७,५३७.९५	ताळमेळ पूर्ण ताळमेळानंतर फरक निरकं आहे.	प्रतिमहा ताळमेळा घेतला जात आहे.
१०	CDPO यवतामळ (शहर) (चालू खाते)	३१.०३.२०१२	८६,६५१	३,९३,०१२	३,०६,३६१ ताळमेळ पूर्ण ताळमेळानंतर फरक निरकं आहे.	प्रतिमहा ताळमेळा घेतला जात आहे.
११	CDPO (R) उमरखेड (चालू खाते)	३१.०३.२०१२	४७,०२२	११,८६,९०५	११,३९,८८३ ताळमेळ पूर्ण ताळमेळानंतर फरक निरकं आहे.	प्रतिमहा ताळमेळा घेतला जात आहे.
१२	CDPO गोरेगाव (प) (चालू खाते)	३१.०३.२०१२	५१,९८,२२९	३०,६८,७७१	२१,२९,४५८ ताळमेळ पूर्ण ताळमेळानंतर फरक निरकं आहे.	प्रतिमहा ताळमेळा घेतला जात आहे.
१३	CDPO अंधेरी (U) (चालू खाते)	३१.०३.२०१२	०	१७,८४,०९९	१७,८४,०९९ ताळमेळ पूर्ण ताळमेळानंतर फरक निरकं आहे.	प्रतिमहा ताळमेळा घेतला जात आहे.
१४	DE. आणि CDO चे कार्यालय, यवतमाळ, (चालू खाते)	३१.०३.२०१२	१०,४६,७१२	५१,७४,६४५	४१,२७,९३३ ताळमेळ पूर्ण ताळमेळानंतर फरक निरकं आहे.	प्रतिमहा ताळमेळा घेतला जात आहे.

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
१५	DW आणि CDO चे कार्यालय, मुंबई उपनगर (चालू खाते)	३१.०३.२०१२	१९,७८,४०,५६९	३१,५१,४७०	१९,४६,८९,०९९ ताळमेळ पूर्ण ताळमेळानंतर फरक निरकं आहे.	प्रतिमहा ताळमेळा घेतला जात आहे.
१६	एकूण		२२,४१,९५,२१३	५,००,६१,३९४.९५	(-) १७,४१,३३,८४८.०५ म्हणजे रु.१७.४१ कोटी	

परिच्छेद क्र.४.१.८.२ चे (विवरण क्र.६) मधील अ.क्र.२ मध्ये उप मुख्य कार्यकारी अधिकारी (Dy.CEO) जिल्हा परिषद उस्मानाबाद संदर्भात महालेखापाल यांनी रोखवहीनुसार अखेरची शिल्लक रक्कम रु.३,६३,४९४ दर्शविली असून फरकाच्या रक्कमेमध्ये रक्कम रु.२४६५९७ एवढा फरक दर्शविण्यात आलेला आहे तो चुकीचा दर्शविला आहे.

प्रत्यक्षात रोखवहीनुसार शिल्लक रक्कम रु.५६३४९४ असून रोखवहीला फरक निरंक दिसून येतो.

त्याचप्रमाणे आयुक्त, महिला व बालविकास, पुणे व आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई या कार्यालयाचे अनुक्रमे पत्र क्रमांक जा.क्र.मबाविआ/का.९/सा.सा.क्षे.अ./२०१७.१८/२९८३, दिनांक २३.०५.२०१७ अन्वये मा. प्रधान लेखाकार, (लेखापरिक्षा) प्रतिष्ठा भवन, १०१, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई २० यांचेकडे १७ कोटी ४१ लाख रुपयांच्या रिकन्सीलेशनचा प्रस्ताव (अनुपालन) सादर करण्यात आला आहे.

यासोबत विभागाकडून प्राप्त झालेली सहपत्रे **(विवरण क्र. १९)** वर आहेत.

२.४० परिच्छेद ४.१.८.३ अंतर्गत लेखा परीक्षण :

सन २००७ ते २०१२ या कालावधीत नियोजित १५६ युनिटपैकी केवळ २३ युनिटचेच अंतर्गत लेखापरीक्षण झाले. उर्वरित युनिटचे लेखा परीक्षण का केले नाही? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, २०१३ मध्ये अंतर्गत लेखा परीक्षणाचे युनिट स्थापन झाले आहे.

सन २००७ ते १२ या काळात अंतर्गत लेखा परीक्षा कक्षाने संबंधित युनिटला ३६१ लेखापरीक्षण परीच्छेद पाठविले होते. त्यापैकी ३२३ परिच्छेदांचे अनुपालन संबंधित युनिटकडून आले नव्हते. या संदर्भात विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सन २००७ ते २०१२ या कालावधीत विभागाकडे स्वतंत्र लेखापरीक्षण युनिट नव्हते.

महालेखाकार यांनी नियोजित १५६ युनिट होते असे नमूद केले आहे. परंतु हा आकडा महालेखाकारांना कसा प्राप्त झाला. याबाबत महालेखाकारांनी खुलासा केला की, आयसीडीएसच्या कार्यालयात १९९३ मध्ये अंतर्गत लेखापरीक्षण युनिट स्थापन केले होते for Women and Child Development Wing consisting of one Assistant Accounts Officer, one Probation Officer and a Head Clerk. त्या वेळी अंतर्गत प्लान होता. महालेखाकारांनी पाच वर्षाचे कम्बाईन गृहीत धरले होते. महालेखाकारांनी१५६ युनिट निरीक्षणासाठी निश्चित केले होते आणि त्यापैकी २३ युनिटचेच अंतर्गत लेखा परीक्षण करण्यात आले. ही एक प्रकारची त्रुटी आहे. तसेच जे अंतर्गत लेखापरीक्षण केले त्यातील मुख्य मुद्यांची पुर्तता करण्यात आलेली नाही. परिणामी अंतर्गत लेखा परीक्षणाचा उद्देश साध्य होत नाही. या संदर्भातील विंग विभागाच्या आयुक्त कार्यालयात सेटअप केली होती.

ज्या गोष्टींचे अंतर्गत लेखापरीक्षण केले त्यातील ३२३ परिच्छेदांचे अनुपालन युनिटकडून झाले नाही. जे आक्षेप घेतले होते, ज्या त्रुटी काढल्या होत्या त्यांचे कम्प्लायन्स केलेले नाही. अनुपालन अहवाल कधी सादर केला? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्या युनिटने ३०९ परिच्छेद काढले होते. यापैकी २५२ परिच्छेदांचे अनुपालन अहवाल सादर करण्यात आले.

अनुपालन अहवाल विहित मुदतीत सादर केला नाही आणि म्हणूनच महालेखाकारांनी याबाबत आक्षेप घेतला आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आतापर्यंत २५२ परिच्छेदांचा अनुपालन अहवाल सादर करण्यात आले आहेत. ९४ परिच्छेद मान्य करून ते वगळण्यात आलेले आहेत. तसेच इतर परिच्छेदांच्या बाबतीत अतिरिक्त माहिती मागविण्यात आलेली आहे.

विभागाचे अधिकारी वेळेवर काम करीत नाहीत म्हणून आज समिती सदस्यांना व अधिकाऱ्यांना हा वेळ वाया घालवावा लागत आहे. समितीला विभागाकडून हे अपेक्षित नाही. महालेखाकार यांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर सुद्धा विभागाकडून त्या परिच्छेदांच्या बाबतीत कम्प्लायन्स केला जात नाही. असे मत समितीने खेदाने व्यक्त केले.

२.४१ तसेच अनुपालन अहवाल केव्हा सादर केले याबाबत माहिती विभागीय सचिवांनी समितीच्या बैठकीत नसल्याने सदर माहिती नंतर सादर करण्यात येईल असे आश्वासीत केले. त्यानुसार विभागाकडून प्राप्त झालेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

सन २००७ ते २०१२ खात्याअंतर्गत माहितीचे तपशीलवार विवरणपत्र.

अ.क्र.	लेखापरीक्षण झालेल्या कार्यालयाचे नाव	एकूण प्रलंबित परिच्छेद	अनुपालन अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
१	जिल्हा महिला बालविकास अधिकारी धुळे	१३	२०.७.२०१२, ३०.७.२०१५, १८.११.२०१५, ९.८.२०१६
२	जिल्हा महिला बालविकास अधिकारी लातुर	१५	१६.०१.२०१२, १५.४.२०१७
३	जिल्हा महिला बालविकास अधिकारी कोल्हापुर	२६	२१.७.२०१५, ५.३.२०१६, १८.४.२०१७
४	जिल्हा महिला व बालविकास अधिकारी पुणे	३१	१८.४.१७
५	शासकीय मुलींचे निरीक्षण गृह मुंढवा पुणे	२५	१६.४.१७
६	वर्गीकरण केंद्र येरवडा पुणे	२२	३.३.२०१७
७	जिल्हा महिला बालविकास अधिकारी सोलापुर	२०	१५.०४.२०१७
८	जिल्हा महिला बालविकास अधिकारी सांगली	२०	१३.४.२०१७
९	जिल्हा महिला बालविकास अधिकारी अहमदनगर	१६	१४.४.२०१७
१०	जिल्हा महिला बालविकास अधिकारी औरंगाबाद	२५	१९.४.२०१७
११	शासकीय मुलींचे निरीक्षण गृह अमरावती	०२	अप्राप्त
१२	मुलांचे निरीक्षण गृह अमरावती	०३	१३.४.२०१७
१३	मुलांचे निरीक्षण गृह बुलढाणा	३०	१७.४.२०१७
१४	जिल्हा महिला बालविकास अधिकारी नागपुर	१८	१७.४.२०१७
१५	सरस्वती वसतीगृह, नागपुर	६	१८.४.२०१७
१६	प्रियदर्शनी वसतीगृह, नागपुर	१३	१७.४.२०१७
१७	जिल्हा महिला बालविकास अधिकारी वर्धा	१५	६.७.२०१५, १७.४.२०१७
१८	जिल्हा महिला व बालविकास अधिकारी मुंबई उपनगर	१८	अप्राप्त
१९	शांतीसदन महिला वसतिगृह उल्हासनगर	०५	अप्राप्त
	एकूण ...	**३२३**	**—**

२.४२ परिच्छेद क्र.४.१.८.४-प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा) यांच्या निरीक्षण अहवालास दिलेला प्रतिसाद :

महालेखाकारांनी काढलेल्या परिच्छेदांना विभागाकडून जो प्रतिसाद मिळावयास पाहिजे होता तो मिळाला नाही. महालेखाकार विभागाकडून कोणती कार्यवाही अपेक्षित होती या संदर्भात प्रथम महालेखाकारांचे म्हणणे काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता महालेखाकारांनी समितीस सांगितले की, विभागाकडे जून २०१२ पर्यंत २४२ निरीक्षण अहवालातील ४९३ परिच्छेद प्रलंबित होते. वर्ष निहाय किती प्रलंबित आहे याबाबतची माहिती विभागाला दिलेली होती.

याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, आता पर्यंतचे सद्यःस्थिती अशी आहे की, आता ९५ अहवाल आणि २११ परिच्छेद प्रलंबित आहेत. इतर सर्व ड्रॉप करण्यात आलेले आहेत.

जे अहवाल आणि परिच्छेद प्रलंबित आहेत त्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्याचा अहवाल दोन वेळा पाठविण्यात आला होता. परंतु, आक्षेप असल्यामुळे ते पुन्हा परत आले. आता त्याची पूर्तता सुरू आहे.

जुने परिच्छेद निकाली काढण्यासाठी ऑडिट कमिटीची मिटिंग प्रस्तावित करण्यात यावी. समितीने साक्ष आयोजित केल्यानंतर या सर्व गोष्टी होतात. महालेखाकारांनी परिच्छेद काढल्यानंतर विभागाने वेळेत पूर्तता केली तर समिती समोर यावे लागत नाही. महालेखाकारांच्या आक्षेपांची पूर्तता वेळेत केली तर तो परिच्छेद समिती समोर येणार नाही असे समितीने सुचित केले.

२.४३ परिच्छेद क्र.४.१.९ निधीची वाटणी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन :

उक्त परिच्छेदासंदर्भात महालेखाकारांचे असे म्हणणे आहे की, सन २००८-०९ व २००९-१० या वर्षात शिल्लक राहिलेले अनुदान अनुक्रमे रु.८९.९७ कोटी आणि रु.५०.१४ कोटी सर्मपित करण्यात आले नव्हते. अर्थसंकल्पीय नियमावलीनुसार विभागाने ती रक्कम सर्मपित करावयास पाहिजे होती. परंतु, ती रक्कम सर्मपित करण्यात आली नाही. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, हा आयसीडीएसचा निधी आहे. आयसीडीएसमध्ये भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकारचे दोन वेगवेगळे फंड असतात, त्याचे वेगळे लेखाशीर्ष आहेत. भारत सरकारचा फंड लॅप्स होत नाही. विभागाला प्रत्येक दोन वर्षांनी एसओई प्रमाणे त्याचे रिकन्सिलिएशन करावे लागते आणि ते दोन वर्षे कन्टीन्यू असते. महाराष्ट्र शासनाकडून फंड उपलब्ध झाला तरच भारत सरकारचा फंड खर्च करता येतो, अन्यथा तो फंड पुढील वर्षात कॅरिओव्हर होतो. विभागाने हा फंड सरेंडर करावयास पाहिजे होता. परंतु, भारत सरकारचा फंड दोन वर्षाच्या रिकन्सिलिएशन नंतर सरेंडर करावा लागतो आणि भारत सरकारकडून विभागाला पुढील आर्थिक वर्षात मॅचिंग ग्रँट मिळाली तर तो निधी खर्च करण्याची परवानगी असते. म्हणून त्यावेळी निधी सरेंडर करण्यात आलेला नाही. एसओई प्रमाणे भारत सरकारकडून प्रत्येक वर्षी रिकन्सिलिएशन करून घेण्यात येते आणि महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाला मॅचिंग ग्रँट सादर करण्यात येते.

यासंदर्भात महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणले की, निधी वेळेत सरेंडर करण्यात आलेला नाही. या अनुषंगाने विभागीय सचिवांनी खुलासा केला की, यामध्ये महत्त्वाचा विषय असा आहे की, एसएनपीची मेजर ग्रँट असते आणि इतर जी ग्रँट असते त्यामध्ये शॅडो प्रोव्हिजन्स असतात. काही अटी व शर्तीनुसार ती ग्रँट उपलब्ध होते, नाही तर ती शॅडो प्रोव्हिजन शिल्लक राहते. यामध्ये महत्त्वाचा विषय मॅचिंग ग्रँट उपलब्ध होण्याचा आहे. काही वेळा भारत सरकारची ग्रँट उपलब्ध झालेली असते तर राज्य सरकारची ग्रँट उपलब्ध झालेली नसते आणि काही वेळा राज्य सरकारची ग्रँट उपलब्ध झालेली असते तर भारत सरकारची ग्रँट उपलब्ध झालेली नसते. शेवटच्या क्षणापर्यंत ग्रँट उपलब्ध होत असल्यामुळे विभाग ती रक्कम सरेंडर करीत नाही. त्यामुळे ती रक्कम अखर्चित दिसते.

२.४४ सन २००९-१० मध्ये जिल्हा परिषदांना देय असलेले रुपये ४५६.२८ कोटीचे अनुदान (केंद्राचा हिस्साः रु.४४३.२८ कोटी आणि राज्याचा हिस्साः रु.१३ कोटी) (जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाच्या कलम १२३ आणि २६१ अन्वये) ICDS अंतर्गत आस्थापनांच्या खर्चासाठी वापरण्यात आले. यापैकी, रु.४८.०१ कोटीचे अनुदान, १५,५२८ अंगणवाडी केंद्रांच्या स्थापनेचे लक्ष ठरले असताना, प्रत्यक्षात १०,९३२ केंद्रे उघडण्यात न आल्याने, समर्पित करण्यात आले. म्हणजे विभागाकडे पैसे उपलब्ध होते. मग उद्दिष्ट का पूर्ण झाले नाही? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, महाराष्ट्र शासनाने सर्वेक्षण करून नव्याने १०,९३२ अंगणवाडी केंद्रे उघडण्याचा प्रस्ताव भारत सरकारकडे सादर केला होता. परंतु, भारत सरकारची मान्यता नसल्यामुळे नवीन अंगणवाडी केंद्रे उघडता आली नाहीत.

अंगणवाडी केंद्रे उघडण्यासाठी अनुदान प्राप्त झाले होते. प्रथम अनुदान प्राप्त झाले आणि नंतर मान्यता मिळाली असे झाले होते काय? यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाकडे ऑलरेडी १ लाख ८ हजार अंगणवाड्या आहेत. त्या अंगणवाड्यांसाठी हे अनुदान खर्च करावयाचे होते. महाराष्ट्र शासनाचा नवीन अंगणवाड्या उघडण्याचा प्रस्ताव भारत सरकारकडे सादर करण्यात आला होता.

प्रत्यक्षात १०,९३२ अंगणवाडी केंद्रे उघडण्यात आली नाहीत, असा आक्षेप आहे. असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी सांगितले की, भारत सरकारच्या मान्यतेशिवाय नवीन केंद्रे उघडता येत नाहीत. त्यावेळी भारत सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. नवीन अंगणवाडी केंद्रे उघडण्याचे उद्दिष्ट होते. परंतु, विभागाला मान्यतेअभावी नवीन केंद्रे उघडता आली नाहीत.

भारत सरकारकडे प्रस्ताव कोणत्या तारखेला सादर करण्यात आला होता? केवळ प्रस्ताव पाठवून काम होत नाही. विभागाकडे निधी उपलब्ध होता. तो प्रस्ताव क्लिअर करून घेण्यासाठी पाठपुरावा केला होता काय? केंद्र शासनाने मान्यता न देण्याचे कारण काय आहे? या संदर्भात पाठपुरावा केला नसेल. यामध्ये कोणती अडचण होती? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये बऱ्याच राज्यांचा विषय असतो. ते सर्व राज्यांची तेथे एकत्रित बैठक घेऊन मान्यता देतात. विभागाकडून परीपूर्ण प्रस्ताव आणि

स्मरणपत्रे देखील पाठविण्यात आलेली आहेत. केंद्र शासनाने मान्यता दिल्यानंतरच नवीन केंद्र उघडता येतात. कारण, प्रत्येक गोष्टीत मानधन असो, एसएनपीचा निधी असो किंवा इतर निधी असो त्यामध्ये भारत सरकारचा ५० टक्के शेअर असल्यामुळे त्यांच्याकडूनच मूळ मान्यता मिळते. मान्यता मिळाली तर निधी अभावी काम थांबू नये म्हणून व्हाईट बुकमध्ये तरतूद करून ठेवण्यात येते. It is awaiting the approval. If the approval had come, then we would have used this money.

२.४५ विभागाने अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे मानधन आणि अंगणवाडी केंद्रातील मुलांच्या पोषण आहारासाठी ५१४.२२ कोटी रुपयांची तरतूद केली होती. यापैकी १३५.९१ कोटी रुपये समर्पित करण्यात आले. एडब्ल्यूसी ओपन झाली नाही, त्यासाठी विलंब झालेला आहे आणि due to non-application of revised rates of honorarium, ऑगस्ट २००९ पासून सप्लीमेंटरी न्युट्रिशियनसाठी प्रती बालक २ रुपयांपासून ४ रुपयांपर्यंत रेट इलेक्टिव्ह झाला होता. विभागाने तो का अप्लाय केला नाही? अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रती दिन प्रती बालक जो निधी असतो त्यासाठी भारत सरकारची मान्यता लागते. Even if Government of India increases the rate, then also it requires approval of the Government of Maharashtra.

केंद्र शासनाने नवीन दरानुसार ५० टक्के निधी दिला होता. विभाग महाराष्ट्र शासन असा उल्लेख करीत आहे. महाराष्ट्र शासनाने नवीन दर का लागू केले नाहीत? नवीन दर लागू केले असते तर त्या मुलांना त्याचा फायदा झाला असता. तो प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर जातो काय? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, The proposal goes to the Finance and the Planning Department. At that point of time, it was not sanctioned and because of that it was not used.

मार्च, २०१० पर्यंत तो मंजूर न होण्याची कारणे काय आहेत? तो प्रस्ताव वित्त विभागाकडे गेला होता काय? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, तो प्रस्ताव वित्त व नियोजन विभागाकडे गेला होता. पुढील आर्थिक वर्षात त्यासाठी मान्यता मिळाली होती.

निधी त्या वर्षात खर्च करू शकला असता. परंतु, पुढील वर्षी मान्यता मिळाल्यानंतर खर्च केला. वित्त विभागाकडे प्रस्ताव केव्हा सादर केला आणि त्यावर वित्त विभागाने कोणता शेरा नमूद केला याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, यासंदर्भात तारखेनिहाय प्रारुप तयार करून ते समितीला सादर करण्यात येईल तसेच यासंदर्भात वित्त सचिवांनी समितीस अवगत केले की, त्याविषयीच्या नस्ती त्यांना बघावी लागेल. राज्य शासनावर आर्थिक भार पडणार असल्यामुळे वित्त व नियोजन विभागाकडून तो प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर जातो. यामध्ये जी वाढ होणार आहे त्यामध्ये ५० टक्के खर्च राज्य शासनाचा असतो. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यावेळी ६०:४० असा हिस्सा होता. या अनुषंगाने वित्त सचिवांनी खुलासा केला की, कदाचित त्यावेळी ६०:४० असा हिस्सा असेल. परंतु, आता तो हिस्सा ५०:५० असा आहे. राज्य शासनावर आर्थिक भार पडणार असल्यामुळे तो विषय मंत्रिमंडळासमोर जातो. त्यावेळी नेमके काय घडले होते याची माहिती त्यांच्याकडे सद्या नाही. कदाचित त्यावेळी तेवढी तरतूद उपलब्ध नसल्यामुळे हा विषय प्रलंबित राहिला असेल.

रिव्हाईज रेट केव्हा पासून लागू केला? कारण, तो रेट ऑगस्ट, २००९ पासून लागू होता. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, तो पोस्ट फॅक्टो लागू केला नाही. ज्या दिवशी फायनान्सची मान्यता मिळाली त्या दिवसापासून तो लागू केलेला आहे. It was implemented from the next financial year. I will furnish you the information regarding from which month we have started it. आपल्या राज्यात वेगळे रेट्स आहेत आणि त्या संदर्भात वित्त व नियोजन विभागाकडे पाठपुरावा सुरू आहे.

उपरोक्त विषयाबाबत तारखेनिहाय प्रारुप सादर करण्यात येईल असे अश्वस्त केले होते त्यानुसार विभागाकडून प्राप्त झालेली माहिती खालीलप्रमाणे आहे :–

२.४६ केंद्र शासनाचे आहाराचे प्रति दिन प्रति लाभार्थी दर रु.४ होते. त्यानंतर सन ऑक्टोबर, २०११ पासून राज्य शासनाने स्वतःच्या निधीतून रु.१ अतिरिक्त दर प्रति दिन प्रति लाभार्थी मान्य करण्यात आले व त्याची अंमलबजावणी करण्यात आली.

केंद्र शासनाकडून पूर्वीचे प्रति दिन लाभार्थी आलेले दर रु.४ यामध्ये वाढ करून रु.६, २० जिल्ह्यांकरिता लागू केलेली आहे. उर्वरित १५ जिल्ह्यांना वाढीव दर रु.६ प्रमाणे एप्रिल २०१४ पासून लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास आयुक्तालयाचे पत्र दिनांक १२.०३.२०१४, २२.७.२०१४, २७.७.२०१४, १०.०६.२०१४ अन्वये सादर करण्यात आलेला होता. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण अंतर्गत १५ जिल्ह्यात नवीन सुधारित दर लागू करण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी नियोजन व वित्त विभागास सादर करण्यात आलेला असून त्यांच्या मान्यतेने प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त माहितीच्या आधारे समितीच्या पुढील बैठकीत सुचित केले की, विभागाकडून सन २००८ पासून प्रयत्न सुरू आहेत. निर्णय घेण्यासाठी विलंब झालेला आहे. परिणामी १५ जिल्ह्यावर अन्याय झालेला आहे. हे विभागाने देखील मान्य केले आहे. पूर्वी ५ रुपये लाभार्थ्यांना दिले जात आहे. आता शासनाने सर्व जिल्ह्यामध्ये ६ रुपये देण्याचा निर्णय घेतलेला आहे. काही ठिकाणी केंद्र शासनाकडून पैसे दिले जातात. तर काही ठिकाणी राज्य शासन स्वतःच्या निधीतून पैसे देत आहे. शेवटी अंतिम निर्णय घेतलेला आहे. ज्या दिवशी शासनाने ६ रुपयाचा दर निश्चित केलेला

आहे हा त्याच दिवसापासून लागू करावा. यावर विभागीय सचिवांनी समितीस अश्वस्त केले की, ज्या दिवशी शासन निर्णय निघेल त्या दिवसापासून ६ रुपयाचा दर लागू होईल. व समितीच्या सूचनेनुसार पुढील कार्यवाही केली जाणार आहे.

२.४७ परिच्छेद क्र.४.१.९.१-उपयोगिता प्रमाणपत्र पाठविण्यातील विलंब :

उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यास विलंब झालेला आहे. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्यावेळी हा मुद्दा उपस्थित झाला त्यावेळी बऱ्याच प्रमाणात उपयोगिता प्रमाणपत्र प्रलंबित होते. त्यानंतर एक मोहिम राबवून सर्व उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले आहेत. आता केवळ १४८ उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे बाकी आहेत आणि त्यामध्ये ४०.०७ कोटी रुपये इतकी रक्कम अडकलेली आहे. इतर सर्व विषय निकाली काढलेले आहेत.

उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यास विलंब झालेला आहे. त्यामुळे उपयोगिता प्रमाणपत्र लवकर सादर करावेत. त्यासाठी एखादे युनिट स्थापन करून हा विषय पूर्ण करून घ्यावा असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी अश्वस्त केले की, या विषयी बैठक घेऊन हे क्लिअर करून घेण्यात येईल.

२.४८ परिच्छेद क्र.४.१.९.२-जिल्हा परिषदांनी शिल्लक निधी ठेवून घेणे :

जिल्हा परिषदांनी शिल्लक निधी ठेवून घेण्याची कारणे काय आहेत? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये अमरावती, उस्मानाबाद, बीड, नागपूर आणि यवतमाळ अशा ५ जिल्हा परिषदांचा उल्लेख आहे. बीड जिल्हा परिषद वगळता इतर सर्व जिल्हा परिषदांनी निधी जमा केलेला आहे. बीड जिल्हा परिषदेचा निधी जिल्हा बँकेत असून ती बँक बुडाल्यामुळे त्यांचे १.०४ कोटी रुपये शिल्लक आहेत. आता केवळ बीड जिल्हा परिषदेचा निधी शिल्लक आहे इतर सर्व जिल्हा परिषदांनी निधी जमा केलेला आहे. Money was in the District Bank and the District Bank was unable to honoured the cheque. जिल्हा परिषदेच्या ॲक्टनुसार जिल्हा को-ऑपरेटिव्ह बँकेत निधी ठेवण्याची तरतूद आहे.

हा विभागाचा निधी आहे. त्यामुळे त्यांनी राष्ट्रीयकृत बँकेत रक्कम ठेवावी, असे विभाग त्यांना सांगू शकते. जिल्हा बँकेत ठेवलेले पैसे बुडाल्यामुळे विभागाने प्रस्ताव तयार करून यामध्ये सुधारणा करून घेतली पाहिजे. पैसे बुडाल्यानंतरही त्यामध्ये सुधारणा करीत नाही, ही दुःखाची बाब आहे. विभागाने पुन्हा अशा प्रकारची घटना घडल्यानंतर बोध घेणार आहात काय? त्या अनुषंगाने जिल्हा बँकेत पैसे ठेवल्यामुळे अमूक इतक्या कोटी रुपयांचे नुकसान झालेले असल्यामुळे राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये पैसे ठेवावेत असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आयसीडीएस आणि डब्ल्यूसीडीचा निधी राष्ट्रीयीकृत बँकेत ठेवलेला आहे. वित्त विभागाने ३४ बँकांची यादी रिलिज केलेली आहे. विभागाने राष्ट्रीयीकृत बँकेत पैसे जमा केलेले आहेत. या अनुषंगाने विभागीय सचिवांनी समितीस विनंती केली की, जिल्हा परिषदांचा जो फंड आहे तो सुद्धा राष्ट्रीयीकृत बँकेत ठेवण्याबाबत परवानगी देण्यासंदर्भात वित्त विभाग आणि ग्रामविकास विभागास शिफारस करावी. याबाबत त्यांच्या स्तरावरुन आदेश निघाला तर बरे होईल. कारण हा विषय ग्रामविकास आणि वित्त विभागाशी निगडित आहे.

आयसीडीएस कमिशनर ग्रँटचे असेसमेंट करीत नाहीत. त्यामुळे जिल्हा परिषदा ती ग्रँट शासनाला सरेंडर करीत नाहीत. आता यामध्ये काही सुधारणा केलेली आहे काय? अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाने यामध्ये सर्व जिल्ह्यांना समाविष्ट केले होते. सन २०१५ पर्यंत १८ जिल्ह्यांचे रिकन्सिलिएशन पूर्ण झालेले आहे. उर्वरित १७ जिल्ह्यांसाठी वेगळा कार्यक्रम सुरू आहे. जिल्हानिहाय टिम पाठवून हे क्लिअर करून घेण्यात येत आहे. आता बीड जिल्हा परिषद वगळता इतर सर्व जिल्हा परिषदांचे रिकन्सिलिएशन पूर्ण झालेले आहे. सन २०१५ तक का डेटा उपलब्ध आहे. सन २०१६-१७ का डेटा आता तयार होत आहे.

असेसमेंट प्रलंबित असल्यामुळे ते शासनाला निधी परत करीत नाहीत. ही बाब महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, हा निधी राष्ट्रीयीकृत बँकेत ठेवावयाचा असेल तर कायद्यामध्ये तसा बदल करावा लागेल.

विधिमंडळाचे काम तेच आहे. डेली अपडेट झाले पाहिजे. कायद्यात बदल करावयाचा असेल तर विभागाने विधिमंडळात तसे बिल आणले पाहिजे. कायद्यात बदल का करावयाचा आहे याबाबतची पार्श्वभूमी त्यामध्ये नमूद करावी. हे विभागाने सुमोटो हे केले पाहिजे. कारण, पैसे अडकल्यामूळे योजना राबविण्यावर त्याचा परिणाम होतो असे समितीने सुचित केले.

शासनाने बीड जिल्हा परिषदेच्या संदर्भात काही कार्यवाही केलेली आहे काय? अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सदर बाब विभागाच्या अखत्यारीतील नाही.

वाईंडिंग अप किंवा लिक्विडेशनचे जे प्रोसिडिंग सुरू असेल त्यामध्ये शासनाच्या फंडसाठी काही तरी प्रायॉरिटी असते. These are Government dues. They must be having priority for recovery. विभागाकडून बीड जिल्हा परिषदेकडे याचा पाठपुरावा करण्यात येत आहे काय? अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की,

विभागाला जे १.०४ कोटी रुपये रिकन्सिलिएशन करावयाचे आहेत तो निधी बीड जिल्हा परिषदेकडून मिळालेला नाही. त्यामुळे हा एकच विषय प्रलंबित राहिलेला आहे.

मध्यंतरी शासनाने नांदेड, बुलढाणा, बीड, नंदुरबार जिल्हा बँकांना मदत केली होती. आता ती बँक सुरू आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, वित्त व सहकार विभागाची मदत घेऊन हा निधी वसूल करण्याचा किंवा रिकन्सिलिएशन करण्याचा प्रयत्न विभागाकडून करण्यात येईल.

निधी वसूल किंवा रिकव्हर करण्याचा प्रयत्न करावा. परंतु राष्ट्रीयीकृत बँकेत निधी ठेवण्यासाठी काय करता येईल? को-ऑपरेटिव्ह बँकेतच निधी ठेवावा, अशी कायद्यात तरतूद आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जिल्हा परिषद ॲक्टमध्ये तशी तरतूद आहे.

तथापि, जिल्हा बँकेतच निधी ठेवण्याबाबत तरतूद आहे का 'either or' आहे? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी सांगितले की, 'Either or' नाही. जिल्हा परिषदेच्या ॲक्टमध्ये तशी स्पष्ट तरतूद आहे. जिल्हा परिषद ॲक्टमध्ये तरतूद असल्यामुळे त्या बँकेत निधी ठेवलेला आहे. However, I will verify the exact words of the provision of the law.

या अनुषंगाने समितीने सुचित केले की, भविष्यात इतर कोणत्याही जिल्ह्यात अशी घटना घडणार नाही याची काळजी घ्यावी.

२.४९ परिच्छेद क्र.४.१.९.३-जिल्हा परिषदांना दिलेल्या अर्थसहाय्याची निर्धारणा न करणे :

जिल्हा परिषदांना दिलेल्या अर्थसहाय्याची निर्धारणा न करणे या संदर्भात महालेखाकार व विभागाने एकत्रित बसून सर्व प्रलंबित क्लिअर करावी. विभागाने सुमोटो काही निर्णय घेतले पाहिजेत. आपण एखादी चूक झाल्यानंतर किंवा ऑडिट झाल्यानंतर त्यामध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करतो. ॲक्टमध्ये ज्या प्रोव्हिजन्स आहेत त्यामध्ये वेळेनुसार बदल करावयास पाहिजे. त्यामध्ये कशा प्रकारे बदल करावयास पाहिजे हे काम विभागाने उप सचिवांकडे द्यावे. अशा दोन-चार घटना नक्कीच असतात. जर ॲक्टमध्ये काही बदल करावयाचा असेल तर उप सचिवांकडे ते काम द्यावे. कायद्यामध्ये वेळेनुसार बदल केला पाहिजे असे समितीने सुचित केले.

२.५० परिच्छेद क्रमांक ४.१.१० "सेवा पुरविणे महिलाच्या सबलीकरणासाठी योजना आणि कायद्याची अंमलबजावणी" :

सदरहू परिच्छेद हा महिलांच्या सबलीकरणासाठी योजना आणि कायद्यांची अंमलबजावणी याबाबत आहे. यासंदर्भात समितीने विचारणा केली की, विभागातर्फे वैयक्तिक लाभाच्या योजना महिला व बालकांसाठी राबविल्या जातात. विशेषत: निराधार महिलांच्या मुलींच्या विवाहाकरिता विवाह भत्ता अशी योजना आहे. या निराधार महिला ग्रामीण क्षेत्रामध्येच असतात असे काही आहे का. कारण असे निदर्शनास आले आहे की, शहरी विभागात अशा प्रकरणात विभाग काहीच आर्थिक मदत करीत नाही. शहरी भागात देखील सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. याकरिता पत्र दिले होते, त्याचे उत्तर तेव्हा आले नाही, त्याबाबतचा उल्लेखही कोठे नाही. आता विभागाने शहरी व ग्रामीण विभागातील निराधार महिलांना किती मदत दिली तसेच त्यात निराधार महिलाच्या मुलींच्या विवाहाकरिता विवाह भत्ता देणे केवळ हे प्रकरण नाही. निराधार महिलांबाबत जे धोरण ग्रामीण क्षेत्रात राबविता ते धोरण शहरामध्ये राबवू नये याबाबत काही शासन निर्णय आहे का? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी सांगितले की, असा शासन निर्णय नाही. अशा महिलांच्या स्वयंरोजगारासाठी योजना आहेत. वैयक्तिक लाभाच्या निराधार महिलांच्या मुलींच्या विवाहासाठी शुभमंगल विवाह योजना आहे पण ती शहरी भागासाठी लागू नाही.

शहरामध्ये निराधार महिला नाहीत का, दरडोई उत्पन्न ठरविताना केवळ ग्रामीण भागाच विचारात घेतला जातो का? महाराष्ट्रातील शहरी विभागामध्येही झोपडपटट्याअसतात. येथेही दाटीवाटीने लोक राहतात. शहरातही अशा योजना राबविण्याकरिता लोकप्रतिनिधींनी याबाबत पत्रव्यवहार सुद्धा केलेला आहे. शासन म्हणते की, ४६ टक्के शहरीकरण झाले आहे. शहरामध्ये निराधार महिला नाहीत असे गृहीत धरणे योग्य नाही. राज्यात भौगिलीक पार्श्वभूमीवर दुष्काळाने त्रस्त झालेले, नॅचरल कॅलॅमीटीमुळे जास्त लोक शहरी भागात आहेत. शहरी भागातील लोकांना या वैयक्तिक योजनांचा लाभ देऊ नये असे कायदयामध्ये आहे का? शुभमंगल योजनेचे निकष काय आहेत? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, शुभमंगल योजना मुळत: यवतमाळ जिल्ह्याकरिता आहे. शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील मुलींकरिता मदत देण्यासाठी ही योजना आहे. या योजनेस डीपीडीसी मार्फत निधी उपलब्ध करून दिला जातो. शुभमंगल योजनेची सुरुवात यवतमाळपासून झालेली आहे. सध्या ग्रामीण महाराष्ट्रात ही योजना लागू आहे. तथापि, ही योजना कधी लागू झाली आहे याची नेमकी तारीख आठवत नसल्यामुळे समितीला सांगण्यात आली नाही.

निराधार महिलांच्या मुलींच्या विवाहासाठी असा विशिष्ट उल्लेख या परिच्छेदामध्ये आहे. केवळ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील मुलींना या योजनेचा लाभ देत नाही. निराधार महिला असतील तर त्यांच्या मुलींच्या विवाहाकरिता १० हजार रुपये मदत देण्यात येते. शहरी भागातील निराधार महिलांच्या मुलीच्या विवाहास विवाह भत्ता देत नाही याची कारणे काय आहेत. शहरात निराधार महिला नाहीत का? अशी

विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, हे खरे आहे की, निराधार महिलांच्या मुलींना विवाह भत्ता देण्याकरिता शहरी भागाकरिता विभागाकडे कोणतीही योजना नाही. याकरिता विशेष योजना तयार करावी लागेल. ही योजना शहरी भागाकरिता लागू करण्याकरिता विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात येईल.

२.५१ ग्रामीण भागासाठी अशी कोणती योजना आहे तसेच विवाह भत्ता व शुभमंगल योजना वेगळी आहे का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, एनजीओमार्फत विवाह घडवून आणणाऱ्या संस्थेस दोन हजार रुपये व विवाहाकरिता १० हजार रुपये दिले जातात, अशी शुभमंगल योजना आहे.

निराधार महिलांच्या मुलींच्या विवाहाकरिता वेगळी कोणती योजना आहे का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, शुभमंगल योजनेशिवाय दुसरी कोणतीही योजना नाही. शुभमंगल योजना ही केवळ ग्रामीण भागासाठी असल्याचा शासन निर्णयामध्ये उल्लेख आहे. परंतु समितीमध्ये झालेल्या चर्चेप्रमाणे शहरी भागातसुद्धा ही योजना लागू करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात येईल.

शहरातील ७० ते ७२ टक्के लोक झोपडपट्टीमध्ये राहत आहेत. विभागाकडून आता शहरी भागाकरिता नव्याने करणार असलेल्या या योजनेच्या प्रस्तावाची प्रत समितीला एक महिन्याचा आत पाठविण्यात यावी असे निदेश समितीने दिले यावर विभागीय सचिवांनी होकारार्थी उत्तर दिले.

महिलांच्या सबलीकरणाकरिता शासन विविध योजना करत असते. लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन या सर्व योजना तयार केल्या जातात की नाही. लोकप्रतिनिधींना माहिती देण्याबाबत काही तरतूद आहे की नाही? तालुका स्तरावरील व जिल्हास्तरावरील समित्यांमध्ये लोकप्रतिनिधींचा समावेश असावा अशी काही तरतूद आहे का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, विविध योजनांसाठी जिल्हास्तरावर समित्या आहेत.

जिल्हा परिषद, पंचायत समित्यास्तरावरही या समित्या आहेत, स्थानिक लोकप्रतिनिधी तेथे सदस्यही आहेत. जिल्हास्तरावर महिला व बालकल्याण समिती असते, या समितीच्या कार्यकक्षेत कार्य केले जाते का याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, जिल्हा पातळीवर वैयक्तिक किंवा सामुहिक लाभाच्या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी दोन एजन्सी आहेत. जिल्हा परिषद, नगर परिषद किंवा नगर पालिका तसेच महिला व बालकल्याण समिती दुसरी असते. लाभार्थी निवडीचे निकष ठरवून त्यांच्याकडे यादी जाते. स्टेट सेक्टरच्या अधिकाऱ्यांकडे काही योजना असतात. योजनेप्रमाणे लाभार्थ्यांची निवड होते. सीडीपीओमार्फत ही माहिती उपलब्ध होते.

काही प्रमाणात योजनेची अंमलबजावणी जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिकामार्फत होत असते. म्हणजे स्टेट सेक्टरची कार्यप्रणाली, अंगणवाडी किंवा वैयक्तिक लाभाच्या योजनेच्या लाभार्थ्यांच्या निवडीमध्ये लोकप्रतिनिधींचा सहभाग असावा असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आमदार हे संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष असतात.

तो शासन निर्णय आता सरकारने बदललेला आहे. स्टेट एजन्सी, सीडीपीओकडून कार्यवाही केली जाते, तेथे लोकप्रतिनिधींचा सहभाग असला पाहिजे. लोकप्रतिनिधींना याबाबत माहिती दिली जावी. अशा प्रकारची समितीची भावना शासनाला कळवावी असे समितीने सुचित केले.

२.५२ परिच्छेद क्रमांक ४.१.१०.१ "महिलांना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य योजना" :

स्वयंरोजगार योजनेमध्ये बदल होण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून योजनेतील बदलांच्या अनुषंगाने सामाजिक न्याय व आदिवासी विकास विभागाकडून अभिप्राय प्राप्त झाले आहेत. सदर प्रस्ताव नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे. अर्थ व नियोजन विभागाच्या मान्यतेसाठी पाठविला होता. असे विभागाने लेखी उत्तरामध्ये नमूद केले आहे. या योजनेखाली लघुउद्योग सुरू करण्यासाठी प्रत्येक महिलेला रु.५०० इतके अर्थसहाय्य एकदा केले जाते. या योजनेमध्ये बदल करण्याकरिता विभागाने नवीन प्रस्ताव सादर करण्यात येणार होता. त्याबाबत सद्यस्थिती काय आहे. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, जुन्या योजनेमधील ५०० रुपये अनुदान हे कमी असल्यामुळे या योजनेस कमी प्रतिसाद मिळत असल्यामुळे शासनाकडे नवीन योजना प्रस्तावित केलेली आहे. स्वयंरोजगारासाठी ५० हजार रुपये प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. याबाबत वित्त विभागाने सांगितले आहे की, एकच नवीन योजना करण्यापेक्षा ज्या योजना कालबाह्य झालेल्या आहेत, त्यातील कमी रकमांच्या योजनांचा आढावा घेऊन नवीन योजना प्रस्तावित करण्याबाबत सांगितले आहे. याबाबतचा प्रस्ताव महिला व बालविकास विभाग अर्थ विभागाकडे पाठविणार आहे.

हा परिच्छेद सन २०११-२०१२ चा आहे. नवीन योजना प्रस्तावित केलेली आहे. असे सांगितले होते. पण आता विभागीय सचिवांकडून वेगळी माहिती देण्यात येते ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, दिनांक १८.१२.२०१३ रोजी ५० हजार रुपये अनुदान करणेबाबतचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. त्यामध्ये नियोजन विभागाने दोन मुद्दे काढले आहेत. ड्युप्लीसीटी ऑफ स्कीम होत आहे का याची खात्री करावी, कारण शासनाच्या विविध पातळीवर हेच काम सुरू आहे. दुसरा आक्षेप असा आहे की, खात्यामध्ये भरपूर योजना

कालबाह्य झालेल्या आहेत. ज्या योजनांची सध्या काही गरज नाही त्यांना सध्या बंद करून तातडीने दुसरी योजना आणता येत असल्यास त्याबाबत विचार व्हावा. या दोन्ही बाजूचा विचार करून विभागाने दिनांक २७.१.२०१६ रोजी पुन्हा नियोजन विभागाकडे प्रस्ताव पाठविला होता. त्यावेळी त्यांनी असे आक्षेप घेतले होते की, तुम्हाला तांत्रिक प्रशिक्षण द्यावयाचे असेल तर एमएसआरएलएम किंवा स्कील डेव्हलपमेंट यांचेमार्फत का करीत नाहीत किंवा त्यांच्याकडेच ही योजना का हस्तांतरित करीत नाही? असे सांगितले. महिलांना प्रोत्साहन देण्याकरिता ही योजना महिला व बालविकास खात्यामध्ये सुरू आहे. पण एमएसआरएलएमकडे वर्ग करावयाचे असेल तर खात्याची हरकत नाही अशा प्रकारचा खुलासा नियोजन विभागाकडे केलेला आहे. अंतिम निर्णय प्रतिक्षेत आहे. शासन स्तरावर त्याचा अंतिम निर्णय होणार आहे.

२.५३ ज्या अनावश्यक योजना आहेत त्या एकत्रित करून प्रस्ताव शासनाला सादर केला आहे. त्याची प्रत चार दिवसांमध्ये समितीला सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी अश्वस्त केले. त्यानुसार विभागाकडून प्राप्त झालेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

"आयुक्तालयाचे पत्र क्र.मबविआ/विवे-स्वयंरोज/का-६/१४.१५/३८१३, दिनांक २३.६.२०१४ अन्वये महिलांना आर्थिक स्वावलंबन प्राप्त होण्यासाठी रोजगारभिमुख कौशल्य प्राप्त करून देण्यासाठी विद्यावेतन व स्वयंरोजगारासाठी सर्व समावेशन नवीन योजनेबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तसेच पुनश्च आयुक्तालयाचे पत्र क्र.३४९८ दि.२३/०६/२०१७ अन्वये स्वंयरोजगार योजनेअंतर्गत महिलांना व्यवसाय करण्यासाठी एकदाच रु.५०० एवढे अनुदान देण्यात येते. ती योजना आणि व्यवसाय प्रशिक्षण घेण्यासाठी देण्यात येणारे रु.१०० विद्यावेतन या दोन्ही योजनेमध्ये अनुदान वाढविणे किंवा या ऐवजी नवीन योजना प्रस्तावित करण्याबाबत शासनास कळविण्यात आले आहे. "सोबत प्रस्तावाच्या प्रती जोडत आहे. **(विवरण क्र. २०)** यानुसार छाननी करून आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येत आहे."

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, महिला स्वयंरोजगार अर्थसहाय्यीत योजनेअंतर्गत महिलांना सध्या ५०० रुपये मिळत आहे. त्यांना फक्त १०० रुपये वाढवून दिल्याचे प्रस्तावित केले आहे का? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, या संदर्भात असे प्रस्तावित केले आहे की, ज्या ठिकाणी ५०० रुपये आहे तेथे योजनेचे स्वरुप सारखे असल्यास त्याकरिता किमान ५० हजार रुपये केले पाहिजेत. तसेच १०० रुपयांची योजना बंद करून शिक्षण विभागाची सध्या सुरू असलेल्या स्कॉलरशीपच्या योजनेमार्फत या संदर्भात कार्यवाही केली पाहिजे. किंवा महिलांकरिता ५०० रुपयांची असलेली योजना एमएसआरएलएममध्ये समाविष्ट केली पाहिजे. तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या योजनेनुसार शिक्षण विभागाची स्कॉलरशीपची योजना केली पाहिजे असे महिला व बालविकास विभागाने वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे. अद्याप त्यासंबंधी निर्णय झालेला नाही.

या संदर्भात सन २०१२-१३ मध्ये लेखापरीक्षण केले तेव्हा आयुक्तांनी महालेखाकारांना असे उत्तर दिले होते की, या संदर्भात यापूर्वी शासनाकडे फायनान्शिएल असिस्टंट रिव्हीजनकरिता प्रस्ताव पाठविलेला आहे. असे असताना सुद्धा या संदर्भात अद्याप निर्णय झाला नसल्यासंबंधी समितीला सांगण्यात येत आहे ही बाब महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणली.

शासनाकडे प्रस्ताव पाठविल्यानंतर सध्या त्याचे काय स्टेटस आहे? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, अद्याप सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाकडून कोणत्याही प्रकारची मान्यता मिळालेली नाही. आता ५० हजार रुपयांसंबंधीचा पुनर्प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे. त्या प्रस्तावाला सुद्धा अद्याप मान्यता मिळालेली नाही.

पाच वर्षांच्या काळात काय घडले त्याचे स्टेटस काय आहे. शासनाने या संदर्भात टर्नडाऊन केले किंवा कसे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की या संदर्भात अगोदर शासनाकडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाला मान्यता मिळाली नव्हती. यामुळे ५० हजार रुपयांचा पुनर्प्रस्ताव विभागाने शासनाकडे पाठविला आहे. तसेच एखादा बिझनेस सुरू करण्यासाठी ५० हजार रुपयांची रक्कम कमी आहे असे वाटते. यामुळे प्रशिक्षण आणि बिझनेस या दोन्हीचे एकत्रिकरण करून एमएसआरएलएम अंतर्गत महिलांसाठी किंवा बचत गटांमार्फत असलेल्या योजनेमध्ये सदर योजनेचा समावेश केला पाहिजे अशा प्रकारचा लेखी प्रस्ताव वित्त विभागाकडे दिलेला आहे. वित्त विभागासमवेत चर्चा केली असता त्यांच्याकडून महिला व बालविकास विभागाला मौखिकरित्या असे सांगण्यात आले आहे की, आपल्याकडे एमएसआरएलएम स्कीम असल्यामुळे तुम्ही प्रशिक्षण आणि बिझनेसची कॉमन स्कीम त्यांच्यामार्फत करून घ्यावी.

याचा अर्थ ५० हजार रुपयांचा प्रस्ताव वित्त विभागाला मान्य नाही का? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी सांगितले की, वित्त विभागाचे असे मत आहे की, विभागाकडे प्रशिक्षण किंवा बिझनेस सुरू करण्यासाठी महिलांना मदत करण्यासाठी वेअरविथहॉल नाही. महाराष्ट्रात एमएसआरएलएम ही कॉम्पेंटन्ट थॉरिटी असल्यामुळे त्यांच्यामार्फत विभागाने सदर योजना आणल्यास त्या योजनेला मान्यता देणे योग्य राहील.

म्हणजेच ५० हजार रुपयांसंबंधी केलेला प्रस्ताव वित्त विभागाला मान्य नाही असे वाटते. सद्य:स्थितीत जी योजना चालू आहे ती बंद करावी असे समितीचे म्हणणे नसून त्यामध्ये वाढ करावी असे समितीचे मत आहे. या संदर्भात प्रशिक्षण आणि बिझनेसची संकल्पना एकत्र करून त्या संदर्भात वर्कआऊट करून पुढे जाण्याचा प्रयत्न विभागाने करावा. या संदर्भात समितीकडून शिफारस केली जाईल. वित्त विभागाच्या व यासंदर्भात

लवकरात लवकर निर्णय घेण्यात यावा. विभागाने वर्कआऊट करून जे काही प्रस्तावित करण्यात येणार आहे. त्याबाबत समितीला एक महिन्यात माहिती कळवावी असे समितीने निदेश दिले.

विभागाकडे ५०० रुपये घेणाऱ्या लाभार्थ्यांच्या लोकांची आकडेवारी आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००७ ते २०१२ या कालावधीत ९ जिल्ह्यात १८ हजार बेनिफिशरीज होते.

२.५४ परिच्छेद क्र. ४.१.१०.२ "विविध हस्तकला व्यवसाय प्रशिक्षण घेणाऱ्या मुलींना विद्यावेतन देण्याची योजना" :

यासंदर्भातचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे काय? या सगळ्या योजना प्रधानमंत्री कौशल्य विकास अंतर्गत घेतलेल्या आहेत. असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या योजना महिला व बालविकास विभागाकडे ठेवायचे असेल तर किमान निधी वाढवावा लागेल. यासाठीच विभागाने निधीची मर्यादा रुपये २०००० एवढी करावी अशा प्रकारचा प्रस्ताव शासनाला सादर करावा लागेल.

सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास विभागांना नियतव्यय मंजूर करण्यात येतो. त्या नियतव्ययातून कोणत्या योजना राबवायच्या हे त्यांनी ठरवायचे असते. यासाठी स्वतंत्ररित्या मान्यता घेणे आवश्यक आहे असे वाटत नाही. हा प्रस्ताव चार वर्षापासून फिरतो आहे. पण विभागाला अनुदान वाढवायचे आहे म्हणून त्यांनी तो प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. विभागाला अनुदानाची रक्कम रुपये १०० वरून रुपये २० हजार करावयाची आहे. यासाठी कॅबिनेटसमोर जावे लागेल. पण कॅबिनेटसमोर प्रस्ताव जाण्यापूर्वी त्यास नियोजन व वित्त विभागाची मान्यता असणे आवश्यक आहे. कारण या विभागाचा सकारात्मक व नकारात्मक शेरा घेऊनच पुढे जावे लागते.

रुपये २०००० असा बदल करण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यांना १०० रुपये प्रशिक्षण देण्यासाठी देत होतो. आता त्यांना रुपये २०००० प्रशिक्षणासाठी देण्यात येणार आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, १०० रुपये प्रतिमहिना देण्यात येत होते. आता पूर्ण कोर्ससाठी रुपये २०००० देण्यात येणार आहे.

पंतप्रधान कौशल्य विकास योजने अंतर्गत हे सर्व येते. यात नोडल एजन्सी काम करते. त्यांना रुपये २०००० देणार आहात काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, महिला व बालविकास विभागाच्या दोन्ही योजना या २० वर्षापूर्वीच्या जुन्या आहेत. सन २०१२ मध्ये कौशल्य विकास विभागाची पूर्ण यंत्रणा तयार झाली. महिला व बालविकास खात्यामार्फत कोणत्याही प्रकारचे तांत्रिक प्रशिक्षण दिले जात नाही. आता महिला व बालविकास विभागदेखील कौशल्य विकास विभागाकडे अर्ज करणार आहे की, हे महिला व बालविकास विभागाचे लाभार्थी आहेत त्यांना मान्यता द्यावी. योजना कार्यान्वित असताना पुन्हा वित्त व नियोजन विभागाकडे जाण्याची आवश्यकता काय आहे असा समितीचा मुद्दा आहे. पण जेव्हा वित्तीय भार बदलतो तेव्हा वित्त विभागाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

ह्यात वित्तीय भार वाढला म्हणजे आता १०० रूपयावरून २० हजार रुपये एवढी मर्यादा केलेली आहे. त्यामुळे दायित्व वाढले आहे असे समितीने नमूद केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, लायबिलीटी (दायित्व) किंवा एखाद्या योजनेमध्ये बदल होतो तेव्हा वित्त व नियोजन विभागाकडे जाणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्या योजनेची अंमलबजावणी होत नाही. त्यासाठी विभागाला वित्त व नियेाजन विभागाकडे प्रस्ताव पाठवावा लागतो.

एकदा नियतव्यय मंजूर झाल्यानंतर त्या अंतर्गत ज्या काही योजना येतात त्यावर विभागाला काम करता येते. प्रधानमंत्री कौशल्य विकास अंतर्गत येणाऱ्या योजना किंवा केंद्र शासनाच्या लाभाच्या विविध योजना यांचा फायदा घेण्यात येतो. घटनेमुळे सामाजिक न्याय व आदिवासी विकास विभागाला निधी मिळतो. त्या निधीमध्ये कोणत्याही प्रकारची कमतरता येत नसावी. तो निधी तसाच असेल ना? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी सांगितले की, अर्थसंकल्पीय प्रक्रियेमध्ये विभागाला लेआऊट मिळतो व वेगवेगळ्या योजनेसाठी विभागाकडून प्रोजेक्शन करण्यात येते.

सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विभागाला अर्थसंकल्पातील निधी संविधानाप्रमाणे मिळतो. त्या बजेटेड हेडमधून निधी खर्च करावयाचा असतो. त्यामुळे यात नियतव्यय वाढण्याचा प्रश्नच येत नाही. आयटेम बदलत नाही त्यामुळे नियतव्ययातून निधी खर्च करावा. विभागाचे म्हणणे असे आहे की, जेव्हा एखाद्या योजनेमध्ये बदल करण्यात येतो, वित्तीय भार वाढवितो तेव्हा वित्त व नियोजन विभागाची मान्यता घेणे आवश्यक आहे. पण विभागाने येथे जे उत्तर दिले आहे तेच चुकीचे आहे. संविधानानुसार यात वित्तीय भार वाढत नाही असे मत समितीने व्यक्त केले. याबाबत वित्त सचिवांनी खुलासा करताना सांगितले की, जेव्हा प्रती व्यक्ती लाभामध्ये वाढ होते तेव्हा त्यांना मग तो लाभार्थी एस.टी.चा असेल व त्यास आदिवासी उप योजनेतून निधी मिळत असेल तर त्यास आदिवासी विभागाची मान्यता घ्यावी लागेल. समजा तो लाभार्थी एस.सी.असेल तर सामाजिक न्याय विभागाची मान्यता घ्यावी लागेल. खुल्या गटाच्या लाभार्थी असेल तर नियोजन व वित्त विभागाकडे जाऊन मान्यता घ्यावी लागेल. कारण प्रती व्यक्ती नॉर्म वाढतो आहे.

२.५५ रुपये २० हजार नियतव्यय ठरविला आहे. पूर्वी रुपये १०० देण्यात येत होते. तेव्हा त्याचा लाभ २० जणांना मिळत होता. आता नियतव्यय २० हजार रुपये देणार आहेत. त्यामुळे त्याचा लाभ फक्त एका व्यक्तीला मिळणार आहे. नियतव्यय ठरल्यानंतर रक्कम कितीही वर खाली केल्यानंतर त्यासाठी नियोजन व वित्त विभागाकडे जाण्याची आवश्यकता नाही असे सन्माननीय समिती सदस्य, श्री.नानाजी शामकुळे यांचे म्हणणे आहे. पण रुपये १०० ते रुपये २०००० यामध्ये फार मोठे अंतर आहे. त्यामुळे यात रक्कम वाढवून घेतली पाहिजे. तसे केले नाही तर मग लाभार्थींची संख्या मर्यादित राहील. यासाठी विभाग वित्त व नियोजन विभागाकडे गेला आहे. विभाग जो काही बदल करीत आहे त्यासाठी नियोजन व वित्त विभागाची मान्यता घेत आहे. तसा विभागाने प्रयत्न केलाच पाहिजे. प्रस्ताव वित्त व नियोजन विभागाला दाखविला नाही काय असा मुद्दा मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये उपस्थित होतो. त्यामुळे विभागाने तसा प्रस्ताव वित्त व नियोजन विभागाला सादर केला आहे. लाभार्थींच्या संख्येप्रमाणे नियतव्यय हा कमी जास्त होतच राहणार आहे. येथे आता आदिवासी व समाजकल्याणासंबंधी सांगितले गेले. त्यांना लोकसंख्येच्या आधारे बजेट दिले पाहिजे. पण ते देऊ शकत नाही हे बजेटमध्ये पहावयास मिळते. विभागाने जो प्रस्ताव शासनास सादर केला आहे त्यास लवकरात लवकर मान्यता घ्यावी असे समितीने नमूद केले.

या योजनमध्ये ज्या योजना दिल्या आहेत त्या शहरी विभागामध्ये सुरू आहेत काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या योजना ग्रामीण व शहरी भागामध्ये सुरू आहेत.

२.५६ परि.क्र.४.१.१०.३ : कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण :

दिनांक १५.२.२०१२ अन्वये संरक्षण अधिकाऱ्याची ३७ पदे निर्माण केली आहेत. त्यापैकी ३० पदे भरण्यात आली आहेत. ६० दिवसांच्या आत सुनावणी होऊन निकाल आला पाहिजे असा नियम आहे. पण तसे होत नाही. विशेष कोर्टाच्या निर्मितीबद्दलचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे पाठविला आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०१५ मध्ये पदांची निर्मिती करून प्रत्येक तालुक्यासाठी संरक्षण अधिकारी पद निर्माण करण्यात आले. त्याप्रमाणे ३०४ पदे भरली आहेत. सुरवातीला अतिरिक्त कार्यभार दिला होता. त्यानंतर स्वतंत्र पद निर्माण करण्यात आले. ती पदे भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. संरक्षण अधिकारी (कनिष्ठ) या संवर्गातील ३५८ पदे भरण्यास मान्यता मिळाली आहे. त्यापैकी ३०४ पदे आजपर्यंत भरलेली आहेत. जिल्हास्तरावरील १११ पदांची निर्मिती केली. त्यापैकी ७७ पदे भरलेली आहेत. प्रत्येक जिल्ह्यासाठी एक संरक्षण अधिकारी आहे. एक विधी अधिकारी आहे, एक डाटा एन्ट्री ऑपरेटर आहे. तालुका पातळीवर छोट्या दर्जाचा संरक्षण अधिकारी आहे. जिल्हास्तरावरील संरक्षण अधिकारी हा वर्ग-२ (अराजपत्रीत) दर्जाचा आहे. हे सर्वजण जिल्हा महिला बाल कल्याण अधिकाऱ्याच्या कार्यालयामध्ये बसतात. तालुकास्तरावरचा संरक्षण अधिकारी हा तालुका पातळीवर असतो.

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम अंतर्गत न्यायालयात प्रकरण दाखल करण्यात येते. ६० दिवसांच्या आत निकाल लागला पाहिजे यासाठी नवीन कोर्ट स्थापन करण्याचा प्रस्ताव दिला आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ६० दिवसांच्या आत कोर्टाला अहवाल सादर करण्यात येतो यात कोर्टाकडून निकालामध्ये विलंब होतो. फास्ट ट्रॅक कोर्टाची निर्मिती केलेली आहे. तसा शासन निर्णय निर्गमित झाला आहे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये फास्ट ट्रॅक कोर्ट नेमण्यासंबंधातील शासन निर्णय सन २०१६ मध्ये शासनाने निर्गमित केला आहे. प्रत्येक जिल्ह्यासाठी एक फास्ट ट्रॅक कोर्ट देण्यासाठी महिला व बालविकास विभागाने विधी व न्याय विभागामार्फत उच्च न्यायालयाला विनंती केली आहे. त्यांच्या स्तरावर ही कार्यवाही होत आहे. सध्या तरी विद्यमान कोर्टाला एकेक फास्ट ट्रॅक कोर्ट डिझीग्नेटेड केलेले आहे. आता पर्यंत कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रकरणासंबंधात महाराष्ट्रातील कोणत्याही जिल्ह्यामध्ये स्वतंत्र असे फास्ट ट्रॅक कोर्ट निर्माण झालेले नाही. कौटुंबिक हिंसाचारातून एखादी महिला घरातून बाहेर पडली व तसा रिपोर्ट विभागाकडे आला तर तिला तात्पुरता एक महिन्याचा निवारा देण्यासंबंधातील कार्यवाही आमच्या संरक्षण अधिकाऱ्यांमार्फत होत असते. पिडीत महिलेला तिच्या नातेवाईकांकडे रहायचे असेल तर तिला मदत केली जाते. त्या महिलेची इच्छा असेल तर एफआयआर दाखल केला जातो किंवा तिची इच्छा असेल तर तडजोड केली जाते.

आता विभागीय सचिवांनी जी माहिती सांगितली आली आहे ती महाराष्ट्रातील ९९ टक्के लोकांना माहीत नाही. जिल्ह्यात संरक्षण अधिकारी कोण आहे हे देखील माहीत नसते. हे सगळे पेपर वर्क आहे. ही आस्थापना खर्च चालविण्यासाठी केलेली व्यवस्था आहे. ही सवय ब्रिटीशांनी लावली असून ती अजून पर्यंत सुरू ठेवली आहे. यासंबंधात अशी व्यवस्था असली पाहिजे की, स्थानिक पोलीस ठाण्यामध्ये संरक्षण अधिकाऱ्यांचे नंबर असणे आवश्यक आहे. एका पोलीस ठाण्याला बाजूच्या पोलीस ठाण्याचे नंबर देखील माहीत नसतात. महिलांच्या अधिकाराचे हनन होत असेल तर कायद्याने त्यांना कशा प्रकारची मदत होते हे माहीत असणे आवश्यक आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी कार्यालय व प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालय येथे यासंबंधातील फलक लावण्यात आलेला आहे.

महिलांना व लोकप्रतिनिधींना अशा प्रकारची व्यवस्था तयार केली आहे याची माहितीच नाही. मग त्या व्यवस्थेचा उपयोग काय? आज या आस्थापनेवर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात येत आहे असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता विभागीय प्रतिनिधींनी याबाबत समितीस अवगत

केले की, हे अधिकारी तीन वर्षांपूर्वीच नेमण्यात आले आहेत. जिल्हा व तालुकापातळीवर नव्यानेच अधिकारी नेमलेले असल्यामुळे अजून त्याचा प्रचार झालेला नाही. या अधिकाऱ्यांना लक्ष्य दिलेले आहे की, जेथे जेथे महिला कर्मचारी जास्त आहे तेथे महिलांची कार्यशाळा घेण्यात यावी. तसेच महिलांचे जे छोटेछोटे बचत गट आहेत तेथे कार्यशाळा घेण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत व त्याप्रमाणे कार्यशाळा घेण्याचे काम सुरू आहे. विभागाने पोलीस ठाण्याच्या आवारात पोलीस समुपदेशन केंद्र देखील सुरू केले आहे. यासाठी समुपदेशकांची नेमणूक देखील महिला व बालकल्याण विकास विभागामार्फत केलेली आहे.

कोणत्या पोलीस स्टेशनच्या अंतर्गत कोणत्या समुपदेशकांची नेमणूक करण्यात आलेली आहे याची यादी तसेच मुंबईतील प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये महिला समुपदेशक कोण आहे व कोणत्या तारखांना पोलीस ठाण्यामध्ये उपलब्ध असतात याची यादी द्यावी असे निदेश समितीने दिले.

२.५७ समिती नेमून तीन वर्ष झाली आहेत. तीन वर्षामध्ये कुठे कुठे कार्यक्रम राबविण्यात आले अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, मुंबईमध्ये टाटा इन्स्टिट्यूट मार्फत कार्यक्रम राबविला जातो.

ज्या महिला पोलीस ठाण्यामध्ये जात आहेत त्यांना त्यांचा अधिकारच माहीत नाही. महिला व बालकल्याण विभाग महिलांसाठी काय करतो आहे हे त्यांनाच माहीत नाही. एकाही पोलीस अधिकाऱ्याला हे महिलांचे अधिकार आहेत हे माहीत नाही. त्यामुळे आधी पोलीस अधिकाऱ्यांनाच तयार केले पाहिजे. तसेच विभागाकडून जिल्हाधिकारी कार्यालयात फलक लावण्यात येतात. पिडीत महिलेला तालुक्याच्या ठिकाणाहून जिल्हाधिकारी कार्यालयात जायला १०० रुपये खर्च येतो. पण १०० रुपये पिडीत महिलेजवळ असतील तर ती महिला हैराण होणार नाही. तथापि, तिच्याकडे पैसे नसतात म्हणूनच ती हैराण झालेली असते. असे समितीने नमूद केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, याकरिता १८१ क्रमांकाची हेल्पलाईन सुरू केली आहे.

कोणत्याही महिलेवर अन्याय झाला तर ती तातडीने पोलीस ठाण्यामध्ये जाते. प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क करण्याबाबत कोणत्या प्रकारची व्यवस्था केली आहे, जेणेकरून त्या महिलेला तातडीने मदत मिळू शकते. पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांना देखील विभागाने केलेल्या या व्यवस्थेची माहिती नाही. निराधार महिलांना कोणी मदत करीत नाही. त्यामुळे विभागाने जी व्यवस्था उभी केली आहे तिचा योग्य वापर करावयाचा असेल तर पोलीस ठाण्यामार्फत संपर्क करण्याची व्यवस्था केली पाहिजे. ती व्यवस्था विभागाकडून करणार आहात काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रत्येक जिल्ह्याचे पोलीस प्रमुख व स्थानिक पोलीस आयुक्तालयातील प्रमुखांना महिला व बालकल्याण आयुक्त स्तरावरुन महिला व बालविकास विभागाचे संरक्षक अधिकारी कोण आहेत, त्यांचा संपर्क दूरध्वनी क्रमांक व ठिकाण याची माहिती दिली जाईल व त्यांना विनंती करण्यात येईल की, तुमच्या अधिनस्त जे पोलीस अधिकारी आहेत त्यांना ही माहिती कम्युनिकेट करण्यात यावी. जिल्हा परिषद, गटविकास अधिकारी व महिला बालविकास अधिकारी कार्यालयात या योजनेच्या माहितीचा फलक लावण्यात येऊन अधिकाधिक प्रचार केला जाईल.

माहितीचा फलक प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये सुद्धा लावण्यात यावा, म्हणजे महिलांना ही योजना आपल्या मदतीकरिता आहे याची माहिती होईल. दूरदर्शनवर देखील जाहिरात करण्यात यावी. ग्रामपंचायत कार्यालय, पंचायत समिती, तहसील कार्यालय, तलाठी कार्यालय व सरकारी इमारतींमध्ये या योजनेच्या माहितीचा फलक लावला पाहिजे असे समितीने सुचित केले.

क्राईम रेशो कमी झाला आहे का, या कायद्याची फलश्रुती काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, हा कायदा अंमलात आला आहे. या अंतर्गत भरपूर केसेस येण्यास सुरुवात झाली आहे. संरक्षण अधिकाऱ्यांमार्फत डोमेस्टिक व्हायलन्स ॲक्ट अंतर्गत ५८८४० केसेस रजिस्टर्ड झाल्या आहेत.

यापैकी किती केसेस निकाली निघाल्या आहेत? फक्त केसेस रजिस्टर्ड होऊन उपयोग नाही, त्या निकाली निघाल्या तरच संबंधितांना न्याय देऊ शकलो असे म्हणता येईल असे समितीने नमूद केले.

एक्झिट कॉन्फरन्सच्या वेळी आयुक्तांनी प्रोटेक्शन ऑफ वुमेन फ्रॉम डोमेस्टिक व्हायोलन्स ॲक्ट, २००५ च्या इम्प्लिमेंटेशन संदर्भात सांगितले आहे. १११ पदे मंजूर झालेली आहेत, त्यामध्ये प्रोटेक्शन ऑफिसर, लिगल डव्हायजर, डेटा एन्ट्री ऑपरेटर ही पदे आहेत. सदर पदांसाठी भरती झाली आहे का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रोटेक्शन आफिसर या पदाची भरती झाली आहे. प्रत्येक जिल्ह्यात एक संरक्षण अधिकारी, एक विधी अधिकारी, तालुका पातळीवर देखील संरक्षण अधिकारी, डेटा एन्ट्री ऑपरेटर वगैरे सर्व पदे निर्माण करून ती कार्यरत आहेत, त्यांच्या मासिक बैठका आयुक्तालय स्तरावर सुरू केल्या आहेत.

ऑडिट झाले, तेव्हा ७० टक्के प्रकरणे प्रलंबित होती, तत्संदर्भातील प्रगती काय आहे? नियुक्त्या झाल्या नसल्यानेच ते थांबले होते. आता नियुक्त्या झाल्या आहेत. आता त्या संदर्भात काय अहवाल आहे? त्यावेळी केसेस प्रलंबित होत्या यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, नियुक्त्या झालेल्या आहेत. काही प्रकरणे प्रलंबित होती. मोस्टली प्रकरणे न्यायालयात प्रलंबित राहतात. त्या संदर्भात उच्च न्यायालय पातळीवर बैठका होतात. उच्च न्यायालयाकडून देखील संबंधित कनिष्ठ न्यायालयांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

२.५८ सन २००८ ते सन २०११ दरम्यानच्या ५८४९ केसेसपैकी फक्त १५०३ केसेसची सुनावणी झाली आणि दिलासा देण्यात आला. मात्र बाकीच्या प्रकरणांची सुनावणीच होत नाही. शेवटी कन्व्हिक्शन रेट वाढला पाहिजे. प्रकरणे चालली तरच कन्व्हिक्शन रेट वाढेल. ७० टक्के केसेस चालल्या आहेत. ही बाब समितीने निदर्शनास आणली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विधी अधिकारी, संरक्षण अधिकारी महिलांना हॅण्डहोल्डिंग करून अर्ज भरण्यासाठी, होम एन्क्वॉयरी रिपोर्ट न्यायालयाला सादर करण्यासाठी मदत करतात.

न्यायालयात सुद्धा कन्व्हिक्शन रेट वाढला पाहिजे. प्रकरणांवर निर्णय झाले पाहिजेत. प्रत्येक संरक्षण अधिकारी, विधी अधिकारी यांच्यावर अकाऊंटिबिलिटी असली पाहिजे की, त्यांनी त्यांचा परफॉर्मन्स दाखविला पाहिजे. फक्त पगार घ्यायचा असे कसे चालेल? काम करणार असतील तरच आपल्याला त्या अधिकाऱ्यांचा उपयोग आहे. आपण विधी संबंधित प्रकरणांसाठी विशिष्ट अधिकारी पगारावर ठेवतो, त्यामुळे त्यांचे ते कामच आहे. वुमेन व्हायोलन्सबद्दल दोन वेगळी न्यायालये स्थापन करण्यात येणार होती. असा प्रस्ताव विधि व न्याय विभागाला दिला होता. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, फास्ट ट्रॅक कोर्टबाबत माननीय उच्च न्यायालयाला विनंती केली आहे. मात्र अजून त्यांच्याकडून मान्यता आलेली नाही. फास्ट ट्रॅक कोर्ट एस्टॅब्लिश झालेले नाहीत. आमची विनंती होती की, प्रत्येक जिल्ह्यात फास्ट ट्रॅक कोर्ट करण्याबाबतचे प्रावदान करावे. पण ते अजूनही झालेले नाही.

दोन विशेष न्यायालये प्रस्तावित केली होती. ही बाब महालेखाकारांनी निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांबरोबर बैठक झाली, बैठकीमध्ये ३-४ विषय होते, त्यांनी स्वत: ती बैठक बोलाविली होती. आम्ही त्यावेळी सुद्धा त्यांना विनंती केली होती की, आम्हाला अमूक या गोष्टींसाठी फास्ट ट्रॅक कोर्टची गरज आहे. फास्ट ट्रॅक कोर्ट डेजिग्नेट करण्याचे अधिकार सीजेला असल्यामुळे त्यांच्याकडे नुसती विनंतीच करू शकतो.

महिलांवर होणाऱ्या अत्याचारांबद्दल जिल्हा पातळीवर नाही तर किमान विभागीय पातळीवर फास्ट ट्रॅक कोर्ट सुरू झाले पाहिजे. या दृष्टीने विभागाने सुद्धा पुढाकार घेऊन कार्यवाही करण्याची गरज आहे. असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी याबाबत पुन्हा न्यायालयाला विनंती करण्यात येईल.

२.५९ परिच्छेद क्रमांक- ४.१.११ वृद्ध, विकलांग आणि निराधारांचे कल्याण :

२.६० परिच्छेद क्रमांक ४.१.११.१ "मुंबई भिक्षा प्रतिबंधक अधिनियम, १९५९ सुधारित न करणे" :

उपरोक्त मुद्याबद्दल विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, भिक्षेकऱ्यांची संख्या आणि त्यांच्यावर होणारा खर्च याबाबत हा आक्षेप आहे.

यामध्ये आस्थापनेवरील खर्च ७० टक्के आणि भिक्षेकऱ्यांवरील खर्च फक्त १२.५ कोटी म्हणजे ३० टक्के होतो. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, संस्थेमध्ये भिक्षेकऱ्यांची उपस्थिती कमी आहे. याबाबत पोलीस विभागाचे सहकार्य वेळोवेळी मागितले आहे. त्यांच्याशी संपर्क साधून भिक्षेकऱ्यांना पकडण्याची मोहीम राबविण्याचे नियोजन आहे. भिक्षेकरी नगर, सोलापूर, पुणे येथे आहेत. महाराष्ट्र स्तरावरील उपस्थिती ५८७ इतकी आहे. मागील ३ वर्षांची आकडेवारी पाहिली तर ३२ हजार लोकांना पकडून कोर्टापुढे हजर केले होते. त्यापैकी फक्त २७०० लोकांना स्थानबद्ध केले. उर्वरित लोकांना सोडून देण्यात आले. त्यामुळे संख्या कमी दिसून येते. ४२०० लोक एकावेळी सामावून घेता येतील एवढी जागा आहे. या दृष्टीने पकड मोहीम राबविणे गरजेचे आहे. मुंबईमधील भिक्षेकरी गृहामध्ये जवळपास १००० भिक्षेकरांना सामावून घेता येईल एवढी जागा आहे.

पण याबाबतीत निकष काय आहेत? विभागामार्फत ज्यांना पकडले जाते ते भिक्षेकरी आहेत हे कोर्टापुढे सिद्ध होत नाही. असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी सांगितले की, डायरेक्ट विभागाच्या स्तरावर कार्यवाही होत नाही. पोलीस रेडमध्ये जे सापडतात त्यांना कोर्टापुढे सादर केले जाते.

सरकारी वकील ज्यांना पकडून कोर्टापुढे हजर केले ते भिकारी असल्याचे सिद्ध करू शकत नाहीत. भिक्षेकऱ्यांच्या दृष्टीने कायदा केलेला आहे. परंतु गुन्हेगारांना जशी कायद्याची भीती असते तशी भिक्षेकऱ्यांना त्यांच्या विरोधात कायदा असल्याची माहिती नसते. भीक मागणे हा त्याचा अधिकार आहे. वास्तविक ही जबाबदारी महिला व बाल कल्याण विभागाची नसून गृह विभागाकडे ही जबाबदारी सोपविली पाहिजे. या योजनेवर ४२ कोटी रुपये खर्च होत असतील तर हे काम पोलीस विभागाकडे देण्यात यावे. रस्त्यावर भीक मागताना पकडण्यासाठी महिला व बालकल्याण विभागाचे अधिकारी गेले आणि पुरुष भीक मागत असेल तर हे काम तुमचे नाही असे म्हटले जाईल. पोलीस विभागाकडे ही जबाबदारी हस्तांतरित केली तर काय फरक पडणार आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, पुरुष असो किंवा महिला वा अल्पवयीन मुले असोत, महिला व बालकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांना पोलिसांच्या मदतीने भिकाऱ्यांना पकडून कोर्टासमोर हजर करावे लागते. पुरुष व स्त्रियांसाठी वेगवेगळी भिक्षेकरीगृहे आहेत.

२.६१ गोखले समिती सन १९९० मध्ये नेमण्यात आली होती. सन २०१० मध्ये धर्माधिकारी समिती नेमली होती. सन २०१३ मध्ये एक अभ्यास समिती नेमली होती. या समित्यांनी कोणत्या शिफारशी केल्या? याबाबत विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले की, सन २०१४ मध्ये एक अभ्यास समिती नेमली होती. न्यायाधीश श्रीमती चव्हाण यांच्यासह पोलीस विभाग व एनजीओचे प्रतिनिधी यांना एकत्र घेऊन शरदचंद्र गोखले व धर्माधिकारी समितीने ज्या शिफारशी केल्या होत्या त्यानुसार भिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे व त्यांचे पुनर्वसन करणे हा विषय होता. त्यानुसार त्यांनी कायद्याच्या मसुद्यात बदल सुचविला. न्यायाधीश श्रीमती चव्हाण यांच्यासमवेत माझ्याकडे २-३ बैठका झाल्या आहेत. सर्व जिल्हा महिला व बालविकास अधिकाऱ्यांचे मत जाणून घेतले आहे. तो मसुदा विधि व न्याय विभागाकडे लवकरच पाठविण्यात येत आहे.

विभागाने दिलेल्या उक्त माहितीवरुन असे दिसून येते की, सन १९९० पासून सन २०१७ पर्यंत समित्यांच्या नेमणूका, चर्चा व अहवाल एवढीच प्रगती झाली आहे. यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, आयुक्तालयाकडून प्रस्ताव नुकताच मंत्रालयात आला आहे. १५ दिवसांत महिला व बालविकास विभागाकडून प्रस्ताव पुढे पाठवण्यात येईल.

चंद्रपूर जिल्ह्यात नागभीड-सिंदेवाही रस्त्यावर चिंधीचख नावाचे गाव आहे. तेथील गावकरी ९ महिने भीक मागायला जातात व ३ महिने शेती करतात. या अनुषंगाने समितीने सुचित केले की, अशा गावाला विभागाने भेट दिली पाहिजे.

२.६२ सध्या मुंबईतील चेंबूर येथे भिक्षेकरी गृह आहे. तेथे मागील ३ वर्षांत ऑन रेकॉर्ड आयुक्तालयातील कोणकोणत्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेट दिली. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सदर माहिती समिती समितीला सादर करण्यात येईल असे आश्वस्त केले. त्यानुसार विभागाकडून प्राप्त झालेली माहिती खालीलप्रमाणे आहे :—

शासकीय पुरुष भिक्षेकरी स्विकार केंद्र, चेंबूर या संस्थेस मागील तीन वर्षात ज्या अधिकाऱ्यांनी भेटी दिल्या त्याचा तपशील खालीलप्रमाणे:

अ.क्र.	नाव	पदनाम	भेटीचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
१	श्री. गोकुळ देवरे	जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मुंबई उपनगर	२३.९.२०१४
२	श्री. गोकुळ देवरे	जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मुंबई उपनगर	२१.१.२०१५
३	श्री. मोरे राहुल	विभागीय उप आयुक्त, महिला व बालविकास विभाग, कोकण विभाग, मुंबई	१३.८.२०१५
४	श्री. मनोज पाटणकर	जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मुंबई उपनगर	१३.८.२०१५
५	श्री. मनोज पाटणकर	जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मुंबई उपनगर	२६.१०.२०१५
६	श्री. मनोज पाटणकर	जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मुंबई उपनगर	८.२.२०१६
७	श्री. मोरे राहूल	विभागीय उप आयुक्त, महिला व बालविकास विभाग, कोकण विभाग, मुंबई	१५.१०.२०१६
८	श्री. मनोज पाटणकर	जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मुंबई उपनगर	१५.१०.२०१६ १०.२.२०१७
९	श्रीमती सुवर्णा पवार	सहाय्यक आयुक्त, भिक्षा प्रतिबंध शाखा, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे	१६.१२.२०१६
१०	श्री. मनोज पाटणकर	जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मुंबई उपनगर	१०.२.२०१७
११	श्रीमती सुवर्णा पवार	सहाय्यक आयुक्त, भिक्षा प्रतिबंध शाखा, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे	१०.२.२०१७

शासकीय महिला भिक्षेकरी स्विकार केंद्र, चेंबूर या संस्थेस मागील तीन वर्षांत ज्या अधिकाऱ्यांनी भेटी दिल्या त्याचा तपशील खालीलप्रमाणे :

अ.क्र. (१)	नाव (२)	पदनाम (३)	भेटीचा दिनांक (४)
१	श्री. गोरे पी.के.	सहाय्यक आयुक्त, भिक्षा प्रतिबंध शाखा, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे	१९.१२.२०१४
२	श्री. गोरे पी.के.	सहाय्यक आयुक्त, भिक्षा प्रतिबंध शाखा, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे	२९.९.२०१५
३	श्री. मनोज पाटणकर	जिल्हा महिला व बालविकास आयुक्तालय, मुंबई उपनगर	९.१२.२०१५
४	श्रीमती सुवर्णा पवार	सहाय्यक आयुक्त, भिक्षा प्रतिबंध शाखा, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे	३०.९.२०१६
५	श्रीमती सुवर्णा पवार	सहाय्यक आयुक्त, भिक्षा प्रतिबंध शाखा, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे	१६.१२.२०१६
६	श्री. मनोज पाटणकर	जिल्हा महिला व बालविकास आयुक्तालय, मुंबई उपनगर	१०.२.२०१७
७	श्रीमती सुवर्णा पवार	सहाय्यक आयुक्त, भिक्षा प्रतिबंध शाखा, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे	१०.३.२०१७

२.६३ परिच्छेद क्रमांक-४.१.११.२ भिकाऱ्यांच्या पुनर्वसनासाठी अपुरे प्रयत्न :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, भिक्षेकऱ्यांचे पुनर्वसन म्हणजे भिकारी भिक्षेकरी गृहात दाखल झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबाचा शोध घेऊन त्यांची कुटुंबाशी ओळख पटल्यानंतर कुटुंबात परत पाठविण्याचा विचार असतो. या अंतर्गत सन २०१२ पासून सन २०१७ पर्यंत २७०० लोक दाखल झाले, त्यापैकी ५९४ लोकांचे पुनर्वसन केले आहे. घायपतवाडीचा विषय होता. तेथील ७ लोकांचे पुनर्वसन केले आहे.

पुनर्वसनासाठी आयुक्त, महिला व बालविकास व संचालक, व्यवसाय प्रशिक्षण यांच्याशी चर्चा करून पुढील कार्यवाही करावी, अशी सूचना सचिवांनी दिली होती. या संदर्भात काय उपाययोजना केली आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ५० टक्क्यांपेक्षा जास्त भिकारी मतीमंद, मनोरुग्ण, आजारी असल्यामुळे त्यांना प्रशिक्षण देणे शक्य होत नाही. भिक्षेकऱ्यांना शिवणकला, हस्तकला याचे प्रशिक्षण देण्यात येते.

काही एनजीओ आजही या क्षेत्रात चांगले काम करीत आहेत. त्यांच्याकडे जागा उपलब्ध नाही. त्यांना जागा उपलब्ध करून दिली तर ते विभागाला मदत करू शकतील. लहान मुले, वयोवृद्धांचा त्यांच्या परिवाराशी मिलनाचा जो क्षण येतो तो अनुभव घेताना लोकांचे डोळे पाणावतात. एका एका व्यक्तीच्या मागे ४-४ महिने ते काम करतात. सर्व माहिती गोळा करतात, त्याची माहिती ते त्या व्यक्तीला देत नाहीत, त्यांच्या घरी परतण्याच्या दृष्टीने मानसिकता तयार करतात. अशा एनजीओची विभागाने मदत घ्यावी, असे समितीने सुचित केले.

या अनुषंगाने विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, ६०० लोकांची त्यांच्या कुटुंबाशी भेट घालून दिल्याची माहिती देण्यात आली आहे. महिला व बालविकास विभागाने उद्योग विभागाशी चर्चा केली आहे. ५३ टक्के लोक हे प्रशिक्षण देण्यापलीकडील आहेत. उर्वरित लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विभागाने प्रयत्न केला आहे. पुनर्वसनाच्या दोन्ही प्रकारांबद्दल विभाग प्रयत्नशील आहे.

समितीने सुचविल्याप्रमाणे विभागाने एनजीओची मदत घ्यावी. कारण सदर संस्था नोंदणीकृत आहे याबाबत पहिल्यांदा मुंबईत प्रयोग करावा. नंतर उर्वरित ठिकाणी प्रयोग करावा असे समितीने सुचित केले असता विभागीय प्रतिनिधींनी समितीस अश्वस्त केले की, संस्थांकडे जागा आहेत. त्यांना जागा वापरायला देऊन तेथे लोकांना रोजगार मिळेल यासाठी प्रयत्न करता येईल. लोकांना तेथे एन्गेज ठेवणे गरजेचे असते.

२.६४ परिच्छेद क्रमांक-४.१.११.३ भिकाऱ्यांना उपयुक्त प्रशिक्षण देण्यात आले नाही :

घायपतवाडी येथे भिक्षेकरीगृहासाठी २२४ हेक्टर जागा असताना शेतीविषयक प्रशिक्षण देण्यामध्ये अडचण काय होती? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, त्यावेळी कृषी सहाय्यकाची पदे भरलेली नव्हती. डिसेंबर, २०१६ मध्ये कृषी सहाय्यकाची ६ पदे भरण्यात आली. त्यांनी घायपतवाडी येथे शेतीविषयक प्रशिक्षण देण्याचे काम सुरू केले आहे.

तेथे कृषी विद्यापीठ स्थापन होऊ शकते एवढी जागा उपलब्ध आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, भिक्षेगृहाकडे भरपूर जागा उपलब्ध आहे. सद्य:स्थितीत जागा ताब्यात आहे. परंतु संबंधित जागेची पुन्हा एकदा मोजणी करून घेण्यात येईल.

२.६५ सदरहू जागेची मोजणी करण्यात यावी. जागा विभागाच्या ताब्यात असेल तर ठीक आहे. परंतु जागा ताब्यात नसेल तर विभागाने जागा ताब्यात घ्यावी व याबाबत समितीला कळविण्यात यावे, असे समितीने सुचित केले असता विभागीय प्रतिनिधींनी समितीच्या सूचनेप्रमाणेच कार्यवाही करण्यात येईल असे अश्वस्त केले. त्यानंतर विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती खालीलप्रमाणे आहे :—

'शासकीय पुरुष भिक्षेकरी गृह, घायपातवाडी, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर या संस्थेच्या ताब्यात एकूण २२४.८८ हे. आर इतके क्षेत्रफळ असून त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे :—

अ.क्र. (१)	मालकी (७/१२ नावे) (२)	जमिनीचे क्षेत्र (हे.आर.) (३)	गट नं. (४)
१	बेगर्स होम	३.६९	गट नं.१२३४
२	बेगर्स होम	१३.११	गट नं.१२३५
३	बेगर्स होम	१५.८९	गट नं.१२३६
४	बेगर्स होम	५.८१	गट नं.१२३८
	एकूण अ :—	**३८.५०**	
५	महाराष्ट्र शासन	११२.०३	गट नं.१२०८ (मुळचे फॉरेस्ट विभागाचे क्षेत्र)
६	महाराष्ट्र शासन	७४.३५	गट नं. १२३७ (मूळचे फॉरेस्ट विभागाचे क्षेत्र)
	एकूण ब :—	**१८६.३८**	
	एकूण (अ + ब)	**२२४.८८**	

वरील तपशीलाप्रमाणे बेगर्स होमच्या नावे असलेले क्षेत्र तसेच महाराष्ट्र शासन यांचे नावे असलेले क्षेत्र एकूण २२४.८८ हे.आर.संस्थेच्या ताब्यात असून सदर क्षेत्रावर अतिक्रमण झालेले नाही. तसेच लोकलेखा समितीच्या सूचनेनुसार सदर जागेची मोजणी करणेबाबत शासकीय पुरुष भिक्षेकरी गृह, घायपातवाडी, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर या संस्थेनी त्यांचे पत्र क्र. १३८, दिनांक २९/६/२०१७ अन्वये भूमी अभिलेख कार्यालय, श्रीगोंदा, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर यांना कळविले आहे. '

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, जागेची मोजणी करून घेण्यात येईल, असे लेखी माहितीमध्ये नमूद केलेले आहे. जागेची मोजणी केलेली आहे काय? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, जिल्हास्तरावर जागेची मोजणी करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यांना मोजणी फी भरावी लागते. मोजणी खात्याने मोठ्या प्रमाणात डिमांड केली असल्यामुळे निधी उपलब्ध करून जागेच्या मोजणीची प्रक्रिया करण्यात येत आहे.

निधी मिळाल्यानंतर शासकीय जागेची मोजणी होईल, असे होत नाही. ते शासकीय जागेची मोजणी कमिटमेंटवर सुद्धा करतात आणि मोजणी करून घ्यावी असे लोकलेखा समितीने आदेश दिल्यानंतर जागेची मोजणी करून घ्यावयास पाहिजे होती असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मोजणी खात्याने जागेच्या मोजाच्या फीची डिमांड केल्यामुळे त्यांना विभागाच्या कॉन्टेंजन्सी फंडातून त्या प्रमाणे निधी अदा केलेला आहे. त्यांना बीडीएसद्वारे ग्रँट अदा केलेली आहे. लवकरच मोजणी करून घेण्यात येईल.

एका महिन्याच्या आत मोजणीचे काम सुद्धा झालेले आहे असे सांगता येईल काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सागितले की, हे काम मोजणी विभागावर अवलंबून असल्यामुळे या संदर्भात लवकरात लवकर पाठपुरावा करण्यात येईल.

त्या जागेवर एकही अतिक्रमण नाही. संपूर्ण जागा विभागाच्या ताब्यात आहे, तरी सुद्धा जागेची मोजणी करून घेतो. विभागाने लेखी माहितीमध्ये अतिक्रमण झालेले नाही असे नमूद केलेले आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाला मोजणी केल्यानंतर त्या जागेवर अतिक्रमण आहे किंवा नाही हे कळेल.

पण लेखी उत्तरामध्ये नमूद केलेले आहे की, अतिक्रमण झालेले नाही. आता मोजणी केल्यानंतर अतिक्रमण आहे किंवा नाही हे सांगणार असाल तर लेखी उत्तर चुकीचे होईल. समितीने "सदर जागेची मोजणी करण्यात यावी. जागा विभागाच्या ताब्यात असेल तर ठीक आहे, परंतु जागा ताब्यात नसेल तर विभागाने जागा ताब्यात घ्यावी व याबाबत समितीला कळविण्यात यावे," अशी सूचना केली होती. यावर विभागीय सचिवांनी उत्तर दिले होते की, "होय, सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल." सदर जागेवर अतिक्रमण नाही असे समितीला पूर्वीच्या बैठकीमध्ये विभागाकडून सांगण्यात आले होते. परंतु, आता असे सांगण्यात येते की, कदाचित मोजणी झाल्यानंतर त्या जागेवर अतिक्रमण आहे की नाही हे कळेल. अशी उत्तरे विभागाने समितीला देऊ नये असे समितीने नमूद केले.

२.६६ परिच्छेद क्रमांक ४.१.११.४ : भिक्षागृहातील भिकाऱ्यांना कमी दराने उपदान देणे.

भिक्षागृहातील भिकाऱ्यांना कमी दराने उपदान देणे यामध्ये ५ रुपयांचे ५०० रुपये करण्यात आले, तरी देखील त्यांना ५०० रुपये न देता केवळ ५ रुपये दिलेले आहेत. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये खरी परिस्थिती अशी आहे की, त्यासंदर्भातील रेट आजही ५ रुपयेच आहे. ५०० रुपये हा रेट नाही. तसेच तेथे सापडलेले बुकलेट हे गव्हर्नमेंट प्रेसचे नव्हते. ते बुकलेट त्या ठिकाणी कुठून आले, हे माहीत नाही. However, as on today also, the rate stands at Rs.५ only.

पण ५ रुपये हा रेट खूप कमी आहे, असे वाटत नाही काय? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, जेलमध्ये देण्यात येणाऱ्या रेटचा आधार घेऊन अकुशल कामगारासाठी ३२ रुपये आणि कुशल कामगारासाठी ४० रुपये देण्यात यावे, असा प्रस्ताव विभागाने शासनास सादर केलेला आहे. अकुशल कामगारासाठी ३२ रुपये आणि कुशल कामगारासाठी ४० रुपये हा रेट दर महिन्याचा आहे.

विभागाने पाठविलेल्या प्रस्तावानुसार संबंधितांना प्रस्ताव मंजूर झाल्यावर दरमहा ३२ आणि ४० रुपये देण्यात येणार आहेत काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, दर दिवसाकरिता अकुशल कामगारासाठी दिवसाला ३२ रुपये आणि कुशल कामगारांसाठी ४० रुपये देण्यात यावे, असा प्रस्ताव सादर केलेला आहे. सद्या त्यांना दरमहा ५ रुपये इतकी रक्कम मिळते.

या ठिकाणी ५०० रुपये छापण्यात आलेले आहेत. ५०० रुपये दिलेच नाही. याचे कारण म्हणजे ५०० रुपये देण्याचा नियम नव्हता. केवळ छपाईच्या चुकीमुळे ५०० रुपयांचा नियम आला आणि तो विभागाने मान्य केला नाही. आता सचिवांनी सांगितल्याप्रमाणे यात दुरुस्ती करून सद्याच्या परिस्थितीमध्ये जेलच्या आधारावर ३२ रुपये आणि ४० रुपये असा दर करण्याबाबत सादर केलेल्या प्रस्ताव मान्य होण्याकरिता पाठपुरावा करण्यात यावा. त्याकरिता विलंब करू नये. असे समितीने सुचित केले तसेच या ठिकाणी ५ रुपयांऐवजी ५०० रुपये चुकीने छापण्यात आलेले आहे, असे उत्तरामध्ये देणे आवश्यक होते असे समितीने नमूद केले असता विभागीय सचिवांनी सदर बाब चूकीने छापण्यात आलेली आहे हे मान्य केले.

अकुशलकरिता ३२ रुपये आणि कुशलकरिता ४० रुपये पर डे दर करण्याबाबतचा प्रस्ताव दिल्याचे सचिवांनी सांगितले. जर खरोखर पुनर्वसन करण्याचा मानस असेल तर अकुशल आणि कुशल असे शब्द सन्माननीय सचिव यांनी वापरले. या देशामध्ये व आपल्या राज्यामध्ये लघुत्तम वेतन कायदा आहे. अकुशल आणि कुशल त्या पद्धतीने काम करीत असेल तर त्याला ३२ रुपये आणि ४० रुपये इतका कमी दर देण्याचे का प्रस्तावित करण्यात आले? त्यांना कंत्राटी पद्धतीने कामावर घेण्यात यावे. असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता विभागीय प्रतिनिधी खुलासा केला की, त्यांना जेवण देखील दिले जाते. त्यामुळे त्यांच्याकरिता किमान वेतन लागू होऊ शकणार नाही.

विभागाला खरोखरच या विषयावर काम करायचे आहे काय? सन २००७ पासून आजपर्यंत ११ वर्षांचा कालावधी होऊनही विभागाने यामध्ये सुधारणा केलेली नाही. यासंदर्भात सन २०१३ मध्ये समिती स्थापन करण्यात आली होती, सदरहू समितीचा अहवाल विभागाला प्राप्त झालेला आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्याबाबत नेमलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झालेला आहे. विभागाने अहवालावर अभ्यास केला व कॉमेंट्स करून मंजुरीसाठी शासनाकडे पाठविलेला आहे.

यासंदर्भात दिनांक २२ फेब्रुवारी २०१३ रोजी समिती स्थापन करण्यात आली होती. तसेच विभागाकडे अहवाल प्राप्त झालेला आहे. तो मंजूर होऊन कार्यवाही केव्हा होणार आहे? समिती स्थापन होऊन ४ वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला आहे. तरी देखील विभागाने काही केले नाही.त्यामुळे यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्यात यावी असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी त्यास होकारार्थी उत्तर दिले.

२.६७ परिच्छेद क्रमांक ४.१.११.५ : महिला वसतिगृहात अपूरी सुरक्षा व्यवस्था आणि आवश्यक सुविधांचा अभाव :

शासकीय प्रियदर्शनी महिला वसतिगृह, शासकीय करुणा महिला वसतिगृह व सरस्वती महिला वसतिगृह याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, प्रियदर्शनी, सरस्वती आणि करुणा ही तीन महिला वसतिगृह आहेत व ही वसतिगृह नागपूर येथे एकाच आवारामध्ये आहेत.

या वसतिगृहामध्ये ५८ महिलांसाठी जागा अपूर्ण होती. तसेच या विषयाबाबत अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत. नवीन बांधकामाबद्दल सन २०११ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. परंतु यासाठी २०१३-२०१४ मध्ये अर्थसंकल्पीय तरतूद झालेली आहे. या कामांकरिता किती तरतूद करण्यात आली अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यामध्ये अशा त्रुटी होत्या की, वसतिगृहातील एकाच खोलीमध्ये ५६ महिला राहत होत्या. त्यांच्यासाठी त्या खोलीच्या वरील मजल्यावर सद्या बांधकाम सुरू आहे. सन २०१४-२०१५ मध्ये प्रियदर्शनी या संस्थेच्या जुन्या इमारतीचे नुतनीकरणाच्या कामावर, संरक्षण भिंतीच्या कामावर व अंतर्गत रस्त्याच्या कामावर २६ लाख रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. तसेच सन २०१५-२०१६ मध्ये प्रियदर्शनी महिला वसतिगृहाच्या जुन्या इमारतीचे नुतनीकरण, संरक्षण भिंतीचे काम आणि अंतर्गत रस्त्याच्या कामाकरिता २१ लाख रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. तसेच २०१५-२०१६ मध्ये करुणा आणि सरस्वती या वसतिगृहांवर

२१ लाख रुपये खर्च करण्यात आले. सरस्वती वसतिगृहाच्या पहिल्या मजल्यावर दोन हॉल पैकी एका हॉलचे काम हाती घेण्यात आलेले आहे. संरक्षण भिंतीची उंची वाढविण्याचे काम पूर्ण झाले असून गेट बसविण्याचे काम प्रगती पथावर आहे.

२.६८ या वसतीगृहांची कोणकोणती कामे करण्यात आली, तसेच समितीने निदर्शनास आणून दिलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे? २४०० स्क्वेअर फूट क्षेत्रफळ असलेल्या खोलीमध्ये ५८ महिला राहत होत्या. त्या खोलीतील स्वच्छतागृह अस्वच्छ होते आणि त्यांना दरवाजे नव्हते. वसतिगृहाला थेट पाणी पुरवठा करण्याची व्यवस्था नव्हती. स्वयंपाकासाठी सरपण वापरण्यात येत होते. अग्निप्रतिबंधक यंत्रणा कार्यरत नव्हती, इत्यादी कामे पूर्ण करण्यासाठी विभागाने कोणती कार्यवाही केली? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, स्वच्छतागृहे अस्वच्छ होती, दरवाजे नव्हते. आता स्वच्छतागृहे स्चच्छ ठेवण्यात येत आहेत. सफाईगाराचे पद भरलेले आहे, तसेच स्वच्छतागृहांना नवीन दरवाजे बसविण्यात आलेले आहेत. तसेच थेट पाणी पुरवठा नसल्यामुळे देणगीद्वारे बोअरवेल घेण्यात आलेली आहे. स्वयंपाक व गरम पाण्यासाठी पूर्वी सरपणाचा वापर केला जात होता, परंतु आता गॅस व गिझरचा वापर करण्यात येत आहे. सरपणाचा वापर केवळ थंडीच्या दिवसामध्ये पाणी गरम करण्यासाठी केला जातो. अग्निप्रतिबंधक यंत्रणा पूर्वी नव्हती, परंतु आता अग्निप्रतिबंधक यंत्रणा लावण्यात आलेली आहे. पेशंटला रुग्णालयात नेण्यासाठी वाहन उपलब्ध नव्हते, तसेच वाहन आताही उपलब्ध नसल्यामुळे रिक्षा किंवा खाजगी वाहनाचा वापर केला जातो. महिलांवर उपचारासाठी मनोविकार तज्ज्ञ, व्यवसायिक रोग उपचारतज्ज्ञ नव्हते. परंतु प्रादेशिक मनोरुग्णालय असून तेथे उपचार करण्यात येतात. तेथील दोन महिला वसतिगृह व एका बालगृहासाठी एकच सुरक्षा रक्षक आहे, तसेच सुरक्षा खोली नाही. दोन महिला वसतिगृह व बालगृह हे दोन्हीही एकाच आवारामध्ये असल्यामुळे सुरक्षा रक्षक एकच नेमण्यात आलेला आहे.

सुरक्षा रक्षक एकच आहे व ही बाब गंभीर आहे. सुरक्षा रक्षकाला कोषागार कार्यालयात जावे लागत होते, हे त्याच्याकडे अतिरिक्त काम होते, एका दिवसातील २४ तासांचा विचार केला तर सुरक्षा रक्षक केवळ दिवसा काम करीत होता. तेथे रात्री सुरक्षा रक्षक नव्हता. रात्री सुरक्षा रक्षकाची नित्तांत आवश्यकता असते. असे असतानाही एकच सुरक्षा रक्षक ठेवण्याची कारणे काय आहेत? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, खाजगी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्यात यावी, असे आदेश दिलेले आहेत.

२.६९ आदेश दिले म्हणजेच सुरक्षा रक्षकांची नियुक्ती होते काय? त्या ठिकाणी खाजगी स्वरुपात, कंत्राटी पद्धतीवर सुरक्षा रक्षक रुजू झाले आहेत काय? तीन वर्षांपासून सप्लीमेंटरी मान्य झाली नाही किंवा सप्लीमेंटरी मान्य झाली, असेच सुरू आहे. सद्याची परिस्थिती काय आहे? वसतिगृहामध्ये खाजगी सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करण्यात आली आहे काय? असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, जेथे पद रिक्त आहेत, तेथेच कंत्राटीपद्धतीवर सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करण्याचे आदेश आहेत. सुरक्ष रक्षक या संवर्गातील मंजूर पदांची संख्या एक आहे.

एकच पद मंजूर असेल तर रात्री सुरक्षा रक्षकाची जबाबदारी कोण पार पाडते? एकच सुरक्षा रक्षक आहे व त्याला कोषागार कार्यालयातही पाठविले जाते. आठ तासाची ड्युटी असेल तर तीन सुरक्षा रक्षक असणे आवश्यक आहे. यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सुरक्षा रक्षक हा रात्रीच्या वेळीच असतो. दिवसा इतर कर्मचारी असतात.

महिलांची वसतिगृहे असल्यामुळे तेथे २४ तास सुरक्षा रक्षक असणे आवश्यक आहे. सुरक्षा रक्षकाचे एकच पद असेल तर कंत्राटी पद्धतीने आणखी आवश्यक सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात यावी. सद्याचा सुरक्षा रक्षक हा केवळ दिवस पाळीसाठी आहे. याच कारणामुळे राज्यातील महिला वसतिगृहांमधील अनेक महिला पळून गेल्याची उदाहरणे आहेत. समितीला अधिकारी योग्य उत्तर देत नाहीत, समितीला अधिकाऱ्यांकडून थातूरमातूर उत्तर दिले जात आहे. केवळ रिक्त जागा भरण्याकरिता थातूरमातूर उत्तर देऊ नये. एवढे लेथर्जी राहून चालणार नाही. असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले.

ही महिलांची वसतिगृहे आहेत. त्यामुळे तेथे २४ तास सुरक्षा रक्षक असलाच पाहिजे. सुरक्षा रक्षकांबाबत विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, विभागाच्या परमनंट सुरक्षा रक्षकाला रात्री ड्युटी करण्याच्या सूचना देण्यात येतील आणि दिवसभरासाठी २ सुरक्षा रक्षकांची कत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्यात येईल. १ कायमस्वरुपी सुरक्षा रक्षक व २ कंत्राटी सुरक्षा रक्षक अशा एकूण ३ सुरक्षा रक्षकांना प्रत्येकी ८ तासाची कामाची वेळ ठरवून देण्यात येईल. ही कार्यवाही पुढील १ महिन्यामध्ये करण्यात येईल.

सुमारे ५०० कोटी रुपयांची दोन बांधकामे मंजूर करण्यात आली, यासाठी २०१४-२०१५ च्या बजेटमध्ये किती रक्कम मंजूर झाली आणि त्याच्या बांधकामाची परिस्थिती काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सन २०१४-२०१५ मध्ये २६ लाख रुपयांची तरतूद झाली होती व त्या रकमेमध्ये नुतनीकरण, संरक्षण भिंत आणि अंतर्गत रस्त्यांची कामे करण्यात आली.

या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, विभागाने बांधकामाकरिता ४ कोटी ६० लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता दिली. तसेच विभागाने दुसरी प्रशासकीय मान्यता ४ कोटी २५ लाख रुपयांची दिली. या बजेटची सद्याची स्थिती काय आहे. यावर विभागीय प्रतिनीधीनी सांगितले की, सन २०१४-२०१५ मध्ये २६ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती.

असे असेल तर ते बांधकाम करण्यास ५० वर्षे लागतील. बांधकाम करायचे असेल तर पैसे उपलब्ध करून दिले पाहिजे व तसे नसेल तर प्रशासकीय मान्यता दिली असल्याची माहिती समितीला का देत आहात? याकरिताची प्रशासकीय मान्यता २०११ मधील आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सन २०१६-२०१७ मध्ये १ कोटी रुपये मिळालेले आहेत. दर वर्षी बांधकाम होईल त्या प्रमाणात ग्रँट मिळते.

ग्रँट नसल्यामुळेच बांधकाम रखडलेले आहे? असा प्रश्न समितीने विचारला असता विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही.

दोन्ही बांधकामे १० कोटी रुपयांची आहेत. सन २०११ मधील सीएसआर आणि सन २०१७ च्या सीएसआरमध्ये कमीतकमी २५ टक्के वाढ झाली असेल. त्यादृष्टीने हे बांधकाम १० ते १२ कोटी रुपयांचे असून ते पुढील दोन, तीन वर्षांमध्ये पूर्ण होईल, अशा पद्धतीने वाटचाल सुरू केली पाहिजे असे समितीने सुचित केले.

२.७० या आस्थापनेवर अधिकारी/कर्मचारी यांची किती पदे मंजूर आहेत? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यासंदर्भात पॅटर्न निश्चित केलेला आहे. अधीक्षक, अवल कारकून, कारकून आणि शिपाई संवर्गातील केअर टेकर यांची पदे असतात. विभागाने राज्यातील वसतिगृहांना भेटी द्याव्यात व त्याची माहिती समितीस सादर करावी असे निदेश समितीने दिले त्यानुसार विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती खालीलप्रमाणे आहे.

या वर्षात खालील शासकीय संस्थांना भेटी देण्यात आलेल्या आहेत.

अ.क्र. (१)	संस्थेचे नाव (२)	भेटीचा दिनांक (३)	भेट देणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव/कार्यालयाचे नाव (४)
१	प्रेरणा महिला वसतीगृह, बारामती, पुणे	२३/०६/२०१७	श्रीम.आर.आर.मोरे, परिवीक्षा अधिकारी, जिल्हा महिला व बालविकास कार्यालय, पुणे
२	महिला राज्यगृह मुंढवा, पुणे	१९/०६/२०१७	श्रीम.आर.आर.मोरे, परिवीक्षा अधिकारी, जिल्हा
		२०.६.२०१७	महिला व बालविकास कार्यालय, पुणे
			मा.श्री.लहुराज माळी, आयुक्त, महिला व बाल-विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
३	तेजस्वीनी महिला वसतीगृह, कोल्हापूर	२२/०६/२०१७	श्री.एम.एन.मस्के, जिल्हा महिला व बालविकास, कोल्हापूर
४	रेणूकामाता महिला राज्यगृह, सोलापूर	२४/०६/२०१७	श्रीमती आर एल जमादार, परिवीक्षा अधिकारी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, सोलापूर
५	आशाकिरण महिला वसतीगृह, कराड, सातारा	२३/६/२०१७	श्री.एस.बी.शिंदे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, सातारा
६	प्रतिभा महिला वसतीगृह, रत्नागिरी	१८/६/२०१७	श्री.आर.आर.कागणे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, रत्नागिरी
७	शासकीय नवजीवन महिला वसतीगृह, चेंबूर, मुंबई	२२/६/२०१७	श्रीमती सपना प्रदीप यंदे, प.अ. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मुंबई उपनगर
८	कस्तुरबा महिला वसतीगृह, चेंबूर, मुंबई	१९/६/२०१७	श्री.मनोज एस.पाटणकर जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, श्रीमती ओव्हाळ प.अ. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मुंबई उपनगर
९	अंकुर महिला वसतीगृह, सिंधुदुर्ग	२९/६/२०१७	श्री. रसाळ, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, सिंधुदुर्ग शासकीय कृपा महिला वसतीगृह, कर्जत जि.रायगड २३/६/२०१७ श्री. एम. डी. गायकवाड, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी
११	शांतीसदन महिला वसतीगृह, उल्हासनगर, जि.ठाणे	१८/६/२०१७	श्री.अजय फडोळ जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, जि.ठाणे.

(१)	(२)	(३)	(४)
१२	वात्सल्य महिला वसतीगृह, नाशिक	१७/६/२०१७	श्री. एम. एन्न. ताजन्नपूरे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, नाशिक.
१३	आशादिप महिला वसतीगृह, जळगाव	१७/६/२०१७	श्री. रमेश बी. काटकर, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, जळगाव
१४	ममता महिला वसतीगृह, धुळे	१७/६/२०१७	डॉ. वनिता सोनगत, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, जि. धुळे.
१५	शासकीय महिला राज्यगृह, अकोला	२१/६/२०१७	श्री. नितीन मोहुले, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, अकोला
१६	सावित्रीबाई शासकीय महिला राज्यगृह, औरंगाबाद	२१/०६/२०१७	श्री. अशोक शिंदे, प.अ. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, औरंगाबाद.
१७	मता अनुसया महिला राज्यगृह, नांदेड	२३/६/२०१७	श्री. धर्मपाल शाहू, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, नांदेड.
१८	शांतीकुंज महिला राज्यगृह, जालना	१७/६/२०१७	श्री. ए. ए. राठोड, परिवीक्षा अधिकारी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, नांदेड.
१९	करुणा महिला वसतीगृह , नागपूर	२२/६/२०१७	श्री. ए. डी. बांदूरकर, परिवीक्षा अधिकारी, जिल्हा महिला व बालविकास कार्यालय, नागपूर.
२०	प्रियदर्शनी महिला वसतीगृह, नागपूर	२२/६/२०१७	श्री. ए. डी. बांदूरकर, परिवीक्षा अधिकारी, जिल्हा महिला व बालविकास कार्यालय, नागपूर.
२१	सरस्वती महिला वसतीगृह, नागपूर	२२/०६/२०१७	श्री. ए. डी. बांदूरकर, परिवीक्षा अधिकारी, जिल्हा महिला व बालविकास कार्यालय, नागपूर.
२२	विद्या महिला वसतीगृह, लातूर	१९/६/२०१७	श्री. वैभव सुर्यवंशी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी व व्यंकट देवकर, परिविक्षा अधिकारी.

उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने विचारणा केली की, जून महिन्यात अनेक वसतिगृहांना भेटी देण्यात आलेल्या आहेत. त्या भेटीमध्ये काय आढळून आलेले आहे? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, मुंडवा येथील वसतिगृहाला त्यांनी स्वत: भेट दिली होती. भेटीच्या वेळी तेथील संस्थेत स्वच्छता असल्याचे आढळून आले आहे. वसतिगृहासाठी पुरेशी जागा आहे. सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे सादर केला होता. परंतु, तो अद्याप मंजूर झालेला नाही. तेथे पाण्याची पुरेशी व्यवस्था आहे, स्वयंपाक तयार करण्यासाठी गॅसचा वापर केला जातो. आग प्रतिबंधक यंत्रणा बसविण्याचा प्रस्ताव सादर केलेला नाही, तो प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. संस्थेमध्ये गरम पाण्यासाठी गिझरची व्यवस्था नाही. गिझर बसवून घेण्यासाठी संस्था प्रयत्नशील आहे. ही सर्व शासकीय वसतिगृहे आहेत.

२.७१ प्रेरणा महिला वसतिगृह तेजस्वीनी महिला वसतिगृह, कोल्हापूर हे शासकीय वसतिगृह आहे. मग तेथे गिझर न बसविण्याचे कारण काय आहे? विभागाने सांगितले की, संस्था गिझर बसवून घेण्यासाठी प्रयत्न करीत आहे. वसतिगृहामध्ये सोईसुविधा पुरविणे हे शासनाचे कामच आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यासाठी निधी उपलब्ध करून देणे हा एकच भाग आहे. विभागाने त्यांच्या स्तरावर त्यांना बीडीएसद्वारे निधी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. कारण, ५० हजारापेक्षा कमी रकमेसाठी परवानगीची आवश्यकता नसते. स्थानिक पातळीवर कोटेशन बेसिसवर तो निधी खर्च करता येतो. निधी उपलब्ध करून देण्याचा विषय आहे. त्यांना निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

या सर्व शासकीय वसतिगृहांमध्ये ज्या उणिवा आढळून आलेल्या आहेत त्या दूर करण्यासाठी कोणते प्रयत्न केलेले आहेत? समितीने निर्देश दिले होते की, "राज्यातील अशा वसतिगृहांना भेटी देऊन पुढील बैठकीमध्ये त्याबाबतची माहिती समितीला सादर करावी." जे महालेखाकारांचे आक्षेप आहे त्याबद्दल विभागाने पुढील कार्यवाही प्रस्तावित केली पाहिजे. त्यासाठी लागणाऱ्या निधीची शासनाकडे मागणी केली पाहिजे. असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी समितीचा मुद्दा मान्य केला व समितीस अवगत केले की, गॅलरीमध्ये सीसीटीव्ही बसविणे,

गार्डची संख्या वाढविणे, खाजगी गार्डची नियुक्ती करणे अशा सूचना समितीने दिल्या आहेत. असे जे धोरणात्मक विषय आहेत ते विभागाच्या स्तरावर घेण्यात आलेले आहेत.

अधिकारी वसतीगृहाला भेट करीत नाहीत असा आक्षेप होता. आणि जेव्हा भेट दिली त्या वेळी ज्या त्रुटी आढळून आलेल्या आहेत. त्या दूर करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. कारण, ही शासकीय वसतिगृहे आहेत. असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यासाठी ॲक्शन प्लॅन तयार करण्यात येत आहेत. त्रुटींचे निवारण देखील करण्यात येत आहे. We will finish it within three months depending on availability of money हे किरकोळ विषय आहेत.

२.७२ चेंबूर येथील वसतीगृहात मध्यंतरी स्वच्छता नसल्यामुळे तेथील इनमेटस् बाधित झाले होते, अशा प्रकारच्या बातम्या टीव्हीवर दाखविण्यात आल्या होता. तेथील कर्मचारी उपोषणासाठी बसले होते, तेथील इनमेटस् बाधित झाल्यामुळे त्यांना हॉस्पीटलमध्ये भरती केले होते म्हणून ते उपोषणाला बसले होते. आणि विभागाकडून दावा करण्यात येत आहे की, स्वच्छता केली होती, स्वच्छता केली असती तर त्यांना हॉस्पीटलमध्ये कशासाठी न्यावे लागले असते. हा मुद्दा समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी सदर बाब मान्य केली व सांगितले की, चेंबूर येथे अग्निशमन यंत्रणा नाही किंवा सीसीटीव्ही कॅमेरे बसविले नाहीत त्याबाबत संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत. तसेच जेव्हा बातमी आली होती त्या आधारावर तातडीने ॲक्शन घेण्यात आली होती. तसेच कायम स्वच्छता ठेवली जात नाही. त्याबाबत आम्ही पुन्हा खात्री करून घेण्यात येईल व यामध्ये सुधारणा करण्यात येईल असे अश्वस्त केले.

विभागाकडून वसतीगृहाला भेटी देताना संबंधीत संस्थेला न सांगता रॅन्डमली भेटी झाल्या पाहिजेत. म्हणजे तेथे जे प्रश्न आहेत, त्याबाबत खरी वस्तुस्थिती कळेल. जर वसतीगृहाला कल्पना देऊन गेला तर तेथे सर्व चकाचक असेल. स्वच्छता होत नाही म्हणून तक्रारी आल्या होत्या. महालेखापालांच्या परिच्छेदामध्ये तोच आक्षेप होता. या विषयाचे गांभीर्य दिसत नाही असे समितीने नमूद केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, हा सर्व व्हीजीटचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात not only in our own institutions but also in private institutions भेटी वगैरे सगळ्या केल्या आहेत.

इन्स्पेक्शन झाले, ऑब्झर्वेशन तुम्हाला मिळाले, त्यामुळे पुढील कारवाई झाली पाहिजे. शुल्लक गोष्टीचे तातडीने निवारण झाले पाहिजे. १० ते २५ लाख रुपयांचा खर्च असेल, गिझर, लाईटचे बल्ब, लहान सहान दुरुस्ती असेल त्याची व्यवस्था तातडीने केली पाहिजे. हजारो कोटी रुपयांचा बजेट महिला व बालविकास विभागाचा आहे. या विभागाच्या बजेटला कट नाही, निधीची कमतरता नाही असे मत समितीने व्यक्त केले.

२.७३ परिच्छेद क्र. ४.१.१२ "एकात्मिक बालविकास सेवाची अंमलबजावणी".

२.७४ ४.१.१२.१ कुपोषण :

अमरावती व मुंबई या दोन जिल्ह्यांमध्ये कुपोषित मुलांच्या टक्केवारीचे प्रमाण अधिक असल्याचे आढळले आहे, असा महालेखाकार यांचा सन २०११-१२ मधील आक्षेप आहे. ९ जिल्ह्यांमध्ये कुपोषणाचे प्रमाण घटले व २ जिल्ह्यांमध्ये वाढले. या २ जिल्ह्यांमध्ये हे प्रमाण वाढण्याचे कारण काय? This is inefficiency of Government machinery. What is the reason? म्हणजे पुरविलेले अन्न दर्जेदार नव्हते की दुसरे काही कारण आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, एकात्मिक बालविकास योजनेची अंमलबजावणी करताना मुंबई व अमरावती या दोन जिल्ह्यांमधील मुलांच्या वजनामध्ये घट आलेली आहे. मुंबई शहरामध्ये सातत्याने येणारे किंवा स्थलांतरित होणारे लोक असल्यामुळे काही वेळा असे निदर्शनास आले आहे की, मुलांचे वजन कमी झालेले आहे किंवा त्यांची कुपोषणाची टक्केवारी जास्त आहे. अमरावतीमध्ये देखील मेळघाटच्या भागामध्ये पावसाळ्यामध्ये काही वेळा न्युमोनिया किंवा डायरियासारखे आजार उद्‌भवल्यामुळे तेथे टक्केवारी वाढलेली आहे. नंतरच्या कालावधीमध्ये ती टक्केवारी कमी झालेली आहे.

मेळघाटाबाबतची जी कारणे सांगितली ती गडचिरोली तसेच चंद्रपूरलादेखील लागू आहेत. तेथेही जंगल आहे, आदिवासी आहेत, दूर्गम भाग आहे. गोंदिया जिल्ह्याच्या काही भागातही लागू आहे. तेथे ही परिस्थिती झाली नाही. फक्त मेळघाटमध्ये विशेषकरून झाली. जर अहवालातील पुढील परिच्छेद पाहिले तर न्युट्रीनचा प्रॉब्लेम, मुलांना जो पौष्टिक आहार मिळावयास हवा होता तो मिळाला नाही याचादेखील उल्लेख आहे. म्हणून विभागाने सांगितलेल्या कारणामुळे अमरावतीमध्ये कुपोषण झाले असे कसे म्हणता येईल? असा मुद्दा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सर्वसाधारणपणे जी कारणे निदर्शनास आली आहेत त्यामध्ये याचा उल्लेख आहे. काही वेळी त्या ठिकाणी अशी परिस्थिती आहे की, टक्केवारी तेथे जास्त आहे.

विभागीय प्रतिनिधींनी समितीस जी कारणे सांगितली त्याशिवाय तेथील मुलांना चांगला आहार मिळाला नाही, शासकीय मशिनरीचे, अधिकारी, विभाग, डॉक्टर, तेथे द्यावयाच्या भेटी, तसेच आहाराची गुणवत्ता तपासली गेली पाहिजे होती परंतु सी.डी.पी.ओ. यांनी तपासली नाही

ही देखील काही कारणे आहेत. परंतु विभागाकडून त्याबद्दल काहीच बोलले जात नाही. जे कारणे सांगतली आहेत ती वस्तुस्थितीला धरून नाहीत असे समितीचे मत आहे. यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, प्रामुख्याने अमरावती जिल्ह्यामधील आदिवासी विभाग हा धारणी व चिखलदरा तालुक्यांमध्ये आहे. मागील तीन वर्षांचा अभ्यास करता व सन २०११-१२ चा अहवाल पाहिल्यास एक गोष्ट लक्षात येत आहे की, कुपोषणाच्या प्रमाणामध्ये सायक्लिक पॅटर्न स्पष्ट दिसत आहे. या प्रमाणामध्ये होणारी पिकिंग ऑगस्ट महिन्यामध्ये असते. उन्हाळा तसेच हिवाळा म्हणजे ऑक्टोबरनंतर एवढे प्रमाण नसते. ऑगस्टमध्ये कुपोषणाचे सर्वात जास्त प्रमाण दिसते. याची प्रामुख्याने तीन कारणे आहेत. पावसाळा हे एक कारण आहे. दुसरे म्हणजे बाहेरुन येणारी मुले. धारणी, चिखलदरा येथील स्थलांतरित लोक छिंदवाडा भागामध्ये जातात. पावसाळ्यामध्ये हे लोक परत येतात. त्यावेळी त्यांना बाहेर काम मिळत नाही. विभागाच्या सर्वेक्षणानुसार या काळात अंगणवाडीमध्ये मुलांची संख्या अचानक वाढते. हे प्रमाण वाढत असल्यामुळे ऑगस्ट महिन्यामध्ये कुपोषणाची पिकिंग असते. यानंतर प्रमाण थोडे कमी होते. याची दोन प्रमुख कारणे आहेत. दिवाळीनंतर स्थलांतरित लोक बाहेर जातात. तेव्हा अंगणवाडीतील मुले कमी होतात. स्थलांतरित लोकांचे परत येणे व जाणे हे कुपोषणाच्या मूळ कारणांपैकी एक आहे. उच्च न्यायालयाने सन २०११-१२ पासून लहान मुलांना जो टी.एच.आर. म्हणजे सुका आहार देण्यात येत होता तो न देता त्यांना फक्त गरम आहार देण्याबाबत आदेश दिले आहेत. त्यामुळे या आदेशान्वये मुलांना गरम अन्न देण्याशिवाय पर्याय नाही. टी.एच.आर. हा घरी साठविता येतो व जाताना महिना दोन महिन्यांचा आहार सोबत घेवून जाऊ शकतात.

२.७५ ही परिस्थिती सन २०११-१२ मधील आहे. उच्च न्यायालयाचे आदेश सन २०११-१२ नंतर लागू झाले. सन २०११-१२ मधील स्थिती जुन्या पद्धतीनुसारच होती का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०११-१२ मध्येच उच्च न्यायालयाचे आदेश आले आहेत. हा विषय झाला तेव्हा धारणी व चिखलदरा या दोन तालुक्यांमध्ये गरम आहारच मिळत होता.

सन २०११-१२ मध्ये लेखापरीक्षण करण्यात आले. हा सन २००८-११ पर्यंतचा विषय आहे. त्यावेळी उच्च न्यायालयाचे निर्देश लागू नव्हते. विभागाला जर उच्च न्यायालयाचा विषय घेवून बोलायचे असेल तर ते पुढच्या वर्षाच्या बाबतीत बोलू शकतील. पण यामध्ये उच्च न्यायालयाचा काही संबंध नाही. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता सदर बाब विभागीय सचिवांनी मान्य केली व समितीस अवगत केले की, सन २०१० मध्ये संपूर्ण महाराष्ट्रामध्ये टी.एच.आर. सुरू झाला. सन २०१२ नंतर अमरावतीच्या या दोन तालुक्यांमध्ये नाही. बाकी इतर ठिकाणी केवळ हॉट मिल मिळत आहे. हॉट मिल घेण्यासाठी ६ महिन्यांपासून ६ वर्षांपर्यंतच्या मुलांना अंगणवाडीमध्ये यावे लागते. जेवढी मुले येतात ती सिस्टममध्ये कव्हर होतात. स्थलांतरित होऊन जर ते बाहेर गेले तर त्यांना कव्हर करता येत नाही. ते देखील कुपोषणाचे मोठे कारण आहे. ऑगस्टमध्ये पिकिंग होते हे नंतरच्या विभागाच्या वार्षिक अहवालामध्ये दिसत आहे.

वास्तविक पाहता तपासणी करणे, आहार देणे किंवा इतर सर्व गोष्टी करणे हे विभागातील अधिकाऱ्यांचे काम आहे. पण ते तेथे राहत नाहीत. उंटावरुन शेळ्या हाकणे जसे म्हणतो आपण तशी परिस्थिती आहे. ते राहायला परतवाडा, अचलपूर किंवा दर्यापूरला असतात. याबाबत ज्या तपासण्या झाल्या पाहिजेत किंवा काळजी घेतली पाहिजे त्या फक्त कागदावर घेण्यात येतात. अधिकाऱ्यांनी जी कारणे सांगितली या कारणामुळे होत आहे ही वस्तुस्थिती १०० टक्के नाही. याला विभागाचा निष्काळजीपणा हे देखील कारण आहे. दुर्गम भाग असल्यामुळे विभागातील अधिकारी तेथे जाणे व सर्व गोष्टी करणे पसंत करत नाहीत. काही भागात अशी परिस्थिती आहे की, तेथे अधिकारी अल्टरनेट डयुटी करतात म्हणजे १५ दिवस एक असतो, दुसरा १५ दिवस सुट्टी मारतो व त्यानंतर १५ दिवस तो जातो. म्हणजे १५-१५ दिवस गायब असतात. इ. बाबी समितीने विभागाच्या निदर्शनास आणल्या व या अनुषंगाने विचारणा केली की, आता समितीने सांगितलेली उपरोक्त कारणे तपासली का की याच कारणामुळे होत आहे, यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, अंगणवाडयामध्ये दिल्या जाणाऱ्या गरत आहाराबाबत मॉनिटरींग आणि इव्हॅल्यूएशन फार कठीण आहे. याचे मूळ कारण हे आहे की, हा आहार तेथेच शिजवून दिला जातो. बचत गटांच्या माध्यमातून असो किंवा अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून असो. या आहाराची शेल्फ लाईफ आठ तासांची आहे. म्हणजे सकाळी अन्न शिजवले तर त्याला दुपारपर्यंत संपवावे लागते. जरी नमुना घेवून अमरावती येथे किंवा शासकीय प्रयोगशाळेमध्ये आणले तर त्यामध्ये एवढा वेळ जातो की, त्याचा दर्जा तपासणे अवघड जाते. मॉनिटरींग आणि इव्हॅल्यूएशन हा विषय यामध्ये नक्कीच आहे.

स्थलांतरामुळेच हे प्रमाण जास्त आहे. मुंबईची परिस्थिती अमरावतीपेक्षा जास्त खराब आहे. मुंबई याबाबतीत उच्चांकावर आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता वित्त सचिवांनी याबाबत खुलासा केला की, यामध्ये दर्जाचा प्रश्न आहे. दर्जाबाबतचा मुख्य प्रश्न आहारामध्ये दाळ कमी असणे हा आहे. खिचडी किंवा उसळमध्ये प्रोटीनची मात्रा जास्त असणे अपेक्षित आहे, परंतु ही मात्रा कमी असते. डाळ असली तर ती अगदी पातळ असते किंवा खिचडीमध्ये डाळीचे प्रमाण फार कमी असते. जवळजवळ तो कार्बोहायड्रेट म्हणजे भात असतो. त्यामध्ये केवळ हळदीचे पाणी टाकले जाते. त्यामध्ये प्रत्यक्ष प्रोटिन कमी असणे हा मुख्य दोष आहे. जेव्हा कोणीतरी पालक किंवा पर्यवेक्षण अधिकारी जातात व त्या जेवणाची चव घेतात त्यावेळी लगेच लक्षात येते. यामध्ये लोकांचा सहभाग असण्यासाठी माता समिती निर्माण केलेल्या आहेत. त्यांनी या अँगलने दर्जाकडे लक्ष देण्यासाठीच त्यांची निर्मिती करण्यात आलेली आहे. कारण हा दररोजचा प्रश्न आहे. जरी फिरत्या लॅब किंवा काहीही केले तरी ते केवळ सँपल बेसिसवर करतात.

२.७६ आजच्या घडीला प्रयोगशाळेची देखील व्यवस्था नाही म्हणून समितीने फिरती प्रयोगशाळा केल्यास चांगले होईल, असे सांगितले. ज्याप्रमाणे आता वित्त सचिवांनी सांगितले की, प्रोटीनची मात्रा कमी आहे. हे जर नजरेने देखील लक्षात येते तर यासाठी प्रयोगशाळेची गरज नाही असे मत समितीने व्यक्त केले असता वित्त सचिवांनी समितीस सांगितले की, यामध्ये स्थानिक पर्यवेक्षण आवश्यक आहे. तसेच गावातील समिती, मातांची समिती यांचे पर्यवेक्षण पाहिजे.

जेवणामध्ये डाळ नसते, फक्त पाणी असते. फक्त हळदीचे पाणी टाकण्यात येते. याप्रकारे जी प्रोटिनची कमतरता असते ती लगेच आढळून येते. पण तेथे राहणारी अंगणवाडी सेविका कुपोषित होत नाही. असे मत समितीने खेदाने व्यक्त केले.

मुंबईमध्ये कुपोषणाचे सर्वात प्रमाण जास्त आहे. याचे कारण फक्त स्थलांतरण आहे की दुसरे काही कारण आहे? कारण राज्याच्या राजधानीमध्ये एवढे मोठ्या प्रमाणावर कुपोषण असेल तर उर्वरित राज्याचे काय? मुंबईमध्ये ठाणे जिल्ह्याचा देखील समावेश आहे का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मुंबईमध्ये मुंबई शहर व मुंबई उपनगर यांचा समावेश आहे. यामध्ये महिला व बालविकास विभागाचे एकूण ३३ प्रकल्प आहेत.

मुंबईमध्ये प्रत्येक स्लममध्ये महिला व बालविकास विभागाच्या अंगणवाडया आहेत. मुंबईमध्ये प्रामुख्याने दोन मोठ्या अडचणी आहेत. फ्लोटिंग पॉप्युलेशन आणि स्थलांतरीत लोकसंख्या हे विषय आहेतच, परंतु याव्यतिरिक्त दुसरा विषय असा आहे की, जेवण देण्यासाठी तेथील स्थानिक बचत गटांवर अवलंबून आहेत. तसेच मुलांना घरातून किंवा इतर जो पौष्टिक आहार मिळत आहे तो ग्रामीण भागातील जेवणासारखा भाजी-पोळी या स्वरुपात नसतो. कुरकुरे, चिप्स, मॅगी यासारख्या जंक फूडवर येथील मुले अवलंबून असतात. अंगणवाडी तसेच घरातून देखील पाहिजे त्या प्रमाणात पौष्टिक आहार मिळत नसल्यामुळे मुंबईमध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे. तसेच पाण्याशी संबंधित व इतर रोगांचे प्रमाणदेखील मुंबईमध्ये जास्त आहे.

२.७७ भारतात कमी वजनाच्या मुलांच्या संदर्भात महाराष्ट्र पाचव्या क्रमांकावर असल्याचे सांगितले आहे. यामध्ये २.३३ हा आकडा कसा आला? यामध्ये बिहार २५ टक्के, चंदीगड ७ टक्के, ओडिसा ३.७५ टक्के, गुजरात २.७७. महाराष्ट्राचा २.३३ हा आकडा कसा आला आहे? ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, इतर राज्यांच्या तुलनेमध्ये महाराष्ट्र पाचव्या क्रमांकावर आहे. भारत सरकारच्या आरोग्य विभागाकडून कमी वजनाच्या मुलांबाबत माहिती प्रसारित करण्यात येते. त्यामध्ये राज्यनिहाय माहिती असते व यामध्ये महाराष्ट्राचा क्रमांक पाचवा आहे. सन २०११ च्या भारत सरकारने प्रमाणित केलेल्या माहितीमध्ये महाराष्ट्रामध्ये नोंदणी केलेल्या कमी मुलांची माहिती आहे.

सन २०१६-१७ साली ही टक्केवारी किती आहे, यामध्ये महाराष्ट्र २.३३ पेक्षा खाली गेला आहे का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सध्या कुपोषणाच्या परिस्थितीमध्ये महाराष्ट्र भारतात तिसऱ्या क्रमांकावर आहे. परंतु, याबाबत कमी वजनाच्या मुलांबाबतची माहिती आरोग्य विभागाकडून घेवून सादर करण्यात येईल असे आश्वासित केले. तसेच कुपोषणाबाबत संपूर्ण भारतामध्ये महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्रापेक्षा केरळ व तामिळनाडू राज्यामध्ये चांगली परिस्थिती आहे.

मागील वेळी एग्झिट कॉन्फरन्समध्ये सांगितले होते की, २० टक्क्यांच्या वर असलेले कुपोषण १५ टक्क्यांवर आणण्यात येईल. सध्या याची परिस्थिती काय आहे? याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सध्या कुपोषणाच्या बाबतीत महाराष्ट्र १९ टक्क्यांवर आहे. यामध्ये महाराष्ट्राचे आदिवासी व बिगर आदिवासी असे दोन विभाग करण्यात आलेले आहेत. बिगर आदिवासी विभागाची परिस्थिती बरी आहे, परंतु एकंदरीत फक्त आदिवासी विभाग पाहिला तर तेथे कुपोषणाची टक्केवारी २४ किंवा २५ पर्यंत आहे. एकूण महाराष्ट्राची परिस्थिती पाहता ही टक्केवारी १९ आहे.

एक्झिट कॉन्फरन्सच्या वेळी म्हणजे सन २०११ मध्ये ही टक्केवारी १५ टक्क्यांवर खाली आणणार असल्याचे सांगण्यात आले होते. विभागाने हे सन २०११ मध्ये सांगितले होते आता सन २०१७ मध्ये चालू आहे. अजूनही १९ टक्क्यांवर आहे. त्यामुळे पुढील किती वर्षामध्ये १५ टक्क्यांवर पोहोचणार अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, १५ टक्के हे फारच म्बिशीअस आहे. यामध्ये अर्धा अर्धा टक्का सुद्धा कमी करण्यासाठी फार मेहनत करावी लागते.

पण यापूर्वी तसे करणार असल्याचे विभागाने एक्झिट कॉन्फरन्सच्या वेळी या समितीला सांगितले आहे. येथे समितीने लक्ष वेधले असता विभागीय सचिवांनी समितीचे मत मान्य केले व सांगितले की, १५ टक्के हे फारच म्बिशीअस आहे. उस समय हम २१ प्रतिशत पर थे, अब १९ प्रतिशत पर आ गए है. आधा अधा प्रतिशत कम करने में भी बहुत मेहनत लगती है.

आदिवासी विकास विभागाचे तसेच कर्मचारी कार्यालयाच्या बाहेर निघालो तर या कामकाजाची गती वाढू शकेल. जोपर्यंत विभागाचे अधिकारी फिल्डवर जाऊन काम करणार नाहीत तोपर्यंत काही उपयोग होणार नाही. त्यावेळच्या अधिकाऱ्यांनी सांगितले होते की, १५ टक्क्यांवर आणू. पण सद्यःस्थितीत यांचा अनुभव असा आहे की, अर्धा अर्धा टक्का सुद्धा खाली येणे सोपे नाही. ज्या प्रमाणात प्रत्येक जिल्ह्याला निधी देतो

किंवा आहार पुरवितो. परंतु त्याच मॉनिटेरिंग न केल्यामुळे विभागाला पाहिजे तसे रिझल्ट मिळत नाही असेच थोडक्यात म्हणावे लागेल. यामध्ये डीएचआर योजनेचा आहार असो किंवा शालेय पोषण आहार व्यवस्थितपणे पुरविला जावा. फक्त अंगणवाडी सेविकांचे पोट भरायचे किंवा त्या ठेकेदाराचे पोट भरायचे करून चालणार नाही. हा आहार संबंधितांपर्यंत पोहोचला नाही तर कसे होईल. विभागाने समितीस जो हजेरीपट दाखविला आहे त्यानुसार तो ५० टक्के सुद्धा दिसत नाही. इनरोलमेंट असले तरी ५० टक्के हजेरी नाही. पण यामध्ये असे दिसून येते की, मदतनीसापासून ते अंगणवाडी सेविकांपर्यंत सर्वांचे कुपोषण संपले आहे असे मत समितीने व्यक्त केले.

२.७८ विशेषतः आदिवासी जिल्ह्यांमध्ये जेथे जास्त प्रमाणात कुपोषण आहे तेथे लक्ष केंद्रित करण्याच्या दृष्टीने शासनाची पुढील कालखंडामध्ये कोणती योजना आहे. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी माहिती दिली की, मुलांना जे दोन प्रकारचे जेवण दिले जाते त्यामध्ये एक टीएचआर आणि दुसरे हॉट मिल आहे. मध्यंतरीच्या काळात टीएचआरच्या दर्जाबाबत फार मोठा प्रश्न निर्माण झाला होता. त्यामध्ये क्वॉलिटी आणि क्वान्टीटीचा विषय होता. यासंबंधी निर्मितीच्या प्रक्रियेपासून डिलिव्हरीच्या मेकॅनिझममध्ये आता बदल केला आहे. त्यामुळे यामध्ये बऱ्यापैकी सुधारणा करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. दुसरा प्रश्न क्वॉलिटी, इन्स्पेक्शन आणि मॉनिटेरिंगचा होता. त्यासंबंधी केंद्र शासनाने एन.ए.बी.एल. लॅबकडे तपासणी करावी अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत. मात्र त्यांच्याकडे अशा प्रकारची तपासणी केल्यानंतर त्यातून फारसा चांगला अनुभव आला नाही. कारण त्याचे सर्टिफिकेशन ज्या पद्धतीने हवे तशा पद्धतीचे टेस्टींग होते तसा विभागाला अनुभव आला नाही. त्यानंतर शासनाचे सन २०१५ मध्ये खरेदी विषयक धोरण निश्चित झाले व त्या धोरणानुसार असे अभिप्रेत आहे की, शासनाच्या स्वतःच्या मालकीच्या किंवा शासनाचे अनुदान प्राप्त असलेल्या विद्यापीठांमध्ये जे बायो टेक्नॉलॉजी विभाग आहेत त्यांना हे टेस्टींगचे अधिकार देण्यात आले आहेत. आता इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल इंजिनिअरींग, चेंबूर, व्ही.एन.आय.टी.नागपूर, बाटू म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर युनिव्हर्सिटी, पुणे अशा प्रकारच्या जी विद्यापीठे आहेत त्यांच्याकडे स्टेट ऑफ आर्ट लेबॉर्टरीज आहेत. त्यांनी ६-६ कोटी केंद्र शासनाकडून युजीसी अंतर्गत अनुदान घेऊन विभागाच्या विनंतीनुसार त्यांच्या लेबॉर्टरीज अपग्रेड केलेल्या आहेत. त्यांच्यासोबत आता एम.ओ.यू. करण्यात येत आहे की, महाराष्ट्रामध्ये जेवढी विद्यापीठे आहेत आणि त्यांच्याकडे या लेबॉर्टरीज सर्व सुविधांयुक्त आहेत त्यांच्याकडूनच टेस्टींग करून घेण्याचा मानस आहे आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागाची मदत घेऊन या विद्यापीठांसमवेत आणि त्यांच्या लेबॉर्टरीजसमवेत एम.ओ.यू. करण्याच्या मार्गावर विभाग आहे, so that they do the laboratory testing for us. त्यामुळे कमर्शिअल किंवा खुल्या बाजारातील टेस्टींगपेक्षा चांगला निकाल विद्यापीठांच्या लेबॉर्टरीज देतील अशा प्रकारची विभागाची अपेक्षा आहे. हा विषय टीएचआरच्या क्वॉलिटीबाबतचा आहे. हॉट मिलबाबतचा दुसरा विषय समितीने उपस्थित केला त्याबाबत असे आहे की, अंगणवाडी सेविकांबाबत थोडे आक्षेप आहेत की, ज्या पद्धतीने त्यांनी जसे जेवण पुरविले पाहिजे तसे त्या देत नाहीत. दुसरे असे की, बचत गटांनी दिलेले जेवण सुद्धा समाधानकारक नाही. यासंबंधी मागच्या वर्षी अनेक प्रयोग करण्यात आले. यामध्ये जर प्रिमिक्स जेवण दिले तर त्यामध्ये क्वॉलिटी मेन्टेन्ड येईल. त्यात ऑईलचे प्रमाण आणि डाळीचे प्रमाण हे प्रिमिक्स करून राखण्यात यावे याचा विचार करण्यात आला. न्युट्रेशन बोर्ड ऑफ इंडियाकडून यासंबंधी माहिती घेण्यात आली आहे. त्यानुसार तो एक ऑप्शन उपलब्ध आहे. तो ऑप्शन विभागाने माननीय मुख्यमंत्री, मंत्री, महिला व बालविकास यांना सांगितला की, this is an option which can be used in rural Maharashtra. त्याबाबत विचार सुरू असून त्यास मान्यता मिळाली तर किमान प्रिमिक्स जेवण तेथे दिले तर खिचडी वगैरे त्या ठिकाणी तयार करून विद्यार्थ्यांना देता येईल. तेथे फक्त त्यांनी शिजवायचे काम आहे.

हे प्रिमिक्स जेवण देणार आहात ते हॉट वॉटरमध्ये टाकून त्याची टेस्टींग करण्यात आली आहे किंवा कसे? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, टेस्टींग केलेली आहे. हे करीत असताना त्यात तीन मुद्दे विचारात घेतले. एक तर त्याचे प्रोटीन कन्टेन्ड टिकतात किंवा नाही हे तपासले. दुसरे म्हणजे त्याची चव आणि तिसरे म्हणजे ते ॲक्सेप्टेबल इन महाराष्ट्र याबाबत तीन पायलट प्रोजेक्ट करून पाहिले आहेत. एक पायलट प्रकल्प पालघरमध्ये, दुसरा पायलट प्रकल्प टाटा ट्रस्टच्या माध्यमातून आणि तिसरा पायलट प्रकल्प मुंबईच्या स्लम एरियामध्ये केला आहे.

या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, असे करण्याची कारणे कोणती आणि लेबॉर्टरी टेस्टींगमधील रिझल्ट कसे आहेत. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, मुलांना ते आवडते. जे सॅम्पल टाटा ट्रस्ट, जेएसडब्ल्यू यासारख्या प्रायव्हेट ऑर्गनायझेशन्सने दिले आहेत ते सॅम्पल्स अगदी बरोबर आहेत. विशेष म्हणजे मुलांना ते आवडले सुद्धा. चवही बरोबर आहे. लोकल व्हेरीएशनमुळे त्यामध्ये चवही डजेस्ट करता येते. कधी मीठ कमी किंवा जास्त झाले असेल तर ते डजेस्ट करता येते.

विभागाने सांगितल्याप्रमाणे त्याचा लवकरच विचार करावा. कारण आतापर्यंत होत असलेल्या घोटाळयांना थांबविण्यासाठी हा योग्य पर्याय आहे. हॉट वॉटरमध्ये रेडी मिक्स केले तर हे सर्व विषय सुटतील. ज्याप्रमाणे मघाशी विभागीय सचिवांनी सांगितले की, कधी डाळ नसते तर त्याचे फक्त पाणीच असते. त्यामुळे प्रोटीन कन्टेन्डचा प्रश्न निर्माण होतो. त्याकरिता रेडी मिक्स फूड वापरले तर फायदा होईल. तसेच त्यामुळे क्वॉलिटीमध्ये सुधारणा होण्याचे चान्सेस आहेत असे मत समितीने व्यक्त केले.

२.७९ मुद्दा क्रमांक ४.१.१२.२ साठवणुकीची सोय नसताना आरोग्य सुधारण्यास आवश्यक सामुग्री घेणे :

या मुद्यासंबंधी एक विशिष्ट आक्षेप असे आहे की, यामध्ये २५ डिग्रीपेक्षा कमी तापमानामध्ये वस्तू किंवा औषधे ठेवण्याची सुविधा विभागाकडे नव्हती. तरी सुद्धा सिरप आणि औषधे खरेदी केली. यावर आपले स्पष्टीकरण द्यावे. आज दिलेल्या सुविधेवर नंतर चर्चा करू. पण त्यावेळी आपण २५ डिग्रीपेक्षा कमी तापमानामध्ये सुविधा नसताना ही औषधे खरेदी का केली व त्यासाठी कोण जबाबदार आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०११-१२ मध्ये काही औषधी किंवा वस्तू खरेदी केल्या होत्या की ज्यांना २५ डिग्री तापमानाखाली ठेवावे लागते. त्यामध्ये काही टॉनिक्स घेतली होती. पोषणमुल्ये असणारी मायक्रोन्युट्रनच्या काही वस्तू घेतल्या होत्या. काही बिस्कीटे व चिक्की खरेदी करून त्या ठिकाणी स्टोअर केल्या होत्या. या वस्तू थंड जागी ठेवण्यासंबंधी सूचना वगैरे नव्हत्या.

प्रत्येक औषधावर लिहिलेले असते की, ते किती तापमानामध्ये ठेवले पाहिजे. त्यामुळे त्यासाठी वृत्तपत्रामध्ये जाहिरात देऊन सूचना दिल्या का? महालेखाकारांचे म्हणणे असे आहे की, २५ डिग्री तापमानाखाली ठेवण्याची व्यवस्था नसताना या वस्तू किंवा औषधे का खरेदी केली? याबद्दल कोठे तरी संकेत असतील म्हणूनच महालेखाकारांनी हा आक्षेप घेतला आहे ना. सर्व सी.डी.पी.ओ. यांना उपायुक्त, आयसीडीएस यांच्या वारंवार सूचना होत्या की, हे लिक्विड प्रोटीन, मल्टी व्हीॲमिन्स सिरप आणि विशेषत: जे कुपोषित बालकांना सप्लाय करतो. प्रेग्नन्ट महिला आणि लॅक्टेटिंग मदर्स यांना जे देतो ते सर्व औषधे २५ डीग्री तापमानाखालील थंड जागेमध्ये ठेवावीत. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, हे फेब्रुवारीच्या आतमध्येच खरेदी करणार आहोत. पण ही खरेदी नंतरच्या काळात केली आहे. त्यामुळे याबद्दल जबाबदारी निश्चित केली पाहिजे. ज्यांच्यामुळे अधिकच्या तापमानात औषधे व वस्तू खरेदी करून ठेवण्यात आल्यामुळे त्यातील अनेक औषधे निरुपयोगी सुद्धा झाली असतील. त्यामुळे त्या औषधांची योग्य विल्हेवाट लावण्याची किंवा सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची सुविधा नसताना त्या वस्तू खरेदी करण्याचे कारण कोणते? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी याबाबत खुलासा केला की, त्यावेळी जितक्या वस्तू आणि सिरप खरेदी करण्यात आले होते त्यावर स्टोर इन ए कूल न्ड ड्राय प्लेस आणि स्टोअर इट बिलो २५ डिग्री असा त्यामध्ये स्पष्ट उल्लेख होता. तरी पण त्या वस्तू खरेदी करण्यात आल्या आहेत. कोणकोणत्या वस्तू खरेदी केल्या, त्यातील कोणत्या वस्तू २५ डिग्रीच्या खालच्या तापमानात ठेवावयाच्या होत्या आणि कोणत्या कालावधीत पुरवठा आदेश दिला आणि कोणत्या ठिकाणी माल डिलीव्हरी करण्यात आला यासंबंधी सखोल चौकशी करून त्याचा अहवाल समितीस सादर करण्यात येईल.

यामध्ये कारण यंत्रणा खराब करण्यामध्ये विभागालाच लोकांचा वाटा असतो. त्यामुळे समितीला ३० दिवसांच्या आत कार्यवाहीसह अहवाल सादर करावा असे समितीने सुचित केले.

यामध्ये १३.६६ कोटी रुपयांचा जो माल खरेदी केला होता. त्यातील किती रकमेचा माल वापराविना शिल्लक राहिला होता. कारण विभागाकडे साठा ठेवण्याची व्यवस्था नव्हती. या सर्व बाबींना जबाबदार कोण आहे. किती औषधांचा वापर झाला आणि किती औषधे वापराविना पडून राहिली त्याचा तपशील संदर्भातील माहिती विभागीय सचिवांनी समितीच्या बैठकीच्यावेळी नसल्याने सदर मुद्याची माहिती नंतर सादर करण्यात येईल.

किती डिग्रीच्या तापमानात वस्तू ठेवावयाच्या होत्या. या वस्तू योग्य वेळी योग्य ठिकाणी प्रिझर्व्ह केल्या नसल्यामुळे, it is totally perishable. या वस्तू उपयोगात आणता येत नव्हत्या. त्यामुळे ज्यांचे नुकसान झाले आहे त्यांची तपासणी करून व दोषी लोकांवर कार्यवाही करून आणि त्यांना ७ दिवसांच्या नोटीसा देऊन कार्यवाही केलेला अहवाल समितीला सादर करावा. तसेच यामध्ये दोषी व्यक्तींचे पद नमूद केले आहे. उपायुक्त, आयसीडीएस, पुणे यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनानुसार साठवणुकीची सोय नसताना आरोग्य सामुग्री घेणे. त्यांनी अशा सूचना देताना संबंधितांकडे साठवणुकीची व्यवस्था आहे किंवा नाही याची माहिती नव्हती काय? तसेच २५ डीग्रीखालील तापमानातील वस्तूंच्या साठवणुकीची व्यवस्था नाही हे माहिती नव्हते काय? प्रथम साठवणुकीची सुविधा काय आहे हे पाहून त्यानंतर हा माल खरेदी करा असे सांगायला हवे होते. हे उपायुक्त तर फक्त एका विभागाचे आहेत. ते संपूर्ण राज्याचे नाहीत.तत्यामुळे यासंबंधी या उपायुक्तांवर जबाबदारी निश्चित करावी असे समितीने सुचित केले.

२.८० ही १३ कोटी रुपयांची खरेदी संपूर्ण महाराष्ट्र राज्याची आहे. एकट्या पुणे जिल्ह्यापुरती मर्यादित नाही. यामध्ये असे म्हटले आहे की, पुरविलेल्या साहित्याच्या उपयुक्ततेबाबत बाल विकास प्रकल्प अधिकारी, सीडीपीओ, मुख्य सेविका यांच्याकडून अभिप्राय घेण्यात येतात. मुंबई किंवा पुण्यामध्ये बसत असलेल्या उपायुक्तांना माहिती आहे की, ही औषधे ठेवण्याची व्यवस्था नाही तर हे २५ डिग्रीच्या खालील तापमानाच्या वस्तू खरेदी का केल्या? तसेच हे आदेश मंत्रालयीन स्तरावरुन निघाले आहेत. ते कोणत्या महिन्यात निघाले आहेत. अशी विचारणा समितीने केली असता याबाबतची माहिती समितीस सादर करण्यात येईल विभागीय सचिवांनी असेही सांगितले की, हे सर्व आदेश आयुक्त स्तरावर निघाले असल्यामुळे त्यावेळी आयुक्तालय पुण्यामध्ये होते आणि हे आदेश संपूर्ण महाराष्ट्रासाठी होते.

स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद केले आहे की, मार्च २००८ ते जानेवारी २०११ या कालावधीत ही औषधे खरेदी केली आहेत. ही औषधे २५ डिग्रीच्या खालील तापमानात ठेवण्यात आली नसल्यामुळे यामध्ये जे दोषी असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला कळविण्यात यावा असे निदेश समितीने दिले.

२.८१ ही आरोग्य सामुग्रीची खरेदी २५ डीग्रीच्या तापमानाखालील यंत्रणेची सुविधा नसताना ऑर्डर का दिली त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी. त्यामध्ये उपायुक्त असतील किंवा अन्य कोणीही असो. यामध्ये एखाद्या सचिवांनी किंवा डेस्क ऑफिसरने त्या ठिकाणी २५ डिग्रीखालील तापमानाची व्यवस्था आहे किंवा नाही याबद्दल फाईलमधील नोटमध्ये लिहिले पाहिजे. परिणामी २५ डीग्रीऐवजी ३५ डिग्री तापमानाची व्यवस्था असेल तर त्या औषधांचा काही उपयोग होणार नाही असे मत समितीने व्यक्त केले.

दुसरे असे की, यानंतर ऑक्टोबर ते फेब्रुवारी या दरम्यानच खरेदी केली जाईल अशा प्रकारचा काही शासन निर्णय झाला आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०१४ पासून अशा प्रकारच्या प्रकरणात तथ्य वाटले की, ज्या औषधांचा किंवा सिरपला २५ डिग्री तापमानाखाली ठेवावे लागते. त्यांच्या बाबतीत आता यापुढे आयसीडीएसमार्फत खरेदी केली जाणार नाही. औषधांची गरज असेल तर आरोग्य विभागामार्फत त्याची रिक्वॉयरमेंट पुरविली जाईल असे विभागाने यामध्ये स्पष्ट धोरण राबविले आहे.

म्हणजे आता यापुढे २५ डिग्रीच्या खालील तापमानात ठेवावयाच्या कोणत्याही औषधांची खरेदी करणार नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी अवगत केले की, सन २०१४ नंतर कमी तापमानाखाली ठेवावयाची औषधे आता आयसीडीएसमार्फत खरेदी केले जाणार नाहीत आणि जर गरज असेल तर त्यांच्या खरेदीसाठी आरोग्य खात्याला तशी विनंती करण्यात येते.

विभागाकडून प्राप्त झालेल्या उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, अंगणवाडी केंद्रात सदर साहित्य ठेवण्यात येते. ग्रामीण भागात अंगणवाडी केंद्रासाठी पुरेशी जागा असते. या अनुषंगाने समितीने विभागाच्या निदर्शनास आणले की, ग्रामीण भागामध्ये अनेक ठिकाणी म्हणजे ३० ते ३५ टक्के अंगणवाड्यांना इमारतीच नाहीत. त्यामुळे त्या कुठे तरी खासगी जागेत किंवा मंदिरात किंवा समाज मंदिरात वा अतिशय अडचणीच्या ठिकाणी या अंगणवाडी भरतात. उलट ग्रामपंचायतीकडे जागा मागतो तरी जागा उपलब्ध होत नाही. त्यामुळे विभागाने दिलेले हे उत्तर चुकीचे वाटते. तसेच पुढच्या परिच्छेदात तर इमारत नाही आणि अंगणवाडी अक्षरशः उघड्या झाडाखाली भरविली जाते असे उत्तर आहे. त्यामुळे हे उत्तर सुद्धा आपल्याला दुरुस्त करावे लागेल असे समितीने नमूद केले व याबाबतची योग्य माहिती समितीस सादर करावी.

२.८२ परिच्छेद क्र. ४.१.१२.३ "घरपोच आहाराचा पुरवठा" :

यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले की, तपासणी झालेली होती. अंगणवाडी केंद्रात टीएचआर पुरविण्यात येत होते त्यामध्ये आवश्यकतेपेक्षा कमी प्रथिने व कॅलरी आढळून आले नाही असे निदर्शनास आले होते. या तपासणीमध्ये व केलेल्या करारामध्ये तफावत येत असेल, कमी गुणवत्तेचा आहार पुरवला जात असेल तर त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी असे अपेक्षित होते. सन २०११-१२ चे अभिलेख तपासण्याचे काम सध्या सुरू आहे. त्यामध्ये केवळ दंडात्मक कारवाई केली की नाही या संदर्भात तपासणी केली जात आहे. तसेच वेगवेगळ्या रकमेची दंडात्मक कारवाई करून बिलातून रक्कम कपात केली. या प्रकरणात किती रक्कम कपात केली गेली, ही माहिती संकलित करून एक महिन्याच्या आत समितीला सादर करण्यात येईल असे समितीस अश्वस्त केले.

बीड, अमरावती व उस्मानाबाद या जिल्ह्यातील सहा गटाच्या संदर्भात समितीसमोर सांगण्यात येत आहे की, एक महिन्यात माहिती सादर करण्यात येईल. पण आतापर्यंत विभागाकडून काय केले? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, बिलातून रक्कमकपात करण्यात आली आहे. नेमका जिल्हा कोणता व किती रकमेची कपात केली आहे ही माहिती संकलित करण्याचे काम सुरू आहे.

वास्तविक पाहता ज्यावेळी विभागाची साक्ष लावण्यात येते, त्यावेळी विभागाने सर्व तयारीने येथे आले पाहिजे. नाही तर या साक्षीला काय अर्थ राहील? हा केवळ या समितीच्या वेळेचा अपव्यय आहे असे मत समितीने नाराजीने व्यक्त केला.

मार्च,२०१३ मध्ये महालेखापालांनी विभागाला दाखवून दिले होते. या अनुषंगाने विभागाने कार्यवाही करावयास हवी होती. संबंधित ठेकेदाराकडून एकही कपात केलेली दिसत नाही. केली असती तर येथे सांगितले असते. पुरवठादाराशी करण्यात आलेल्या करारामध्ये ५ टक्के सूट ग्राह्य धरण्यात आली होती. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी याबाबत खुलासा केला की, पुरवठादारासोबत करार केला होता त्यात क्वालिटीमध्ये ५ टक्के तफावतीची सूट देण्यात आली होती. आताच्या करारात ०.५ टक्के तफावत मान्य आहे. सन २०१५ मधील निविदेमध्ये केवळ ०.५ टक्के सूट देण्यात आली आहे.

म्हणजे पूर्वी ५ टक्के सूट दिली होती, त्याचे विभागीय सचिव समर्थन करता काय? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी असे मत व्यक्त केले की, ५ टक्के अतिशय जास्त आहे ते जास्तीत जास्त १ टक्का असले पाहिजे. क्वालिटी अतिशय महत्वाची असल्यामुळे त्या बाबत कॉम्प्रमाईज करू नये.तसेच ५ टक्के सूट देण्याची प्रथा टीएचआरमध्ये सन २०१० ते २०१५ पर्यंत सुरू होती.

मटकीमध्ये टीएचआर नाही काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्याकरिता ५ टक्क्याची अट नाही. हॉटमिल करिता ५ टक्याची अट नव्हती ती केवळ टीएचआरमध्ये होती.

२.८३ ज्या बालकांचे कुपोषण दूर होण्यासाठी काम करण्यात येते, त्यांच्या आहारामध्ये ५ टक्के सूट दिली जाते. हे कितपत योग्य आहे? तसेच पुरवठादार संस्था यांचेशी केलेल्या करारनाम्या प्रमाणे उष्मांक मध्ये ५% तुट ग्राह्य धरण्यात आली आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, टीएचआरमधील करारनाम्यामध्ये ५ टक्क्याची अट घालण्यात आली होती. पण हॉटमिलमध्ये ही अट नव्हती.

ज्या संस्थांकडून आवश्यक त्या प्रमाणात आहारात उष्मांक मिळाले नाही, त्या संस्थांवर करावयाची दंडात्मक कारवाई पुरेशी नाही. त्या कंपन्यांना काळ्या यादीत टाकले पाहिजे. अनेक ठिकाणी आहारात ५० टक्के कमी आहे. अमरावतीमध्ये २५ ते ३० टक्के, उस्मानाबादमध्ये ५० टक्के, तुळजापूरमध्ये ६० टक्के कमतरता आहे. बालकांना पुरवल्या जाणाऱ्या आहाराकडे दुर्लक्ष करण्यात आले. या संदर्भात लोकलेखा समितीसमोर साक्षीला येण्यापूर्वी कोणतीही कार्यवाही न करणे ही बाब योग्य नाही असे मत समितीने खेदाने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, उष्मांक व प्रथिने कमी असल्याबाबत उपाययोजना करणे गरजेचे आहे. याकरिता मॉनिटरींग बळकट करावे लागणार आहे. हॉटमिलमध्ये देखील सुधारणा करावी लागणार आहे. किती जणांवर दंडात्मक कारवाई झाली, याचा डेटा गोळा केला जात आहे. सन २०१५ पर्यंत प्रयत्न सुरू होते.

सरकार कोणतेही असो. टीएचआरमध्ये पुरवठादार तेच आहेत, पुरवल्या जाणाऱ्या आहाराची गुणवत्ता तीच आहे व कुपोषण काही कमी होत नाही. स्थलांतराचे कारण नाही. आहाराची गुणवत्ता योग्य नसणे हे मुख्य कारण आहे. मुंबई, उस्मानाबाद, तुळजापूर येथे पुरवल्या जाणाऱ्या आहारात ५० टक्के कमतरता आहे. मुंबईमध्ये देखील हे प्रमाण बरेच कमी आहे. धारावीमध्ये ४६ टक्के कमतरता आढळून आली आहे. प्रगती महिला मंडळ यांनी पुरवलेल्या आहारात ८६ टक्के कमतरता आहे. त्यांना बिलाचे पैसे देखील देण्यात आलेले आहेत. आता त्यांच्याकडून कशी काय वसुली केली जाणार आहे? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी ज्यांच्याकडून कपात झालेली आहे, ती माहिती सादर करण्यात येईल असे अश्वस्त केले.

या अनुषंगाने समितीने सुचित केले की, इस्कॉन सारख्या महाकिचन चालवणाऱ्या संस्थेला हे काम द्यावे. शासनाकडे बरीच जागा उपलब्ध आहे. ती अशा संस्थांना चालवण्यासाठी देण्यात यावी. या बाबत लवकरात लवकर चांगला निर्णय घ्यावा. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, इस्कॉन यांना ठाणे येथे काम दिलेले आहे. तसेच नागपूर येथे अक्षयपात्रला काम देण्याची सुरुवात केली आहे.

या संबंधित अधिकारी तसेच पुरवठादार यांच्यावर आपण कारवाई करावी. ज्या पुरवठादारांच्या आहारात ५० टक्के कमतरता आहे, त्यांचा समावेश काळ्या यादीत करावा. त्यांच्याकडून रक्कम तर वसूल कराच मात्र भविष्यात ते पुरवठा करू शकणार नाही, याची देखील कारवाई करावी. एखाद्या संस्थेने नाव बदलले व संचालक तेच असतील तर ते देखील तपासण्यात यावे असे निदेश समितीने दिले.

यवतमाळ शहरात तक्रार आल्यानंतर देखील तेथील सीडीपीओ यांनी नमुने प्रयोगशाळेत तपासण्यासाठी पाठविले नाहीत. याचे कारण काय आहे? सीडीपीओ, यवतमाळ यांच्याकडे आहारात निकषाबाबत तक्रार करूनही नमुने तपासण्याबाबत कारवाई करण्यात आली नाही. आहारातील नमुने न तपासण्याचे प्रमाण १.२ ते ९९ टक्के आहे. सन २००७ ते २०१२ पर्यंत आहाराचे नमुने एकदाही तपासणीसाठी पाठवण्यात आले नसल्याचे आढळून आले. किती दिवसात तपासणी करणे आवश्यक आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, दर महिन्याला किमान एका सँपलची तपासणी केली पाहिजे.

ज्या अधिकाऱ्यांनी एका महिन्यात नमुने तपासले नाहीत, त्या सर्वांना निलंबित केले पाहिजे. हा गंभीर विषय आहे. आहाराचा नमुना तपासण्यासाठी लॅबमध्ये पाठविण्याची काय व्यवस्था आहे? कारण काही ठिकाणी तपासणीसाठी पाठविल्यानंतर तेथे पोहचायलाच दोन दिवस लागतात या अनुषंगाने समितीने सुचित केले की, अंगणवाडी सेविका यांनी स्वतः ते अन्न खाताना फोटो व व्हिडीओ काढून तो शासनाच्या ॲपवर पाठवावा.

२.८४ समितीने याबाबत असे देखील सूचित केले आहे की, एका राष्ट्रीय पक्षाचा असा एक ॲप तयार केलेला आहे. एखाद्या गावात सभा सुरू असताना फोटो घेतला जातो. तो फोटो ॲपवर लगेच ट्रान्सफर होतो. त्यावर सर्व माहिती मिळते. त्या ठिकाणचे अक्षांश, रेखांश, वेळ, वार, तारीख येते. त्यामुळे कोणाला त्यात काही बदल करण्याची संधी मिळत नाही. तसे ॲप विभागाने तयार करावे. अंगणवाडीमध्ये जेवण सुरू असताना फोटो काढला की, त्याच वेळी तो ॲपवर आपोआप अपलोड होतो. यामुळे या सर्व प्रकारावर चेक राहील व आपल्याला वस्तुस्थिती कळेल.

घरपोच आहाराचा पुरवठा यामध्ये प्रयोगशाळेचा विषय आहे. Why not put mobile laboratory in every district.? प्रत्येक जिल्ह्याला एक फिरती प्रयोगशाळा ठेवण्यात यावी. बऱ्याच ठिकाणी प्रयोगशाळेमध्ये तपासणी झालेली नाही. ८ तासामध्ये अन्न शिजवून द्यावे लागते, प्रयोगशाळेमध्ये यायला वेळ लागतो, प्रत्येक जिल्ह्यामध्ये प्रयोगशाळा नाही. प्रत्येक जिल्ह्याला आय.सी.डी.एस. चा एवढा मोठा प्रोग्राम आहे तर एक-एक फिरती प्रयोगशाळा ठेवायला काय हरकत आहे? असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी समितीस विनंती केली की, समितीमार्फत शासनाला याबाबत सूचना देण्यात यावी.

२.८५ तसेच विभागीय सचिवांनी यासंदर्भात समितीस अवगत केले की, पुणे, नाशिक येथे शासकीय प्रयोगशाळा आहेत. तेथे जशी तपासणी हवी आहे ती होणे अभिप्रेत असते. यामध्ये तीन गोष्टींची माहिती फार महत्त्वाची असते. एक म्हणजे कोणताही बाहेरील हानिकारक पदार्थ खाण्यामध्ये आला आहे किंवा नाही. दुसरे म्हणजे माईक्रोबीयल इन्फेक्शन्स आणि तिसरे म्हणजे जेवणामध्ये प्रोटिनची मात्रा. अपेक्षा अशी आहे की, प्रत्येक दिवशी १०-१२ ग्रॅम प्रोटिन मुलांच्या पोटात गेले पाहिजेत. प्रोटीनची तपासणी, माईक्रोबीयल इन्फेक्शन्सची तपासणी आणि बाहेरील हानिकारक पदार्थांची तपासणी करणे अभिप्रेत असून तसेच भारत सरकारचे निर्देश आहेत. काही शासकीय प्रयोगशाळांमध्ये या प्रमुख तत्त्वांच्या व्हेरिफिकेशनची सोय उपलब्ध नसल्यामुळे हे अवघड जाते. सर्व लॅबोरेटरी आरोग्य विभागाच्या अधिनस्त आहेत. जर त्यांच्यामार्फत मोबाईल लॅबोरेटरीची सोय करण्यात आली तर हा विभाग समितीचा आभारी राहिल.

You can start your own laboratories, what is the problem? पण विभागाला त्यांची स्वतःची प्रयोगशाळा काढण्यात काय अडचण आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मोबाईल लॅबोरेटरी हा फक्त एकवेळ खरेदीचा विषय नाही. त्यांना ऑपरेट करण्यासाठी तज्ञ माणसे, मशिन्स, केमिकल्स, ऑपरेशनल कॉस्ट हे सर्व विषय तांत्रिक असल्यामुळे हे आरोग्य खात्याच्या अधिनस्त आहे. आरोग्य खात्याने प्रथम विभागीय स्तरावर व नंतर जिल्हा स्तरावर मोबाईल व्हॅन पुरविल्या तर त्याचा फायदा होईल. हे काम अन्न व औषध प्रशासन आणि आरोग्य विभाग या दोन्ही खात्यांकडे असते. सध्याच्या प्रयोगशाळा या अन्न व औषध प्रशासन विभागाच्याच अखत्यारित आहेत.

२.८६ ज्याप्रमाणे जलसंधारण विभागामध्ये जलसंपदा विभागाकडून अधिकारी मिळतात त्या धर्तीवर इन्फ्रास्ट्रक्चर महिला व बालविकास विभागाने तयार करावे व त्यांच्याकडून अधिकारी घ्यावेत. अशा प्रकारची व्यवस्था जर आय.सी.डी.एस. ने प्रस्तावित केली तर अन्न व औषध प्रशासन तसेच आरोग्य विभागाची काही अडचण राहणार नाही. त्यादृष्टीने प्रत्येक जिल्ह्याला एक मोबाईल लॅबोरेटरी देण्याबाबत विचार करण्यात यावा. आणि जर प्रत्येक जिल्ह्याला देणे शक्य होणार नसेल तर आदिवासी जिल्ह्यांना जरी दिली तरी चालेल असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, राज्यातील १६ जिल्ह्यांमध्ये आदिवासी क्षेत्र आहे. या १६ जिल्ह्यांना प्राधान्याने देवून नंतर इतर जिल्ह्यांमध्ये केल्यास विभागाची अडचण बऱ्यापैकी सुटू शकेल.

या परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे अन्नाच्या नमुन्यामध्ये कमतरता आढळून आली, या संदर्भात डेप्युटी सीईओ, नागपूर व पुणे यांनी उत्तरात असे नमूद केले आहे की, आम्ही नमुने तपासणीसाठी पाठविले नाही याचे कारण पुरवठादाराने चाचणी अहवाल दिले होते. तसेच नमुन्यांची तपासणी करण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली नाही. सीडीपीओ, यवतमाळ यांच्यावर का कारवाई केली नाही याचे समितीला उत्तर देण्यात आलेले नाही. जेथे सर्वात अधिक तक्रारी आल्या होत्या, तेथे तरी निदान तपासणी करून घेणे आवश्यक होते. तिसरी गोष्ट आणखी गंभीर आहे. विभागाने या सर्व पुरवठादारांचे कराराचे नुतनीकरण केले. याचे कारण डेप्युटी सीईओ यांनी समाधानकारक अहवाल दिला. असे समितीने नमूद केले आहे. या संदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, डेप्युटी सीईओ पुणे व नागपूर यांनी असे सांगितले की, पुरवठादारांनी सेल्फ टेस्टींग रिपोर्ट दिले. असा रिपोर्ट अभिप्रेत आहे. मात्र केवळ सेल्फ टेस्ट रिपोर्ट घ्यावा, अशा सूचना दिलेल्या नव्हत्या. विभागाने अशी सूचना दिली होती की, सेल्फ टेस्ट रिपोर्ट घ्यावा व त्या सोबत विभागाने स्वतंत्र नमुना घेऊन व्हेरीफिकेशन करणे गरजेचे आहे. विभागाने रँडम सँम्पलिंग करावयाचे आहे. त्याचे बिल ठेकेदाराकडून वसूल करावयाचे आहे असे करारनाम्यामध्ये नमूद आहे. केवळ सेल्फ टेस्ट रिपोर्टवर अवलंबून राहायचे नाही. करारनामा जिल्हास्तरावर झालेला आहे. रँडम सँम्पलिंग किंवा रँडम टेस्टींग विभागाकडून केले जाते. त्याची वसुली कंत्राटदाराकडून घेण्याचा उल्लेख करारनाम्यामध्ये केलेला आहे. महालेखापालांनी या ठिकाणी जो मुद्दा काढला आहे, त्या बाबत दोन्ही डेप्युटी सीईओ यांनी दिलेले उत्तर नियमाला धरून नाही. डेप्युटी सीईओ यांनी समाधानकारक रिपोर्ट दिला नाही, मात्र ३१४ पुरवठादार असे होते त्यांच्या सोबत ३ वर्षाचा करार करण्यात आला होता. त्या पैकी बरेचसे पुरवठादार फेज आऊट झालेले आहेत. १५६ कंत्राटदार जुने आहेत. सन २०१५ मध्ये निविदा काढण्यात आल्या होत्या.

पण पुरवठादाराने ज्या लॅबमध्ये टेस्ट केली, त्याच लॅबमध्ये विभाग देखील टेस्ट करतो. ही बाब महालेखाकारांनी निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, नियमानुसार, एनएबीएल लॅबमध्ये तपासणी करणे अभिप्रेत आहे. संपूर्ण राज्यात ८४ एनएबीएल लॅब आहेत. कोणत्याही एनएबीएल लॅबमध्ये टेस्ट करता येते.

टेस्टींग रिपोर्ट व लॅब समाधानकारक वाटत नसल्यास युनिव्हर्सिटीशी करार केलेला आहे. त्यांच्याकडे चांगली यंत्रसामुग्री व तंत्रज्ञान आहे, ते अधिक चांगले रिपोर्टस देऊ शकतात. यवतमाळ संदर्भातील सांगताना विभागीय सचिवांनी सांगितले की, तत्कालीन सीडीपीओ, यवतमाळ यांनी तक्रारी असून देखील तपासणी केली नाही, त्यांना निलंबित करून त्यांच्यावर तत्काळ आज संध्याकाळ पर्यंत कारवाई करण्यात येईल.

कंत्राटदारांचा कार्यकाळ संपल्यानंतर आणखी दोन वर्षाची वाढ का देण्यात आली, याचे कारण काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०१३ मध्ये दुसरी निविदा काढण्यात आले होते. या निविदेचा कालावधी संपणार असल्यामुळे सन २०१५ मध्ये परत टेंडर काढण्यात आले होते. टी.एच.आर.चे पहिले टेंडर सन २०१० मध्ये काढण्यात आले होते. ते टेंडर सन २०११ मध्ये फायनल

झाले होते. दुसरे टेंडर सन २०१३ मध्ये काढण्यात आले होता. त्यानंतर तिसरे टेंडर सन २०१५ मध्ये काढण्यात आले होते. सन २०१५ चे टेंडर कोर्ट केस व इतर कारणामुळे पूर्ण होऊ शकले नाही. दिनांक १ मे, २०१७ रोजी या टेंडरचे वर्क ऑर्डर देण्यात आलेले आहेत.

२.८७ सद्य:स्थितीत विभाग फार चांगले काम करीत आहात याबद्दल समितीचे दुमत नाही. त्याकाळात टेंडरला दोन वर्षाची मुदतवाढ देण्याची कारणे काय आहेत? जर आपण दोन ते तीन महिन्यासाठी मुद्दत वाढ दिली असती तर समितीस समजू शकलो असतो पण दोन वर्षाची मुदतवाढ का देण्यात आली? काही कालावधीसाठी मुदतवाढ देण्याची कायद्यात तरतूद आहे पण दोन वर्षाची मुदतवाढ देण्याची कायद्यात कोठेही तरतूद केलेली नाही. कायद्यात तरतूद नसताना सुद्धा आपण दोन वर्षासाठी मुदतवाढ का दिलेली आहे? अशी विचारणा समितीने पुन्हा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०१५ मध्ये टेंडर काढण्यात आलेले होते मात्र कोर्ट केसमुळे पूर्ण होऊ शकले नाही.

काम समाधानकारक नसताना सुद्धा काम समाधानकारक दाखवून या टेंडरला दोन वर्षाची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. या टेंडरास दोन वर्षाची मुदतवाढ कोणत्या नियमाप्रमाणे देण्यात आलेली आहे. पुढील टेंडर प्रक्रिया होइपर्यंत दोन ते तीन महिन्याची मुदतवाढ देऊ शकतो पण दोन वर्ष मुदतवाढ देण्याची कारणे काय आहेत? असा प्रश्न समितीने पुन्हा उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या लोकांची मुदत संपत असल्यामुळे सन २०१५ मध्ये टेंडर काढण्यात आले होते.

पण हा मुद्दा सन २०१५ नसून सन २०११-१२ चा आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०११ मध्ये काढण्यात आलेल्या टेंडरची मुदत सन २०१३ पर्यंत होती.

If you see all these paras, there were deficiencies in supplies to malnutrition children. There were deficiencies in supplies by Mahilamandals also. So, in this background how do you support extension of these tenders for two years on basis of satisfactory performance report submitted by your Deputy C.E.O. ही बाब महालेखाकारांनी निदर्शनास आणून दिली.

या अनुषंगाने समितीने सुचित केले की, संबंधित डेप्युटी सीईओची चौकशी करण्यात यावी. यामध्ये दोषी आढळ्यास डेप्युटी सीईओवर कारवाई करून पुढील साक्षीसाठी उपस्थित राहावे.

सी.डी.पी.ओ. हा तालुका स्तरावरील अधिकारी आहे. ते अधिकारी टेंडर रिन्यूव्ह करत नाही किंवा त्या टेंडरास मुदतवाढ देऊ शकत नाही. या सर्व गोष्टीस महिला बाल विकास खात्याचे उप कार्यकारी अधिकारी जबाबदार आहेत. टेंडरला मुदतवाढ देण्याचे अधिकार जिल्हा स्तरावर आहेत. या प्रकरणामध्ये दोन्ही अधिकाऱ्यांना जबाबदार धरले पाहिजे. या प्रकरणामध्ये तर कनिष्ठ अधिकाऱ्याला जबाबदार धरले तर डेप्युटी सीईओवर कारवाई होणार नाही तो या प्रकरणातून सुटून जाऊ शकतो. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या प्रकरणामध्ये स्पेसिफिक कंप्लेंट अगेनस्ट सी.डी.पी.ओ. यवतमाळ यांच्यावर तक्रार करण्यात आलेली आहे.

२.८८ समाधानकारक कार्यसिद्धि अहवालावर विभाग अवलंबून राहिले आणि डेप्युटी सीईओनी या टेंडरास दोन वर्षाची मुदतवाढ दिलेली आहे असे समितीचे मत आहे. या टेंडरास तीन महिन्यासाठी मुदतवाढ देण्यात आली असती तर या प्रकरणामध्ये समितीची तक्रार राहिली नसती. या टेंडरास दोन वर्षाची मुदतवाढ देण्याची कारणे काय आहेत? त्याचे काम सॅटीसफॅक्टरी नाही असे डेप्युटी सीईओ यांना जो अहवाल आलेला आहे. या संदर्भात ज्या फिर्याद आलेल्या आहेत त्या सर्व फिर्यादी त्याच विभागाच्या आहेत. एवढ्या फिर्यादी आल्यानंतरसुद्धा त्या अहवालावर ते विसंबून राहिले. या टेंडरास दोन वर्षाची मुदतवाढ देण्याचा निर्णय डेप्युटी सीईओ यांनी घेतलेला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई केल्याचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा असे निदेश समितीने दिले.

विभागीय सचिवांनी मान्य केले की, यामध्ये खराब दर्जाचे जेवण देणाऱ्या माणसाला मुदतवाढ देणे अतिशय दुर्भाग्य व दोषपूर्ण आहे.

अभिलेख्यांच्या तपासणीत पुढे असे आढळून आले की, मेळघाट प्रकल्प, धारणी येथे ६ महिने ते ६ वर्ष वयापर्यंतच्या वयोगटातील सर्व मुलांसाठी एकसारखच आहारांचा तक्ता बनविण्यात आला होता. वेगवेगळा तक्ता न देण्याची कारणे काय आहेत?

सहा महिन्याच्या मुलास व ६ वर्षाच्या मुलास एकच आहार कसा देणार आहात? मेळघाट व धारणीची परिस्थिती यामुळे ढासळलेली दिसत आहे. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये एकच रेसिपी वापरण्यात आलेली आहे. त्यामध्ये कॉन्टीटी वेगवेगळी करण्यात आलेली आहे. खरे म्हणजे यामध्ये तीन गट करणे आवश्यक होते. ६ महिने ते २ वर्ष, २ वर्ष ते ३ वर्ष आणि ३ वर्ष ते ६ वर्ष असे तीन गट करणे आवश्यक होते. पण अशा प्रकारचे गट करण्यात आलेले नाही. या प्रकरणाला जे जबाबदार असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून समितीस कळविण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस अश्वस्त केले.

घरपोच आहाराचा पुरवठा न केल्याची स्थिती दर्शविणारे विवरणपत्र १ यामध्ये नमूद केले आहे की, बऱ्याच ठिकाणी घरपोच आहाराचा पुरवठा उशिरा करण्यात आलेला आहे. अशा प्रकारे उशिरा पुरवठा केल्यानंतर दंड लावण्याची तदतूद केली होती का? तसेच संबंधित व्यक्तीकडून या दंडाची वसूली झालेली आहे का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, उशिरा आहार पुरवठा केल्यानंतर

दंडाची तरतूद केलेली आहे. या संदर्भात वसुली केलेली आहे. कोणत्या बचत गटाकडून किती वसुली केलेली आहे, तसेच या संबंधीचा अहवाल समितीस सादर करण्यात येईल असे समितीस अश्वस्त केले.

२.८९ खंडित कालावधीत तेथील बालक आहारापासून वंचित राहिलेले आहे यास जबाबदार कोण आहे? तसेच ३०० दिवस आहार पुरवितो असा विभागाने दावा केला आहे हे योग्य आहे का? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, याच्या डिलेमुळे दिसते की, त्यांना विलंबाने आहार मिळालेला आहे.

आहार कसा विलंबाने होऊ शकतो. जेवण आज पाहिजे आणि आहार एक महिन्यांनी मिळाला तर तो डिलेल्ड आहार कसा होऊ शकतो. एकीकडे विभाग सांगत आहे की, ३०० दिवस आहाराचा पुरवठा केलेला आहे. २५ ते ३० दिवस आहार पुरवठा उशिरा केल्यानंतर एका वर्षातून ३०० दिवस कसे पूर्ण होणार? ३०० दिवस आहार पुरवठा करीत असल्याचा दावा केलेला आहे तो दावा आता फोल ठरत आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सदर समितीचे मत मान्य केले व सांगितले की, यामध्ये डिले असल्यामुळे मुलांना आहार पुरवठा करण्यामध्ये खंड नक्की पडलेला असेल.

ज्यांच्यासाठी ही योजना चालवितो त्यांना जर आहारच मिळत नसेल तर ती बालके कुपोषित होणार नाही तर काय होणार? मुले कुपोषित झाल्यानंतर विभागाकडून वेगवेगळी कारणे देण्यात येतात. मुले कुपोषित होण्याचे मूळ कारण वेळेवर आहार पुरवठा करीत नाहीत. मुलांना वेळेवर रोज आहार मिळाला पाहिजे ही संकल्पना अजून रुजलेलीच नाही. त्यांना वेळेवर आहार पुरवठा केला पाहिजे. त्यांनी एक महिन्याचा आहार एकाच वेळी घेतला तरी चालेल असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, टी.एच.आर. यांच्यामार्फत एक महिन्याचा आहार आईकडेच दिला जातो. मुलांना दर दिवशी आंगणवाडीमध्ये येऊन हॉटमिल खावे लागते. या प्रकरणामध्ये जेवढ्या त्रुटी समोर आलेल्या आहेत त्यात सुधारणा करण्यासाठी विभाग सुप्रीम कोर्टापर्यंत गेलेले आहेत. हॉटमिलमध्येसुद्धा न्युट्रिशियन बोर्ड ऑफ इंडियाकडून सर्टिफाय करून घेण्याचे काम तसेच प्रिमिक्स वगैरे करण्याचे सर्व काम विभागाकडून करण्यात येत आहे. कॉलीटी, कॉन्टीटी आणि सप्लायर ओरियन्टेंड न होऊ देता मुलांची ओरियन्टेंड स्कीम असावी. यासाठी मागील दोन वर्षापासून प्रयत्न करण्यात येत आहे.

या अनुषंगाने समितीने सुचित केले की, जे अधिकारी चांगल्या प्रकारे काम करीत नाहीत. अशा अधिकाऱ्यांना संरक्षण दिले गेले नाही, तरच यामध्ये बदल होऊ शकतो. अन्यथा यामध्ये कोणत्याच प्रकारचा बदल होत नाही. यामध्ये विभागीय सचिवांची मानसिकता चांगली आहे पण दुसऱ्या अधिकाऱ्यांची मानसिकता भ्रष्टाचाराची आहे. अशा अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे. त्याशिवाय यामध्ये कोणताच बदल होऊ शकत नाही. अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करणे हे विभागाचे कामच आहे. Being the Chief of this Department, this is your prime and outmost duty when you have found out certain irregularities and you are convinced. विभागीय सचिवांस काही मर्यादा आहेत, काही शब्दाचा प्रयोग त्यांना करता येणार नाही. चांगले काम करीत आहे. अशा प्रकारचे काम चांगले व्हावे ही समितीचीसुद्धा अपेक्षा आहे. चांगले काम व्हावे हे विभागाचे आणि समितीचे उद्दिष्ट आहे. अशी जी प्रवृती आहे, त्यांना आपण आळा घातलाच पाहिजे. दोषी अधिकाऱ्यांना कठोर शिक्षा दिली पाहिजे. विभागाचे सचिव म्हणून दोषी अधिकाऱ्यावर लवकरात लवकर कारवाई करण्यात यावी. असे समितीने सूचित केले.

"आहारातील नमूना तपासणीतील उणीवा" यासंदर्भात विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती **(परिच्छेद क्र.४.१.१२.२ व ४.१.१२.३ संदर्भातील माहिती विवरण क्र. २१)** मध्ये समाविष्ट आहे. त्या अनुषंगाने विभागीय सचिवांनी सांगितले की, समितीने सूचना दिल्या होत्या त्यासंदर्भात ज्या उणिवा होत्या त्यांना आम्ही नोटीसा दिलेल्या आहेत, त्यांना १५ दिवसाचा कालावधी दिलेला आहे. त्यांना सचिवांच्या कार्यालयात बोलावून घेतले होते. १५ दिवसात समक्ष खुलासा घेऊन यावा अशा सूचना दिल्या आहेत.जे दोषी आढळतील त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल. यवतमाळ येथील डेप्युटी सीईओ यांच्या विभागीय चौकशीच्या प्रस्तावाबाबत नोटीस दिली आहे.

त्या अनुषंगाने समितीने सुचित केले की, उपरोक्त प्रकरणी जी आश्वासने दिली आहेत ती पाळण्यात यावीत.

२.९० परिच्छेद क्र. ४.१.१३ अंगणवाडी केंद्राचे बांधकाम :

ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणावर अंगणवाड्यांना जागा नाहीत. ५० टक्यापेक्षा जास्त अंगणवाड्यांना इमारती नाहीत. शासनाची जागा किंवा ग्रामपंचायतीची जागा अंगणवाडी बांधकामासाठी मिळत नाही. मंदिर, खाजगी जागा किंवा कोणत्यातरी झाडाखाली अंगणवाडी शाळा भरवावी लागत आहे. तसेच दररोज त्यांना आहार वेळेवर मिळतच नाही, जरी मिळाला तर तो निकृष्ट दर्जाचा असतो. अशा अंगणवाड्या बांधण्याचे विभागाने कोणते नियोजन केलेले आहे. प्रत्येक जिल्ह्यातील किती अंगणवाड्यांचे बांधकाम झालेले आहे, त्यातील किती अंगणवाड्या जागे अभावी त्यांचे बांधकाम झालेले नाही. जागा उपलब्ध आहे पण त्या जागेवर बांधकाम झालेले नाही आणि जागे अभावी बांधकाम केलेले नाही अशा एकूण किती अंगणवाड्या आहेत असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, तपासणी वेळी मंजूर अंगणवाड्यांची संख्या ९७,४६२ होती. सद्या अंगणवाड्यांची संख्या ९७,३३४ आहे. तपासणी केल्यावेळी खुल्या जागेत असणाऱ्या अंगणवाड्यांची संख्या ७,६५८ होती.

तीच सद्यःस्थितीतील अंगणवाड्यांची संख्या ४,३४२ आहे. अंगणवाड्यांची तपासणी करते वेळी खुल्या जागेत स्वतःची इमारत नाही किंवा भाड्याच्या इमारतीमध्ये अंगणवाडी शाळा भरवलेली आहे अशाही अंगणवाड्यांचा समावेश खुल्या जागेतील अंगणवाड्या आहेत. अशा प्रकारचा उल्लेख केलेला आहे.

२.९१ खुल्या जागेत भरणाऱ्या अंगणवाड्यांची संख्या किती आहे. एकूण भाडे तत्त्वावर जागा किती आहे. त्यातील बांधकाम झालेली जागा किती आहे आणि एकूण खुली जागा केली आहे. भाडेतत्त्वावर जागा असेल तर भाडेतत्त्वावर जागा आहे नाही तर ती खुली जागा आहे असे विभागाने नमूद करावे. खुल्या जागेस रेंटेड जागा कसे काय म्हणू शकता? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, महिला बाल विकास कल्याण या विभागाकडे अंगणवाडी एकूण तीन प्रकारच्या आहेत. मिनी अंगणवाडीसहित एकूण १,०८००० अंगणवाड्या आहेत. त्यामधील ६८,००० अंगणवाड्यांना दान म्हणून मिळालेल्या इमारती किंवा स्वतःची इमारती आहेत. त्यातील २७००० अंगणवाड्या भाड्याच्या इमारतीत आहेत. एकाच जागेवरती न राहता, दर तीन ते चार महिन्यानी ज्या अंगणवाड्यांची जागा बदलावी लागते अशा अंगणवाड्यांची संख्या ४,३०० इतकी आहे. याचा अर्थ या अंगणवाड्या झाडाखाली भरत नसून त्या अंगणवाड्या इमारतीमध्येच भरल्या जातात. But, yes, we do not have a permanent rented space for these Anganwadis. फक्त दोन ते तीन महिन्यांनी या अंगणवाड्यांच्या इमारती चेंज होतात.

पण समितीस जे आकडेवारी सांगितलेली आहे. ६८,०००+२७,०००+४,३००, पण याची एकूण बेरीज १,०८,००० येत नाही ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी याबाबत खुलासा केला की, विभागाकडे चार प्रकारच्या इमारती आहेत या विषयी माहिती दिलेली आहे.

पण आता विभागीय सचिव जी आकडेवारी सांगत आहेत ती आकडेवारी कम्पेयर झाली पाहिजे. १,०८,००० अंगणवाड्यापैकी किती अंगणवाड्यांना स्वतःच्या इमारती आहेत, किती अंगणवाड्या रेंटेड आहेत आणि किती अंगणवाड्या खुल्या जागेवरती आहेत? "Donated premises" means your building. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मिनी अंगणवाड्यांचा डेटा १,०८,००० मध्ये इनक्लुड केलेला होता. मिनी अंगणवाड्याशिवाय ९७,३३४ इतक्या अंगणवाड्या महिला व बालविकास विभागाकडे आहेत. महिला व बालविकास विभागाकडे स्वतःच्या इमारती ५३,६८१ आहेत. यातील रेंटेड इमारती २१,६२४ इतक्या आहेत. डोनेटेड इमारतीमध्ये १७,६८७ इतर इमारती नसलेल्या अंगणवाड्यांची संख्या ४,३४२ इतकी आहे.

या इमारती डोनेट केलेल्या आहेत की, फक्त विदाऊट रेन्टेड प्रिमायसेस दिलेली आहे? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, संबंधित गावातील लोकांनी त्यांची स्वतःची खाजगी जमीन विभागाला लॅन्ड डोनेट केलेली आहे. त्या जागेवरती शासकीय निधीने इमारतीचे बांधकाम केलेले आहे.

It is now a Government Building and not a donated building. १७,००० अंगणवाडी इमारती स्वतःची आहे, २७,००० अंगणवाडी इमारती रेंटेड आहे ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ४,३४२ इतक्या इमारती अशा आहेत की त्या इमारतींचा एक वर्षाचा करारनामा नाही. मोकळे किंवा अंडर द ट्री असे नाही. त्यांचे रेन्ट ॲग्रीमेंट लॅप्स झालेले आहे किंवा त्यांना दोन-तीन महिन्यांनी शिफ्ट करावे लागतात. अशा प्रकारच्या या अंगणवाड्या आहेत.

ज्या गावात पहिले १० शाळा होत्या त्यातील एक-दोन शाळा विद्यार्थ्या अभावी बंद पडलेल्या आहेत. अशा बंद पडलेल्या शाळातील तीन-चार खोल्या तेथील अंगणवाडीसाठी देण्यात याव्यात अशी विनंती विभागाने तेथील नगरपालिकेला किंवा शालेय शिक्षण विभागास करण्यात यावी. अशा प्रकारच्या खोल्या जिल्हा परिषद शाळेत थोड्याफार कमी मिळतील पण नगरपालिकेत अशा प्रकारच्या खोल्या मोठ्या प्रमाणात मिळू शकतील. अशा प्रकारच्या खोल्या मिळविण्यासाठी महिला बाल विकास कल्याण विभागाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, अशा प्रकारचे प्रयत्न विभागाने ग्रामीण आणि शहरी भागामध्ये सुरू केलेले आहे. उदाहरण द्यावयाचे झाले तर पालघर जिल्ह्यामध्ये पावसाळ्यापूर्वी १०३ अंगणवाड्या जिल्हा परिषद शाळेत स्थलांतरित करण्यात आलेल्या आहेत.

ज्या प्रमाणे पालघर जिल्ह्यामध्ये जि.प. शाळेत अंगणवाड्या स्थलांतरीत केलेल्या आहेत, त्याचप्रमाणे अशा प्रकारच्या अंगणवाड्या महाराष्ट्रातील सर्व जिल्हा परिषद शाळेमध्ये शिफ्ट करण्यात याव्यात असे देखील समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ऑलरेडी अशा प्रकारचे पत्र डेप्युटी सीईओ यांना पाठविण्यात आलेले आहे. अशा प्रकारचे पत्र पाठविण्याचा निर्णय शिक्षण विभागाचे सचिव माननीय श्री. नंदकुमार यांच्या सोबत चर्चा करून घेण्यात आलेला आहे. खरे पाहता यातील ४,३४२ आणि काही रेंटल अंगणवाड्या ज्या अंगणवाड्यांचा करार संपत आहेत अशा एकूण ५ हजार अंगणवाड्यासाठी इमारतीची आवश्यक आहे. या सर्व अंगणवाड्यांची यादी महिला व बालविकास विभागाने शिक्षण खात्यास सादर केलेली आहे. शालेय शिक्षण विभागाचे स्तरावर आणि महिला व बालविकास विभागाच्या स्तरावर ही कार्यवाही सुरू आहे. प्रत्येक जि.प.शाळेमध्ये अशा प्रकारचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. मुंबई वगळून इतर कार्पोरेशनमध्ये सुद्धा महानगरपालिका

आयुक्त यांच्याशी चर्चा करून हे काम हाती घेण्याच्या मार्गावर आहोत. मुंबई शहर वगळण्याचे कारण असे आहे की, अशा प्रकारचे काम मुंबईत सुरू झालेले नाही. इतर ठिकाणी हे काम सुरू झालेले आहे. म्हणून मुंबई शहरास वगळण्यात आलेले आहे.

२.९२ महापालिकेने भाडेपट्ट्यावर दिलेल्या जवळजवळ ७० टक्के शाळांमध्ये जागा आहेत. आवश्यक असल्यास शासनाने त्यासाठी क्लेम करावा, मुंबईतील आंगणवाड्यांचे कामकाज कोण पाहते? शासन अशा आंगणवाड्या महापालिकेकडे हस्तांतरित करणार काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मुंबई शहरामध्ये ३१४ आंगणवाड्या ह्या एस.आर.ए. कॉलनीच्या ताब्यातून घेण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक महापालिकाक्षेत्रामध्ये सी.डी.पी.ओ. वर्ग-१ कार्यरत असतो. विभागाकडील ५५३ प्रकल्पापैकी १०४ प्रकल्प हे नागरी क्षेत्रामध्ये आहेत. ३३ प्रकल्पात जवळपास पाच हजार आंगणवाड्या ह्या मुंबई शहर आणि मुंबई उपनगरामध्ये आहेत. याबाबत श्री. नितीन करीर यांच्या सोबत चर्चा केल्यानंतर प्रथम वर्ग आंगणवाड्यांना मुंबई शहरामध्ये जागा मिळत नाही किंबहुना झोपडपट्टी क्षेत्रामध्येसुद्धा त्यासाठी भाडे जास्त असल्यामुळे तेथे आंगणवाड्या विभाग भाडेतत्वावर घेऊ शकत नाही. याबाबत काहीतरी ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. बृहन्मुंबई महापालिकेचे तात्कालीन आयुक्त यांनी याबाबत पत्र पाठवून सांगितले की, विभागाने याबाबत सर्व आंगणवाड्या ह्या संबंधीत महापालिकेकडे हस्तांतरित करण्याबाबतचा निर्णय घ्यावा. आंगणवाड्यांबाबत विभागाचे पॉलीसी डिसिजन अजून झालेले नाही.

मुंबई महापालिकेने आंगणवाड्या स्विकारण्यास सहमती दर्शविली असेल तर त्यांना आंगणवाड्या हस्तांतरित केल्या पाहिजेत. सर्व मोठ्या शहरामध्ये असे करण्यास हरकत नसावी. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, It is a policy decision. I will definitely take it to our Hon. Minister.

विभागाने मिनी अंगणवाडी सुरू केलेली आहे. त्यांच्या इमारतीची सध्या काय परिस्थिती आहे आणि अशा किती आंगणवाड्या आहेत? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले की, सध्या ११९५३ मिनी आंगणवाड्या आहेत. अशा आंगणवाड्या ह्या विशेषतः आदिवासी भाग, पाडे, तांडे किंवा डोंगराळ भागामध्ये चालू केलेल्या असतात. अशा आंगणवाडयामध्ये सरासरी १० ते १२ मुले असतात. तेथे मुख्य आंगणवाडी सेवीका कार्यरत असते व मदतनीस तेथे कार्यरत नसतो.

समितीने पुढे विचारणा केली की, मिनी आंगणवाडयांच्या बांधकामाबाबत सद्यस्थिती काय आहे? सध्या मोठ्या प्रमाणावर भाड्याच्या इमारतीमध्ये अशा आंगणवाड्या सुरू केल्या जातात. अशा आंगणवाड्यांच्या बांधकामासाठी डी.पी.डी.सी. च्या व्यतीरिक्त कोणते नियोजन आहे? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, याबाबत वित्त विभागाने अशी सूचना केलेली आहे की, सदर आंगणवाड्या ह्या शासनमान्य अनुदानीत/विना अनुदानीत शाळांना अशा आंगणवाड्या हस्तांतरित करता येतील का ते पहावे. जर अशा प्रकारची व्यवस्था होत नसेल तरच आंगणवाड्यांच्या बांधकामाबाबत विभागाने विचार करावा. जर कोणतेही पर्याय उपलब्ध नसेल तर आंगणवाड्याचे बांधकाम करावे अशा प्रकारची सूचना नियोजन विभागाने केलेली आहे.

२.९३ बऱ्याच आंगणवाड्या ह्या एखाद्या मंदिरामध्ये भरत असतात. मिनी आंगणवाड्या ह्या साधारणपणे, एखाद्या वस्त्यावर किंवा तांड्यावर सुरू झालेल्या असतात. या वस्त्या एखादे पाच-पंचवीस लोक एखाद्या ठिकाणी जाऊन राहिले तर त्या ठिकाणी अशा मिनी आंगणवाड्या सुरू झालेल्या पहावायास मिळतात. जर कोणतेही पर्याय उपलब्ध नसेल तर आंगणवाड्याचे बांधकाम करावे, असे नियोजन विभागाने म्हटले असेल तर ते योग्य नाही. ज्या ठिकाणी शासनाच्या मोकळया जागा असतील त्याठिकाणी एक टाईप प्लॅन तयार करावा. ज्या ठिकाणी प्राथमिक शाळेच्या इमारतीमध्ये अशा आंगणवाड्या टाईप प्लॅनद्वारे बांधकाम करावे आणि अशा ठिकाणच्या इमारतींची दुरुस्ती करून त्या ठिकाणी मिनी आंगणवाड्या सुरू कराव्यात. जिल्हा परिषद, ग्रामपंचायतीमधील अशा जागा किंवा शाळा शासनाने घेऊन त्या सुस्थितीमध्ये आहेत किंवा नाही अथवा त्या जागा शासनाने निर्लेखित करून टाईप प्लॅन नुसार तेथे बांधकाम करावे. बऱ्याच ठिकाणी जिल्हा परिषदेकडे जागा असुन सुद्धा केवळ जिल्हा परिषदेकडे निधी नाही म्हणूण आंगणवाड्या बांधकाम होऊ शकत नाही, याबाबत सुद्धा विभागाने लक्ष द्यावे. निधी अभावी आंगणवाड्यांचे बांधकाम शासन करू शकणार नाही, असे जे सांगितलेले आहे त्या दृष्टीने आंगणवाड्यांच्या बांधकामाबाबतची गती विभागाने वाढविली पाहिजे. या दृष्टीने राज्य शासनाने पुढाकार घ्यावा असे समितीने सुचित केले.

कोकणात सुद्धा अशा प्रकारच्या मिनी आंगणवाड्या चालू आहेत. अशा आंगणवाड्यांना शासनाकडून निधी किंवा जागेचे भाडे मिळत असते का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सामान्य आंगणवाडी असो किंवा मिनी आंगणवाडी असो त्यामध्ये त्यांना भाडेदर, नियम हे सारखेच लागू असतात.

सदर भाडे हे विभागाच्या मार्फत वितरीत करण्यात येते का आणि त्यांना दिलेल्या भाड्याची पावती संबंधीत जागा मालकाकडून घेण्यात येते का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जेव्हा अशा प्रकारची जागा भाडेतत्वावर घेण्यात येते तेव्हा त्यांच्यासोबत भाडे करारनामा करण्यात येत असतो. सदर करारनामा हा सी.डी.पी.ओ. आणि घरमालक यांच्यामध्ये असतो. सदर भाड्याची पावती देण्याचा सुद्धा नियम आहे आणि यांचे सदर भाड्याचे बील हे ट्रेझरी ऑफिसमधून निघत असते. तसेच यामध्ये चेक द्वारे वेतन दिले जाते.

२.९४ बऱ्याच वेळेला स्थानिक लोकप्रतिनिधींनी हे ग्रामपंचायत किंवा तेथील ग्रामस्थांना सांगतात की, जर तुम्हाला आंगणवाडी पाहिजे असेल तर जागा उपलब्ध करून द्या. शिराळा तालुक्यामध्ये १४१ मिनी आंगणवाड्या चालू आहेत. तेथील ग्रामस्थांना किंवा ग्रामपंचायतीला शासन भाडे देत असेल, असे मला वाटत नाही. ज्या ठिकाणच्या आंगणवाड्या ह्या दिर्घकाळ बंद होत्या किंवा तेथील मुलांना पोषण आहार दिला जात नाही. परंतु, मार्च महिन्या अखेर असे काम कागदोपत्री केलेले असते आणि त्यांना पोषण आहार दिल्याचे दाखविण्यात येते. तेथील सी.डी.पी.ओ., उप मुख्य कार्यकारी अधिकारी आणि कंत्राटदार हे कागदोपत्री पोषण आहार दिल्याचे दाखवितात. परंतु प्रत्यक्षात तेथे पोषण आहार मुलांना मिळालेला नसतो. कंत्राटदाराने माल न देता त्याला पैसे दिले जातात आणि अधिकारी संबंधीत कंत्राटदारासोबत व्यवहार करीत असतात. तसेच आंगणवाड्यांच्या भाड्याबाबत सुद्धा तपासणी करावी लागेल. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, समितीने उपस्थित केलेले वरील मुद्दे, सूचना प्रश्न हे अनेक सदस्य, जिल्हा परिषद अध्यक्ष यांनी विभागाकडे केलेल्या आहेत. यासाठी कायमस्वरुपी उपाय-योजना करण्याबाबत एक एम.पी.आर. (Monthly Progress Report) सॉफ्टवेअर तयार करण्यात आलेले आहे. त्यामध्ये प्रत्येक आंगणवाडीमध्ये जितकी मुले येत आहेत, त्यामध्ये प्रत्येक मुलाचे नाव त्याच्या आईचे नाव नोंदविण्यात आलेले आहे. सदर सॉफ्टवेअरमध्ये त्यांचे आधार क्रमांक घेण्यात आलेले आहे. जवळपास ५६ टक्के मुलांचे आधार त्या सॉफ्टवेअरमध्ये नोंदविण्यात आलेले आहेत. पुढील महिन्यापासून १०० टक्के आधार क्रमांक सक्तीचे करण्यात येणार आहे आणि जर आधार क्रमांक त्यामध्ये नसेल तर सेवा दिली जाणार नाही असा निर्णय घेण्यात आलेला आहे. जर मुलांचे आधार क्रमांक असतील तर त्यांची आय.सी.डी.एस.मध्ये नोंद होईल. तसेच मुलांनी शालेय पोषण आहार घेतला आहे किंवा नाही यासाठीसुद्धा काही उपाययोजना करता येते का किंवा कोणते सॉफ्टवेअर तयार करता येते का ह्या बाबत विभाग विचार करीत आहे. तसेच ॲप्सद्वारे किंवा ओळखपत्राद्वारे याबाबतची माहिती ठेवावी असे प्रकार ७० ते ८० टक्के आंगणवाड्यामध्ये शक्य होईल. परंतु जिथे इंटरनेट किंवा अशा प्रकारच्या सोयी नाहीत, अशा ठिकाणी अडचणी निर्माण होतात. तरी सुद्धा याबाबत १०० टक्के उपाय विभागाला अजून तरी मिळालेला नाही. परंतु त्याबाबत विचार सुरू आहे. मुळात किती पोषण आहार तयार झालेला आहे आणि किती आहार मुलांपर्यंत वितरीत झालेला आहे ह्याबाबत नावीन्यपूर्ण तांत्रिक बाबी विभागाने तयार केलेल्या असून त्याबाबतचा नमुना तयार झालेला आहे आणि तो सर्व आंगणवाड्यांना लागू करता येईल किंवा नाही याबाबतही अभ्यास सुरू आहे.

२.९५ परिच्छेद क्र. ४.१.१३.१ "खुल्या जागेत कार्यरत असणारी अंगणवाडी केंद्रे" :

झाडाखाली कोणत्याही आंगणवाड्या भरत नाहीत. परंतु महालेखापालांचा आक्षेप असा आहे की, आयुक्तांच्या अभिलेख्याच्या तपासणीत ७६५८ आंगणवाड्या खुल्या जागेत झाडाखाली चालविण्यात येत असल्याचे सांगितलेले आहे. परंतु विभागाच्या अभिप्रायामध्ये नमूद आहे की, की झाडाखाली आंगणवाड्या भरत नाहीत. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, काही ठिकाणी असे आढळलेले आही की विशेषत: औरंगाबाद शहरामध्ये आंगणवाडी सेविकेच्या घरामध्ये अशा आंगणवाड्या भरत आहेत. झाडाखाली एकही आंगणवाडी भरते असा एकही अहवाल विभागाकडून प्राप्त झालेला नाही.

पण आयुक्तांकडे जो एम.पी.आर. अहवाल येत असतो त्यामध्ये मोकळ्या जागेमध्ये असे म्हटलेले आहे. याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, मोकळी जागा याचा अर्थ झाडाखाली असा होत नाही.

या अनुषंगाने समितीने सुचित केले की, मोकळ्या जागेबाबत विभागाने चौकशी करावी आणि मोकळ्या जागेमध्ये आंगणवाड्या सुरू होऊ नयेत. तसेच मोठ्या प्रमाणात सी.एस.आर. चे पैसे मिळत असतात. सदर निधी हा जलयुक्त शिवार किंवा इतर कामामध्ये अशा प्रकारचा निधी खर्च करण्यात येत असतो. याचा मिलाप शासनाने सी.एस.आर. मध्ये समाविष्ट करून घेतला पाहिजे आणि समाजकल्याण अधिकारी किंवा बाकीच्या विभागाशी संबंधीत अधिकाऱ्यांनी त्यांच्या जागेची ओळख करून दिल्यास किंवा तेथील जागा मालकाची अनुज्ञा असेल तर कोणतीही सी.एस.आर. कंपनी ही अशा इमारती बांधून देण्यास तयार होत असते. त्यांना सर्टीफिकेशन आणि व्हॅल्युऐशन शासनाच्या बांधकाम दराप्रमाणे उपलब्ध करून द्यावयास पाहिजे. असे शासन या वर्षापासून सुरू करणार का? दुसरे म्हणजे आंगणवाडी शाळामध्ये मुलांना सकस पोषण आहार पुरविण्याची जी व्यवस्था आहे त्यामध्ये सचिव महोदयांच्या म्हणण्याप्रमाणे तेथे इंटरनेट किंवा ॲप्स उपलब्ध नसतील किंवा इतर काही अशा सुविधा करणे शक्य होत नसेल तर आंगणवाड्यांच्या बाहेर "खालील विद्यार्थी या आंगणवाडीमध्ये येऊन शिक्षणाचा लाभ घेत आहेत" अशा प्रकारची विद्यार्थ्यांच्या नावाची यादी लावली तर न जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाव त्यावर असेल तर त्याबाबत गावातील लोक फिर्याद करू शकतील. अशा प्रकारे जी मुले आंगणवाडीमध्ये जाऊन शिक्षणाचा व सकस शालेय पोषण आहाराचा लाभ घेत आहेत, अशा मुलांच्या आई वडीलांच्या नावासह एक पाटी शाळेच्या बाहेर लावली तर यामधील बऱ्याच अडचणी दुर होऊ शकतील. या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, यामध्ये सी.एस.आर. आणि पटसंख्येबाबत निर्णय घेऊन याबाबतच्या उपाय योजना केव्हापर्यंत विभाग करणार आहे यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, पहिल्या सूचनेमध्ये सी.एस.आर. मधून आंगणवाडी बांधकाम करून देण्यास कोणी तयार असतील तर त्यांचे विभाग स्वागतच करेल. आंगणवाडी बांधकाम करून झाल्यावर त्याचे हस्तांतरणावेळेस शासनाच्या बांधकाम दराप्रमाणे व्हॅल्युऐशन देण्यात येईल. तसेच समितीने केलेली दुसरी सूचनाही उत्कृष्ट असून त्याबाबतचा सुद्धा निश्चितपणे विचार करण्यात येईल.

२.९६ एकूण ९६४३ आंगणवाड्यापैकी किती आंगणवाड्याचे बांधकाम पूर्ण झालेले आहे? ५६४५ आंगणवाड्याचे बांधकाम साध्य केलेले आहे. दुसरे असे की, मोठ्या प्रमाणावर आंगणवाड्यांचे बांधकाम चालू आहे. परंतु सन २०१६ पासून त्यांच्या दुरुस्तीसाठी कोणतेही नियोजन नाही. शासन दुरुस्तीसाठी निधी देत नाही त्यामुळे त्या इमारती पाडून नवीन इमारती बांधाव्या लागत आहेत. समितीची भूमिका अशी आहे की, आंगणवाड्यांच्या दुरुस्तीसाठी लेखा संकेतांक तयार करून निधी देण्यात यावा. परंतु अजूनपर्यंत याबाबत विभागाकडून कार्यवाही करण्यात आलेली नाही. तर अशा दुरुस्त्या विभाग करणार का? असे समितीने नमूद केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये बरेच प्रयत्न करण्यात आले आहे. तसेच वित्त व नियोजन याबाबत चर्चा ही केली आहे की, डीपीसी मधून किंवा इनोव्हेटिव्ह मध्ये तरी करू द्या. त्यावेळी श्री. गिरीराज यामध्ये असताना त्यांनी तो मान्य केला होता. पण पुढे त्याचा हेड उघडला नाही. १४ व्या वित्त आयोगात दुरुस्ती करण्याबाबतही प्रस्ताव सादर केला होता.

२.९७ DPDC मधून अंगणवाडी बांधकाम दुरुस्तीसाठी खर्च करण्याची कार्यपद्धती निश्चित केली आहे काय व त्यासाठी DPDC मधून नवीन लेखाशिर्ष घेणे या अनुषंगाने विभागाने केलेल्या कार्यवाहीची लेखी माहिती खालीलप्रमाणे आहे :-

DPDC मधून अंगणवाडी बांधकाम दुरुस्तीचा खर्च करण्याची कार्यपद्धती निश्चित करण्याकरिता या आयुक्तालयाचे पत्र क्र.एबाविसेयो/का-७/८३२/१६.१७, दिनांक १६.३.२०१७ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. या प्रस्तावात अंगणवाडी केंद्रांच्या इमारतींची दुरुस्ती करणे.

(उदा. अंगणवाडी केंद्राची फरशी बदलणे, दरवाजे खिडक्यांच्या दुरुस्ती करणे, सिंमेटच्या अथवा लोखंडी पत्रे असलेल्या अंगणवाडीचे छत दुरुस्त करणे इ.चा समावेश आहे.) या बाबीकरिता स्वतंत्र लेखाशिर्ष घेण्याबाबतची करण्याची कार्यवाही शासन स्तरावरून करण्यात येत आहे.

१४ व्या वित्त आयोगातील पैसा ग्रामपंचायतीला जातो आणि ते लोक अंगणवाडीला काहीच देत नाहीत. अंगणवाडीला डीपीडीसी मधून पैसे द्यायला लोकप्रतिनिधी तयार आहोत. पण जर डीपीडीसी मध्ये विभाग हेडच उघडत नाहीत तर लोकप्रतिनिधींचा काय करणार? जिल्हा परिषदेच्या रिपेअरींगला हेड आहे म्हणूनच निधी मिळतो मग अंगणवाडीला का मिळत नाहीत? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी ही बाब मान्य केल्यास अंगणवाडीच्या बांधकाम दुरुस्तीसाठी कुठेही पैसे मिळत नाहीत त्याबाबत समितीने देखील सूचना केली आहे.

जर विभागाने प्रस्ताव पाठविला असेल तर समितीच्या माध्यमातून सूचना करण्यात येईल की, अंगणवाडी इमारतीची दुरुस्ती जिथे शक्य असेल त्या दुरुस्ती साठी एक स्वतंत्र हेड उघडावा आणि त्या पैशाचे नियोजन डीपीडीसी मधून करावे. सर्व शिक्षा अभियानात तर प्रचंड पैसा दुरुस्ती साठी वापरला आहे. जुन्या इमारती पाडून आपण नवीन सुद्धा केल्या आहेत आणि त्याला कंपाऊंड वॉल सुद्धा केलेले आहेत. असे मत समितीने व्यक्त केली असता विभागीय सचिवांनी आश्वासित केले की, पुढील आठवड्यात महालेखाकार हे हेड क्रिएट करण्याबाबतचा प्रस्ताव मूव्ह करण्यात येईल. हेड करण्यासाठी फायनान्स कडून ऑफीसकडे जावे लागेल.

चांगल्या इमारतीसाठी १० हजार लागतात तेही देण्यात येत नाहीत आणि लोकप्रतिनिधींना आमदार फंडातुनही देता येत नाहीत. शेवटी ती इमारत पाडावी आणि नवीन बांधावी हाच प्रकार या ठिकाणी चालू आहे असे मत समितीने व्यक्त केले.

डोंगरी भागात मिनी अंगणवाड्या जास्त आहेत आणि जागा मिळत नसल्यामुळे त्या अडचणीच्या आहेत. डोंगरी भागात मोठ्या प्रमाणात पवनचक्क्या उभ्या राहिलेल्या आहेत आणि त्याचे पैसे पीडब्लूडीला देतात व ग्रामपंचायतीला एखादे सामाजिक मंदीर बांधण्यासाठी देत आहेत त्यांच्याकडून सीएसआर मध्ये आपण ते पैसे घेऊयात. सीएसआरशी संबंधीत जे सूचना आहेत त्या जर महिला व बालविकास विभागाच्या वेबसाईटवर टाकल्या तर many corporates will respond to this because they have so much fund but they do not know or have a clear idea where they can spend this fund. असे समितीने सूचित केले.

२.९८ CSR अंगणवाडी बांधकाम व सुविधा याबाबतची कामे करता येऊ शकतात. त्याबाबतची कामाची यादी संकेतस्थळावर दर्शविण्यात यावी यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती खालीलप्रमाणे आहे :-

CSR माध्यमातून केली जाणारी कामे जिल्हास्तरावर संनियंत्रित केली जातात या अंतर्गत करण्यात येणारे बांधकाम व सुविधा याबाबतच्या कामांची यादी संबंधीत जिल्हापरिषदेच्या संकेत स्थळावर दर्शविण्याबाबत आयुक्तालयाचे पत्र क्र. १८९२, दिनांक ३०/०६/२०१७ अन्वये सर्व जिल्ह्यांना सूचना देण्यात आलेल्या आहे. याच्या अंमलबजावणीबाबत वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येईल.

दुसरे म्हणजे ९६४३ इमारतींच्या विकासाबाबत विभागाची भुमिका काय आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, याबद्दल प्रगतीची माहिती उपलब्ध नाही.

सदर माहिती लेखी स्वरुपात विभागाकडून प्राप्त झाली असून ती खालीलप्रमाणे आहे.

अंगणवाडी इमारत बांधकाम कार्यक्रम सन २०१०-११ या वर्षापासून सुरू करण्यात आला आहे. ही बांधकामे जिल्हा नियोजन समिती, मानव विकास मिशन, १३ वा वित्त आयोग, नाबार्ड, आदिवासी उपयोजना, अल्पसंख्याक आयोग (MSDP) इ.स्त्रोतांकडून उपलब्ध करून देण्यात

आलेल्या निधीतून करण्यात येतात. यापैकी आयुक्तालयाच्या स्तरावरुन १३ वा वित्त आयोग व आदिवासी विकास विभाग यांच्याकडून प्राप्त झालेला निधी वितरीत करण्यात आला आहे. जिल्हा नियोजन समिती, मानव विकास मिशन, नाबार्ड, अल्पसंख्यांक आयोग (MSDP) यांच्याकडील निधी संबंधित जिल्ह्यांचे नियोजन समितीकडे वर्ग करण्यात येतो व तो निधी संबंधीत जिल्हापरिषदांना वितरीत करण्यात येतो. ही बांधकामे जिल्हापरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत करण्यात येतात. ही कामे संबंधित गटविकास अधिकारी व ग्रामपंचायत यांचेमार्फत करून घेण्यात येतात. या संपूर्ण प्रक्रियेवर संबधित जिल्हापरिषदेच्या बांधकाम विभागाचे संनियंत्रण असते. अंगणवाडी केंद्राचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्या क्षेत्रातील बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे सदर इमारतीचे हस्तांतरण करण्यात येते. त्यामुळे सदरील बांधकाम जलदगतीने व विहित कालावधीत परिपूर्ण करून घेणे या विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना शक्य होत नाही. सन २०१०-११ पासून दरवर्षी नवीन बांधकामे मंजूर करण्यात आली आहेत. त्यापैकी काही कामे विविध कारणांमुळे पूर्ण झालेली नाहीत याबाबत जिल्हास्तरावरुन प्राप्त झालेल्या माहितीनुसा सद्य:स्थितीत एकूण २३४१ अंगणवाडी केंद्राचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. ही कामे पूर्ण करून घेण्यासाठी आयुक्तालयाच्या स्तरावरुन पाठपुरावा करण्यात येत आहे.

पण या ९६४३ अंगणवाडयांची माहिती एमपीआरमध्ये नाही असे महालेखाकारांनी निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या ९००० अंगणवाडयांची माहिती तंतोतंतपणे एमपीआरमध्ये नाही. एकूण किती अंगणवाडया आहेत आणि त्या प्रत्येकाचे काय स्टेटस आहे याची वेगळी नोंद आहे.

२.९९ परिच्छेद क्र. ४.१.१३.२ : अंगणवाडी केंद्रांना भेट :

अंगणवाडी केंद्रांना भेट देखील बरोबर झालेली दिसत नाही. अनेक ठिकाणी स्वच्छता गृहे नाहीत, काही ठिकाणी मोकळी जागा नाही, काही ठिकाणी मुलांच्या बसण्याची व्यवस्था नाही म्हणजे मुंबईत २० लाभार्थ्यांसाठी ८० फुट जागा आहे या जागेत विद्यार्थी कसे बसणार आहेत. या ठिकाणी सांगितल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या इमारती ७० टक्के रिकाम्या आहेत, त्यांच्या कडून जागा घ्या कारण २० लाभार्थ्यांना ८० फुट जागेवर कसे बसवणार आहात? त्यांचे संगोपन कशा प्रकारे होणार आहे? सीडीपोओचे अंगणवाडयांना भेटी देण्याचे प्रमाणे खूप कमी आहे. याबद्दल विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, समितीने सूचना केल्याप्रमाणे मुंबई महापालिकेकडून जितक्या जागा उपलब्ध करता येतीललतेवढे विभागगत्यांच्याकडून उपलब्ध करून घेण्यात येईल. समितीची सूचना अशी आहे की, पूर्वीचा जो नॉर्म्स आहे त्याप्रमाणे तपासणी होत नाहीत त्याबद्दल आता विशेष मोहिम घेऊन त्यांच्याकडून मासिक अहवाल मागवणार आहोत की, त्यांनी किती तपासणी केली आणि किती अपेक्षित होती. जर यामध्ये ते अधिकारी दिलेल्या निकषाप्रमाणे तपासणी करत नसतील तर त्यांच्यावर नक्कीच प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

There are so many students who are ready, in their vacation period, to volunteer or do some work for the Government. Can it we take the help of these students? You deviced a checklist, they have to just fill it up and give it back to you as to what they have seen there. This is only a suggestion? बाब महालेखाकारांनी निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले तर यामध्ये शासकीय प्रकार टूर डायरीचा होता. मध्यंतरीच्या काळात टूर डायरी लिहिणे बंद करण्यात आले होते. आता ०१ एप्रिल, २०१७ पासून टूर डायरी पुन्हा कार्यान्वीत केलेली आहे आणि सर्व सीडीपीओ व डेप्युटी सीओनी आपली टूर डायरी कमिशनर ऑफिसकडे सबमीट करायची आहे. प्रोजेक्ट मोडमध्ये ठराविक काळासाठी ते करता येईल. पण टूर डायरी बोलावण्याचा प्रकार सुरू केलेला आहे त्यावरुन असे कळेल की, किती लोक यात आहेत किंवा नाही, किती लोकांनी भेटी दिलेल्या आहेत. कारण यात लोकांनी वेगवेगळी कारणे पुढे केलेली आहेत. यामध्ये असे लक्षात आले आहे की, lack of will power on the part of people to move, हे एक प्रमुख कारण आहे आणि म्हणून त्याला चालना देण्यासाठी टूर डायरी पुन्हा बोलावण्याचा प्रकार सुरू केलेला आहे. दर महिन्याला कळेल की, who is inspecting and not inspecting.

२.१०० टूर डायरीची जी जबाबदारी आहे ती बंद करण्याची त्या वेळेला काही कारणे असतील ती आता आपण नवीन सुरू करत आहोत तर त्यामधील ज्या लॅप्सेस व लॅक्युनास होत्या त्या दुरुस्त करण्याची गरज होती. समजा एखादा व्यक्ती त्या गावात जात असेल तेथील सरपंचाची सही असेल तर त्याला तो जबाबदार राहायला पाहिजे की, हा व्यक्ती माझ्या गावात आला आणि त्यानेच हे केले आहे. असे काहीतरी मेकॅनिझम आपल्याला तयार करावे लागेल म्हणजे आपला जो काही हेतू आहे तो साध्य होईल. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये जेवढे सीडीपीओ आणि डेप्युटी सीईओ आहेत हे सर्व तालुका किंवा जिल्ह्याच्याच ठिकाणी असतात म्हणून त्यांना इंटरनेटची काहीच अडचण नाही. त्यांनी तिथे फोटो काढुन जेव्हा रेंजमध्ये येतील तेव्हा मेलवर अपलोड करायचे आहेत. या लोकांचे मॉनिटरींग आणि इव्हॅल्यूएशन हे काही तांत्रिक अडचण नाही. अवघड क्षेत्रातील अंगणवाडया असल्या तरी त्यांना तांत्रिक उपाय आहे आणि हे लोकांना व्हाटस् अप ग्रुपवर भेटीचे फोटोग्राफ अपलोड करण्याचा प्रकार आता आमच्या आणि कमिशनर स्तरावर सुरू झालेला आहे.

२.१०१ परिच्छेद क्र.४.१.१४ - बालनायक कायद्याची अंमलबजावणी

२.१०२ परिच्छेद क्र. ४.१.१४.१ "बालगृहातील मुलाकरिता व्यावसायिक शिक्षणाची तरतूद नव्हती" :

मुलींचे लैगिंक शोषण होऊ नये यासाठी सीसीटीव्ही बसविण्याचे प्रस्तावित केले आहे. सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, बहुतेक सर्व ठिकाणी सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत. जेथे बसविण्यात आले नाहीत तेथे आठ दिवसात सीसीटीव्ही बसविण्याच्या सूचना देण्यात येतील.

यामध्ये २२ ठिकाणी तपासणी करण्यात आली आहे. नागपूर, नाशिक व देवनार या ठिकाणी सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत. इतर ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले नाहीत. तसेच नागपूर येथे दोन ठिकाणी कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

संस्थेतील बालकांची व कर्मचाऱ्यांची उपस्थिती नोंदविण्यासाठी शासन मान्य बाल विकास संस्थेमध्ये बायोमॅट्रीक यंत्र बसविण्यासाठी संबंधितांना वर्कऑर्डर देण्यात आली आहे. हे बायोमॅट्रीक यंत्र बसविण्यात आली आहेत काय? प्रस्तावित केले असे आपण नमूद केले आहे. वर्क ऑर्डर दिले असे नमूद केले आहे. त्यामुळे सीसीटीव्ही बसविण्यात आले नाहीत काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, बायोमॅट्रीक यंत्र सामाजिक न्याय विभागामार्फत सर्व संस्थासाठी पुरविण्यात आले होते. ते यंत्र सद्यस्थितीत सुरू नाहीत. एनजीओच्या संस्थामध्ये बायोमॅट्रीक यंत्र देण्यात आले होते. ते चालू स्थितीत नाहीत.

विभागीय सचिवांनी समितीस आताच सांगितले की, वर्क ऑर्डर दिली आहे. वर्क ऑर्डर दिली तर आता बायोमॅट्रीक यंत्र तेथे बसतील. आता सांगण्यात येते की, बायोमॅट्रीक यंत्र बसविली पण सुरू नाहीत. अशा प्रकारे गोलमोल उत्तरांनी समितीचे समाधान होणार नाही आणि समिती हा प्रश्न सोडूनही देणार नाही. समितीला सर्व माहिती हवी आहे. जर बायोमेट्रिक मशिन्स लावल्या असतील तर त्या सुस्थितीत कार्यरत असल्याच पाहिजेत, असे अभिप्रेत आहे. कार्यरत नाहीत, हे काही उत्तर होऊ शकत नाही. यासाठी विभागाने यासाठी कोट्यवधी रुपये खर्च केले आहेत. यास जबाबदार कोण आहेत? व महिला व बाल कल्याण विभागाने ऑर्डर दिली होती की सामाजिक न्याय विभागाने ऑर्डर दिली होती? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सामाजिक न्याय विभागामार्फत ऑर्डर दिली होती.

६ विभागीय स्तरावर ३५ जिल्ह्यात बाल महोत्सव केला जातो असे विभागाच्या उत्तरामध्ये नमूद केले आहे. पण असे कधीही ऐकले नाही. महिला व बालविकास विभागाची बालमहोत्सवाची एक योजना आहे. त्यानुसार बालमहोत्सव आयोजित केले जातात का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या योजनेमध्ये असे अभिप्रेत आहे की, राज्यातील बालगृहांमधील मुलांना एका ठिकाणी आणणे व स्पर्धा घ्यावी. बालमहोत्सव विभागीय स्तरावर आयोजित केला जातो. पण मागील दोन वर्षात बालमहोत्सव झालेले नाहीत. त्यापूर्वी झाले होते. सर्वसाधारणपणे वर्षातून एकदा बालमहोत्सव आयोजित केला जावा, असे अपेक्षित आहे. पण मागील दोन वर्षात बालमहोत्सव झालेला नाही. बालमहोत्सवासाठी फक्त निधी कमी प्रमाणात उपलब्ध होतो. जिल्हा स्तरावरुन फोटो वगैरे सुद्धा मागवून घेण्यात आलेले आहेत. या कालावधीत बालमहोत्सव साजरे झाले आहेत. पण निधी कमी प्रमाणात उपलब्ध होतो.

"मुलांना उच्च शिक्षण देण्यासाठी 'एकलव्य' व 'ज्ञानसूर्य' या नवीन योजना प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत व मान्यतेची कार्यवाही सुरू आहे" असे लेखी खुलाशात म्हटले आहे. ही योजना कधी प्रस्तावित करण्यात आली, योजनेचे सद्य:स्थिती काय आहे, योजना मंजूर झाली आहे का आणि ही योजना कशी आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्या नवीन योजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत तशाच स्वरुपाच्या योजना सामाजिक न्याय विभाग किंवा आदिवासी विकास विभागाकडून राबविण्यात येत आहेत. योजनांचे ड्युप्लिकेशन होऊ नये म्हणून वित्त विभागाने महिला व बालविकास विभागाचा प्रस्ताव टर्न डाऊन केला आहे आणि त्यावर कार्यवाही सुरू आहे.

वित्त विभागाने मान्यता दिली नसल्यामुळे आता कोणती कार्यवाही सुरू आहे? विभागाचा प्रस्ताव दप्तरी दाखल झाला आहे. महालेखाकारांचा परिच्छेद असा आहे की, आय.टी.आय.बरोबर प्रशिक्षणाची योजना होती. पण ती बंद पडली. त्यामुळे आता विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते किंवा नाही, त्यासाठी काही पर्यायी व्यवस्था केली आहे का, याबाबतचा खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, आय.टी.आय.साठी अनुदानाची जी योजना होती त्यासाठी स्वतंत्र हेड दिले नसून संस्थांना जे अनुदान देण्यात येत होते त्यातूनच ती योजना राबवावी, अशा सूचना होत्या. त्यासाठी सेपरेट हेड क्रिएट केलेले नव्हते. म्हणून निधी उपलब्ध होत नव्हता. संस्थांनाच निधी कमी प्रमाणात उपलब्ध होत असल्यामुळे ती योजना बंद पडली. म्हणून नवीन हेड क्रिएट करून कर्मवीर भाऊराव पाटील स्वावलंबन योजना तयार केली आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील स्वावलंबन योजना ही वेगळी योजना आहे. त्यापूर्वीच्या योजनेनुसार विभागाने विद्यार्थ्यांना आय.टी.आय.मध्ये दाखल केले. त्यामधील काही विद्यार्थी शासकीय वसतिगृहाचे तर काही विद्यार्थी खाजगी अनुदानित संस्थेचे होते. संस्थांना विभागाने असे सांगितले की, तुमच्याकडे असलेल्या उपलब्ध निधीतूनच हा खर्च करावा. अगोदरच संस्थांवर विद्यार्थ्यांच्या जेवणाची, राहण्याची आणि अन्य जबाबदारी आहे. त्यासाठी जे अनुदान संस्थांना दिले जाते त्यामधूनच प्रशिक्षणाचा खर्च करावा, त्याचे नियोजन नंतर करतो, असे विभागाने त्यांना सांगितले. परंतु, सांगितल्याप्रमाणे विभागाने निधीचे नियोजन केले नाही. म्हणून त्या विद्यार्थ्यांना एक वर्षानंतर प्रशिक्षण अर्धवट सोडावे लागले, याबाबत

विभागाचे काय स्पष्टीकरण आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, निधी उपलब्ध करून न दिल्यामुळे ही योजना बंद झाली. म्हणूनच नवीन कर्मवीर भाऊराव पाटील स्वावलंबन योजना सुरू करण्यात आली आहे.

२.१०३ विभागाने योजना तयार करायची, त्यानुसार विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यास सांगायचे आणि एक वर्षानंतर फी भरावयास निधी नसल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रशिक्षणापासून माघारी बोलवायचे, हा कोणता न्याय आहे? ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, हे खरे आहे की, निधीअभावी या विद्यार्थ्यांचे आय.टी.आय.चे प्रशिक्षण त्यावेळी पूर्ण होऊ शकले नाही. विभागाकडे वेगळा हेड नसल्यामुळे आणि शासनाची ग्रँट नसल्यामुळे त्या विद्यार्थ्यांची फी भरता आली नाही. म्हणून त्यांचे प्रशिक्षण अर्धवट राहिले.

परंतु, याच योजनेसाठी विभागाने सन २०१० मध्ये १३ लक्ष रुपये दिले आहेत असे समितीने नमूद केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, समितीचे म्हणणे बरोबर आहे. पण त्यानंतर दुसरा टप्पा आला त्यावेळी शासनाची अशी भूमिका होती की, नियमित अनुदानातूनच निधी उपलब्ध करून द्यावा. परंतु, आमच्याकडे निधी उपलब्ध नसल्यामुळे दुसऱ्या टप्प्याचा निधी देता आला नाही. म्हणून त्यांचे प्रशिक्षण अपूर्ण राहिले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

परंतु, यासाठी केलेला १३ लक्ष रुपयांचा खर्च निष्फळ ठरला आहे. एक तर अर्धवट शिक्षण दिले आणि त्यासाठी केलेला १३ लक्ष रुपयांचा खर्च निष्फळ ठरला. दुसऱ्या वर्षी आपण विद्यार्थ्यांना काढून घेतले. कारण, विभाग निधी देऊ शकत नव्हता. वास्तविक पाहता, धोरण तयार करून विभागाने ही योजना आखली होती, त्यानुसार विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यास सांगितले होते, एका वर्षाचा खर्च सुद्धा केला होता. पण त्यानंतर योजनेचा हेतू योग्य असताना केवळ निधी नसल्यामुळे योजना बंद केली आणि त्यामुळे पूर्वी केलेला खर्च निष्फळ ठरला, असे वाटत नाही का, असल्यास, यास कोण जबाबदार आहेत? यामुळे ४५६ मुलांचे भवितव्य सुद्धा अडचणीत आले आहे. दोन वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण करता आले असते तर त्यांना काही तरी रोजगार मिळाला असता. म्हणूनच विभागाने या योजनेचे नियोजन ढिसाळ पद्धतीने केले, असे म्हणता येणार नाही का? एखादी योजना तयार करीत असताना आणि ती योजना देखील कालबद्ध प्रशिक्षणाच्या संदर्भातील असताना पूर्ण कालावधीसाठी निधी उपलब्ध आहे किंवा नाही, याबाबतचा विचार विभागाने करणे अभिप्रेत आहे. तसा विचार विभागाने केला होता का? विभागाच्या ढिसाळ नियोजनामुळे विद्यार्थ्यांचेही नुकसान झाले आहे आणि शासकीय निधीचाही अपव्यय झाला आहे. त्यामुळे यासाठी जे कुणी जबाबदार असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करावीच लागेल. नियमाप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणे गरजेचे होते. कै.भाऊराव पाटील स्वावलंबन योजना ही या योजनेच्या नंतरची योजना आहे. योजनेची नावे काहीही असोत. ती योजनाच पूर्ण झाली नाही तर काय उपयोग आहे? असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ही वस्तुस्थिती आहे की, १६ ते १८ वयाच्या मुलांच्या पुढील भवितव्यासाठी आय.टी.आय.प्रशिक्षण महत्वाचे होते. पण एक वर्षानंतर ही योजना बंद करण्यात आल्यामुळे शासनाचे आणि विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले आहे, हे विभागास मान्य आहे.

जर विभागाला हे मान्य असेल तर या संदर्भात जबाबदारी निश्चित करावी. ज्यांनी ही अर्धवट योजना तयार केली त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून, कारवाई करून समितीला एक महिन्याच्या आत अहवाल सादर करावा असे निदेश समितीने दिले.

२.१०४ विभागाने निधी उपलब्ध करून दिला होता का? निधी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाची आहे. म्हणजेच विभागाच्या अधिकाऱ्यांची असते. मात्र, त्यांनी निधी उपलब्ध करून घेतला नाही आणि नंतर संस्थेला असे सागितले की, तुम्ही खर्च करावा. संस्थांनी असे सांगितले की, संस्थेचे जे बजेट आहे त्यामध्ये हा खर्च करू शकणार नाही. एका वर्षाला शासनाने १३ लक्ष रुपये खर्च केले आणि पुढील वर्षी ४५६ विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात लोटले. त्यामुळे पूर्वी केलेला खर्च निष्फळ ठरलेला आहे. यास जे कुणी अधिकारी जबाबदार असतील, ज्यांनी ज्यांनी या विषयाकडे दुर्लक्ष केले आहे, त्या सचिवांपासून सर्वांवर जबाबदारी निश्चित करावी आणि समितीला अहवाल सादर करावा असे निदेश समितीने दिले.

"नवीन संस्थांमध्ये असलेल्या मुलींशी जास्तीत जास्त संवाद साधल्याशिवाय त्या मोकळेपणाने बोलू शकणार नाहीत. यासाठी संस्थांमध्ये मुख्य सेविकांनाही नियमित तिमाही भेटी देण्याकरिता आयुक्तांच्या परिपत्रकान्वये सूचित करण्यात आले आहे तसेच सर्व संस्थांमध्ये समुपदेशकाच्या सेवा उपलब्ध करून देण्याबाबत सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना कळविण्यात आले आहे. त्यामुळे मुलींच्या शोषणाच्या घटनांना आळा बसेल" , असे नमूद केले आहे. याबाबतची अंमलबजावणी झाली आहे का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मुलींसाठी व्यवस्था आहे, त्यानुसार नियमित स्वरुपात स्थानिक लोक उपलब्ध होतात, बेसिकली त्यामध्ये महिला टिचर, एनजीओ प्रतिनिधी यांचा समावेश आहे. आमचे हे नियमित असते. संवाद साधायला तज्ज्ञ माणसे, लेडी डॉक्टर उपलब्ध झाले तर कमीत कमी ३ महिन्यांतून एकदा शिबिर घेण्याचे आमचे प्रावदान आहे आणि तसे भरपूर ठिकाणी झाले आहे. आपणास पाहिजे असेल तर मी त्याचा रिपोर्ट देते. मुख्य सेविका तेथे जात नाहीत, पण प्रायव्हेट इंडिव्हिज्युअलला बोलावून त्यांचे समुपदेशन करणे आणि त्यांना प्रत्येक गोष्टीची इन्फर्मेशन करून देणे, हे विभागाकडून करण्यात येते.

२.१०५ परिच्छेद क्र. ४.१.१५.१ मनुष्यबळाचे व्यवस्थापन :

मनुष्यबळाचे व्यवस्थापन याबाबत सध्याची परिस्थिती अवगत करताच विभागीय सचिवांनी सांगितले की, ही इस्टॅब्लिशमेंट सुद्धा पुणे, कमिशनरेटला आहे शेवटी या पदांची अपॉइंटमेंट महिला व बालविकास विभागाला करायची आहे तर याबद्दल सध्या काही सुधार केला आहे काय? एमपीएससी कडून काही अधिकारी मिळाले आहेत काय? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, एमपीएससी कडून महिला व बालविकास विभागाने सीडीपीओ मिळाले आहेत आणि त्यांचे नियुक्तीचे परिपत्रक देखील निघालेले आहे. दिनांक १९ जून २०१७ वार सोमवारी सर्वांची जॉइनिंग नवी मुंबई मध्येच ठेवण्यात आली आहे आणि इथूनच त्यांना वर्क ऑर्डर देऊन २ दिवसात त्यांना त्यांच्या ठिकाणी रुजु व्हायला सांगितले जाणार आहे.

तथापि पूर्वीच्या उत्तरात विभागीय सचिवांनी सांगितले की, सीडीपीओंची ३५० पेक्षा जास्त पदे रिकामी आहेत. अनेक ठिकाणी फक्त पर्यवेक्षकाला, बीडीओला, एकालाच दोन-दोन ठिकाणी चार्ज आहे. या दृष्टीने आता किती टक्के पदे भरणार आहेत. अशी विचारणा समितीने केली असे विभागीय सचिवांनी सांगितले. १४९ पदांची प्रत्यक्ष भरती विभागाकडे येत आहे आणि ४९ पदांची दुसरी यादी एमपीएससीने जाहीर केली आहे. तर २०० वर्ग २ चे सीडीपीओ विभागाला मिळत आहेत. वर्ग १ च्या सीडीपीओंची १०४ पदे विभागाकडे आहेत या विरुद्ध ६८ व्यक्ती उपलब्ध आहेत त्यामुळे ही परिस्थिती काही इतकी बिकट नाही. वर्ग २ ची बिकट परिस्थिती ही रुरल आणि ट्रायबल एरिया मधील होती. त्यात ३५० च्या विरुद्ध २०० व्यक्ती आपल्याला मिळत आहेत आणि पूर्वीचे ५० व्यक्ती आपल्याकडे आहेत. यामध्ये जो गॅप राहिल तो १०० लोकांचा राहिल पण तो इतका बिकट नाही होणार की, पूर्वी ७० टक्के पदे रिक्त होती त्यापेक्षा ह्या परिस्थितीत सुधारणा होणार आहे.

पूर्वी काही पदे प्रमोशन मधून देत होते ते आता कसे दिले जातात? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सुपरवाइझर ५० टक्के प्रमोशनची जी पदे आहेत त्यामध्ये मागच्या आरआर रुल प्रमाणे त्यामध्ये ७ फिडींग कार्डर होते त्यापैकी २ कार्डर डेड होते तर ५ फिडींग कार्डर होते. त्या अंतर्गत सुपरवाइझर उच्च न्यायालयात गेले होते आणि तिथे त्यांनी असा स्टे आणला होता की, ' only Supervisor should be promoted to the cadre of CDPO ' . यामध्ये विभागीय सचिवांचे म्हणणे असे आहे की, ५ फिडींग कार्डर मध्ये सर्व जिल्हा परिषददकार्डर आहेत यात खुल्या स्पर्धेमध्ये जो काही मार्क्सने सुपेरिअर होईल त्यांना सीडीपीओ म्हणून घ्यावे लागेल पण कोर्टाने असे सांगितले की, यात तुम्हाला जे काही करायचे ते करा पण मागचे आरआर रुल प्रमाणे वन टाईम प्रमोशन द्या. वन टाईम प्रमोशनमध्ये जितक्या आपल्याला उपलब्ध होतील तितक्या पोस्ट आम्ही भरणार आहोत. त्यानंतर आरआर रुल्स बदलून सीडीपीओ वर्ग २ चे रुल आम्ही फ्रेम करीत आहोत. त्याबाबत आम्ही जीएडीला फाईल पाठविलेली आहे. पण कोर्टाच्या आदेशान्वे One time promotion as to the old Recruitment Rules आता करण्यात येत आहे. पण अनेक ठिकाणी बालकल्याण विभागाचे डेप्युटी सीईओ पण नाहीत. ही बाब समितीच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले, यामध्ये सर्व डेप्युटी सीईओ आणि जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी या दोन क्रिटीकल केस असल्यामुळे आमच्याकडे जितके वर्ग १ चे अधिकारी आहेत. प्रत्येक जिल्ह्यात हे दोन खूपच कटिंग एजचे अधिकारी असतात हे दोन लोकांना सामान्य ट्रान्सफर मध्ये वर्ग १ मध्ये जेवढे अधिकारी आहेत ते भरण्याचे यामध्ये प्रावधान आहे. गोंदियामध्ये श्री. पारखे आपल्याकडे अर्बन सीडीपीओ होता त्यांना आम्ही जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून मूळ चार्ज दिलेला आहे. जो पर्यंत तिथला सीडीपीओ वर्ग १ चा अधिकारी येत नाही तो पर्यंत त्याला तो डीशनल चार्ज दिलेला आहे.

२.१०६ राज्यात पुढे डेप्युटी सीईओची पदे ही जिल्हा परिषदेने भरलीच पाहिजे. जिल्हा महिला बालकल्याण अधिकाऱ्याकडे तितके काम नसते जितके जिल्हा डेप्युटी सीईओ महिला बाल कल्याण अधिकाऱ्याकडे असते. राज्यामधील जिल्हा परिषदेची ही सर्व पदे भरलीच पाहिजे. एखादया वेळी अडचण असल्यास डिशनल चार्ज दिला तर ते वेगळे पण ज्या प्रमाणे आपण गोंदिया जिल्ह्यात केले त्या प्रकारे पूर्ण राज्यात करणार काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले, आजच्या परिस्थितीत कोल्हापूर जिल्हा सोडून डेप्युटी सीईओच्या ट्रान्सफर ऑर्डर कव्हर झालेल्या आहेत. सर्व जिल्हांत त्यांना इन्डीपेन्डंट चार्ज दिलेला आहे व जिमावची ३ पदे बाकी आहेत.

कोल्हापूर संदर्भात फाईल मूव्ह केलेली आहे ती माननीय मुख्यमंत्र्यांकडे जाईल.

सध्या जी एकूण पदे आहेत त्यापैकी किती भरलेली व किती रिकामी आहेत याचा अद्यायावत माहिती समितीला अपेक्षित आहे. कारण ही सन २०११-१२ ची माहिती आहे त्यामुळे आजची परिस्थिती काय आहे याची माहिती द्या. एमपीएससीची जी १५० पदांची आपण भरती व जे काही प्रमोशन केले असेल व त्याच प्रमाणे अंगणवाडी व मदतनीसची किती पदे रिकामी आहेत आणि त्याचे रिक्त असण्याचे कारण काय आहे? म्हणजे उमेदवार खूप असतानाही त्याचे रिक्त असण्याचे काय कारण आहे. शहरी असो किंवा ग्रामीण असो, मिनी अंगणवाडी असो किंवा मोठी अंगणवाडी असो ही सर्व पदे रिकामी आहेत तर याला भरण्यासाठी आपली काय कालमर्यादा आहे. तसेच महालेखापालांची एक सूचना होती की, आपण रेडीमिक्स आहारा बद्दल सांगितले त्या बद्दल समितीची शिफारस राहणार आहे की आपण हे करावे. त्याच बरोबर याला ट्रायल बेसिसवर अमरावती, नंदुरबार आणि गडचिरोली सारख्या जिल्ह्यामध्ये ट्राय करूनच पुढे जावे अशी समितीची भावना आहे.

३ अभिप्राय व शिफारशी :

महिला आणि बालविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्य १९९३ पासून सुरू झाले. महिलांचा विशेषतः ग्रामिण भागातील महिलांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावणे तसेच सहा वर्षे वयापर्यंतच्या मुलांमधील मृत्यूदर आणि रोगाचे प्रमाण घटविणे हे या विभागाचे उद्दिष्ट आहे. या विभागाच्या कार्यामध्ये महिला आणि मुलांना पोषण आहार, निवारा, प्रशिक्षण आणि समुपदेशन, तसेच या कार्यामध्ये अशासकीय संघटनांना समाविष्ट करून घेणे इत्यादी कामांचा समावेश होता. महिलांच्या विकासासाठी महिलांवर होत असलेल्या हिंसाचारांच्या प्रकारांचे उच्चाटन करणे, त्यांचा आर्थिक स्तर उंचावणे, अशासकीय संघटनांमार्फत शासकीय कार्यामध्ये सामुदायिक सहभाग वाढविणे ही या विभागाची प्रमुख कार्ये आहेत. विभागाच्या बालविकास कार्यक्रमामध्ये, शुन्य ते सहा वर्षे वयापर्यंतच्या मुलांचे आरोग्य पोषण सुधारणे, शारिरिक आणि सामाजिक विकासासाठी मुलांसाठी योग्य वातावरण तयार करणे, इत्यादी कामांचा समावेश होतो. त्याअनुषंगाने महिला आणि बाल विकासासाठी योग्य धोरण अस्तित्वात आहे किंवा कसे केंद्रीय आणि राज्य योजनांची अंमलबजावणी काटकसरीने, परिणामकारकरित्या आणि कुशलतेने होत आहे किंवा कसे?, पुरेसा निधी उपलब्ध होता आणि वित्तीय नियोजन हे वित्तीय नियम, अर्थसंकल्पीय पद्धतीनुसार होते किंवा कसे?, वित्तीय अहवाल यंत्रणा परिपुर्ण होती, परिणामकारक नियंत्रण यंत्रणा आणि अंतर्गत नियंत्रण अस्तित्वात होते किंवा कसे? आणि मनुष्यबळ पुरेसे होते आणि त्याचा वापर विभागाच्या उद्देशांची संपूर्ण अंमलबजावणी करण्यासाठी होत होता या गोष्टींचा आढावा घेणे ही लेखापरिक्षणाची मूळ उद्दिष्टे होती.

मुख्य नियंत्रण अधिकारी निहाय विभागाचे २००७-०८ ते २०११-१२ या कालावधीचे लेखापरिक्षण करण्यात आले असता, सदोष नियोजन, बालगृहांची तपासणी न करणे, बालगृहातील मुलांसाठी व्यवसायाभिमुख प्रशिक्षणाची तरतुद नसणे, निर्धारित केलेल्या दर्जापेक्षा कमी उष्मांक (Calorific value) असलेला आहार पुरविणे, लाभार्थ्यांना पुरविलेल्या आहाराची तपासणी न करणे इत्यादी त्रुटी आढळून आल्या.

३.१ परिच्छेद क्र. ४.१.६.१ "बालगृहांच्या स्थापनेसाठी योजना तयार न करणे"

अभिप्राय :

राज्यातील ३५ जिल्ह्यांमध्ये मंजूर असलेल्या बालगृहांपैकी बीड, नांदेड आणि लातूर या तीन जिल्ह्यांमध्ये ३७ टक्के बालगृहे एकवटली आहेत. तर ३५ जिल्ह्यांतील १५१ तालुक्यांमध्ये मुलांसाठी व ११ जिल्ह्यांतील ३०९ तालुक्यांमध्ये मुलींसाठी बालगृहे नव्हती. याखेरीज राज्यात १३९ तालुक्यांमध्ये मुले अथवा मुलींसाठी बालगृहे नव्हती. प्रत्यक्ष गरज आणि सर्वंकष योजनेअभावी राज्यातील बालगृहांची स्थापना योग्य पद्धतीने झाली नाही असा आक्षेप महालेखापालांनी त्यांच्या परिच्छेदात नोंदविलेला आहे.

समितीने यावर सखोल चर्चा केली असता असे निदर्शनास आले की, काळजी आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या मुलांची निश्चित संख्या कळण्यासाठी यंत्रणा नसल्यामुळे बालगृहांची स्थापना करण्यासाठी कालबद्ध योजना आखता आली नाही. फेब्रुवारी, २००८ मध्ये झालेल्या बैठकीत मंत्री, महिला आणि बालविकास यांनी नवीन बालगृहे स्थापन करण्यासाठी आणि त्यांना मंजुरी देण्यासाठी कार्यक्षेत्रसीमा (Parameters) ठरवून सर्वंकष योजना तयार झाल्याशिवाय नवीन बालगृहे स्थापण्याचे प्रस्ताव (मतिमंद, एचआयव्ही बाधित मुले सोडून) मान्य न करण्याचे ठरविले. परंतु ऑगस्ट, २०१२ पर्यंत सर्वंकष योजना तयार करण्यात आली नव्हती, असे असतानाही अशासकीय संस्थांनी पाठवलेल्या बालगृहांच्या प्रस्तावांना मंजुरी देण्याचा निर्णय विभागाने मे, २००८ मध्ये घेतला व त्यानुसार ५२७ नवीन बालगृहे स्थापन करण्यासाठी नोव्हेंबर-डिसेंबर, २००८ मध्ये मंजुरी दिली. मार्च, २०१२ पर्यंत विभागातर्फे ४६ बालगृहे आणि अशासकीय संस्थांतर्फे ११२४ बालगृहे राज्यात चालविण्यात येत होती. परंतु आता सन २०१५ मध्ये नवीन कायदा अस्तित्वात आलेला असून त्यानुसार काळजी आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या गरजू मुलांना संस्था, व्यक्ती, पोलीस अधिकारी, नर्सिंग रुग्णालय, प्रसुतीगृहे, एनजीओ यांचेमार्फत बाल कल्याण समितीसमोर (Child Welfare Committee) प्रस्ताव सादर करण्यात येतो व त्यानंतर योग्य अशा मुलांना बालगृहामध्ये ठेवण्यात येते.

परंतु सन २००८ मध्ये नवीन बालगृहे मंजूर करण्यात येऊ नये असा निर्णय झाल्यानंतरही अधिकची बालगृहे वाढवून का देण्यात आली, त्याचप्रमाणे ही बालगृहे मंजूर करताना देखील असमतोलपणा झालेला आहे. आवश्यकतेनुसार व गरजेनुसार त्याचे वाटप न करता सरसकट बालगृहे मंजूर करण्यात आली. या सर्व बाबींमध्ये विभागांतर्गत समन्वय व सर्वेक्षणाचा अभाव दिसून येतो. संपूर्ण राज्याचे सर्वेक्षण करून त्याचे समतोल वाटप करून संपूर्ण राज्यासाठी ही योजना राबविणे आवश्यक असताना फक्त ठराविक भागामध्येच ती राबविण्यात आली व ही वस्तुस्थिती विभागाने साक्षीदरम्यान मान्य देखील केली. परंतु सन २०१४ मध्ये केंद्र शासनाने नोंदविलेल्या आक्षेपान्वये नवीन बालगृहे उघडण्यापुर्वी बाल कल्याण समितीने ज्या मुलांची शिफारस केली त्याबाबत अगोदर निर्णय घ्यावा व त्यानंतरच बालगृहांना मंजुरी द्यावी असे सांगितल्यामुळे नवीन बालगृहे उघडण्याचा प्रस्ताव बाजूला ठेवण्यात आला, परिणामी विभागीय असमतोलपणा असला तरीही नवीन बालगृहांना मंजुरी मिळालेली नाही ही वस्तुस्थिती असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. त्यातही ज्या तीन जिल्ह्यांमध्ये बालगृहे मंजूर झाली तिथे विद्यार्थी देखील खूपच कमी होती. या बालगृहांची आता विभागाने अ, ब, क अशी वर्गवारी केली व ' अ ' दर्जाच्या संस्थांची मान्यता ठेऊन अन्य संस्थांना बंद करण्याची कारवाई शासनस्तरावर सुरू झाली असता त्यास मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिली व न्यायालयाच्या परवानगीने सर्वेक्षण करण्यात आले असून आता हा

न्यायालयाचा निर्णय अंतिम टप्प्यात आहे. निकाल लागल्यानंतर 'अ' वर्गवारीच्या बालगृहांवर जास्त लक्ष केंद्रीत करून अन्य वर्गवारीच्या बालगृहांना अनुदान बंद करणेबाबत अथवा ती बालगृहे बंद करणेबाबतचा निर्णय न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून घेण्यात येईल असेही समितीसमोर सांगण्यात आले.

३.२ शिफारस :

राज्यात अत्यंत दुर्लक्षित व अज्ञान बालकांसाठी बालगृहे मंजूर करण्यात येतात. परंतु ही मंजुरी गरज व आवश्यकतेनुसार व पूर्णतः विभागीय समतोल राखून करणेसाठी राज्यातील एकूण बालगृहांची संख्या (शासकीय व अनुदानीत) व मंजूर मुलांची संख्या याबाबत विभागाने एकत्रित आढावा घेऊन ज्या जिल्ह्यात आवश्यकतेपेक्षा जास्त बालगृहे मंजूर झालेली आहेत त्या जिल्ह्यातील बालगृहे अन्य जिल्ह्यात आवश्यकतेप्रमाणे व मागणीप्रमाणे स्थलांतरीत करण्यात यावीत. कमी बालगृहे असलेल्या जिल्ह्यांच्या क्रमाप्रमाणे बालगृहांना मंजुरी देऊन यात समतोलपणा राखण्यात यावा. जी बालगृहे ' अ ' वर्गवारीत मोडतात त्यांना अधिक सक्षम करण्यात यावे व 'ब' व 'क' वर्गवारीच्या बालगृहांबाबत न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून योग्य तो निर्णय घेण्यात यावा व बंद करण्यात येणाऱ्या बालगृहातील मुलांची अन्य बालगृहामध्ये व्यवस्था करण्यात यावी. शहरी भागातील अनाथ/निराश्रीत मुलांचा देखील सर्वे करून ग्रामीण भागातील बालगृहे शहरी भागात आवश्यकतेप्रमाणे स्थलांतरीत करण्याबाबत विभागाने योग्य तो निर्णय घेऊन केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत द्यावी. तसेच भविष्यात शासनाने काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या मुलांच्या संख्येची प्रत्यक्ष निर्धारणा करून बालगृहांच्या स्थापनेसाठी कालबद्ध योजना आखावी व त्याची अंमलबजावणी योग्य तो समतोल राखून करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.३ परिच्छेद क्र. ४.१.७ 'संनियंत्रण'

३.४ परिच्छेद क्र. ४.१.७.१ "जिल्हास्तरीय पुनर्वसन समिती कार्यरत नसणे"

अभिप्राय :

विभागाने, जून २००० मध्ये जिल्हाधिकारी अध्यक्ष असलेल्या जिल्हास्तरीय पुनर्वसन समितीची स्थापना केली. ही समिती, बालगृह सोडून जाणाऱ्या मुलांना (मुले १८ वर्षांवरील आणि मुली २१ वर्षांवरील), त्यांच्या पुनर्वसनाकरिता व्यवसाय प्रशिक्षण, लघुउद्योग सुरू करण्यासाठी सहाय्य, शासन राबवित असलेल्या विविध योजनांची माहिती, वित्तीय संस्थांकडून आर्थिक सहाय्य/कर्ज मिळविण्यासाठी मदत करणे इत्यादीसाठी जबाबदार होती. समितीच्या, तीन महिन्यांतून एकदा याप्रमाणे २००७-१२ या कालावधीत २० बैठका व्हायला हव्या होत्या. मात्र तपासणी केलेल्या जिल्ह्यांमध्ये विहित केल्याप्रमाणे समितीच्या बैठका झाल्याचे दिसून आले नाही. प्रत्यक्षात सात जिल्ह्यांमध्ये २००७-१२ या कालावधीत फक्त दोन ते अकरा बैठका झाल्या आहेत. बीड जिल्ह्यामध्ये २००९-१२ या कालावधीत १८ वर्षांवरील लाभार्थी नसल्याने बैठका झाल्या नाहीत व अमरावती जिल्ह्यात २० बैठका घेण्यात आल्या. प्रमाणित केलेल्या संख्येपेक्षा कमी बैठका घेणे हे बालगृहातील मुलांच्या पुनर्वसनासाठी असलेली संस्थात्मक व्यवस्था कमकुवत असल्याचे निदर्शक आहे.

यासंदर्भात समितीने सखोल तपासणी केली असता राज्यात अनेक ठिकाणी समितीच्या विहित बैठका न होण्याची कारणे काय? अशी विचारणा समितीने केली असता यासंदर्भात सर्व सबंधितांवर कारणे दाखवा नोटीस बजावून माहिती घेऊन समितीस सादर करणेबाबत विभागाने आश्वासित केले त्याप्रमाणे प्राप्त माहितीनुसार ही बाब जिल्हाधिकारी यांचे कार्यकक्षेत येत असून स्थानिक निवडणूका, आचारसंहिता व इतर कामांची व्यस्तता लक्षात घेऊन बैठकीचा दिनांक निश्चित होतो. तसेच काही ठिकाणी मुलेच उपलब्ध नसल्यामुळे बैठका घेण्यात आल्या नाहीत अशी माहिती समितीला देण्यात आली. विभागाने याअनुषंगाने जिल्हानिहाय पुनर्वसन समितीची बैठकांची माहिती समितीसमोर सादर केली व त्यातील बैठकांचे प्रमाण पाहता संबंधितांकडून खुलासे घेण्यात आले असून प्राप्त खुलाशांची छाननी करण्यात येत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

३.५ बालगृहात राहणारी मुले व त्यांची अवस्था अत्यंत दयनीय असून शासनच त्यांचे पालक म्हणून काम करीत असते व या उदात्त हेतुनेच शासनाने या वर्गासाठी कायद्यात प्रभावी तरतुदी केलेल्या असून त्यासाठी निधीदेखील उपलब्ध करून दिला. अशा परिस्थितीत या मुलांची योग्य देखभाल होऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे करणे व सर्वसामान्य नागरिकांप्रमाणे जीवन जगण्यास सक्षम करणे व जिवनाच्या मुख्य प्रवाहात आणणे अपेक्षित आहे. या मुलांना बालगृहात ठेवण्याची वयोमर्यादा मुलांसाठी १८ वर्षे व मुलींसाठी २१ वर्षे आहेत. परंतु या विहित वयोमानानंतर या मुलांना बालगृहातून बाहेर काढण्यात येते. या वयोमानात या मुलांना योग्य दिशा दाखवून त्यांना त्यांच्या पायावर उभे करण्यासाठी व त्यांना प्रशिक्षण देणे व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बैठकाच जर विभाग घेत नसेल तर ही मुले बाहेर जाऊन स्वतःच्या उपजिवीकेसाठी अन्य गैरमार्गाला देखील लागण्याची शक्यता असते व अशावेळी या सर्व तरतुदी व निधी निरुपयोगी ठरतो. त्यामुळे या बाबी

विभागाने अतिशय जबाबदारीने व गांभीर्याने हाताळणे अभिप्रेत व आवश्यक आहे. तरीही विभागाने जिल्हास्तरीय पुनर्वसन समितीच्या नियमित बैठका घेतल्या नाहीत. प्रमाणित केलेल्या संख्येपेक्षा कमी बैठका घेणे हे बालगृहातील मुलांच्या पुनर्वसनासाठी असलेली संस्थात्मक व्यवस्था कमकुवत असल्याचे निदर्शक आहे.

३.६ वर्षातून चार बैठका घेण्याची तरतूद असताना ज्या जिल्ह्यामध्ये किमान दोन तृतीयांश बैठका घेण्यात आल्या नाहीत त्या जिल्ह्यातील संबंधित अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या कारणे दाखवा नोटीसींच्या खुलाशाची सखोल छाननी करून यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी. तसेच कोणत्याही कारणास्तव बैठका घेण्यामध्ये खंड पडू नये व जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबतचे योग्य संनियंत्रण ठेऊन जिल्हास्तरीय पुनर्वसन समिती सक्षमरित्या कार्यरत करावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी, तसेच महिला व बालविकास विभागांतर्गत सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या ९ अनुरक्षण गृहांना आणखी सक्षम करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना विभागाने कराव्यात व केलेल्या उपाययोजनांची माहिती समितीला ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.७ जिल्हास्तरावर कार्यरत अनेक समित्यांवर जिल्हाधिकारी हे अध्यक्ष असतात. जिल्हाधिकाऱ्यांकडे असलेल्या कामाची व्याप्ती पाहता या सर्व समित्यांच्या बैठका नियमितपणे घेणे त्यांना शक्य नसते. त्यामुळे याचा परिणाम निश्चितच त्या समितीच्या कामावर किंवा ज्या योजनांच्या अंमलबजावणीवर होतो. अत: यातून मार्ग काढून ही जबाबदारी अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्याकडे देणेबाबतच्या शक्यतांचा विचार करावा व योग्य तो निर्णय घेण्यात यावा. व त्या अनुषंगाने आवश्यकता असल्यास कायद्यात देखील सुधारणा करणेबाबतची आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.८ परिच्छेद क्र. ४.१.७.२ (अ) "जिल्हा निरिक्षण समिती कार्यरत नसणे"

अभिप्राय :

केंद्र शासनाच्या, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००२ च्या कलम ६२ अन्वये, राज्य शासनाने प्रमुख समाज सेवक, बालकल्याण क्षेत्रातील स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी, वैद्यकिय व्यवसायिक, राज्य शासनाचे संबंधित विभाग, इत्यादी सदस्यांचा समावेश असलेल्या राज्य सल्लागार मंडळाची स्थापना करणे बंधनकारक होते. परंतु नऊ जिल्ह्यांमध्ये निरीक्षण समित्या / सल्लागार मंडळाची विभागाने स्थापन केली नसल्याचे आढळून आले.

परिणामी बालगृहांची स्थापना आणि व्यवस्थापन, साधन संपत्तीचा वापर, शिक्षण आणि प्रशिक्षणाच्या सोयी सुविधा, काळजी आणि संरक्षण आवश्यक असलेल्या मुलांचे पुनर्वसन आणि कायद्याविरुद्ध वागणुक असणारे बाल गुन्हेगार इत्यादींबाबत शासनाला सल्ला देण्याची जबाबदारी राज्य सल्लागार मंडळाची आहे. कायद्याप्रमाणे बालगृहांची तपासणी करण्याचे महत्त्वाचे काम जिल्हा निरीक्षण समित्या/सल्लागार मंडळाच्या स्थापनेअभावी दुर्लक्षित राहिले. असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविलेला आहे.

उपरोक्त कायद्याच्या कलम ३५ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा निरीक्षण समित्यांनी जिल्हा सल्लागार मंडळ म्हणूनही काम करणे अपेक्षित आहे. त्याअनुषंगाने सल्लागार मंडळाने विविध संस्थांची पाहणी करावी व त्यांच्या शिफारशींवर राज्य शासनाने कृती करणे अपेक्षित असताना जिल्हास्तरीय समित्या स्थापन होण्यास जवळजवळ १२ वर्षे लागण्यामागील कारणांची समितीने विचारणा केली असता सन २००५ मध्ये राज्य सल्लागार समितीची स्थापना झाली. सदर समिती स्थापन झाल्यानंतर जिल्हास्तरीय समित्या स्थापन करणे बंधनकारक होते. त्या स्थापन न झाल्यामुळे पुढील गोष्टी घडल्या आहेत. परंतु जिल्हास्तरीय समित्या गठीत करणे आणि त्याअनुषंगाने आवश्यक बाबीची पूर्तता करण्याची जबाबदारी विभागाची होती. सन २०१२ मध्ये महालेखाकारांनी आक्षेप नोंदविल्यामुळे नंतर राज्य सरकारने या समित्या गठीत केल्या. परंतु सन २००५ पासून ते सन २०११ पर्यंत राज्य सरकारने याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही. हा केंद्राचा कायदा असून त्यांची अंमलबजावणी करणे राज्य सरकारवर बंधनकारक आहे. सन २००३ मध्ये कायदा स्वीकारला गेल्यानंतर सन २००५ मध्ये राज्यस्तरीय मंडळ स्थापन झाले आहे. परंतु जिल्हास्तरीय समित्या सन २०१३ मध्ये स्थापन झाल्या ही वस्तुस्थिती असल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर मान्य केले.

कायद्यान्वये विभागाला या राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय समित्या गठीत करणे बंधनकारक असताना त्या न केल्यामुळे व नंतर अमर्याद विलंबाने तयार केल्यामुळे या अत्यंत महत्त्वाच्या विषयावरील कायद्यातील तरतुदीच्या अंमलबजावणीत निश्चितच बाधा आली. या संपूर्ण बाबींना पुर्णत: प्रशासन जबाबदार आहे. यामागील कारणमिमांसा समितीने विचारली असता विभागाने सादर केलेल्या आश्वासित माहितीमध्ये दिलेली कारणे ही पूर्णत: प्रशासकीय स्वरूपाची असून या सर्व बाबी कालबद्धरित्या पूर्ण करणे विभागावर बंधनकारक होते व ती त्यांची जबाबदारीही होती जी सक्षमरित्या पार पाडण्यास विभाग अयशस्वी ठरला. आता सन २०१५ च्या कायद्यामध्ये अशा समित्यांची तरतूदच नाही. त्यामुळे या समित्या गठीत

करण्याची आता गरज राहिलेली नाही. परंतु केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सुचनांप्रमाणे राज्यात या संदर्भात नियम करणे आवश्यक असून विभागाने ते तयार करून मान्यतेसाठी सादर केले आहे. या नवीन नियमावलीला मान्यता मिळाल्यानंतर अस्तित्वात असलेल्या समित्या व्यपगत होतील. परंतु तोपर्यंत या समित्या अस्तित्वात असून त्यांनी घेतलेले सर्व निर्णय वैध असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

३.९ केंद्र शासनाच्या बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००२ च्या कलम ६२ अन्वये राज्य शासनाने प्रमुख समाज सेवक, बालकल्याण क्षेत्रातील स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, वैद्यकीय व्यावसायिक, राज्य शासनाचे संबंधित विभाग इत्यादी सदस्यांचा समावेश असलेल्या राज्य सल्लागार मंडळाची स्थापना करणे बंधनकारक असताना व याअंतर्गत जिल्हा निरीक्षण समित्या/ सल्लागार मंडळाच्या स्थापनेअभावी कायद्याप्रमाणे बालगृहांची तपासणी करण्याचे महत्त्वाचे काम दुर्लक्षित राहिले. पूर्वी अस्तित्वात असलेल्या कायद्यान्वये समित्यांना प्रशासकीय स्तरावरून मान्यता देण्यात आली नाही व आता नवीन कायद्यान्वये या समित्या गठीतच करण्याची आवश्यकता राहिलेली नसून केवळ नियमावली तयार करणे आवश्यक असून ती नियमावली मान्यतेसाठी सादर करण्यात आली असून अद्याप त्यास मान्यता नाही. या सर्व बाबींमुळे केंद्राने मुलांच्या संरक्षणासंबंधी केलेल्या महत्त्वाच्या कायद्याची अंमलबजावणी करण्यात खचितच बाधा आली. विभागाच्या या कार्यपद्धतीबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

महिला व बालविकास विभागा अंतर्गत बालकांच्या निवासी संस्थांमध्ये गैरप्रकार घडू नयेत व संस्थेच्या कामकाजामध्ये सुधारणा होण्यासाठी विभागांमार्फत अनेक प्रकारची सुधारात्मक कार्यवाही करण्यात आल्याचे तसेच जिल्हा निरीक्षण अधिकारी व निरीक्षण अधिकारी यांची पदे रिक्त असल्याने हे लक्ष्य साध्य करता आले नाही असे विभागाने स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये व विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी समितीसमोर सांगितले. परंतु या बाबी कदापि समर्थनीय ठरू शकत नाही. कायद्यातील तरतुदीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशासकीय यंत्रणा अस्तित्वात असते. परंतु प्रशासकीय यंत्रणेअभावी कायद्याची अंमलबजावणी थांबणे हे समिती मान्य करू शकत नाही. विभागाने भविष्यात याबाबत अधिक दक्षता घ्यावी व या सर्व बाबींची पुनरावृत्ती टाळावी तसेच शासनाने प्रस्तावित नियमांना तातडीने मान्यता देऊन या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.१० (ब) "बालगृहांच्या तपासणीतील उणिवा"

अभिप्राय :

आयुक्तांनी अशासकीय संस्था व शासनातर्फे चालविण्यात येणाऱ्या बालगृहांची अचानक व तपशिलवार पाहणी केली असता नऊ पैकी आठ जिल्ह्यात महत्त्वाच्या उणिवा असल्याचे निदर्शनास आहे. विभागीय समितीच्या अहवालानुसार पुणे जिल्ह्यातील शिरुर येथील मतिमंद मुलांसाठी असणारे बालगृह बंद केल्यावर, त्यात राहणाऱ्या ३० मुलांपैकी १६ मुले शासकीय मोठ्या मुलांचे बालगृह, येरवडा, पुणे येथे दाखल करण्यात आली. उर्वरित १४ मुले शिवाजीनगर, पुणे येथे विधी संघर्षग्रस्त बालकांच्या पुनर्वसनासाठी असलेल्या निरीक्षण केंद्रामध्ये दाखल करण्यात आली. बीड जिल्ह्यातील मतिमंद मुलांसाठी असलेली दोन बालगृहे बंद झाल्यावर त्यामधील १०० मतिमंद मुले त्यांच्या आई-वडिलांकडे सोपविण्यात आली. मतिमंद मुलांना विशेष लक्ष व काळजीची आवश्यकता असते. अशा मुलांना निरीक्षण गृह/विधी संघर्षग्रस्त बालकांच्या पुनर्वसनासाठी असलेल्या गृहांमध्ये दाखल करणे बरोबर नव्हते, कारण ह्या केंद्रामध्ये/गृहांमध्ये विशेष काळजी/गरज पुरविण्याची तजवीज नसते. अशा मुलांची पर्यायी पुनर्वसन व्यवस्था योग्य वैद्यकीय सुविधा असलेल्या बालगृहात करण्यात विभाग अपयशी ठरला. आयुक्तांनी निर्गमन परिषदेत सांगितले की, जिल्हा निरीक्षण अधिकारी आणि निरीक्षण अधिकारी यांची पदे रिक्त असल्यामुळे हे लक्ष्य साध्य करता आले नाही. ही बाब देखील अतिशय गंभीर आहे.

त्यामुळे वृत्तपत्रात बालगृहांच्या कार्यक्षमतेसंबंधी प्रसिद्ध झालेल्या प्रतिकूल अहवालाची दखल घेत उच्च न्यायालयाने स्वत:हून (*suo moto*) एक याचिका दाखल करून घेतली. (ऑगस्ट २०१०) त्याप्रमाणे राज्यातील अशासकीय संस्था आणि विभागातर्फे चालविण्यात येणाऱ्या बालगृहांत घेण्यात येणारी काळजी आणि व्यवस्थापन यांचा दर्जा तपासण्यासाठी राज्य शासनाने नोव्हेंबर-डिसेंबर २०१० मध्ये अनुक्रमे एक राज्य समन्वय समिती आणि सहा विभागीय समित्यांची स्थापना केली. बालगृहांची अचानक पाहणी करून बालगृहांच्या कार्यपद्धतीत सुधारणा राज्य समितीला सुचविण्याची जबाबदारी विभागीय समित्यावर होती. विभागीय समित्यांनी, अशासकीय संस्थांतर्फे मतिमंद मुलांसाठी चालविण्यात येणाऱ्या सहा बालगृहांना भेट दिली असता (फेब्रुवारी आणि मार्च, २०११) असे आढळून आले की, बालगृहांमध्ये शिक्षणाची सोय नव्हती, आरोग्य सुविधा अपायकारक होत्या, बालगृहातून बाहेर पडणाऱ्या मुलांसाठी पुनर्वसन आणि प्रशिक्षण योजना आखण्यात आली नव्हती. विभागाने प्रमाणित केलेला कर्मचारी आकृतीबंध अनुसरला नव्हता. त्यामुळे आयुक्तांनी सर्व सहा बालगृहांची मान्यता काढून घेतली (जुलै, २०११) विभागीय अधिकाऱ्यांकडून बालगृहावर देखरेख ठेवण्यामध्ये उणीवा असल्याचे सुद्धा या समितीने निदर्शनास आणले.

महालेखाकारांनी नोंदविलेले उपरोक्त आक्षेप हे अत्यंत गंभीर स्वरुपाचे असून यासंदर्भात समितीने साक्ष घेतली असता मतिमंद मुलांची बालगृहे हा विषयच आता सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय झाला त्याप्रमाणे १९ बालगृहे सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली असे समितीला सांगण्यात आले. परंतु अशाप्रकारे हा विषयच अन्य विभागाकडे हस्तांतरित केल्यामुळे महिला व बाल विकास विभाग आपली जबाबदारी टाळू शकत नाही. विभागांतर्गत विषय हस्तांतरणामुळे त्याचा विपरित परिणाम या मुलांवर नक्कीच पडू शकतो.

शिफारस :

३.११ पुणे जिल्ह्यातील शिरुर तालुक्यातील बालगृहे बंद केल्यावर ३० मुलांपैकी १६ मुले मोठ्या मुलांचे बालगृह, येरवडा, पुणे येथे दाखल करण्यात आली. उर्वरित १४ मुले शिवाजीनगर, पुणे येथे विधी संघर्षग्रस्त बालकांच्या पुनर्वसनासाठी असलेल्या निरिक्षण केंद्रामध्ये दाखल करण्यात आली. ही तर अत्यंत आक्षेपार्ह बाब आहे. मतिमंद मुलांची काळजी ही विशेषरित्या घेणे आवश्यक असताना त्यांना निरीक्षण गृह/विधी संघर्षग्रस्त बालकांच्या पुनर्वसनासाठी असलेल्या निरीक्षण केंद्रामध्ये त्यांची राहण्याची व्यवस्था करणे ही अत्यंत गंभीर व आक्षेपार्ह बाब आहे. विभागाने अपरिहार्य कारणास्तव देखील जरी ही तात्पुरती व्यवस्था केली असली तरीही समिती याचे समर्थन करू शकत नाही व याबाबत नापसंती व्यक्त करीत आहे व या मुलांची पर्यायी व्यवस्था तात्काळ करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.१२ बालगृहांच्या तपासणीतील उणिवा या परिच्छेदा संदर्भात महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप हे अत्यंत गंभीर स्वरुपाचे असून या बालगृहांमध्ये राहणाऱ्या बालकांची अत्यंत दयनीय अवस्था असते. या बालगृहांमध्ये आवश्यक त्या सोयी सुविधा नसणे, त्यांना देण्यात येणाऱ्या आहाराचा दर्जा निकृष्ट असणे, तेथे आवश्यक त्या वैद्यकीय सुविधा नसणे. या सर्व सुविधा पुरविणेबाबत तात्काळ शासनस्तरावरुन उपाययोजना करण्यात यावी. तसेच या बालगृहांसाठी बालमानसोपचार तज्ज्ञ देखील देण्यात यावा. परिणामी ही बालके शारीरिक व मानसिकदृष्ट्या सुदृढ होऊ शकतील. या बालगृहांच्या स्थितीबाबत मा.उच्च न्यायालयाने या संदर्भात स्वत:हून दखल घेवून वृत्तपत्रात बालगृहांच्या कार्यक्षमतेसंबंधी प्रसिद्ध झालेल्या प्रतिकूल अहवालाच्या आधारे याचिका दाखल करुन घेतलेली आहे. मा.उच्च न्यायालयाने या प्रकरणी स्थगिती दिली असून हे प्रकरण न्यायालयात निर्णयाच्या अंतिम टप्प्यात प्रलंबित आहे. याअनुषंगाने गठीत केलेल्या समितीने बालगृहांच्या तपासण्या केल्या असता गंभीर स्वरुपाच्या बाबी समितीच्या निदर्शनास आल्या. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार नेमण्यात आलेल्या विभागीय समन्वय समितींनी दिलेल्या अहवालानुसार विभागाने अशा गंभीर प्रकरणी केलेल्या कारवाईची व उपाययोजनांची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.१३ तसेच भविष्यात या बालगृहांची नियमितपणे तपासणी करण्यात यावी व त्याअनुषंगाने आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी व त्यासंबंधीचा अहवाल मुख्य नियंत्रण अधिकाऱ्याकडे वेळोवेळी पाठविण्याबाबतची दक्षता विभागाने घ्यावी व यासाठी जिल्हा निरिक्षण अधिकारी व निरिक्षण अधिकारी यांची पदे देखील आवश्यकते नुसार भरण्यात यावीत व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.१४ मतिमंद मुलांची बालगृहे हा विषय आता सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरित करण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. कोणता विषय कोणत्या विभागाने हाताळावा हा शासनाचे अंतर्गत व्यवस्थेचा भाग आहे. त्याबाबत समितीचे काहीही म्हणणे नाही. परंतु मतिमंद मुलांची देखभाल व त्यांना द्यावयाच्या सुविधा हा विषय अतिशय प्राधान्याने व प्रभावीपणे हाताळण्यात यावा याकडे शासनाने लक्ष घालावे व कोणत्याही परिस्थतीत त्यांची दुरावस्था होणार नाही याची काळजी घेण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.१५ राज्यात कित्येक जोडप्यांना अपत्य नसतात व काही विशिष्ट वयोमर्यादेनंतर व अथक प्रयत्नानंतर हे जोडपे मुलांना दत्तक घेण्याचा निर्णय घेतात. सद्य:स्थितीत ही दत्तक प्रक्रिया ही अत्यंत जाचक, वेळखाऊ व अतिशय अडचणी व अडथळे निर्माण करणारी आहे. मुलांना दत्तक देणेअगोदर पुर्ण सुरक्षितता व बालकांचे हित या सर्व बाबी तपासणे क्रम:प्राप्त आहे याबाबत समितीचे दुमत नाही. परंतु या प्रक्रियेच्या अटी अत्यंत जाचक असून कित्येक जोडपी मुले दत्तक घेण्याचा विचारच सोडून देतात व अशा परिस्थितीत दत्तक मुलांचे पालनपोषण उत्कृष्टरित्या करण्याची क्षमता असणाऱ्या पालकांना मुले दत्तक घेता येत नाहीत. अशा परिस्थितीत या दत्तक प्रक्रियेचे सुलभीकरण करण्यात यावे व यादृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.१६ परिच्छेद क्र. ४.१.७.३ "एकात्मिक बालविकास सेवा योजना (ICDS) मधील कार्यक्षेत्र कर्मचाऱ्यांच्या तपासणीतील उणीवा"

अभिप्राय :

केंद्र शासनाच्या समाज कल्याण मंत्रालयाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे प्रत्येक CDPO ने दरमहा किमान १८ दिवसांचे दौरे करुन अंगणवाडी केंद्रातील अभिलेख्यांची छाननी, अन्नपदार्थाचा दर्जा, मुलांची उपस्थिती इ. माहिती घेणे आवश्यक आहे. परंतु चाचणी तपासणी केलेल्या ३४ पैकी ३१ केंद्रामध्ये CDPO यांनी केलेल्या दौ-याचा तपशील पाहता २००७-१२ या कालावधी अपेक्षित प्रमाणात दौरे झाले नसुन त्यामध्ये एक ते ९० टक्के इतकी तुट होती असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविलेला आहे.

ऑगस्ट, १९८४ मध्ये केंद्र शासनाने विहित केल्याप्रमाणे, ICDS पर्यवेक्षकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व अंगणवाडी केंद्राना महिन्यातून एकदा भेट देणे बंधनकारक आहे. याखेरीज या परिवेक्षकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व अंगणवाडी केद्रांची तपासणी तीन महिन्यातून एकदा करणे आवश्यक आहे. तरी ही सन २००७-१२ मध्ये पर्यवेक्षकांनी केलेल्या तपासणीतील कमतरता ०.४२ टक्के ते १०० टक्के असल्याचे लेखापरिक्षणात आढळले. अशा त-हेने कार्यक्षेत्रात कर्मचा-याच्या तपासणी मधील कमतरतेमुळे अंगणवाडयावरची देखरेख अल्प प्रमाणात होती. विभागाच्या अधिका-यांबरोबर लेखापरिक्षकांनी केलेल्या पाहणीत अंगणवाडी केंद्राच्या कामकाजात आढळलेल्या उणीवा प्रभावहीन निरिक्षणामुळे झालेल्या प्रतिकुल परिणामाचे निदर्शक आहे.

यावर CDPO यांनी दिलेली कारणमिमांसा ही पर्यवेक्षकांवर सोपविलेले निवडणुकांचे काम, इतर शासकीय योजनांची अंमलबजावणी या अतिरिक्त कामामुळे निरिक्षणामध्ये कमतरता राहीली. ही तर अधिकच गंभीर बाब आहे. केंद्र शासनाने ICDS प्रकल्प आणि अंगणवाडी केंद्राच्या देखरेख व नियंत्रणासाठी निरनिराळ्या पातळीवर ICDS च्या पर्यवेक्षकांपासून ते विभागाच्या सचिवांपर्यंत सुधारित प्रमाणके सांगितली आहेत. सुधारित प्रमाणकांनुसार CDPO ने दरमहा किमान २० आणि सर्व अंगणवाडी केंद्रांना वर्षातून किमान एकदा भेट देणे आवश्यक आहे. तसेच पर्यवेक्षकांनी सर्व अंगणवाडी केंद्रांना दर दोन महिन्यातून किमान एकदा भेट देणे आवश्यक आहे. परंतु या सुधारित प्रमाणकांच्या अंमलबजावणीसाठी विभागाने सप्टेंबर २०१२ मध्ये म्हणजे जवळजवळ दोन वर्षानंतर शासन निर्णय जारी केला. तसेच CDPO आणि पर्यवेक्षकांची पदे रिक्त असल्यामुळे लक्ष्य साध्य करता आले नसल्याचे आयुक्तांनी निर्गमन परिषदेत सांगितले.

केंद्र शासनाच्या कायद्यामध्ये असलेल्या तरतूदीची अंमलबजावणी करणे विभागावर बंधनकारक असतानाही तसेच या संदर्भात न्यायालयाने निदेश दिल्यानंतरही निर्णयाची अंमलबजावणी विभागाकडून होत नाही व दौऱ्यासाठी वाहने उपलब्ध नसणे, अतिरिक्त कार्यभार, पदे रिक्त अशा प्रशासकीय कारणास्तव उद्दिष्टपूर्ती होवू शकली नाही हे विभागाचे म्हणणे समिती ग्राह्य धरु शकत नाही व कदापि समर्थनीय नाही. विभागाच्या अशा कार्यपद्धतीमुळे केंद्राकडून मिळणारा निधी देखील बंद होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे विभागाचे कोणतेही नियंत्रण या योजनांच्या अंमलबजावणीवर राहिले नाही. ज्या ठिकाणी १८ ते २० दौरे करणे अपेक्षित आहे त्याठिकाणी केवळ १ ते २ दौरे होतात. ज्या सीडीपीओंची ही जबाबदारी आहे ते ही सक्षमपणे पार पाडत नसेल तर केवळ ही पदे ठेवून उपयोग नाही. त्यातही सोपविलेली जबाबदारी पार न पाडणाऱ्या सीडीपीओंवर विभागाने कोणतीही कारवाई केली नाही. केवळ रिक्त पदांची कारणे सांगून विभागाला आपली जबाबदारी टाळता येणार नाही. विभागाने आता १४९ पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरू केलेली असून लोकसेवा आयोगाकडून १४७ उमेदवारांची नावे विभागास प्राप्त झाली असून त्यांची नियुक्ती अंतिम टप्प्यात आहे. त्यातच न्यायालयाने दिलेली स्थगिती उठली तर यातील 'क' व 'ड' वर्गवारीतील कित्येक बालगृहे बंद होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत बालगृहे व त्यासाठी आवश्यक असणारा कर्मचारी/अधिकारी वर्ग याचे योग्य नियोजन विभागाने आताच केले पाहिजे. विभागाने आता ११०० बालगृहांची तपासणी केली असून त्यातील केवळ १८२ बालगृहांनी कागदपत्रे सादर केली व इतरांनी केली नाहीत त्यांना अखेरची मुदत देण्यात आली आहे व त्याअनुषंगाने त्यांचे अनुदान थांबविणे अथवा त्यांच्या मान्यता रद्द करण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असेही समितीसमोर सांगण्यात आले. तसेच यासाठी पुढील ६ महिन्यात आयटी बेस टेक्नॉलॉजी घेवून इलेक्ट्रॉनिक सिस्टिम उभी करण्याबाबत देखील समितीला आश्वासित करण्यात आले.

शिफारस :

३.१७ अंगणवाडी केंद्रातील अभिलेख्यांची छाननी, अन्नपदार्थांचा दर्जा, मुलांची उपस्थिती यासंदर्भात पाहणी करण्याची व दौरे करण्याची ज्या अधिकाऱ्यांची जबाबदारी होती त्यांनी ती पार न पाडल्याबाबत त्यांचेवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.१८ राज्यातील ६ महसूल विभागामार्फत विभागीय उपआयुक्त, महिला व बालविकास यांच्या अध्यक्षतेखाली एक भरारी पथकाची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचेमार्फत प्रकल्प कार्यालय तसेच अंगणवाड्यांना भेटी देवून तपासणी करण्यात येत असल्याचे तसेच बालविकास प्रकल्प अधिकारी हे नियमितपणे दौरे करीत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. अतः चालू आर्थिक वर्षामध्ये राज्यातील सर्व जिल्ह्यांत बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांकडून किती

अंगणवाड्यांना भेटी देण्यात आल्या आहेत. तपासणीमध्ये आढळून आलेल्या त्रुटी वा उणिवा व विभागाने त्यांचे केलेले निराकरण, तपासणीसाठी विहीत १८ दिवसांपैकी सरासरी किती दिवस अंगणवाड्यांची तपासणी करण्यात येत आहे. यासंदर्भातील जिल्हानिहाय अहवाल विभागाने उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून मागवून घ्यावा व त्यावरील कृती अहवालासह याबाबतची माहिती तयार करुन ३ महिन्याचे आत समितीला सादर करावी तसेच एकात्मिक बालविकास योजनेमधील कार्यक्षेत्र कर्मचाऱ्यांच्या तपासणीतील उणिवा दूर करुन भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळावी अशी समितीची शिफारस आहे.

३.१९ परिच्छेद क्र. ४.१.७.४ "दक्षता पथकांची स्थापना न करणे"

अभिप्राय :

विभागाच्या सप्टेंबर, २००२ मधील शासन निर्णयानुसार शासन स्तरावर सहसचिव, एकात्मिक बालविकास सेवा योजना (ICDS) यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता पथकाची स्थापना करणे आवश्यक होते. एकात्मिक बालविकास सेवा योजना (ICDS) प्रकल्प आणि अंगणवाडी केंद्रामधील लाभार्थींना मिळणा-या सेवा, जशा पोषण आहार आणि आरोग्य तपासणी, एकात्मिक बालविकास सेवा योजना (ICDS) च्या अंमलदारांची कार्ये इ. तपासणीसाठी दक्षता पथक स्थापन करणे आवश्यक होते. प्रत्यक्षात सहसचिव ICDS, W & CD यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता पथकांची स्थापना ऑगस्ट, २०११ मध्ये करण्यात आली. त्यांना दरवर्षी किमान सहा अंगणवाडी केंद्रांना भेटी देवुन या भेटीचा अहवाल विभागाच्या प्रधान सचिवांना सादर करणे बंधनकारक करण्यात आले मात्र दक्षता पथकांनी ऑगस्ट, २०११ ते मार्च, २०१२ या कालावधीत फक्त चार अंगणवाडी केंद्राना भेटी दिल्या असा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेला आहे.

शिफारस :

३.२० दक्षता पथकाकडे सोपविण्यात आलेली जबाबदारी व कार्ये ही अत्यंत महत्वाची असून एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दक्षता पथक गठीत करणे व त्यांनी सक्षम व प्रभावीरित्या काम करणे अत्यंत आवश्यक आहे. दक्षता पथकांची स्थापना न झाल्यामुळे अंगणवाडी केंद्रांना अत्यंत कमी प्रमाणात भेटी देण्यात आल्या. परिणामी एकात्मिक बालविकास योजना व अंगणवाडी केंद्रे यांना मिळणाऱ्या सोयी सुविधांची पाहणी करण्याचे कार्य या दक्षता पथकाअभावी दुर्लक्षित राहिले. अतः विभागाने ही दक्षता पथके तात्काळ स्थापन करावे. तसेच विभागाने दक्षता पथकाची कामगिरी प्रभावी होण्यासाठी व त्यायोगे योजनेची अंमलबजावणी आणखी चांगल्या प्रकारे होण्यासाठी दक्षता पथकांचा उपयोग प्रभावीपणे करुन योग्य ती उपाययोजना करावी व भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.२१ परिच्छेद क्र. ४.१.७.५ "मुख्य नियंत्रण अधिका-याकडे विवरणपत्रे न पाठविणे"

अभिप्राय :

अंगणवाडी केंद्राद्वारे एकात्मिक बालविकास सेवा योजना (ICDS) च्या विविध घटकांच्या प्रगतीचे मासिक अहवाल मुख्य नियंत्रण अधिकाऱ्याकडे CDPO मार्फत ऑनलाईन पद्धतीने पाठविण्यात येतात. आवश्यकतेप्रमाणे उष्मांक असलेला आहार अंगणवाडी केंद्रातील मुलांना न पुरविणे, बालगृहाचे निरीक्षण, निरिक्षणगृहे, महिला गृहाची तपासणी, लाभार्थींना पुरविण्यात येणा-या आहाराचा दर्जा अशा महत्वाच्या त्रुटीचे अहवाल मुख्य नियंत्रण अधिका-याला पाठविण्याची पद्धत विभागात अस्तित्वात नाही. असे निदर्शनास आले. असा सर्वंकष अहवाल सादर न करण्याच्या पद्धतीमुळे मुख्य नियंत्रण अधिकाऱ्यांना कार्यक्रमाच्या परिणामाचा आढावा घेऊन योग्य ते निर्णय घेणे शक्य झाले नाही असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविलेला आहे.

शिफारस :

३.२२ मुख्य नियंत्रण अधिकाऱ्याकडे विवरणपत्रे न पाठविणे, परिणामी या कार्यक्रमाच्या परिणामांचा आढावा घेऊन योग्य ते निर्णय घेणे शक्य झाले नाही. याबाबत महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप अत्यंत गंभीर व महत्वाचे आहेत. परंतु ज्या अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी पार पाडली नाही अशा अधिकाऱ्यांना फक्त कारणे दाखवा नोटीस विभागाने दिली. परंतु कोणतीही ठोस कारवाई त्यांचेविरुद्ध करण्यात आली नाही. अतः विभागाने या सर्व संबंधितांवर तात्काळ कारवाई करावी. तसेच आता विभागाने या सर्व बाबींसाठी संगणकीकृत नियंत्रण आणि मुल्यांकन पद्धत तयार करुन घेतली आहे त्यामुळे अशा बाबींची पुनरावृत्ती होऊ शकणार नाही. त्यामुळे विभागाने भविष्यात याची सक्षमरित्या अंमलबजावणी करावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.२३ परिच्छेद क्र. ४.१.८ "अंतर्गत नियंत्रण"

३.२४ परिच्छेद क्र. ४.१.८.१ "रोखवही ठेवणे"

अभिप्राय :

महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ च्या नियम ९८ (२)(iv) अन्वये प्रत्येक महिन्याच्या अखेरीस, विभाग प्रमुखाने रोखवहीत नोंदविलेली रोख शिल्लक तपासणे व सदर शिल्लक रक्कम शब्द आणि आकडयांमध्ये तारीख आणि स्वाक्षरीसह नोंदविणे आवश्यक आहे. चाचणी तपासणी केलेल्या ३४ पैकी १७ CDPOs च्या कार्यालयांमध्ये CDPOs नी पाच वर्षांमध्ये देयक क्रमांक, रक्कम काढण्याची तारीख, यांची नोंदणी न केल्याने दिर्घकाळ वाटप न केलेल्या रकमांची निश्चिती करता आली नाही असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविलेला आहे.

सदरहु परिच्छेदाबाबत समितीने चर्चा केली असता रोखवही ठेवण्यात आली नसल्याचे विभागाने साक्षीदरम्यान मान्यच केले. तसेच विभागाने नियमितरित्या खर्चाचा ताळमेळ (Reconciliation) देखील दाखल केलेला नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. रिक्त पदे हे विभागाने यामागील सांगण्यात आलेले कारण निश्चितच अशा वित्तीय अनियमिततांसाठी समर्थनीय ठरु शकत नाही. रोख हाताळणाऱ्या प्रत्येक विभागाला रोखवही अद्ययावत ठेवणे बंधनकारकच आहे अन्यथा ही वित्तीय नियमांचे उल्लंघन करणारी बाब ठरते. रोखवही अद्ययावत न ठेवल्यामुळे या रकमांचा उपयोग अथवा दुरुपयोग कसा झाला याची निश्चिती करण्यासाठी कोणताही दस्तावेज उपलब्ध राहात नाही. रोखवही ठेवणे, ती वेळोवेळी अद्ययावत करणे व वर्षअखेरीस त्याचा ताळमेळ करणे ही त्या संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी असताना त्यांनी ती पार पाडली नाही. तरीही विभागाने त्यांचेवर कोणतीही कारवाई केली नाही. केवळ कारणे दाखवा नोटीस देऊन विभाग अशी गंभीर प्रकरणे अशा बेजबाबदारपणे विभाग हाताळत असेल तर ही अत्यंत गंभीर बाब आहे.

शिफारस :

३.२५ महाराष्ट्र कोषागार नियमान्वये रोखवही ठेवणे बंधनकारक असताना अशी रोखवही ठेवण्यात आली नाही. परिणामी रकमांची नोंदणी नसल्यामुळे दीर्घकाळ वाटप न केलेल्या रकमांची निश्चिती करणे शक्य झाले नाही. रोखवही अद्ययावत न ठेवल्यामुळे या रकमांचा उपयोग अथवा दुरुपयोग कसा झाला याची निश्चिती करण्यासाठी कोणताही दस्तावेज उपलब्ध होत नाही. रोखवही ठेवण्यातील अनियमिततांचे सातत्य हे विभागातील अंतर्गत नियंत्रण नसल्याचे द्योतक आहे व या बाबी वित्तीय नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ठरतात. या बाबी विभागाने साक्षीदरम्यान समितीसमोर मान्य देखील केल्या. परंतु कोणत्याही संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई केली नाही. ही देखील अत्यंत गंभीर बाब असून समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. अतः ज्या रोखपाल व आहरण तथा संवितरण अधिकाऱ्यांनी रोख नोंदवही वेळेवर पूर्ण केली नाही व ज्यांनी रोख नोंदवहीची माहिती तपासणीवेळी सादर केली नाही त्यांचेवर विभागाने तात्काळ कारवाई करावी तसेच हे सर्व व्यवहार विभागाने अद्ययावत संगणकीय आज्ञावलीच्या माध्यमातून हाताळावे व केलेल्या कारवाईची माहिती ३ महिन्यात समितीस देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.२६ विभागाचे अधिन सर्व रोखवही व बॅंक खात्यांच्या ताळमेळाचे काम अद्ययावत करुन घ्यावे. तसेच विभागाने खर्चाचा ताळमेळ (Reconciliation) नियमित करावा व भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळावी व त्याबाबतची माहिती ३ महिन्यात समितीस कळवावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. ४.१.८.२ "रोखवहीचा बॅंक खात्याबरोबर ताळमेळ न घालणे"

३.२७ अभिप्राय :

CDPOs, Dy.CEOs आणि DWCDOs हे आहरण आणि संवितरण अधिकारी (DDOs) म्हणून काम पाहत होते. आहार,मानधन, विविध योजनांची अंमलबजावणी आणि कर्मचा-यांचे वेतन इत्यादींसाठी मिळणारा निधी कोषागाराच्या इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सिस्टिमद्वारे (ECS) संबंधित DDOs च्या बॅंक खात्यात परस्पर जमा होत होता. ११ CDPOs, दोन DWCDOs (मुंबई उपनगरे आणि यवतमाळ) आणि दोन Dy.CEOs (बीड आणि उस्मानाबाद) यांच्या रोखवहयांची छाननी केली असता, बॅंक खाते आणि रोखवही यामध्ये दाखविलेल्या शिल्लक रकमेत तफावत आढळली व तफावतीचा ताळमेळ घातला नसल्याचे निदर्शनास आले असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविलेला आहे.

रोखवहीचा बॅंक खात्याबरोबर ताळमेळ न घालणे ही बाबदेखील अत्यंत गंभीर असून आर्थिक शिस्तीला धरुन नाही व वित्तीय नियमांचे उल्लंघन करणारी आहे. महालेखाकारांनी तारीखनिहाय व रक्कमनिहाय रु. १७ कोटी ४१ लाख रुपयांची तफावत असल्याचे त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहे. परिणामी उपलब्ध निधीचा नेमका गुणवत्तेवर विनियोग झाला किंवा कसे याबाबींची तपासणी करणे शक्य होत नाही, किंबहुना निधीमध्ये गैरव्यवहार झालेला असल्याची शंका घेण्यास पूर्ण वाव राहतो. असे असतानाही महालेखाकारांसमवेत झालेल्या निर्गमन परिषदेत लेखा अधिकारी व सहायक लेखा अधिकारी ही पदे मंजूर करण्यासाठी प्रस्ताव शासनास सादर केला आहे. पदे मंजूर झाल्यावर ताळमेळ घालण्यात येईल.

असे नमूद करणे ही अत्यंत आक्षेपार्ह बाब आहे. खर्चाचा ताळमेळ नियमितरित्या घालणे हे विभागावर बंधनकारकच आहे. रिक्त पदे ही त्यासाठी पळवाट असू शकत नाही. विभाग महालेखाकार यांनी घेतलेले आक्षेप एका बाजूने मान्य करतो परंतु दुसऱ्या बाजूने संबंधितांवर कोणतीही कारवाई करीत नाही ही बाब देखील समर्थनीय ठरू शकत नाही.

शिफारस :

३.२८ बँक खाते व रोख नोंदवही यांचा ताळमेळ विहित वेळेत न घातलेल्या अधिकाऱ्यांवर विभागाने कारवाई करण्यात यावी. तसेच निधीच्या तफावतीबाबत तपासणी करून त्याचा ताळमेळ जुळविण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती ३ महिन्यांत समितीला द्यावी व भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळावी व बँक खाते आणि रोख नोंदवही अद्ययावत ठेवण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.२९ परिच्छेद क्र. ४.१.८.३ "अंतर्गत लेखापरिक्षण"

अभिप्राय :

आयुक्तांच्या अभिलेख्यांची छाननी केली असता असे आढळून आले की, १९९३ मध्ये, महिला व बाल विकास शाखेत एक सहाय्यक लेखा अधिकारी, एक परिविक्षा अधिकारी, एक वरिष्ठ कारकून अशा कर्मचाऱ्यांचा समावेश असलेला अंतर्गत लेखा परिक्षा कक्ष स्थापन करण्यात आला. २००७-१२ या कालावधीत सदर पथकाने नियोजित केल्याप्रमाणे थकीत घटकांची तपासणी केली नाही तसेच पथकाने घेतलेल्या परिच्छेदांचे अनुपालन विहित वेळेत संबंधित घटकांनी पथकाकडे पाठविले नाही असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविलेला आहे.

या संदर्भात सन २००७ ते २०१२ या कालावधीत विभागाकडे स्वतंत्र लेखापरिक्षण युनिट नव्हते असे समितीसमोर विभागीय सचिवांनी सांगितले असता महालेखाकारांनी विभागाकडे १५६ युनिट असल्याचे नमूद केलेले आहे. मग हा आकडा महालेखाकारांना कुठून प्राप्त झाला व त्या १५६ पैकी केवळ २३ युनिटचेच लेखापरिक्षण झाले होते. ही गंभीर स्वरुपाची त्रुटी आहे. तसेच ज्या युनिटचे अंतर्गत लेखापरिक्षण केले त्यातील ३२३ परिच्छेदांचे अनुपालनही विभागाकडून झाले नाही व ते नंतर बऱ्याच विलंबाने करण्यात आले. या सर्व परिच्छेदांची दखल समितीने साक्ष आयोजित केल्यानंतर घेण्यात आली व त्यानंतर अनुपालन करण्यात आले. महालेखाकारांनी नोंदविलेल्या आक्षेपांची दखल विभागाने वेळोवेळी घेऊन त्याचे अनुपालन करणे आवश्यक होते. परंतु विभागाने तसे केले नाही.

शिफारस :

३.३० सद्यस्थितीमध्ये अंतर्गत लेखातपासणीचे एकूण घटक किती? त्यापैकी तपासणी झालेले घटक किती व थकीत घटक किती? याबाबतची तपासणी करावी. तसेच प्रलंबित परिच्छेदांचे अनुपालन करून त्याचा तपशील समितीला सादर करावा. तसेच विभागाने थकीत घटकाचे अंतर्गत लेखापरिक्षण पूर्ण करून घेण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखून ते पूर्ण करण्यासाठी आवश्यक ते सर्व उपाय कालबद्धरित्या योजावेत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.३१ अंतर्गत लेखापरिक्षणासाठी मंजूर केलेल्या पदांपैकी जास्तीत जास्त पदे भरण्यासाठी आवश्यक तो पाठपुरावा व उपाययोजना करावी व भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.३२ परिच्छेद क्र. ४.१.८.४ "प्रधान महालेखाकार (लेखापरिक्षा) यांच्या निरिक्षण अहवालांस दिलेला प्रतिसाद"

अभिप्राय :

विभागाचे वैधानिक (Statutory) लेखापरिक्षण महालेखाकार कार्यालयांकडून केले जाते. महालेखापालांकडील २४२ निरीक्षण अहवालातील ४९३ परिच्छेद जून, २०१२ पर्यंत विभागाकडे प्रलंबित होते.

ज्या घटकांचे लेखापरिक्षण महालेखापालांचे पथकाने केले त्या घटकांनी प्रलंबित परिच्छेदांचा निपटारा करण्यासाठी काही प्रयत्न केल्याचे दिसून आले नाही तसेच आयुक्त कार्यालयाने देखील संबंधित घटकांकडे योग्य तो पाठपुरावा केला नाही असा महालेखापालांचा मुळ आक्षेप आहे.

शिफारस :

३.३३ दरवर्षी जून अखेर प्रत्येक विभागाकडे किती निरिक्षण अहवाल व परिच्छेद प्रलंबित आहेत. याबाबतचा तपशील महालेखापाल कार्यालयाकडून सर्व विभागांना कळविला जातो. विभागाकडे प्रलंबित असलेल्या परिच्छेद वगळण्याची कार्यवाही पुढील प्रकारे करण्यात येते. प्रलंबित परिच्छेदाचे अनुपालन योग्य त्या संबंधित कागदपत्रांसह महालेखापाल कार्यालयास पत्राद्वारे पाठविण्यात येते व महालेखापाल कार्यालय परिच्छेद वगळण्यासंदर्भात संबंधित कार्यालयास पत्राद्वारे कळविते.

यातील जे परिच्छेद गंभीर स्वरुपाचे असतील व ज्यात मोठ्या स्वरुपातील रक्कम गुंतलेली असेल अथवा जे परिच्छेद खुपच जुने असतील व वारंवार अनुपालन सादर करुनही महालेखापाल कार्यालयाकडून वगळले जात नसतील तर त्यासाठी विभाग स्तरावर स्थापन केलेल्या लेखापरिक्षा समितीपुढे अशा परिच्छेदांचे अनुपालन करण्याची कार्यवाही करण्यात येते व सदर समितीच्या इतीवृत्ताद्वारे परिच्छेद वगळण्याची कार्यवाही करण्यात येते. त्यानंतर महालेखापालांचे पथक लेखापरिक्षणासाठी कार्यालयात आले असता सदर पथकाकडे प्रलंबित परिच्छेदांचे अनुपालन सादर करून परिच्छेद वगळून घेणे. उपरोक्त ३ मार्गाव्यतिरिक्त जे परिच्छेद अतिगंभीर स्वरुपाचे अथवा महत्त्वाच्या योजनांसंबंधिचे असतात व ज्यांचा समावेश भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे अहवालात झालेला असतो असे परिच्छेद लोकलेखा समितीसमोर येतात. विभागाच्या स्तरावरून निरनिराळ्या घटकांकडून लेखापरिक्षणाला मिळालेला अल्प प्रतिसाद आणि आयुक्त आणि विभागाकडून झालेला अपूरा पाठपुरावा, परिणामी आक्षेपांचे निराकरण व परिच्छेदांचे अनुपालन अनिर्णीत राहिल्यामुळे त्यासंदर्भातील आक्षेप अंतिम होऊन लोकलेखा समितीसमोर ते छाननीसाठी येतात. या सर्व परिच्छेदांची दखल विभागाने वेळेत घेतली व त्याचे निराकरण केले तर पुढील बाबी टाळणे विभागास सहज शक्य असताना विभाग या आक्षेपांकडे वेळेत लक्ष देत नाही व ते अंतिम झाल्यास त्यासंबंधीची पुढील कारवाई करणे क्रमप्राप्त ठरते, ही बाब गंभीर आहे. अतः विभागाकडे ३० जून, २०१७ अखेर प्रलंबित असलेले परिच्छेदांबाबत उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करून आक्षेपित परिच्छेदांचा योग्य तो पाठपुरावा महालेखाकारांसमवेत करून हे आक्षेप अंतिम होण्याचे टाळून भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.३४ परिच्छेद क्र. ४.१.९ कायदे नियम, ठराव आदेश, नियमावली इत्यादींचे अनुपालन

"निधीची वाटणी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन"

अभिप्राय :

महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमावलीनुसार, खर्च करणाऱ्या विभागांनी शिल्लक राहणाऱ्या रकमेचा अंदाज आल्यावर, अनुदाने /विनियोजने किंवा त्यांचा काही भाग वित्त विभागाला समर्पित करणे आवश्यक असताना २००८-०९ आणि २००९-१० या वर्षात, शिल्लक राहिलेले अनुदान अनुक्रमे रु. ८९.९७ कोटी आणि रु. ५०.१४ कोटी समर्पित करण्यात आले नाही. तर सन २००९-२०१० मध्ये जि.प.ना देय अनुदान रु. ४५६.२८ कोटी ICDS अंतर्गत आस्थापनांच्या खर्चासाठी वापरण्यात आले. यापैकी रु. ४८.०१ कोटीचे अनुदान १५५२८ आंगणवाडी केंद्राच्या स्थापनेचे लक्ष्य ठरले असताना प्रत्यक्षात १०९३२ केंद्रे उघडण्यात न आल्याने समर्पित करण्यात आले. तसेच अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे मानधन आणि अंगणवाडी केंद्रातील मुलांचे पोषण आहाराचे अनुदान पुर्णपणे खर्च न करता कोट्यवधी रुपयांचा निधी समर्पित करण्यात आला असा महालेखापालांचा मुळ आक्षेप आहे.

यासंदर्भात समितीसमोर सांगण्यात आले की सन २००८ ते २०१० या वर्षात शिल्लक राहिलेले अनुदान हा केंद्र शासनाकडून प्राप्त निधी असून तो निधी व्यपगत होत नाही. तर प्रत्येक दोन वर्षांनी विभागाला त्याचे रिकन्सीलीएशन करावे लागते. या निधीला राज्य शासनाचा अनुरुप हिस्सा (मॅचिंग ग्रँट) मिळाला की हा निधी खर्च करण्यात येतो व शेवटच्या क्षणापर्यंत हा निधी उपलब्ध होत असल्यामुळे हा निधी समर्पित करण्यात येत नाही असे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच जिल्हापरिषदांना देय असलेले रु. ४५६.२८ कोटीचे अनुदान आस्थापना खर्चासाठी वापरण्यात आले. यापैकी रु. ४८.०१ कोटीचे अनुदान प्रत्यक्षात १०९३२ केंद्रे उघडण्यात न आल्याने समर्पित करण्यात आले. यासंदर्भात समितीसमोर खुलासा करण्यात आला की यामध्ये ५० टक्के निधी हा केंद्र शासनाचा असल्यामुळे नवीन आंगणवाडी केंद्र उघडण्यासाठीच्या प्रस्तावास केंद्र शासनाची मान्यता आवश्यक आहे व ही मान्यता न मिळाल्यामुळे हा निधी समर्पित करण्यात आला. केंद्र शासनाची मान्यता मिळाली तर निधीअभावी काम थांबू नये म्हणून राज्य शासनाकडून ही निधीची तरतूद करून ठेवण्यात येते असेही समितीसमोर सांगण्यात आले. तसेच आंगणवाडी केंद्रातील मुलांच्या पोषण आहारासाठी सुधारित दर लागू न केल्याने कोट्यवधी रुपयांचा निधी समर्पित करण्यात आला यामागील कारणमिमांसा समितीने विचारली असता वाढीव दर १५ जिल्ह्यांना एप्रिल, २०१४ पासून लागू करण्याचा प्रस्ताव मार्च, २०१४ मध्ये मान्यतेसाठी वित्त व नियोजन विभागास सादर करण्यात आलेला असून त्यांच्या मान्यतेनंतर मंत्रीमंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात येत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. विभागाकडून यासंदर्भात सन २००८-०९ पासून प्रयत्न सुरू आहेत. परंतु निर्णय घेण्यासाठी विलंब झाला, परिणामी १५ जिल्ह्यांवर अन्याय झाल्याचे विभागाने मान्य केले.

शिफारस :

३.३५ सदरहू परिच्छेदांतर्गत महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमावलीनुसार अखर्चित रक्कम वर्षअखेरीस समर्पित न करणे तसेच नवीन अंगणवाडी केंद्रे सुरू करण्यास झालेला विलंब आणि आहार खर्चासाठी सुधारित दर लागू न केल्याने कोट्यवधीचा निधी समर्पित करण्यात आला ही बाब गंभीर असून विभागास प्राप्त निधी अखर्चीत राहणे व त्याच्या खर्चाचे योग्य व

वेळेत नियोजन विभागाने न करणे ही बाब अतिशय गंभीर असून ज्या उद्दात हेतूने समाजातील अत्यंत महत्त्वाच्या घटकासाठी हा निधी शासनाने दिला त्याचा हेतू देखील विभागाला साध्य करता आला नाही व ही तरतूद निष्फळ ठरली. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. परिणामी आवश्यक तेथे अनुदान विहीत वेळेत समर्पित न करणाऱ्या व आवश्यक तेथे निधी खर्च न करता अनुदान समर्पित करणाऱ्या अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.३६ अर्थसंकल्पामध्ये विभागासाठी ज्या अर्थसंकल्पीत तरतुदी मंजूर होतील त्या पूर्ण खर्च होण्यासाठी योग्य त्या उपाययोजना विभागाने कराव्यात व कोणत्याही प्रकारची अर्थसंकल्पीय अनियमितता होऊ नये यासाठी प्रशिक्षण, खर्चाचा मासिक आढावा, विहित वेळेत रक्कम समर्पित करणे, खर्चास प्रशासकीय मंजुरी देणे, अनुदान वितरण करणे, देयके कोषागारात सादर करणे इ. आवश्यक त्या उपाययोजना व नियोजन करावे व भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.३७ परिच्छेद क्र. ४.१.९.१ "उपयोगिता प्रमाणपत्र पाठविण्यातील विलंब"

अभिप्राय :

मार्च, २०१२ पर्यंत रु. १,११५.५३ कोटी निधीची २१३८२ उपयोगिता प्रमाणपत्रे (Utilisation Certificates) पाठविण्यात आली नव्हती. हे अनुदानित संस्थांनी द्यावयाच्या प्रमाणपत्रांवर विभागाचे नियंत्रण नसल्याचे द्योतक आहे अशा तऱ्हेने वेळेवर निधी वापराचे प्रमाणपत्र न पाठवल्यामुळे निधीचा वेळेत वापर वा गैरवापर होऊ शकतो असा महालेखापालांचा मुळ आक्षेप आहे. यासंदर्भात ही उपयोगिता प्रमाणपत्रे आता सादर करण्यात आली असून केवळ १४८ प्रमाणपत्रे सादर करणे बाकी असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

३.३८ प्राप्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित वेळेत सादर केले नाही तर निधीचा नेमका वापर वा गैरवापर तातडीने निदर्शनास येऊ शकत नाही. इतकेच नव्हेतर पुढील वर्षी निधी मिळण्यास देखील अडचणी निर्माण होतात ही बाब ध्यानात घेता विभागाने त्यांचेकडे सद्यस्थितीत प्रलंबित असलेली सर्व उपयोगिता प्रमाणपत्रे ३१ मार्च, २०१८ पूर्वी महालेखापाल कार्यालयास व केंद्र शासनास सादर करावीत. तसेच विहित मुदतीत ही उपयोगिता प्रमाणपत्रे सादर न करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. तसेच केवळ उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करून न थांबता विभागाने या कामासाठी स्वतंत्र अधिकारी नेमून महालेखापाल कार्यालयाकडे पाठपुरावा करावा व त्याबाबतचे निपटारा प्रमाणपत्र (Clearance Certificate) महालेखापाल कार्यालयाकडून मिळवावे. तसेच याबाबतची महालेखापाल कार्यालयाच्या संकेतस्थळावर असलेली माहिती अद्ययावत झाली असल्याबाबत खात्री करून घ्यावी तसेच भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.३९ परिच्छेद क्र. ४.१.९.२ "जिल्हा परिषदांनी शिल्लक निधी ठेवून घेणे"

अभिप्राय :

वित्त विभागाने जिल्हा परिषदांना निधीचा वापर पुढील आर्थिक वर्ष अखेर पर्यंत करण्याची परवानगी दिल्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानंतर शिल्लक निधी शासन खात्यात त्वरेने जमा करावयाचा होता. परंतु पाच जिल्हा परिषदेमध्ये सन २००७-०८ ते २००९-१० या कालावधीत, पुरक पोषण आहार योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या निधी पैकी रु. ५.८३ कोटी इतका निधी अखर्चित राहिला. परंतु संबंधित उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अखर्चित रक्कम जून २०१२ पर्यंत शासन खात्यात जमा केली नव्हती असा महालेखापालांचा मुळ आक्षेप आहे.

महालेखापालांनी ज्या पाच जिल्हापरिषदासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत त्यातील बीड वगळता अन्य सर्व जिल्हापरिषदांनी निधी जमा केलेला आहे व बिड जिल्हापरिषदेचा निधी हा जिल्हा बँकेत असून ती बँक बुडाल्यामुळे त्याचे रु. १.०४ कोटी वसुलीचे शिल्लक आहेत. जिल्हापरिषदेच्या कायद्यानुसार निधी जिल्हा सहकारी बँकांमध्ये ठेवणे बंधनकारक आहे. अनेक जिल्हापरिषदांचे असेसमेंट प्रलंबित राहिल्यामुळे हा निधी परत करण्यात आला नाही. त्यामुळे विभागाने बिड जिल्हापरिषद वगळता इतर सर्व जिल्हापरिषदांचे खर्चाचा ताळमेळ पुर्ण करून घेतलेला आहे असेही समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

३.४० पुरक पोषण आहार योजनेंतर्गत प्राप्त झालेला परंतु अखर्चित राहिलेला निधी शासन खात्यात जमा करण्यात आला नाही. महालेखाकारांनी आक्षेप नोंदविल्यानंतर याची तात्काळ दखल घेऊन विभागाने हा निधी जमा करण्याची आवश्यकता असताना

विभागाने ही रक्कम विलंबाने जमा केली. आता या रकमेचे खर्चाचे ताळमेळ विभागाने केले असून बीड वगळता अन्य सर्व ठिकाणी ही रक्कम जमा करण्यात आली आहे. तरीही याप्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.४१ बीड जिल्हा परिषदेने रु. १.०४ कोटी निधी जिल्हा बँकेमध्ये ठेवल्यामुळे व ही बँक बुडाल्यामुळे हा निधी अडकून पडला आहे. विभागाने वित्त विभाग, सहकार विभाग व ग्रामविकास विभाग यांचेशी समन्वय साधून हा निधी प्राप्त करून घेण्याचे पुर्ण प्रयत्न करावे. तसेच जिल्हापरिषदेचा निधी जिल्हा बँकामध्ये ठेवणे जिल्हापरिषदेच्या कायद्यानुसार बंधनकारक आहे व बँक अडचणीत आल्यास हा निधी बुडण्याची शक्यता असते, परिणामी निधीअभावी योजना राबविण्यावर त्याचा थेट परिणाम होतो. अतः हा निधी राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये देखील ठेवण्याची मुभा असण्याची आवश्यकता आहे व यासंदर्भात आवश्यक तो बदल जिल्हापरिषदेच्या कायद्यात करणेबाबतची कार्यवाही करण्यात यावी. वित्त विभागाने या अगोदरच जर जिल्हा परिषदांचे निधी जिल्हा सहकारी बँक तथा राष्ट्रीयीकृत बँकेत ठेवण्यासंदर्भात आदेश निर्गमित केले असतील तर त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच प्रत्येक वर्षी या जिल्हा बँकांचे लेखापरीक्षण होत असते त्या आधारे या बँकांना ग्रेडीग देण्यात यावे व या सर्व बँकांचे ग्रेडींग शासन स्तरावरून प्रसिद्ध करण्यात यावे जेणेकरुन त्या ग्रेडींगच्या आधारे स्थानिक संस्थांकडून निधी जिल्हा अथवा राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये ठेवण्याबाबत योग्य तो निर्णय स्थानिक यंत्रणेने घ्यावा व त्याअनुषंगाने कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीची माहिती ३ महिन्याचे आत समितीला देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.४२ परिच्छेद क्र. ४.१.९.३ "जिल्हा परिषदांना दिलेल्या अर्थसहाय्याची निर्धारणा न करणे"

अभिप्राय :

महाराष्ट्र शासन, जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित केलेल्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी किंवा अभिकरणाखाली राबविलेल्या योजना, जसे वैयक्तिक लाभ योजना, याकरिता अर्थसहाय्य देते.

ग्राम विकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या सुचनांप्रमाणे नियंत्रण अधिकाऱ्यांने जिल्हा परिषदांना दिलेल्या अर्थसहाय्याचा वापर नियोजित प्रयोजनासाठी केल्याची खात्री करण्याकरिता, प्रतिवर्षी १० एप्रिल ते १५ जुलै दरम्यान, दिलेल्या निधीची निर्धारणा करून त्यानुसार खर्चातील अधिक्य/बचतीचे वार्षिक तत्वावर समायोजन करणे आवश्यक आहे. परंतु जिल्हा परिषदांना दिलेल्या अनुदानाची निर्धारणा १९९५-९६ पासून प्रलंबित होती असा महालेखापालांचा मुळ आक्षेप आहे.

शिफारस :

३.४३ अनुदान निर्धारण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. नियंत्रण अधिकाऱ्यांनी योग्यवेळी निर्धारणा न केल्यामुळे विभाग इतक्या उशिराने अर्थसहाय्याचा वापर नियोजित प्रयोजनासाठी केल्याची खात्री करू शकत नाही. ही बाब अत्यंत गंभीर असून या बाबी विभागाने स्वतःहून करणे आवश्यक असताना चुका झाल्यानंतर अथवा लेखापरिक्षणात आक्षेप नोंदविल्यानंतर विभाग त्यामध्ये सुधारणा करते ही बाब योग्य नसून विभागाने यासंदर्भातील कायद्यातील तरतुदी वेळोवेळी व स्वतःहून अद्ययावत करणे अभिप्रेत आहे. अतः सर्व जिल्हा परिषदांचे प्रलंबित अनुदान निर्धारण ३१ मार्च, २०१८ पर्यंत पूर्ण करून घ्यावे. तसेच २०१७-२०१८ या वर्षाचे अनुदान निर्धारण १५ जुलै २०१८ पूर्वी करून घ्यावे. जेणेकरून जिल्हा परिषदांकडून देणे व घेणे असलेल्या निधीचे वार्षिक तत्वावर समायोजन होऊ शकेल. जिल्हापरिषदांनी अखर्चित अर्थसहाय्याचा तपशील न दिल्यास व आवश्यकता पडल्यास अर्थसहाय्य रोखून ठेवण्याबाबतची कारवाई करण्यात यावी. तसेच या प्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

३.४४ परिच्छेद क्र. ४.१.१० सेवा पुरविणे

"महिलांच्या सबलीकरणासाठी योजना आणि कायद्याची अंमलबजावणी"

अभिप्राय :

विभागातर्फे वैयक्तिक लाभाच्या योजना उदा. स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य, मुलींना व्यवसायाभिमुख प्रशिक्षणासाठी विद्यावेतन, निराधार महिलांच्या मुलीच्या विवाहासाठी विवाहभत्ता, शेतकऱ्यांच्या मुलीच्या सामुदायिक विवाहासाठी अर्थसहाय्य, देवदासींना निर्वाह भत्ता, शहरी भागातील महिला मंडळांना अर्थसहाय्य आणि ग्रामीण भागातील मंडळांसाठी जिल्हा परिषदांमार्फत अर्थसहाय्य राबविण्यात येतात. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील महिलांचा स्तर उंचावणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. या खेरीज विभाग कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ आणि हुंडा प्रतिबंधक अधिनियम,१९६१ या कायद्यांची अंमलबजावणीही करते. लेखा परिक्षणात चाचणी तपासणी केलेल्या जिल्ह्यांमध्ये अधिनियम आणि योजनांच्या अंमलबजावणी योग्य प्रकारे झाली नाही असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविलेला आहे.

सदरहू विषयावर चर्चा करतेवेळी समितीच्या असेही निदर्शनास आले की, महिलांच्या सबलीकरणासाठी अस्तित्त्वात असलेल्या योजना व त्याची अंमलबजावणी ही फक्त ग्रामीण भागात लागू असून शहरी भागातील निराधार महिलेस या योजना लागू नाहीत अशी विसंगती शासन योजनांमध्ये महिलांसाठी असणे योग्य नाही व योजनांमध्ये व त्याच्या अंमलबजावणीमध्ये एक समानता असणे आवश्यक आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे.

शिफारस :

३.४५ शासनस्तरावरुन राबविण्यात येणारी शुभमंगल योजना ही फक्त ग्रामीण भागातील निराधार महिलांसाठी आहे. ही बाब योग्य नसून या योजनेसाठी अनुज्ञेय ठरण्यासाठी निराधार महिला हा एकमेव निकष असणे आवश्यक असून शहरी व ग्रामीण भागातील निराधार महिला यामध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव करणे योग्य नाही. हे विभागीय सचिवांनी समितीसमोर मान्य देखील केले व त्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करणेबाबत समितीस आश्वासित केले. अतः ग्रामीण भागातील निराधार महिलांच्या धर्तीवर शहरी भागातील निराधार महिलांसाठी देखील योजना प्रस्तावित करुन त्यास मान्यता द्यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत सादर करावी. तसेच महिलांच्या सबलीकरणासाठी शासनस्तरावर अस्तित्त्वात असलेल्या योजनांची अंमलबजावणी सक्षमपणे करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.४६ महिलांच्या सबलीकरणासाठी महिला व बालविकास विभागाकडून विविध योजना राबविल्या जातात. परंतु अशा कल्याणकारी योजनांची माहिती महिलांना नसते. अशा योजना तयार करताना व राबविताना स्थानिक लोकप्रतिनिधींचा सहभाग व त्यांना विश्वासात घेण्याबाबत व अशा योजनांमध्ये ग्रामीण भागाबरोबरच शहरी भागाचा देखील विचार होणेबाबत विभागाने निर्णय घ्यावेत. तसेच अशा योजनांना शासनस्तरारुन योग्य ती प्रसिद्धी देण्यात यावी व त्याचा लाभ जास्तीतजास्त महिलांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न शासनस्तरावरुन करण्यात यावा व यासंदर्भात घेतलेल्या निर्णयांची माहिती समितीला ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.४७ परिच्छेद क्र. ४.१.१०.१ "महिलांना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य योजना"

अभिप्राय :

ऑक्टोबर, १९८५ मध्ये महाराष्ट्र शासनाने महिलांना स्वयंरोजगार यासाठी अर्थसहाय्य ही योजना सुरू केली. या योजनेखाली लघुउद्योग सुरू करण्यासाठी प्रत्येक महिलेला रु. ५०० इतके अर्थसहाय्य एकदा केले जाते.

ऑक्टोबर, १९८५ मध्ये निश्चित केलेली लाभार्थींना द्यावयाची रु. ५०० इतकी अर्थसहाय्याची रक्कम सुधारीत करण्यात आली नव्हती. या खेरीज योजनेचे परिणाम तपासण्याची यंत्रणा अस्तित्वात नव्हती. लाभार्थींना लघुउद्योग सुरू करण्यासाठी देण्यात येणारे अर्थसहाय्य अल्प असल्याने विभागाला संनियंत्रण आणि परिणाम निर्धारणा करण्यास खूप कमी वाव होता. अर्थसहाय्याची मर्यादा, विश्वासार्हता आणि यशस्वीतेच्या पातळीपर्यंत न वाढविता योजना पुढे सुरू ठेवणे म्हणजे जनतेच्या पैशाचा अपव्यय आहे आणि योजनेचे उद्दिष्टे असफल होण्याचे द्योतक आहे.

शिफारस :

३.४८ महिलांना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य ही योजना सन १९८५ पासून सुरू असून त्यामध्ये प्रत्येक लाभार्थीला फक्त रु. ५०० चे अर्थसहाय्य देण्यात येते. या रकमेमध्ये लाभार्थीला लघुउद्योग सुरू करणे शक्य नसल्याने व हे अर्थसहाय्य अत्यंत नगण्य व तोकडे असल्यामुळे या योजनेला कमी प्रतिसाद मिळत होता. त्याअनुषंगाने शासनाकडे नवीन योजना प्रस्तावित केलेली असून स्वयंरोजगारासाठी रु. ५०००० प्रस्तावित करण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच ज्या अनावश्यक व कालबाह्य झालेल्या योजना आहेत त्या सर्व एकत्रित करुन सुधारीत नवीन प्रस्ताव शासनाला सादर करण्यात आला आहे. यात वित्त विभागाने काही सुधारणा सुचविल्या असून प्रस्ताव अद्याप मान्य झालेला नाही. अतः या योजनेन्वये देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्याच्या रकमेत वाढ करण्यात यावी व यासंदर्भात प्रशिक्षण व व्यावसायिक संकल्पना याचा एकत्रित विचार करुन त्याअनुषंगाने आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे व वित्त विभागाने देखील या प्रस्तावासंदर्भात योग्य तो निर्णय तातडीने घ्यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.४९ परिच्छेद क्र. ४.१.१०.२ "विविध हस्तकलांत व्यवसाय प्रशिक्षण घेणाऱ्या मुलींना विद्यावेतन देण्याची योजना"

अभिप्राय :

महाराष्ट्र शासनाने विविध हस्तकलांत व्यवसाय प्रशिक्षण घेणाऱ्या मुलींना विद्यावेतन देण्याची योजना (ऑक्टोबर, १९८५) सुरू केली. ज्यामध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी मंजूर केलेले कोर्सेस जसे की, परिचारिका, टेलीफोन ऑपरेटर, इ. घेण्यासाठी रु. १०० प्रति महिला इतके अर्थसहाय्य देण्यात येते. सदर विद्यावेतन अल्प असल्याने योजनेस अल्प प्रतिसाद मिळाला व योजनेचा परिणाम दिसून आला नाही.

शिफारस :

३.५० या योजनेंतर्गत सन २००७-१२ या कालावधीत अनुक्रमे रु. १.१५ कोटी व रु. ३४.६४ लक्ष इतका खर्च केला होता. परंतु विभागांतर्गत पाठपुरावा यंत्रणा नसल्यामुळे सदरील योजनेच्या परिणामांची निर्धारणा करता आली नाही. तसेच सदरील योजनेखाली देण्यात येणारे रु. १०० इतके विद्यावेतन मागील २७ वर्षांपासून सुधारीत न केल्यामुळे या योजनेस अल्प प्रतिसाद होता. त्यामुळे याअंतर्गत निधीची मर्यादा रु. २०००० करणेबाबतचा प्रस्ताव शासनाला सादर करण्यात आला. त्यास वित्त व नियोजन विभागाची मान्यता घेणे आवश्यक असून हा प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे देखील सादर करण्यात येणार असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. अतः या प्रलंबित प्रस्तावास शासनाने मान्यता द्यावी व अशा योजनेची पंतप्रधान कौशल्य विकास योजनेशी सांगड घालण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करावी आणि केलेल्या कार्यवाहीची माहिती ३ महिन्यात समितीला कळवावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. ४.१.१०.३ "कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ ची अंमलबजावणी"

३.५१ अभिप्राय :

शारीरिक इजा, मानसिक छळ, लैंगिक छळ, आर्थिक पिळवणुक इत्यादींपासून महिलांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ ची अंमलबजावणी राज्यात ऑक्टोबर, २००६ मध्ये सुरू करण्यात आली सदर अधिनियमाच्या कलम ८(१) अन्वये कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडणाऱ्यांना मदत/आधार देण्यासाठी आवश्यक संरक्षण अधिकाऱ्यांची प्रत्येक जिल्हयांत अधिसूचनेद्वारे नेमणूक करायची होती. परंतु संरक्षण अधिकारी ज्यांची जबाबदारी कौटुंबिक प्रासंगिक अहवाल तयार करणे व दंडाधिकाऱ्यांना मदत करणे ही आहे त्यांची नेमणूक करण्यात आली नव्हती आणि संरक्षण अधिकाऱ्यांची जबाबदारी सर्व शहरी CDPOs, महसूल आणि ग्रामविकास विभागाच्या अधिकाऱ्यावर सोपविण्यात आली होती तसेच या अधिनियमाखाली नोंदविण्यात आलेल्या प्रकरणांची सुनावणी दिर्घकाळ प्रलंबित राहीली.

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमअंतर्गत न्यायालयात प्रकरण दाखल झाल्यापासून ६० दिवसांच्या आत निकाल लागणे बंधनकारक असताना विभागाकडे संरक्षण अधिकारी, कायदेशीर सल्लागार, डाटा एन्ट्री ऑपरेटर्स ही पदे रिक्त असून न्यायालयांची संख्या देखील कमी असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच ही पदे आता मंजूर करुन घेतलेली असून त्यावर भरती देखील केल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच प्रत्येक जिल्ह्यासाठी एक फास्ट ट्रॅक कोर्ट देण्यासाठी महिला व बालविकास विभागाने विधी व न्याय विभागामार्फत उच्च न्यायालयाला विनंती केली आहे. वास्तविकतः कौटुंबिक हिंसाचारातून एखादी महिला घराबाहेर पडली तर तिला काय अधिकार प्राप्त आहेत तसेच शासनस्तरावर अस्तित्त्वात असलेल्या कोणकोणत्या योजना तिच्या हिताच्या आहेत यासंबंधीची माहितीच या महिलांना नसते. त्यामुळे या महिला कौटुंबिक हिंसाचार अखेरपर्यंत सहन करीत राहतात अथवा याची वाच्यता अथवा तक्रार करण्यास घाबरतात. एखादी महिला कौटुंबिक हिंसाचारामुळे घराबाहेर पडली व तसा रिपोर्ट विभागाकडे आला तर तिला तात्पुरता १ महिन्याचा निवारा देण्याची कार्यवाही संरक्षण अधिकाऱ्यांमार्फत होत असते. परंतु याची माहितीच या महिलांना नसते. अतः अशा महिलांचे अधिकार व शासनस्तरावर त्यांच्यासाठी अस्तित्त्वात असलेल्या योजनांची माहिती व प्रसिद्धी राज्यात सर्वत्र करणे आवश्यक आहे.

शिफारस :

३.५२ महिलांवर होणाऱ्या अत्याचारांबद्दल जिल्हा पातळीवर अथवा विभागीय पातळीवर फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करण्याबद्दल विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी तसेच न्यायालयात दाखल असलेल्या प्रकरणांवर वेळीच निर्णय होण्यासाठी व गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण वाढण्यासाठी विभागाने विधी अधिकाऱ्यांचे पॅनेल नेमणे अथवा अन्य समांतर सक्षम यंत्रणा तयार करण्यासारखी कार्यवाही करुन त्यासाठी आवश्यक ते उपाय योजावेत व केलेल्या उपाययोजनांची माहिती समितीला ३ महिन्यांत द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.५३ कौटुंबिक हिंसाचारातून घराबाहेर पडणाऱ्या महिलांना त्यांचे अधिकार अथवा शासनस्तरावर त्यांच्यासाठी अस्तित्त्वात असलेल्या विविध हिताच्या योजनांची माहिती नसते. परिणामी या महिला असे अत्याचार सहन करीत राहतात वा त्याची कुठेही वाच्यता अथवा तक्रार करीत नाही. यासाठी विभागाने महिलांसाठीच्या या योजनांना भरपूर प्रसिद्धी द्यावी. महिला बालविकास विभागाच्या स्तरावर अस्तित्त्वात असलेल्या यंत्रणेने स्थानिक पोलीस स्टेशनशी नियमित समन्वय साधावा व यासाठी महिलांची कार्यशाळा घ्यावी व योग्य समुपदेशन करावे. कोणत्या पोलीस स्टेशनअंतर्गत कोणत्या महिला समुपदेशकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्यांची माहिती पोलीस स्टेशनमध्ये फलकाद्वारे दर्शविण्यात यावी. तसेच यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींना देखील यासंबंधीचा तपशील देण्यात येऊन दूरदर्शनच्या माध्यमातून देखील यास प्रसिद्धी देण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.५४ परिच्छेद क्र. ४.१.११ "वृद्ध, विकलांग आणि निराधारांचे कल्याण"

अभिप्राय :

भीक मागणे हा मोठा सामाजिक प्रश्न आहे. ग्रामीण भागातील जनता औद्योगिकरण व शहरीकरणामुळे शहरी भागात स्थलांतरीत होत आहे. ज्या लोकांना नोकरी मिळत नाही, असे लोक जगण्यासाठी सोप्या रितीने पैसा मिळविण्यासाठी भिक्षेचा मार्ग अवलंबतात. ह्याचा विचार करुन भिकाऱ्यांना अन्न, निवारा, व्यवसाय प्रशिक्षण इत्यादी सुविधा देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी मुंबई भिक्षा प्रतिबंधक अधिनियम, १९५९ बनविण्यात आला.

सदर अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी सन २००७-१२ मध्ये रु. ४३.५५ कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली. परंतु यापैकी ७०% खर्च केवळ वेतन व आस्थापनेवर तर फक्त ३०% खर्च म्हणजे रु. १२.५३ कोटी भिक्षेकरी गृहातील लाभार्थ्यांवर करण्यात आला. क्षमतेपेक्षा भिक्षेकरी गृहामध्ये प्रवेशितांची संख्या कमी असल्याने लाभार्थ्यांवर खर्च कमी होत असल्याचे विभागाने समितीसमोर सांगितले. वास्तविकत: भिक्षेकऱ्यांसाठी निधिची तरतूद इतक्या मोठ्या प्रमाणात अस्तित्त्वात असताना त्याचा थेट लाभ या भिक्षेकऱ्यांना झाल्याचे अथवा त्यामुळे राज्यात भिक्षेकऱ्यांची संख्या कमी झाल्याचे कुठेही समितीला दिसून आले नाही. पोलिसांच्या रेडमध्ये असे भिक्षेकरी सापडल्यास ते भिक्षेकरी असल्याचे कोर्टात सिद्ध होत नाही. त्यामुळे त्यांना सोडून द्यावे लागते व या भिक्षेकऱ्यांना कायद्याचे कोणतेही भय राहत नाही. त्यामुळे राज्यात भिक्षेकरी गृह ज्या क्षमतेने बांधण्यात आली आहेत त्या क्षमतेने ती भरली अथवा वापरली जात नाही. वास्तविकत: या भिक्षकऱ्यांचा विषय हा महिला व बालविकास विभागामार्फत न हाताळता हा विषय गृह विभागाकडे हस्तांतरित केल्यास अधिक प्रभावीपणे तो हाताळता येईल असे समितीचे स्पष्ट मत आहे. या विषयासंदर्भात शासनस्तरावर सन १९९० ते सन २०१४ पर्यंत अनेक समित्या अभ्यास गट नेमण्यात आले होते व या समित्यांनी अनेक शिफारशी केलेल्या असून त्यात विशेषत: भिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे व त्यांचे पुनर्वसन करणे अशा बाबींचा समावेश असणे व त्याअनुषंगाने कायद्याच्या मसुद्यात बदल करुन तो मान्यतेसाठी विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात येत असल्याचे विभागीय सचिवांकडून समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

३.५५ भिक्षेकरी गृहाच्या मंजूर क्षमतेप्रमाणे लाभार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी आवश्यक उपाययोजना विभागाने योजाव्यात. तसेच अशा भिक्षेकऱ्यांना प्रशिक्षण देणे व त्यांचे पुनर्वसन करणे यासारख्या बाबी प्रभावीपणे राबविण्यास व या शिर्षांतर्गत जो निधी विभागास प्राप्त होतो त्याचा योग्य तो उपयोग करुन राज्यात भिक्षेकऱ्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना करावी. या शिर्षाखाली प्राप्त होणारा निधी हा कोणत्याही परिस्थितीत प्रमाणाच्या बाहेर प्रशासकीय बाबींसाठी खर्च होणार नाही याची विभागाने दक्षता घ्यावी. तसेच भिक्षेकरी हा विषय सद्य:स्थितीत महिला व बालविकास विभागामार्फत हाताळण्यात येतो. परंतु हा विषय गृह विभागाकडे हस्तांतरित केल्यास तो अधिक प्रभावीपणे हाताळता येऊ शकतो. त्यामुळे त्यादृष्टीने विभाग हस्तांतरण करणेबाबतच्या शक्यतांसंदर्भात आवश्यक ती उपाययोजना करावी व यासंदर्भात केलेली कार्यवाही ३ महिन्यांत समितीला कळवावी अशी समितीची शिफारस आहे.

३.५६ परिच्छेद क्र. ४.१.११.१ "मुंबई भिक्षा प्रतिबंधक अधिनियम,१९५९ - सुधारित न करणे"

अभिप्राय :

याचिका क्र.१६३९/१९९० वर मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार, राज्यातील भिक्षेकरी गृहाच्या कामकाजाचा अभ्यास करण्यासाठी शरदचंद्र गोखले यांच्या अध्यक्षतेखाली जुलै, १९९० मध्ये एक समिती नेमण्यात आली होती तसेच जुलै, २०१० मध्ये न्यायमूर्ती धर्माधिकारी प्रमुख असलेल्या दुसऱ्या एका समितीने यासंदर्भात शिफारशी केलेल्या आहेत.

परंतु अधिनियमांत सुधारणा आणि भिक्षेकरी गृहातील लाभ्यार्थ्यांसाठी योग्य पुनर्वसन योजना तयार करणे, हया शिफारशी दोन समित्यांनी करुन देखील पुढे या प्रकरणात एप्रिल, २०१२ पर्यंत काहीही प्रगती झाली नाही.

शिफारस :

३.५७ मुंबई भिक्षा प्रतिबंधक अधिनियम, १९५९ मध्ये सुधारणा करण्यासंदर्भात शरदचंद्र गोखले समितीने निराधारांना स्वेच्छेने निवाऱ्यासाठी प्रवेश करण्याची तरतूद करुन भिक्षेकरी गृहे कल्याणकारी गृहांमध्ये रुपांतरीत करण्यात यावी व भिकाऱ्यांचे प्रशिक्षण व पुनर्वसन करावे अशी शिफारस केली होती. तसेच न्यायमूर्ती धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने पुरुष/ महिला भिकाऱ्यांकरिता जिल्हा उद्योग केंद्र आणि व्यवसाय प्रशिक्षण संस्था यांच्या समन्वयाने योग्य पुनर्वसन योजना आखण्यात यावी आणि नवीन अधिनियम पुढील सहा महिन्यात बनविण्यात यावा अशी शिफारस केलेली आहे. उपरोक्त दोन्ही समित्यांच्या अहवालावर विभागाने तातडीने कार्यवाही करुन या शिफारशींची प्रभावी अंमलबजावणी करावी व त्यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.५८ परिच्छेद क्र. ४.१.११.२ "भिकाऱ्यांच्या पुनर्वसनासाठी अपुरे प्रयत्न"

अभिप्राय :

महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंधक नियम, १९६४ च्या नियम २५ अन्वये, भिक्षेकरी गृहातील वर्तवणूक पाहून आणि भिक्षा मागण्याची त्यांची सवय सुटल्याची शक्यता पडताळून भिक्षेकरी गृहातील भिका-यांची अटकाव अवधी आधी सुटका करण्यात येते.

अधीक्षक, भिक्षेकरी गृह, घायपतवाडी, जिल्हा अहमदनगर यांच्या अभिलेख्यांची तपासणी करता असे आढळून आले की, सन २००७-१२ मध्ये, १५० लाभार्थ्यांची क्षमता असुन देखील फक्त सरासरी ६९ लाभार्थी प्रति महिना उपलब्ध होते. परंतु, अटकाव अवधी संपण्यापूर्वी, एकाही भिकाऱ्याचे पुनर्वसन करण्यांत आले नव्हते.

यासंदर्भात समितीसमोर सांगण्यात आले की, सन २०१२-२०१७ दरम्यान २७०० दाखल झालेल्या लोकांपैकी ५९४ लोकांचे पुनर्वसन केले आहे व घायपतवाडी येथे ७ लोकांचे पुनर्वसन केले आहे. तसेच ५० टक्क्यापेक्षा जास्त भिकारी मतीमंद, मनोरुग्ण व आजारी असल्यामुळे त्यांना प्रशिक्षण देणे शक्य नाही असे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

३.५९ राज्यात सद्यःस्थितीत असलेल्या भिक्षेकऱ्यांपैकी काहींना विभागामार्फत प्रशिक्षण देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात येते. परंतु काहींना प्रशिक्षण देणे शक्यच नसते. या निर्णयासंदर्भात विभागाची भूमिका अत्यंत उदासिन दिसून येत असून भिक्षेकऱ्यांना शासनाच्या मदतीने हे काम करण्यासाठी परावृत्त करुन त्यांना जीवनाच्या मुख्य प्रवाहात आणणे व स्वतःच्या पायावर उभे करणे या शासनाच्या उद्देशाची पुर्ती देखील प्रभावीपणे करीत नाही. शासनस्तरावरुन या योजनेच्या अंमलबजावणीसाठी कोणतेही विशेष प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. यासंदर्भात राज्यात अनेक ठिकाणी अनेक एनजीओ कार्यरत आहेत. त्यांची मदत घेणे विभागाला नक्कीच शक्य आहे. सदर संस्था या नोंदणीकृत असतात. त्यांच्या माध्यमातून हा विषय हाताळण्याचा प्रयोग प्रथम मुंबईपूरता व यशस्वी झाल्यास नंतर राज्यात करण्यास कोणतीही हरकत नाही व यासंदर्भात विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी समितीला आश्वासित केल्याप्रमाणे ज्या नोंदणीकृत अशासकीय संस्था भिक्षेकऱ्यांना शिवणकला, हस्तकला यांचे प्रशिक्षण देत आहेत अथवा देण्यास तयार आहेत अथवा त्यांना अन्य प्रशिक्षण देणे व त्यांचे पुनर्वसन करण्यास तयार आहेत त्यांना जेथे शक्य आहे तेथे जागा देऊन अथवा अन्यरितीने मदत करुन भिक्षेकऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी व त्याद्वारे रोजगार देऊन पुनर्वसनाचे प्रयत्न करणेबाबत आवश्यक ती उपाययोजना करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती ३ महिन्यांत समितीला कळवावी अशी समितीची शिफारस आहे.

३.६० परिच्छेद क्र. ४.१.११.३ "भिकाऱ्यांना उपयुक्त प्रशिक्षण देण्यात आले नाही"

अभिप्राय :

मुंबई भिक्षा प्रतिबंधक अधिनियम, १९५९ च्या कलम १३ आणि महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंधक नियम, १९६४ च्या नियम २६ अन्वये, भिक्षेकऱ्यांना शेतीविषयक, औद्योगिक आणि इतर उद्योगांचे प्रशिक्षण देणे अभिप्रेत आहे.

अधीक्षक, भिक्षेकरी गृह, घायपतवाडी, जिल्हा अहमदनगर जिल्हयातील आणि चेंबूर, मुंबई उपनगर यांच्या अभिलेख्यांची चाचणी तपासणी करण्यात आली असता घायपतवाडी भिक्षागृहाकडे २२४.८८ हेक्टर जमीन होती. जरी शेतीविषयक प्रशिक्षण देण्यात वाव होता, तरीही भिक्षेकऱ्यांना असे प्रशिक्षण देण्याचे प्रयत्न करण्यात आले नाहीत.

साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, उपरोक्त कायद्यामध्ये नमूद तरतूदींची अंमलबजावणी करण्यात आलेली नसून शासनस्तरावर यासंदर्भात तरतूद अस्तित्त्वात असताना व शासनाने यासाठी निधीची तरतूद देखील केलेली असताना सदरहू विषय विभागाकडून अत्यंत दुर्लक्षितपणे व अखेरच्या प्राधान्याने हाताळण्यात येत असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. घायपतवाडी ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर येथे भिक्षागृहाकडे २२४.८८ हेक्टर जमीन उपलब्ध आहे. एक संपुर्ण कृषि विद्यापिठ या ठिकाणी तयार होऊ शकते असे असताना त्या जागेचा वापर व ज्या उद्देशाने ही जागा देण्यात आली होती त्यानुसार भिक्षेकऱ्यांना शेती विषयक प्रशिक्षण देखील देण्यात आले नाही. कृषी सहाय्यकाची पदे उपलब्ध नसल्यामुळे हे करता आले नव्हते हे विभागाचे म्हणणे समर्थनीय नाही. विभागाची अशी कार्यपद्धती असेल तर या दुर्लक्षित वर्गासाठी अस्तित्त्वात असलेल्या तरतूदींचा व निधीचा कोणताही उपयोग नाही.

शिफारस :

३.६१ मुंबई भिक्षा प्रतिबंधक अधिनियम, १९५९ मध्ये नमूद केलेल्या तरतूदींची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी भिक्षेकऱ्यांना शेती विषयक, औद्योगिक इ. बाबतचे प्रशिक्षण देण्यासंदर्भातील तरतूदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी व त्यासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्यात यावा. तसेच शासनाच्या सर्व योजना या कागदावर अत्यंत उत्कृष्ट असतात परंतु त्याची अंमलबजावणी व प्रशासकीय स्तरावर त्या अंमलबजावणीतील सुसंगतपणा याच्या अभावामुळे या योजना वास्तविकरित्या असफल ठरतात. या योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्याची आवश्यकता आहे. तसेच समितीला आश्वासित केल्याप्रमाणे घायपतवाडी तालुका श्रीगोंदा, जि.अहमदनगर संस्थेच्या ताब्यातील २२४.८८ हेक्टर जमिनीची मोजणी करून घेण्यात यावी. यासाठी आवश्यक असणारी कृषी सहायकांची पद निर्मिती करून पदभरती करण्यात यावी व भिक्षेकऱ्यांना शेतीविषयक उपयुक्त प्रशिक्षण देण्याची कार्यवाही करावी व या जागेचा वापर योग्यरित्या करण्यास ही संस्था असमर्थ असल्यास ती जमीन शासनजमा करून घेण्यात यावी. यासंदर्भात आवश्यक ती सर्व कार्यवाही कालबद्ध कार्यक्रम आखून विभागाने करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती ३ महिन्यात समितीला द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.६२ शासनाने भिक्षेकरीसाठी कायद्यात प्रभावी तरतूदी केलेल्या असून त्यासाठी आवश्यक तो निधी देखील देण्यात आलेला आहे. परंतु या योजनांची फलश्रुती व निष्पत्ती काय आहे याचा राज्यस्तरीय आढावा घेण्यात यावा व अगोदर असलेले भिक्षेकरींचे प्रमाण व या योजनांवर त्या प्रमाणात झालेली वाढ किंवा घट याच्या आकडेवारीचा आढावा घेऊन समितीस ३ महिन्यात सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

३.६३ परिच्छेद क्र. ४.१.११.४ "भिक्षागृहातील भिकाऱ्यांना कमी दराने उपदान देणे"

अभिप्राय :

महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंधक नियम, १९६४ च्या नियम २७ अन्वये, भिक्षागृहातील चांगली वर्तवणुक असलेल्या प्रशिक्षित भिकाऱ्यांना जास्तीत जास्त रु. ५०० दरमहा उपदान देणे आवश्यक आहे.

अधीक्षक, भिक्षेकरी गृह, घायपतवाडी यांच्या अभिलेख्यांच्या तपासणीत असे निदर्शनास आले की, सन २००७-११ या कालावधीत, भिकाऱ्यांनी केलेल्या शेतीविषयक कामे, स्वयंपाक, स्वच्छता इत्यादी कामांबद्दल दरमहा फक्त रु. ५ देण्यात आले. मार्च, २०११ नंतर पैसे देणेच बंद करण्यात आले. काहीही मोबदला न देता भिकाऱ्यांच्या सेवा घेतल्याचा परिणाम त्यांची अवाजवी पिळवणूक करण्यात झाला. तसेच हे महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंधक नियम, १९६४ च्या तरतूदींचे उल्लंघन होते. निर्गमन बैठकीत प्रधान सचिवांनी सुधारीत तरतूदींची अंमलबजावणी करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्याचे मान्यही केले. नियमामध्ये प्रशिक्षित भिकाऱ्यांना जास्तीत जास्त रु. ५०० दरमहा उपदान देण्याची तरतूद उपलब्ध असताना त्यांना केवळ रु. ५ देण्यामागील कारणमिमांसा समितीने विचारली असता हा दर रु. ५०० नसुन फक्त रु. ५ असल्याचे विभागाने समितीसमोर सांगितले. मग महालेखाकारांनी त्यांच्या आक्षेपात नोंदविलेल्या रु. ५०० प्रतिमाहचा आधार काय? अशी समितीने विचारणा केली असता रु. ५०० देण्याचा नियम कधीच नव्हता. केवळ पुस्तकातील छपाईच्या चुकीमुळे तो महालेखाकारांच्या निदर्शनास आल्याचे विभागाने समितीसमोर सांगितले. यावर समितीने आक्षेप नोंदवित हा दर अत्यंत कमी असून कारागृहात राहणाऱ्या कैद्यांनादेखील यापेक्षा जास्त रक्कम मिळते. मात्र प्रशिक्षित भिक्षेकऱ्यांना केवळ महिन्याला रु. ५ देणे हे निश्चितच योग्य नाही. कारागृहात कैद्यांना देण्यात येणाऱ्या दराचा आधार घेवून भिक्षेकरींमधील अकुशल कामगारांसाठी रु. ३२ व कुशल कामगारांसाठी रु. ४० प्रतिमाह हा दर देणेबाबत विभागाने प्रस्ताव सादर केल्याचे देखील समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

३.६४ महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंधक अधिनियम, १९६४ मधील नियम २७ अन्वये भिकाऱ्यांना देण्यात येणाऱ्या उपदानाची रक्कम ही अत्यंत कमी असून त्यात तात्काळ सुधारणा करणे आवश्यक आहे. यासंदर्भात विभागाने सुधारीत दर प्रस्तावित केलेले आहेत. त्यासंदर्भातील प्रस्ताव शासनस्तरावरुन तातडीने मान्य करून घेण्याबाबत आवश्यक ती कारवाई विभागाने करावी. तसेच यासंदर्भात नेमलेल्या समितीने दिलेल्या अहवालाची व त्यातील शिफारशींची देखील प्रभावी अंमलबजावणी करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.६५ परिच्छेद क्र. ४.१.११.५ "महिला वसतिगृहात अपूरी सुरक्षा व्यवस्था आणि आवश्यक सुविधांचा अभाव"

अभिप्राय :

सामाजिक व नैतिक आरोग्य विषयक स्वच्छता कार्यक्रम १९७३ या कार्यक्रमांतर्गत राज्य शासनाने १०० मतिमंद महिलांना सामावून घेण्याची क्षमता असलेले वसतिगृह नागपूरमध्ये स्थापन केले, मे, २०१२ पर्यंत १०० क्षमता असलेल्या या वसतिगृहात ५८ महिला रहात होत्या. मे, २०१२

मध्ये लेखा परिक्षकांनी संबंधित विभागाच्या प्रतिनिधींसह या वसतिगृहाची संयुक्त पाहणी केली असता तेथे अनेक त्रुटी आढळल्या त्यामुळे मुलभूत सुविधा, स्वच्छतागृहांचा अभाव व अपुरी सुरक्षा व्यवस्था यांचा त्रास मतिमंद महिलांना होत असल्याचे वास्तव कायम राहिले. तसेच २४०० चौ.फु. क्षेत्रफळ असलेली एकच खोली होती जी ५८ महिलांसाठी अपूरी होती, स्वच्छतागृहे अस्वच्छ होती आणि त्यांना दरवाजे नव्हते, थेट पाणीपुरवठा वसतिगृहास नव्हता, स्वयंपाकासाठी आणि गरम पाण्यासाठी सप्टेंबर २०११ पासून सरपण वापरण्यात येत होते, अग्निप्रतिबंधक यंत्रणा कार्यरत नव्हती, गंभीर परिस्थितीत तातडीने उपचार करण्यासाठी रुग्णांना हॉस्पिटलमध्ये नेण्यासाठी वाहन व्यवस्था नव्हती, महिलांवर उपचार करण्यासाठी मनोविकारतज्ञ/व्यावसायिक रोगोपचार तज्ञांच्या सेवा उपलब्ध नव्हत्या, ३,१४८ चौ. मीटर क्षेत्रात असलेल्या महिलागृह आणि शासकिय बालगृहासाठी (कनिष्ठ व वरिष्ठ) सुरक्षा रक्षकाचे एकच पद मंजूर होते. मुख्य प्रवेशद्वाराजवळ सुरक्षा रक्षकासाठी सुरक्षा खोली नव्हती, सध्याचा सुरक्षा रक्षक फक्त दिवसपाळीसाठी कार्यरत होता. तसेच सुरक्षा रक्षकाला कोषागार कार्यालयात जाणे हे अतिरिक्त कामही होते. तसेच मुख्य प्रवेशद्वाराजवळची कुंपणाची भिंत जुलै २०११ मध्ये कोसळली होती आणि ती पुन्हा न बांधता त्या जागी तात्पुरते पत्रे बसविले होते. तसेच मुख्य प्रवेशद्वाराजवळच्या भिंतीच्या पायाशी दोन मोठी भोके होती व त्यातून कोणीही अनधिकृतपणे प्रवेश करणे शक्य होते.

सदरहू महिला वसतिगृहाच्या अधीक्षकांनी या त्रुटी मान्य देखील केल्या व वसतिगृहाचे नुतीनकरण व विस्ताराच्या रु. ४.६० कोटीच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता दिली असून त्यासाठी सन २०१३-१४ मध्ये अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे व त्या रकमेमधून नुतनीकरण, संरक्षक भिंत आणि अंतर्गत रस्त्यांची कामे करण्यात आली असे समितीसमोर सांगण्यात आले. या कामांसाठी प्रशासकीय मान्यता रु. ४.६० कोटीची असताना केवळ रु. २६ लक्षची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली, असे असेल तर ही कामे पुर्ण होण्यास पुढील २०-२५ वर्षे लागतील व तोपर्यंत बांधकामाच्या खर्चात देखील अधिकची वाढ होईल. अशा परिस्थितीत विभागाचे कामाचे व निधीचे नियोजन काय? याबाबत देखील समिती साशंक आहे. वास्तविकतः या सर्व बाबी व त्रुटी अत्यंत गंभीर स्वरुपाच्या असून त्याठिकाणी सुरक्षा रक्षक देखील एकच असणे ही देखील गंभीर बाब आहे. त्यातही त्या सुरक्षा रक्षकाकडे अन्य कामे देखील सोपविण्यात आल्यामुळे त्यांच्यावर सोपविलेल्या महत्वाच्या कामाकडे नक्कीच दुर्लक्ष होणार असे समितीने विचारले असता, यावर खाजगी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्यात यावी असे आदेश दिलेले असल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले. येथे २४ तास सुरक्षा रक्षक असणे आवश्यक आहे. ही कार्यवाही पुढील १ महिन्यात करण्याबाबत देखील समितीसमोर आश्वासित करण्यात आले. या शासकीय वसतिगृहांना अधिकाऱ्यांनी नियमित भेटी देणे देखील आवश्यक असताना त्या न दिल्यामुळे या वसतिगृहांच्या कामकाजावर शासनाचे कोणतेही सर्वसाधारण निरिक्षण व नियंत्रण राहत नाही. अधिकाऱ्यांनी या वसतिगृहांना कोणतीही पूर्व कल्पना न देता भेटी दिल्यास खरी वस्तुस्थिती समोर येणे शक्य आहे. परंतु तसे होत नाही. त्यामुळे निश्चित वस्तुस्थिती लपविण्यास वसतिगृहांना पुरेसा वाव मिळतो.

शिफारस :

३.६६ महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप हे अत्यंत गंभीर स्वरुपाचे असून शासकीय महिला वसतिगृहांची अतिशय दयनीय व दुरावस्था दर्शविणाऱ्या आहेत. महिला वसतिगृहात अपूरी सुरक्षा व्यवस्था आणि आवश्यक मुलभूत सुविधांचा अभाव समितीला दिसून आला. यासाठी शासनस्तरावरुन सद्यःस्थितीत कार्यरत असलेली यंत्रणा, उपलब्ध असलेला निधी व त्याअनुषंगाने करण्यात येणारी उपाययोजना ही अत्यंत अपूरी व तोकडी असल्यामुळे शासनाने ज्या उदात्त हेतूने ही वसतिगृहे सुरू केलेली आहेत तो उद्देश साध्य करण्यास या बाबींमुळे निश्चितच बाधा व अडथळा निर्माण होते. अधिकाऱ्यांनी या सर्व शासकीय वसतिगृहांना नियमित व पूर्व कल्पना न देता भेटी दिल्यास या बाबींवर निश्चितच आळा बसविणे शक्य असताना विभाग या संदर्भात केवळ सोपस्कार पार पाडीत आहे. अतः या महिला वसतीगृहासंबंधी योग्य ती सुरक्षा व सुविधा देण्यासंदर्भात शासनस्तरावरुन कार्यवाही करण्यात यावी. तसेच अशा वसतिगृहांसाठी करावयाच्या कामांची प्रशासकीय मान्यता, त्याअनुषंगाने अर्थसंकल्पात उपलब्ध होणारा निधी याचा कोणताही ताळमेळ नाही. निधी उपलब्ध होण्यास अधिक कालावधी लागल्यास खर्चामध्ये देखील निश्चित वाढ होईल व प्रशासकीय मान्यतेला कोणताही अर्थ शिल्लक राहणार नाही. अतः विभागाने या सर्व बाबींचे योग्य नियोजन करून आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी. तसेच क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून या संदर्भात करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचा त्रैमासिक आढावा देखील विभागाने घ्यावा व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.६७ परिच्छेद क्र. ४.१.१२ "एकात्मिक बालविकास सेवांची अंमलबजावणी"

परिच्छेद क्र. ४.१.१२.१ "कुपोषण"

सन २००९-१० पर्यंत, सहा महिने ते सहा वर्ष या वयोगटातील मुलांमधील कुपोषणाची स्थिती समजण्यासाठी चार निकष लावण्यात आले होते. परंतु सन २०१०-११ पासून जागतिक आरोग्य संघटनेच्या शिफारशींनुसार हे निकष बदलण्यात आले. सुधारीत निकषांप्रमाणे, कमी वजनाच्या मुलांचे सामान्यपणे कमी वजनाची आणि अतिशय कमी वजनाची असे दोन गट पाडण्यात आले.

भारतात कमी वजनाच्या मुलांच्या संदर्भात महाराष्ट्र हा पाचव्या क्रमांकावर (२.३३%) आहे. नऊ जिल्ह्यांतील कुपोषीत मुलांचे प्रमाण सन २०१०-११ तुलनेत सन २०११-१२ मध्ये घटले असल्याचे आढळले. परंतु अमरावती (१९.५२) आणि मुंबई (२६.४८) या दोन जिल्ह्यांमध्ये, हे प्रमाण सन २०११-१२ मधील राज्याच्या एकूण कुपोषित मुलांच्या टक्केवारी पेक्षा (१८.८५) अधिक असल्याचे आढळले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले.

यासंदर्भात अमरावती व मुंबई या दोन जिल्ह्यांमध्ये कुपाषित मुलांच्या टक्केवारीचे प्रमाण वाढण्याची कारणे काय? अशी समितीने विचारणा केली असता अमरावती, मेळघाट येथे पावसाळ्यामध्ये अनेक आजार उद्‌भवल्यामुळे ही टक्केवारी वाढल्याचे दिसते. परंतु नंतर ती कमी झालेली आहे. तसेच मुंबईत स्थलांतरीतांची संख्या जास्त असल्यामुळे हे प्रमाण कमी जास्त असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. परंतु ही कारणे व या अडचणी अन्य भागातही अस्तित्वात असताना केवळ याच भागात हे प्रमाण जास्त असण्याची कारणे काय? चांगला आहार, शासकीय यंत्रणा, अधिकारी, डॉक्टर, तेथे द्यावयाच्या भेटी, आहाराची गुणवत्ता या सर्व बाबी देखील या परिस्थितीत तितक्याच जबाबदार असताना विभाग याबाबत काहीच बोलत नाही जी पुढील परिच्छेदांमध्ये चर्चील्या गेली आहेत. त्याठिकाणी स्थलांतरीतांची संख्या जास्त आहे. जे पावसाळ्यात कामाअभावी परत येतात. त्यामुळे या आकडेवारीमध्ये सतत बदल दिसतो. हे त्यामागील एक कारण असू शकते. परंतु ते एकमेव कारण नाही. ६ महिन्यांपासून ते ६ वर्षापर्यंतच्या मुलांना आंगणवाडीमध्ये हॉटमील देण्यात येते. परंतु जी स्थलांतरीत होऊन बाहेर जातात त्यांना याचा लाभ मिळत नाही व हे देखील कुपोषणाचे कारण आहे असे समितीसमोर सांगितले असता या बाबींना विभागाचा व अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा देखील कारणीभूत असून अधिकारी दुर्गम भागात जायला, भेटी द्यायला व तेथे राहायला तयार नसतात. त्याठिकाणी ज्या तपासण्या झाल्या पाहिजे वा काळजी घेतली पाहिजे त्या फक्त कागदावरच दिसतात. त्यांच्या जेवणचा जो दर्जा असला पाहिजे तो दिला जात नाही अथवा त्याची नियमित तपासणी देखील केली जात नाही. यामध्ये लोकांचा सहभाग असण्यासाठी माता समिती निर्माण केलेली आहे. परंतु त्यातून देखील प्रभावी पर्यवेक्षण होत नाही. त्याचप्रमाणे प्रयोगशाळेची देखील व्यवस्था आसपास उपलब्ध नसल्यामुळे आहाराची तपासणी देखील तात्काळ होऊ शकत नाही. मुंबईमध्ये कुपोषणाचा उच्चांक आहे. याच्या कारणांचा देखील समितीने आढावा घेतला असता मुंबईत स्थलांतरीतांची संख्या हे एक कारण तर आहेच. परंतु येथे जेवण देण्यासाठी तेथील स्थानिक बचत गटावर अवलंबून राहावे लागते व त्यामुळे त्यांचेवर थेट नियंत्रण ठेवणे शक्य होत नाही. भारतात कमी वजनाच्या मुलांच्या संदर्भात महाराष्ट्र पाचव्या क्रमांकावर आहे. निर्गमन परिषदेच्या वेळीही महाराष्ट्रातील कुपोषणाची टक्केवारी ही १९ टक्के होती व ती १५ टक्क्यांपर्यंत आणण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. त्याबाबत काय झाले अशी विचारणा समितीने केली असता सद्यःस्थितीत अर्धा अर्धा टक्कासुद्धा खाली येणे सोपे नाही, परंतु विभाग प्रयत्नशील असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

३.६९ बालकांचे कुपोषण हा राज्यासाठी अत्यंत गंभीर, महत्वाचा व ज्वलंत विषय असून यात महाराष्ट्र देशात पाचव्या क्रमांकावर आहे. शासनाने यासाठी विविध योजना तयार केल्या असून यासाठी शासनस्तरावरुन मोठ्या प्रमाणात व प्राधान्याने निधी देखील दिला असताना राज्यात कुपोषणाचे प्रमाण कमी होत नाही व ही बाब राज्याला नक्कीच भूषणावह नाही. स्थानिकांचे स्थलांतरण हे एक कारण या वाढ अथवा घट यामागे आहे. परंतु चांगला आहार, शासकीय नियंत्रणाचा अभाव, योजनांची प्रभावी अंमलबजावणी, वैद्यकीय सुविधेचा अभाव, अधिकाऱ्यांची उपस्थिती व त्यांचे संनियंत्रण, आहाराची गुणवत्ता या सर्व बाबी या कुपोषणास तितक्याच जबाबदार आहे. या योजनांवर नियंत्रण व निरीक्षणाच्या अभावामुळे याचा लाभ कंत्राटदार अथवा शासकीय यंत्रणांना होतो व यासाठीचे खरे अनुज्ञेय लाभार्थी यापासून वंचित राहतात. न्यायालयाने देखील या विषयाची वेळोवेळी दखल घेऊन आदेश पारित केले. परंतु या सर्व अडचणींचे मूळ हे योजनेमध्ये नव्हे तर त्याच्या अंमलबजावणीमध्ये आहे. कुपोषित बालकांना देणाऱ्या आहाराची गुणवत्ता, दर्जा व प्रमाण याकडे विभागाने विशेष लक्ष द्यावे. या भागांमध्ये अधिकाऱ्यांची उपस्थिती अनिवार्य करण्यात यावी. चांगली वैद्यकीय सेवा उपलब्ध करून द्यावी. आहाराचा दर्जा तपासण्यासाठी फिरती प्रयोगशाळा उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच या कुपोषित बालकांना देण्यात येणाऱ्या आहाराचे स्वरुप व प्रमाण यात वेळोवेळी विभागाकडून बदल करण्यात येत आहे. परंतु आजपर्यंत नेमका आहार काय द्यावा याबाबत शास्त्रशुद्ध निष्कर्षाप्रत विभाग येऊ शकला नसून प्रत्येक वर्षी एक नवीन प्रयोग विभागामार्फत करण्यात येतो. याअनुषंगाने कुपोषित बालकांना देण्यात येणाऱ्या टीएचआर व हॉटमील बाबत शासनाने योग्य नियोजन करून यात अनेक अनुभवी सेवाभावी संस्थादेखील कार्यरत आहेत त्यांची देखील मदत घ्यावी. आज एस्कॉन सारख्या संस्था यात यशस्वीरित्या कार्यरत आहेत. या सर्व बाजूने विचार करून शासनाने या कुपोषित बालकांबाबत तात्काळ निर्णय घ्यावा व त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.७० एकात्मिक बालविकास सेवा योजना ही विभागाची एक महत्वाची योजना आहे. यासाठी येणारा खर्च केंद्र व राज्य शासन ५० : ५० टक्के या प्रमाणात करते. या योजनेन्वये शून्य ते सहा वर्षे वयापर्यंतच्या मुलांचे पोषण आणि आरोग्याचा दर्जा सुधारणे, मुलांच्या मानसिक, शारीरिक आणि सामाजिक विकासाचा पाया घालणे, मुलांमधील मृत्यूदर, दुर्बलता, कुपोषण

आणि शाळा सोडण्याचे प्रमाण कमी करणे, मुलांच्या विकासासाठी निरनिराळ्या विभागांमध्ये शासकीय धोरण आणि त्यांची अंमलबजावणी यांचा परिणामकारक समन्वय साधणे, मुलांचे आरोग्य आणि पोषण विषयक गरजा समजुन घेऊन त्यांचे संगोपन करण्यासाठी योग्य आरोग्यविषयक आणि योग्य आहारविषयांचे शिक्षण देऊन माता क्षमता वाढविणे, पोषण आहार, लसीकरण, आरोग्य तपासणी, संदर्भित सेवा, शालेयपूर्व अनौपचारीक शिक्षण, पोषण आणि आरोग्य शिक्षण ह्या सेवा एकत्र साध्य करून या योजनेची उद्दिष्टे साध्य करण्याबाबत विभागाच्या स्तरावरुन धडक कृती कार्यक्रम तयार करून त्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.७१ परिच्छेद क्र. ४.१.१२.२ "साठवणूकीची सोय नसताना आरोग्य सुधारण्यास आवश्यक सामुग्री घेणे"

उपायुक्त, ICDS, पुणे यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांनुसार द्रवरुप प्रथिने, बहु - जिवनसत्वे असलेली सिरप, पुरक अन्न इत्यादी औषधे सहा वर्षे वयापर्यंतच्या कुपोषित मुलांना, गरोदर महिला, स्तनदा मातांना पुरविणे आवश्यक होते. ही सामुग्री २५ डिग्री पेक्षा कमी तापमानात साठविणे आवश्यक होते.

परंतु मार्च, २००८ आणि जानेवारी, २०११ या कालावधीत विभागाने एकूण ३५,१३५ अंगणवाडी केंद्रातील (२०० प्रकल्प) १७,२४,८३९ लाभार्थ्यांसाठी आरोग्य सामुग्रीची खरेदी करण्यासाठी रु. १३.६६ कोटींचा खर्च केला. परंतु ही सामुग्री साठविण्यासाठी पुरेशी सोय CDPOs पातळीवर किंवा अंगणवाडी केंद्रामध्ये नसल्याने, उद्दिष्टांप्रमाणे मुलांमधील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी गरोदर महिला आणि स्तनदा मातांसाठी कितपत उपयोग झाला, हे निश्चित करता येत नाही. निर्गमन परिषदेत, प्रधान सचिवांनी सांगितले की, सदरील औषधे उन्हाळ्यात जास्त खराब होण्याची शक्यता गृहीत धरुन, सिरप इत्यादींचा पुरवठा ऑक्टोबर ते फेब्रुवारी दरम्यान करण्यासंबंधीचा शासन निर्णय जारी करण्यात येणार आहे.

शिफारस :

३.७२ २५ डीग्री पेक्षा कमी तापमानामध्ये औषधे किंवा वस्तु ठेवण्याची सुविधा विभागाकडे नसतानाही खरेदी करण्यात आली यामागील कारणे व त्यास जबाबदार कोण अशी समितीने विचारणा केली असता या वस्तु थंड जागी ठेवण्यासंबंधी कोणत्याही सूचना नसल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. वास्तविकतः गरोदर महिलांना व कुपोषित बालकांना द्यावयाच्या लिक्विड प्रोटीन व मल्टीव्हीटॅमीन सिरप तसेच अन्य औषधे साठवणूकीची व्यवस्था नसताना जवळजवळ रु. १३ कोटीची औषधे खरेदी करण्यात आली. कुठलीही औषधे ही थंड जागी ठेवणे आवश्यक असल्याची माहिती ही सर्वसाधारण लोकांना देखील असते. तसेच औषधांच्या बाटल्यांवर देखील ते स्पष्टपणे नमूद असते. तसेच ही सर्व खरेदी ही फेब्रुवारी महिन्याच्या आतमध्ये करणे अपेक्षित होते. परंतु ही खरेदी नंतरच्या काळात करण्यात आली. ज्यावर अधिक तापमानाचा निश्चित प्रभाव पडण्याची पूर्ण शक्यता आहे. तसेच त्यातील अनेक औषधे निरुपयोगी देखील झालेली असण्याची शक्यता नाकारता येणार नाही, असे असताना ही अनावश्यक खरेदी करण्यात आली. या बाबी गंभीर असून विभागाने यासंदर्भात सखोल चौकशी करून त्याचा अहवाल समितीस १ महिन्याच्या आत सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीला आश्वासित केले. परंतु अद्यापही सदरहू माहिती समितीला अप्राप्त आहे. त्याअनुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करून या कारवाईचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा. व त्याअनुषंगाने विभागाने केलेल्या कारवाईबाबत समितीला १ महिन्याच्या आत कळविण्यात यावे व भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आवश्यकती उपाययोजना विभागाने करावी अशी समितीची शिफारस आहे.

३.७३ परिच्छेद क्र. ४.१.१२.३ "घरपोच आहाराचा पुरवठा"

कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी केंद्र शासनाने कुपोषित मुलांना देण्यात येणाऱ्या पोषण आहाराच्या उष्मांकामध्ये बदल केला. त्यात सहा महिने ते तीन वर्षे वयापर्यंतच्या प्रत्येक मुलांसाठी तसेच गरोदर आणि स्तनदा मातांसाठी, तीन ते सहा वर्षे वयापर्यंतच्या सर्वसामान्य मुलांसाठी व कुपोषित मुलांसाठी व आदिवासी भागातील कुपोषित मुलांसाठी ठरविण्यात आलेला उष्मांक, ऊर्जामुल्य, प्रथिने, पोषण आहार अंगणवाडी केंद्रामध्ये न्याहारी व जेवणातून पुरवावयाचा होता. तसेच विभागाने सुचविलेल्या पाककृती प्रत्येक जिल्हा पोषण आहार समितीने मान्य करून बचत गटांना कळवावयास हवी होती व बचत गटांना असा आहार पुरविणे शक्य नसल्यास, महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक फेडरेशन मर्यादित या राज्य पातळीवरील ग्राहक संस्थेकडून, पाककृतीप्रमाणे कच्चा माल (धान्य) घेऊन अन्न शिजवायला हवे होते. याखेरीज आपल्या क्षेत्रातील भौगोलिक परिस्थिती व खाण्याच्या सवयी यांचा विचार करून पाककृती मध्ये योग्य ते बदल करण्याचे अधिकार संबंधित जिल्हा पोषण आहार समित्यांना महाराष्ट्र शासनाने दिले होते. तरीही शिफारस केलेल्या आहारात आणि दिल्या जाणाऱ्या आहारातील उष्मांकात आणि प्रथिनात फरक व त्रुटी आढळल्या. यात विशेषतः अंगणवाडी केंद्रातील अतिकुपोषित मुलांसाठी पूरक पोषण आहाराचा पुरवठा प्रमाणित उष्माकांच्या प्रमाणात नव्हता. निर्देशित केलेल्या उष्मांकांपेक्षा कमी उष्मांकांचा पूरक पोषण आहाराचा पुरवठा हे विभागातील कमकुवत देखरेख यंत्रणेचे निदर्शक आहे. आंगणवाडी

केंद्रातील मुलांना पूरक पोषण आहाराचा पुरवठा विहित निकषाप्रमाणे नव्हता. Dy.CEOs (अमरावती आणि बीड) या कार्यालयांमध्ये जिल्हा पोषण समितीने स्वीकारलेला आहार तक्ता हा विभागाने ठरविलेल्या निकषांप्रमाणे नव्हता. बचत गट/महिला मंडळांनी पुरविलेल्या अन्नामध्ये उष्मांक आणि प्रथिनांची कमतरता होती. ३४ पैकी तीन (बोरीवली २, धारावी आणि रेड लाईट एरिया) CDPOs च्या आहार तपासणीत अहवालानुसार निरनिराळ्या बचत गट/महिला मंडळांनी लाभार्थींना पुरविलेल्या आहारात उष्मांक मूल्य कमी होते. आहाराचे नमुने तपासण्यातील उणिवा आढळून आल्या. नियमित तपासणीत १९ प्रसंगी लाभार्थींना अन्नपदार्थ न तपासताच देण्यात आले. तरीही विभागाच्या मुख्य नियंत्रण अधिकारी (CCO) निहाय लेखापरीक्षणांत, आहाराचे नमुने न तपासता लाभार्थ्यींना आहार देणे सुरूच असल्याचे आढळले. शासन निर्णयानुसार प्रत्येक पुरवठादाराच्या आहाराचे प्रत्येकी दोन नमुने दरवर्षी पोषण मूल्य तपासण्यासाठी प्रयोगशाळेकडे पाठविणे आवश्यक होते. चाचणी तपासणी केलेल्या ३४ पैकी १९ CDPOs नी आहाराचे नमुने एकदाही तपासण्यासाठी पाठविले नाही.

पुरवठादारांशी केलेल्या करारानुसार, पुरवठादारांनी शासनाशी संलग्न असलेल्या प्रयोगशाळेतून, बॅच निहाय, घरपोच आहाराच्या नमुन्याचे तपासणी अहवाल सादर करणे आवश्यक होते. परंतु पाच Dy.CEO आणि दोन CDPOs (शहरी) यांनी आहाराचे नमुने एकाच प्रयोगशाळेकडून तपासून घेतले. आहाराचे नमुने त्याच प्रयोगशाळेकडून विभागाने तपासून घेणे, हे कार्यक्रमाच्या दृष्टीने हितावह नव्हते, कारण ती प्रयोगशाळाद्वारे पुरवठादारांना दिलेल्या तपासणी अहवालासारखाच अहवाल विभागाला देणे शक्य होते. नागपूर आणि पुणे यांनी नमुने तपासणीसाठी पाठविले नाहीत, कारण पुरवठादारांनी तपासणी अहवाल सादर केले होते आणि नमुना तपासणीसाठी विभागीय अर्थसंकल्प तरतूद उपलब्ध नव्हती. यवतमाळ (शहरी) यांच्याकडे, आहाराच्या निकृष्ट दर्जाबद्दल वैयक्तिक तक्रारी लाभार्थ्यांनी नोंदविल्या होत्या, तरीसुद्धा नमुने प्रयोगशाळेकडून तपासून घेण्यासाठी कार्यवाही करण्यात आली नाही. भारत सरकार, अन्न आणि पोषण मंडळ यांनी दोन नमुन्यांची अचानक तपासणी केली असता नमुने प्रमाणित निकषांप्रमाणे नव्हते. धामणगाव रेल्वे, अमरावती जिल्हा आणि अहमदनगर ग्रामीण-१, अहमदनगर जिल्हा येथे THR प्रमाणित उष्माकांच्या दर्जाप्रमाणे नव्हते.

वर दर्शविलेल्या उणिवा व त्यासाठी पुरवठादारांवर दंडात्मक कारवाईची तरतूद करारनाम्यात असतानादेखील, विभागाने, कमी उष्मांक असलेला आहार पुरविल्याबद्दल, पुरवठादारांना कोणताही दंड आकारला नाही. याहीउपर Dy.CEOs नी दिलेल्या समाधानकारक कार्यसिद्धी अहवालांवर विसंबून, विभागाने कंत्राटाची मुदत दोन वर्षांनी वाढविली. विभागाने कंत्राटाची मुदत वाढविण्यापूर्वी पुरवठादारांच्या कामाचा पुरेसा आढावा घेतला नाही, कारण यास पुरवठादाराने ज्या प्रयोगशांळाकडून नमुने तपासले, त्यापेक्षा अन्य प्रयोगशाळांच्या तपासणी अहवालांचा आधार नव्हता.

घरपोच आहार अथवा चावण्याजोगे अन्न न पुरविणे याबाबत चार जिल्हयांमध्ये असे निदर्शनास आले की, घरपोच आहार पुरवठ्याची मागणी उशिरा केल्याने, सप्टेंबर २०१० ते मार्च २०१२ या कालावधीत, तीन ते ७० दिवस आहार पुरविण्यात आला नाही. धामणगाव रेल्वे, उरळीकांचन, वडगाव मावळ, जुन्नर आणि बीड ग्रामीण I या प्रकल्पांना पुरविलेल्या आहाराच्या पावत्यांवर पुरवठ्याच्या तारखेची नोंद नसल्याने, आहार पुरविण्यास उशीर झाला की नाही, हे लेखापरीक्षणांत निश्चित करता आले नाही. CDPO, धारणी यांनी सहा महिने ते सहा वर्ष या वयोगटातील मुलांना शिजवलेले अन्न देण्यासाठी विलंबाने कच्च्या मालाची मागणी नोंदविली. ज्यामुळे आहार पुरवठ्यास ३८ ते ४७ दिवसांचा अडथळा निर्माण झाला. या काळात लाभार्थ्यींना पूर्वीचा आहारही मिळाला नाही व शिजविलेले अन्नही मिळाले नाही. मेळघाट प्रकल्प, धारणी येथे ६ महिने ते ६ वर्ष वयापर्यंतच्या वयोगटातील सर्व मुलांसाठी एकसारखाच आहाराचा तक्ता बनविण्यात आला होता. मुलांच्या वयाप्रमाणे वेगवेगळा आहार / पाककृतीचे प्रावधान करण्यात आले नव्हते.

महालेखाकारांनी या शीर्षांतर्गत नोंदविलेले विस्तृत आक्षेप हे अत्यंत गंभीर असून बालकांच्या व मातांच्या जिवाशी खेळ करणारे आहेत. समितीने याची गंभीर दखल घेऊन यावर विस्तृत चर्चा केली.

शिफारस :

३.७४ महालेखाकारांनी या परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप हे सन २०११-१२ मधील असतानाही समितीची साक्ष लागेपर्यंत विभागाने या गंभीर बाबींची साधी दखलही घेतली नाही. वास्तविक या संपूर्ण प्रकरणी चौकशी करून व संबंधितांवर कारवाई करून विभागीय सचिवांनी समितीसमोर कृती व अनुपालन अहवालासह येणे अपेक्षित होते. परंतु आता समितीसमोर याबाबत चौकशी करुन माहिती देणेबाबत विभागाचे प्रतिनिधी आश्वासित करतात ही अतिशय गंभीर बाब आहे. इतक्या महत्त्वाच्या, गंभीर व संवेदनशील विषयाकडे व त्यातील दोष, उणिवा, त्रुटी व गैरप्रकारांकडे विभागाचा बघण्याचा दृष्टिकोन अत्यंत मवाळ व उदासीन दिसून येतो. पुरवठादाराने पुरवठा केलेल्या आहारात विहित केलेली प्रथिने/कॅलरी व उष्मांक आढळून न येणेबाबत कोणतीही दंडात्मक कारवाई विभागाने पुरवठादारावर केली नाही. पुरवठादाराशी करण्यात आलेल्या करारामध्ये ५ टक्के एवढी अतिशय जास्त सूट ग्राह्य धरण्यात आली. परिणामी आहाराच्या

दर्जाशी तडजोड करण्यात आली. पुरवठादारांनी केलेल्या आहाराचा पुरवठा हा निकषाप्रमाणे व अटी शर्तीनुसार नसतानाही त्यांना देयकाची रक्कम अदा करण्यात येणे, कोणतीही दंडात्मक वसुली त्यांचेकडून न करणे, पुरवठादाराने दिलेला तपासणी अहवाल अंतिम समजणे, त्याची कोणतीही शहानिशा न करणे, यवतमाळ येथे यासंदर्भात अनेक तक्रारी प्राप्त होऊनही आवश्यक ती कारवाई न करणे, आहाराचे नमुने एकदाही तपासणीसाठी न पाठविता रकमेचे प्रदान करणे, यासंदर्भात जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई न करणे, पुरवठारास रकमेचे प्रदान करणे या सर्व त्रुटी व उणिवा असताना उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कामाचा समाधानकारक अहवाल देणे व त्या अहवालाच्या आधारावर या सर्व पुरवठादारांच्या कराराचे दोन वर्षाचे नुतनीकरण करून मुदतवाढ देणे, आहाराचे नमूने न तपासता बालकांना तोच आहार देणे, वेगवेगळ्या वयोगटाच्या मुलांना एकच आहार देणे या सर्व बाबी अतिशय दुर्भाग्यपूर्ण व दोषपुर्ण आहेत. यासंदर्भात विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती समितीने विचारली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, समितीने सूचना दिल्या होत्या त्यासंदर्भात ज्या उणिवा होत्या त्यांना आम्ही नोटीसा दिलेल्या आहेत, त्यांना १५ दिवसाचा कालावधी दिलेला आहे. यात जे दोषी आढळतील त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल. यवतमाळ येथील उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या विभागीय चौकशीच्या प्रस्तावाबाबत नोटीस दिली असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

या सर्व बाबी अतिशय गंभीर असून महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेल्या सर्व आक्षेपासंदर्भात विभागबाह्य त्रयस्थ यंत्रणेमार्फत सखोल चौकशी कालबद्धरित्या करण्यात यावी. या प्रकरणी सकृतदर्शनी दोषी अधिकाऱ्यांवर चौकशीआधी प्रथम निलंबनाची कारवाई करण्यात यावी. चौकशी अहवालातील दोषी आढळणाऱ्या सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करून त्यासंबंधीचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

३.७५ या प्रकरणी दोषी आढळणाऱ्या पुरवठादारांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी व करारातील अटीप्रमाणे दंडाची वसुली करण्यात यावी. तसेच या सर्व दोषी पुरवठादारांना कंपनीच्या व संचालकांच्या नावासह काळ्या यादीत टाकण्यात यावे व शासनस्तरावरील कोणतेही काम यापुढे या पुरवठादारांना देण्यात येऊ नये व यासंदर्भात केलेल्या कारवाईबाबतची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.७६ आहारातील उष्मांकाचा दर्जा व प्रमाण प्रमाणित निकषांप्रमाणे व नियमानुसार अनुरूप ठेवण्याकरिता आंगणवाड्यांना देण्यात येणाऱ्या आहाराच्या तपासणीसाठीची यंत्रणा अधिक मजबूत, पारदर्शक, अद्ययावत व बालकांच्या हिताची करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.७७ जिल्हा पोषण समितीने स्वीकारलेला आहारतक्ता पडताळणीसाठी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यालयास नियमित पाठवून त्यास मान्यता घेण्यात यावी. आयुक्तालयात सदर आहारतक्त्यातील अन्न पदार्थाद्वारे शासननिर्णयाद्वारे विहित केलेल्या निकषांप्रमाणे उष्मांक मिळतात किंवा कसे याची योग्य त्या यंत्रणेमार्फत तपासणी करून सदर आहार तक्त्यात सुधारणा करून संबंधित जिल्ह्यास पाठवाव्यात जेणेकरुन विहित केल्याप्रमाणे उष्मांक लाभार्थ्यांना मिळतील व निकषांप्रमाणे व उष्मांकाप्रमाणे आहार देण्यात आला नसेल तर पुरवठारांच्या देयकातून त्या प्रमाणात रक्कम कापून घेण्याबाबतची तरतूद करारनाम्यात नमूद करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.७८ पुरवठादारांनी घरपोहोच आहाराची तपासणी ज्या प्रयोगशाळेत केली त्याच प्रयोगशाळेत विभागानेदेखील तपासणी केल्याचे आढळून आले किंवा काही ठिकाणी विभागाने तपासणी न करता पुरवठादारांच्या तपासणी अहवालावरच देयके अदा केली. यापुढे असा प्रकार होऊ नये यासाठी विभागाकडून मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्यात व तपासणीसाठी लागणाऱ्या निधीची तरतूद अर्थसंकल्पीत करावी अथवा हा आर्थिक भार पुरवठादारावर टाकणेबाबत करारात अटी नमूद कराव्यात. तसेच त्यादृष्टीने प्रत्येक जिल्ह्याला एक फिरती प्रयोगशाळा देण्याबाबत विचार व निर्णय करण्यात यावा. आणि जर प्रत्येक जिल्ह्याला देणे शक्य होणार नसेल तर राज्यातील १६ जिल्ह्यांमध्ये आदिवासी क्षेत्र आहे. या १६ जिल्ह्यांना प्राधान्याने फिरती प्रयोगशाळा देऊन त्यानंतर इतर जिल्ह्यांचा सकारात्मक विचार करण्यात यावा व याअनुषंगाने केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.७९ थेरेपेटीक आहारामध्ये (THR) पुरवठादार कायम तेच असतात, पुरवल्या जाणाऱ्या आहाराची गुणवत्ता विहित निकषाप्रमाणे असल्याचे वेळोवेळी दर्शविण्यात येते. तरीही कुपोषण कमी होत नाही. आहार वेळेत कुपोषित मुलांपर्यंत न पोहोचणे व आहाराची गुणवत्ता योग्य नसणे हे याचे मुख्य कारण आहे. यासाठी इस्कॉनसारख्या महाकिचन चालवणाऱ्या संस्थेला अथवा इतर तत्सम संस्थांना हे काम देणेबाबतचा विचार व निर्णय शासनस्तरावरून करणे शक्य असल्यास त्याचाही विचार करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

३.८० धामणगाव रेल्वे, उरळीकांचन, वडगाव मावळ, जुन्नर, बीड, धारणी याठिकाणी आहार पुरविण्यास उशीर झाला. तसेच त्या विलंबाच्या काळात लाभार्थींना पूर्वीचा आहारही मिळाला नाही व शिजवलेले अन्नही मिळाले नाही हीदेखील अत्यंत गंभीर बाब आहे. प्रशासकीय लालफीतशाहीचा विपरीत परिणाम अशा बालकांच्या दैनंदिन आहारासंदर्भात नक्कीच समर्थनीय नाही व ही बाब शासनास भूषणावह नाही. त्या दरम्यानच्या काळात या बालकांच्या आहाराची काय व्यवस्था अस्तित्वात होती हे देखील समितीसमोर स्पष्ट होऊ शकले नाही. शासकीय स्तरावरील निर्णयातील दिरंगाई अशा महत्त्वाच्या बाबींमध्ये करणे अभिप्रेत नाही. समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे व याप्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात यावी व भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळावी व बालकांच्या आहारामध्ये नियमितता राखण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.८१ परिच्छेद क्र. ४.१.१३ "अंगणवाडी केंद्राचे बांधकाम"

अभिप्राय :

मार्च २०१२ पर्यत ICDS, योजनेखाली ९७४६२ केंद्रांना मंजुरी देण्यात आली होती. त्यापैकी ९५,३३५ केंद्रे कार्यरत होती. शून्य ते सहा वर्षे वयोगटातील मुलांसाठी असलेली अंगणवाडी केंद्र, पिण्यासाठी नळाचे पाणी, अन्न साठविण्यासाठी जागा, भांडी, खेळणी, बसण्यासाठी योग्य व्यवस्था इत्यादी सोयी असलेल्या बांधकाम केलेल्या जागेत कार्यरत असणे आवश्यक होते सन २००७-०८ पर्यंत ग्रामिण भागात अंगणवाडी केंद्रे बांधण्याचे काम जिल्हा परिषदा करत होत्या. अंगणवाडी केंद्रे बांधण्याच्या कामासाठी सन २००८-२०१२ मध्ये उपलब्ध निधी पूर्णपणे खर्च झाला नाही. समितीने याबाबत सखोल छाननी केली असता ही वस्तुस्थिती असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

शिफारस :

३.८२ आंगणवाड्यांना कायमस्वरुपी जागा उपलब्ध नाही तर काही ठिकाणी त्याचे बांधकाम केलेले नाही. अनेक ठिकाणी या आंगणवाड्या भाड्याच्या इमारतीत कार्यरत आहेत. जिल्हापरिषद, नगरपालिका व महानगरपालिकांच्या शाळांमध्ये उपलब्ध असलेल्या रिकाम्या वर्गखोल्या आंगणवाड्यांसाठी उपलब्ध करून देण्याच्या पर्यायांचा देखील विभागाने विचार केल्यास यातून मार्ग निघण्यास मदत होऊ शकते. त्याअनुषंगाने नजीकच्या काळात जागेची आवश्यकता असणाऱ्या व भाडेकरार संपुष्टात येणाऱ्या आंगणवाड्यांची यादी शालेय शिक्षण विभागाकडे देण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच मुंबईमध्ये आंगणवाड्यांसाठी जागा उपलब्ध होत नाही व भाडेकराराने देखील येथे आंगणवाड्या चालविणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत या आंगणवाड्या महानगरपालिकेकडे सोपविण्याच्या पर्यायांचादेखील शासनस्तरावरून धोरणात्मक निर्णय व्हावा. यासंदर्भात तत्कालीन आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांनी विभागास पत्र पाठवून या सर्व आंगणवाड्या महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याबाबत निर्णय घ्यावा असे कळविले. परंतु आंगणवाड्या हस्तांतरणाबाबत धोरणात्मक निर्णय अद्यापही होऊ शकलेला नाही. मुंबई महानगरपालिका या आंगणवाड्या स्वीकारण्यास सहमती दर्शवित असेल तर त्यांना आंगणवाड्या हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेण्यात यावा. त्याचप्रमाणे इतर ठिकाणी या आंगणवाड्या शासनमान्य अनुदानित/ विनाअनुदानित शाळांना हस्तांतरीत करता येतील काय याचादेखील विभागाने गांभीर्याने विचार करावा. वित्त विभागानेदेखील या आंगणवाड्या शासनमान्य अनुदानित/ विनाअनुदानित शाळांना हस्तांतरीत करता येतील काय ते पहावे व जर अशाप्रकारची व्यवस्था होत नसेल तरच व अन्य कोणतेही पर्याय उपलब्ध नसेल तरच या आंगणवाड्यांचे बांधकाम करावे असे कळविले आहे. यादृष्टीने देखील गांभीर्याने विचार व्हावा तरीपण आवश्यकतेनुसार आंगणवाड्यांच्या बांधकामाची परवानगी व निधी असे दोन्ही देण्यात यावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.८३ राज्यात मंजूर आंगणवाड्या किती, त्यातील किती ठिकाणी आंगणवाडी इमारत आहे? किती आंगणावाड्या उघड्यावर अथवा भाड्याच्या जागेमध्ये भरतात? किती ठिकाणी नवीन इमारत मंजूर केली? त्यापैकी किती बांधकामे पूर्ण व किती बांधकाम अपूर्ण याबाबत विभागाने नियमित आढावा घ्यावा व उर्वरित इमारत नसलेल्या सर्व आंगणवाड्यांना इमारत मिळण्याच्या दृष्टीने नियोजन करून कालबद्ध कार्यक्रम तयार करावा व त्याचा तपशील समितीला द्यावा अशी समितीची शिफारस आहे.

३.८४ परिच्छेद क्र. ४.१.१३.१ "खुल्या जागेत कार्यरत असणारी अंगणवाडी केंद्रे"

अभिप्राय :

आयुक्तांच्या अभिलेख्याच्या तपासणीत ७६५८ अंगणवाडी केंद्रे खुल्या जागेत, झाडाखाली इत्यादि ठिकाणी चालविण्यात येत असल्याचे आढळले.

अंगणवाडी केद्रांच्या बांधकामाचा नमुना आराखडा (Type plan) आणि बांधकामासाठीचे प्राधान्य विभागातर्फे निश्चित करण्यात आले होते. त्याप्रमाणे, खुल्या जागेत चालविल्या जाणा-या अंगणवाड्यांच्या बांधकामाला अग्रक्रम देण्यात आला होता. प्राधान्यक्रमानुसार सर्व अंगणवाडी

केंद्राचे बांधकाम पूर्ण झाल्यावर आयुक्ताकडे प्रमाणपत्र पाठविणे आवश्यक होते. त्यानंतर भाड्याच्या जागेतील इत्यादी अंगणवाडी केंद्रांच्या बांधकामाला प्राधान्य देण्यात येणार होते असे असताना आयुक्त व मुख्य नियंत्रण अधिकारी यांना (CCO) आवश्यक प्रमाणपत्र न पाठविल्याने उर्वरित ७६५८ खुल्या जागेत चालविल्या जाणाऱ्या अंगणवाड्याचे बांधकाम प्राधान्य क्रमानुसार सुरू झाले की नाही हे लेखापरिक्षणात निश्चित करता आले नाही.

विभागाने सदरहू आक्षेप नाकारले असून कोणत्याही अंगणवाड्या झाडाखाली भरल्याचा अहवाल विभागाकडे प्राप्त नाही. परंतु आयुक्तांकडे जो एम.पी.आर. अहवाल येतो त्यात मोकळ्या जागेत असा उल्लेख असल्याचेही सांगण्यात आले व मोकळ्या जागा म्हणजे भाड्याच्या इमारतीत असेही विभागाने स्पष्ट केले. परंतु तरी ही बाब योग्य नसल्याचे मत समितीने व्यक्त केले.

शिफारस :

३.८५ राज्यात अद्याप किती अंगणवाड्या खुल्या जागेत भरत आहेत याचा विभागाने आढावा घ्यावा आणि अशा खुल्या जागेत भरणाऱ्या अंगणवाड्यांना कायमस्वरूपी जागा देणेबाबत अथवा त्याचे बांधकाम प्राधान्याने होण्यासाठी नियोजन करावे. तसेच जिल्हापरिषद व महानगरपालिकांच्या शाळांमध्ये अशा आंगणवाड्यांसाठी जागा उपलब्ध होऊ शकते किंवा कसे? याबाबत योग्य तो समन्वय साधून निर्णय करण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.८६ विभागाने खुल्या जागेत कार्यरत असणाऱ्या अंगणवाड्यासंदर्भात तातडीने निर्णय घ्यावा. सी.एस.आर. मधून कोणी आंगणवाड्याचे बांधकाम करून देण्यास तयार असतील तर त्या पर्यायाचा देखील शासनाने अवलंब करण्यास हरकत नाही. त्याचप्रमाणे आंगणवाड्यांच्या दुरुस्तीसाठी शासन निधी देत नाही. तरीही आता या समितीच्या साक्षीनंतर शासनाने याविषयी सुधारणा करून उपलब्ध सांकेतांक वापरण्यास मुभा दिली. परंतु त्यात चौदाव्या वित्त आयोगाच्या निधीचा समावेश नाही तो देखील करणेबाबतचा विचार व्हावा अशी समितीची शिफारस आहे व अंगणवाड्यांसाठी कायमस्वरूपी व सुरक्षित जागा देणेबाबत उपाययोजना करण्यात यावी तसेच महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप हे अत्यंत महत्वाचे असून विभागाने असे संवेदनशील विषय प्राधान्याने व अधिक प्रभावीपणे हाताळणे अपेक्षित असताना याकडे शासकीय यंत्रणेचे दुर्लक्ष होत असल्याचे समितीचे मत आहे. या सर्व आक्षेपांची गंभीर दखल घेऊन विभागाने आवश्यक ती कारवाई व उपाययोजना तातडीने करावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.८७ परिच्छेद क्र. ४.१.१३.२ "अंगणवाडी केंद्रांना भेट"

अभिप्राय :

लेखापरिक्षकांनी ५४ अंगणवाड्याची विभागाच्या प्रतिनिधीसोबत संयुक्त पाहणी केली असता अंगणवाडी केंद्रामध्ये स्वतंत्र स्वच्छतागृह, खेळाचे मैदान यासाठी जागा नसल्याचे तसेच ठिकठिकाणी खूपच छोट्या आकाराच्या जागा असल्याचे निदर्शनास आले. याशिवाय आहारपुरवठा व औषधे मिळाल्याची पोचपावती घेण्यात आली नव्हती.

महालेखाकारांनी अंगणवाडी केंद्रांना देण्यात येणाऱ्या भेटीसंदर्भात नोंदविलेले आक्षेप अत्यंत गंभीर स्वरूपाचे असून या अंगणवाडी केंद्रांना अधिकाऱ्यांकडून नियमित भेटी दिल्या जात नाही. या अंगणवाडी केंद्रांना नियमित जागा देखील उपलब्ध नाही व यासंदर्भात शासनस्तरावरून कोणतीही कारवाई केल्याचे दिसून येत नाही. अस्तित्वात असलेल्या निकषाप्रमाणे ही तपासणी विहित वेळेत झाली असती तर या अंगणवाडी केंद्रांवर शासनाचे नियमित नियंत्रण ठेवणे शक्य झाले असते. कित्येक महानगरपालिकांच्या शाळांमध्ये वर्ग रिकामे असतात त्या महानगरपालिकांना विश्वासात घेऊन अशा आंगणवाडी केंद्रांसाठी जागा प्राप्त करून घेणे शक्य असल्यास त्या शक्यतांची तपासणी देखील विभागाने करणे आवश्यक आहे. तसेच अधिकाऱ्यांनी दिलेल्या भेटी संदर्भात दौरा रजिस्टर तयार करण्याची बंद करण्यात आलेली पद्धत आता पुन्हा सुरू करण्यात आलेली असल्यामुळे अधिकाऱ्यांनी केलेल्या दौऱ्याचा तपशील आता विभागाकडे उपलब्ध होणार आहे त्यामुळे यावर नियंत्रण ठेवणे विभागाला आता शक्य होईल. त्याअनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही विभागाने आता करणे अपेक्षित व अभिप्रेत आहे. असेही समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

३.८८ पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांनी वेळोवेळी अंगणवाडी केंद्रांना भेटी दिल्यास अंगणवाडीच्या आर्थिक बाबीशी संबंधित नसलेले छोटे/मोठे प्रश्न तेथल्या तेथे सुटू शकतात. यासाठी विभागाने पर्यवेक्षिका, बालविकास प्रकल्प अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) इ. प्रत्येक स्तरावरील पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांना अंगणवाडी तपासणीचे निकष विहित करून द्यावेत व त्याच्या अंमलबजावणीचा आढावा दरमहा आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांच्या स्तरावर घेण्यात यावा व भेटीमध्ये आढळलेल्या त्रुटी दूर करण्याची कार्यवाही करावी व अशाप्रकारे विभागांतर्गत नियंत्रण व पर्यवेक्षण व्यवस्था मजबूत करावी व याबाबत केलेली कार्यवाही ३ महिन्याचे आत समितीला कळवावी अशी समितीची शिफारस आहे.

३.८९ परिच्छेद क्र. ४.१.१४.१ "बालगृहातील मुलांकरिता व्यावसायिक शिक्षणाची तरतूद नव्हती"

अभिप्राय :

विधी संघर्षग्रस्त बालकांस न्याय देणे आणि काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांशी मैत्रीपूर्ण संवाद तसेच त्यांच्या विकासाच्या दृष्टीने पुनर्वसन करणे या मुळ उद्देशाने बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम, २०००, एप्रिल २००१ मध्ये पारित करण्यात आला.

बाल न्याय नियमांच्या नियम १६(८), १६(९) आणि २९(४) अन्वये बालगृहातील मुलांना उपयुक्त आधुनिक आणि खुल्याबाजारात उपयोगी पडणारे व्यावसायिक शिक्षण देणे आवश्यक आहे. विभागाने ऑगस्ट, २००७ मध्ये बालगृहातील मुलांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमार्फत व्यावसायिक प्रशिक्षण देण्याचे ठरविले त्यानुसार १६ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांसाठी प्रत्येकी रुपये ५,००० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक शिक्षण देण्यावर खर्च करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे नऊ जिल्ह्यात सुरुवातीला मार्गदर्शक तत्त्वावर असे प्रशिक्षण देण्याचे निश्चित करण्यात आले.

परंतु, शासकीय व अशासकीय संस्थांना शासनाकडून रुपये २१.४६ लाख इतके शुल्क न मिळाल्याने सन २००८-०९ पासून औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी प्रशिक्षण बंद केले. विभागाने रुपये १३.३५ लाख इतकी रक्कम मार्च, २०१० मध्ये खर्च केली. मात्र पूर्ण रक्कम न मिळाल्याने वर नमूद केल्याप्रमाणे संस्थांनी प्रशिक्षण बंद केले. सबब, मुलांना दिलेल्या प्रशिक्षणाचा अपेक्षित लाभ झाला याची खात्री आयुक्त करू शकले नाहीत.

आयुक्तांनी राज्यातील सर्व DWCDOs यांना बालगृहातील मुलांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना मार्च, २००८ मध्ये दिल्या. आयुक्तांनी प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने सन २००८-०९ या वर्षासाठी एक वार्षिक योजना तयार केली व विभागाला पाठविली. परंतु, सन २०११-१२ पर्यंत अर्थसंकल्पीय तरतूद न केल्यामुळे सदरिल वार्षिक योजना राबविता आली नाही. बालगृहांमध्ये मुलींचे शोषण होऊ नये म्हणून सर्व ठिकाणी सी.सी. टिव्ही बसविण्याचे काम सुरू केले आहे. तसेच बालकांची नोंद करण्यासाठी बायोमॅट्रिक यंत्रे देखील बसविण्यात आले असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. समितीने याची सखोल तपासणी केली असता सामाजिक न्याय विभागाने ही बायोमॅट्रीक यंत्रे बसविली असून ती सद्यःस्थितीत सुरू नसल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच विभागीय स्तरावर बाल महोत्सव देखील आयोजित करण्यात येतो. परंतु मागील काही वर्षात यासाठी कमी निधी उपलब्ध झाल्याने हे बाल महोत्सव आयोजित झाले नाही. त्याचप्रमाणे मुलांना उच्च शिक्षण देण्यासाठी नविन योजना प्रस्तावित असून त्यास मान्यतेची कारवाई प्रलंबित आहे. परंतु याच स्वरूपाच्या योजना सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकासामार्फत राबविण्यात येत आहेत. त्यामुळे या योजनांचे डुप्लीकेशन होऊ नये म्हणून वित्त विभागामार्फत यासंदर्भात कार्यवाही सुरू असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. त्याचप्रमाणे आय.टी.आय. साठी अनुदानाची योजना होती. ती संस्थांना मिळणाऱ्या निधीमधूनच राबविण्याबाबत सूचना होत्या. परंतु ही योजना नंतर निधीअभावी बंद पडली व यामधून विद्यार्थ्यांना १ वर्षानंतर प्रशिक्षण अर्धवट सोडावे लागले परंतु निधीअभावी ही योजना बंद झाल्याचे व त्याजागी कर्मवीर भाऊराव पाटील स्वावलंबन योजना सुरू करण्यात आल्याचे समिती समोर सांगण्यात आले. परिणामी या योजनांवर केलेला रुपये १३ लक्षांचा खर्च देखील निष्फळ ठरला ही अत्यंत गंभीर बाब आहे.

शिफारस :

३.९० व्यावसायिक शिक्षण देण्यासाठी ४५६ मुलांना आय.टी.आय. साठी प्रवेश देण्यात आला व यासाठी रुपये १३.३५ लक्ष खर्च देखील करण्यात आले. परंतु नंतर निधी अभावी ही योजना बंद पडली व झालेला खर्च निष्फळ ठरला. विभागाच्या ढिसाळ नियोजनामुळे सदर मुलांना व्यावसायिक शिक्षण अर्धवट सोडावे लागले व यावर केलेला रु. १३.३५ लक्ष खर्च वाया गेला. विभागाने एखादी योजना सुरू करावी व त्यानुसार विद्यार्थ्यांना या योजनेअंतर्गत प्रवेश द्यायचा व १ वर्षानंतर निधीअभावी ही योजना बंद करावी ही बाब अत्यंत आक्षेपार्ह असून कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय ठरू शकत नाही व निधीअभावी विद्यार्थ्यांचे त्यावेळी आय.टी.आय.चे प्रशिक्षण पुर्ण होऊ शकले नाही. शासनाने देखील सुरुवातीला या प्रशिक्षणासाठी निधी देणे परंतु नंतर तो अमान्य करणे ही गंभीर बाब असून यामुळे त्या मुलांचे भवितव्यदेखील अडचणीत आले आहे. ही बाब विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्यही केली. अतः या ढिसाळ नियोजनास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून केलेल्या कारवाईची माहिती समितीला ३ महिन्यांचे आत कळवावी अशी समितीची शिफारस आहे.

३.९१ बालगृहांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याबाबतची सद्यस्थिती समितीला कळविण्यात यावी. तसेच बालगृहांमध्ये बायोमेट्रीक यंत्र बसविणे व ती सद्यस्थितीमध्ये चालू आहेत किंवा कसे याबाबतची माहिती तसेच बायोमॅट्रिक यंत्रणा चालू नसेल तर ती चालू करण्याची व्यवस्था करावी व याबाबतची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.९२ परिच्छेद क्र. ४.१.१५.१ "मनुष्यबळाचे व्यवस्थापन"

अभिप्राय :

महिला व बालविकास तसेच एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालयासाठी मंजूर पदे व प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचा आढावा घेतला असता असे दिसून आले की, राज्यातील महिला व बाल विकासाच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत महत्वाची भूमिका बजावणारे जिल्हा परीविक्षा अधिकारी व परीविक्षा अधिकारी ही पदे तसेच एकात्मिक बाल विकास सेवा योजनेची बालविकास प्रकल्प अधिकारी व पर्यवेक्षिका ही पदे लक्षणीयरित्या रिक्त असल्याचे दिसून आले. परंतु आता एम.पी.एस.सी. कडून सी.डी.पी.ओ. मिळाले आहेत व ती भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. रिक्त पदांची पूर्वी असलेल्या बिकट परिस्थितीत आता हळूहळू सुधारणा करण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. सी.डी.पी.ओ.च्या भरती संदर्भातील नियमातील तरतुदींच्या अनुषंगाने काही याचिका देखील दाखल झाल्या होत्या व त्याआधारे हे नियम बदलण्याचे काम सुरू आहे व सर्व रिक्त पदे टप्प्याटप्प्याने भरण्याचे काम सुरू असल्याचे समिती समोर सांगण्यात आले

शिफारस :

३.९३ सद्य:स्थितीमध्ये महिला व बालविकास तसेच एकात्मिक बाल विकास सेवा योजनेसाठी मंजूर पदे, कार्यरत पदे व भरलेली पदे याबाबतची काय स्थिती आहे व रिक्त पदे भरण्यासाठी विभागाचे नियोजन तथा कार्यवाही याबाबतची अद्ययावत माहिती तयार करण्यात यावी तसेच विभागाने रिक्त पदे भरणेसंदर्भात आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यांत द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.९४ महालेखाकारांनी महिला व बालविकास विभागांतर्गत नोंदविलेल्या गंभीर आक्षेपांची समितीने सखोल छाननी व तपासणी केली. त्यात समितीला आढळून आले की, राज्यातील संगोपन व संरक्षणाची आवश्यकता असलेल्या मुलांची संख्या निश्चित करता येणाऱ्या यंत्रणेअभावी बालगृहांच्या स्थापनेसाठी कालबद्ध योजना आखता आली नाही, जिल्हा पातळीवरील पुनर्वसन समित्यांच्या बैठकांची संख्या अल्प होती व जिल्हा निरीक्षण समित्यांची स्थापना करण्यात आली नव्हती, विभागाच्या संनियंत्रणात ढिलेपणा होता. अंगणवाडी केंद्रांच्या कार्यावर देखरेख ठेवण्याठी दीर्घ कालावधीपर्यंत दक्षता पथकांची स्थापना करण्यात आली नव्हती DWCDOs आणि CDPOs यांनी बालगृहांच्या करावयाच्या निरीक्षणात कमतरता होत्या. मतिमंद मुले, ज्यांना विशेष संगोपन आणि गरजांची आवश्यकता होती, त्यांचे योग्य पुनर्वसन करण्यात आले नाही. महिलांच्या सबळीकरणाकरिता विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभ योजना ज्यांच्यावर बराच मोठा खर्च केला जातो, आढावा व परिणाम निर्धारणा यंत्रणेअभावी, विशेष परिणामकारक नव्हत्या. कौटुंबिक हिंसाचार कायद्याखाली, सन २००८-११ कालावधीत नोंदविण्यात आलेल्या ७० टक्क्यापेक्षा जास्त प्रकरणांत अद्याप सुनावणी झाली नव्हती आणि पिडितांना मदत करण्यात आली नव्हती. विभागाने, बालगृह व भिक्षेकरी गृहातील लाभार्थ्यांच्या व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षणाद्वारे पुनर्वसनाकरिता केलेली संस्थात्मक रचना समाधानकारक नव्हती. पूरक पोषण आहार योजनेखाली (ICDS), प्रस्तावित केलेल्या आहार भत्यात आणि लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष आहारात तफावत होती. घरपोच आहाराच्या पौष्टीक दर्जाची नियमितपणे तपासणी करण्यात आली नाही. घरपोच आहार व इतर कच्च्या मालाची मागणी नोंदविण्यात विलंब होता, त्यामुळे लक्षणीय कालावधीसाठी पुरवठा पुरविण्यात अडथळे निर्माण झाले होते. हे सर्व आक्षेप अत्यंत गंभीर स्वरूपाचे असून विभागाच्या एकंदरीत कार्यपद्धतीबाबत साशंकता निर्माण करणारे आहे. या सर्व आक्षेपांची विभागाने गांभीर्याने दखल घेऊन योग्य ती उपाययोजना करावी व भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिशिष्ट-अ

परिच्छेद क्रमांक ४.१.१

विवरण क्रमांक १

परिशिष्ट 4.1.1

(संदर्भ : परिच्छेद:4.1.1 आणि 4.1.5; पृष्ठ 79 आणि 80)

विभागाने अंमलबजावणी केलेल्या योजनांचा आणि त्यावर केलेल्या खर्चाचा तपशील

(₹ कोटीत)

अ. क्र.	योजना	2007-08	2008-09	2009-10	2010-11	2011-12
1.	महिला आर्थिक विकास महामंडळाला दिलेले सहाय्यक अनुदान	0.03	9.69	2.77	4.3	11.10
2.	देवदासींच्या पुनर्वसनाच्या योजना	0.16	0.15	0.01	0	0
3.	राज्य महिला आयोगाला दिलेले सहाय्यक अनुदान	0.80	0.83	0.87	1.02	0.99
4.	"विधवा, परित्यक्ता आणि निराश्रित" महिलांना तिच्या मुलींच्या विवाह प्रित्यर्थ दिलेला विवाह भत्ता"	0.11	0.14	0.08	0.11	0.07
5.	महिलांसाठीच्या बहुउद्देशीय सामाजिक केंद्राची स्थापना	0	0.23	0.07	0.06	0.28
6.	देवदासींसाठी निर्वाह भत्ता	2.16	2.18	2.24	2.24	0.45
7.	शेतकऱ्यांच्या मुलींच्या विवाहप्रित्यर्थ स्वयंसेवी संस्थांना विवाह भत्ता **(चाचणी तपासणी केलेली)**	6.48	11.84	11.22	10.95	23.78
8.	काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या मुलांसाठी, चालवल्या जाणाऱ्या स्वयंसेवी संस्थाना दिलेले सहाय्यक अनुदान निराश्रित मुलांसाठी संस्था बाहय सेवा व बाल न्याय कार्यक्रम **(चाचणी तपासणी केलेली)**	53.13	52.90	60.69	66.97	86.89
9.	स्वागत केंद्र आणि राज्यगृहे	3.89	4.65	6.30	6.30	7.71
10.	अहिल्याबाई होळकर पुरस्कार	0	0	0	0.93	0.33
11.	महिला समुपदेशन केंद्राची स्थापना **(चाचणी तपासणी केलेली)**	0.42	4.59	0.43	0.74	1.01
12.	महिला मंडळांना दिलेली सहाय्यक अनुदाने	0.63	0.63	0.52	0.96	2.45
13.	व्यवसाय प्रशिक्षणासाठी मुलींना दिलेले विद्या वेतन **(चाचणी तपासणी केलेली)**	0.49	0.30	0.22	0.08	0.06
14.	महिलांसाठी स्वयंरोजगार **(चाचणी तपासणी केलेली)**	1.12	0.78	0.43	0.17	0.15
15.	हुंडा प्रथेचे उच्चाटन	0.28	0.86	3.32	0.25	0.02
15.	एकात्मिक बाल विकास सेवा (ICDS) **(चाचणी तपासणी केलेली)**	857.42	834.25	1198.77	1533.15	2036.87
	एकूण	**927.12**	**924.02**	**1287.94**	**1628.23**	**2172.16**

स्त्रोत : महाराष्ट्र शासनाचे 2007-12 चे अर्थसंकल्पीय अंदाज

विभागाकडून अंमलबजावणी केल्या जाणाऱ्या अधिनियमांचा तपशील

1	कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, 2005 **(चाचणी तपासणी केली आहे)**
2	देवदासी प्रथा (निर्मूलन) अधिनियम, 2005
3	परिवीक्षा अपराधी अधिनियम, 1958
4	मुंबई भिक्षा प्रतिबंध अधिनियम, 1959 **(चाचणी तपासणी केली आहे)**
5	हुंडा प्रतिबंध अधिनियम, 1961
6	अनैतिक वाहतूक (प्रतिबंध) अधिनियम, 1956
7	बालविवाह प्रतिबंध अधिनियम, 1929
8	बालगुन्हेगार न्याय (बालकांचे काळजी आणि संरक्षण) अधिनियम, 2000 **(चाचणी तपासणी केली आहे)**

टीप : ICDS वर झालेली खर्च, हा GoI आणि GoM. यांच्या मध्ये विभागाला जातो. वर नमूद केलेल्या इतर सर्व योजना, अधिनियम आणि नियम यांची GoM कडून अंमलबजावणी केली जाते.

परिच्छेद क्रमांक ४.१.१ व ४.१.५

विवरण क्रमांक १ व २

दिनांक 31 मार्च 2012 रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल क्र.3 (सा. सा. क्षे)

परिशिष्ट 4.1.2

(संदर्भ : परिच्छेद 4.1.5; पृष्ठ 80)

घटक कार्यालये आणि DDOs यांच्या चाचणी तपासणींचा तपशील

अ. क्र.	जिल्ह्याचे नाव	CDPOs (आणि DDOs)	बालगृह/महिलांसाठी राज्य गृह/ भिक्षेकरी निरिक्षण गृह
1.	मुंबई शहर	1. रेड लाईट क्षेत्र	--
		2. धारावी (शहरी)	
2.	मुंबई उपनगर	3. बोरीवली 2	1.कस्तूरबा महिला वसतिगृह, चेंबूर (प)
		4. अंधेरी (शहरी)	2. भिक्षेकरी गृहे, चेंबूर (B)
		5. कुर्ला (शहरी)	
		6. गोवंडी (शहरी)	
		7. गोरेगाव (पश्चिम)	
3.	अमरावती	8. धरणी	3.किशोरवयीन मुलांसाठी शासकीय निरिक्षण गृह, अमरावती (C)
		9. दर्यापूर	4.मुलींसाठी निरिक्षण गृह व बालगृह, अमरावती (C).
		10.धामणगाव रेल्वे	
4.	नागपूर	11.पराशिवानी	5. मुलांसाठी शासकीय सुधारगृह आणि कुमारवयीन मुलांसाठी शासकीय बालगृह (C)
		12.कामटी	6.महिलांसाठी सरस्वती वसतीगृह, कटोल(W)
		13.नागपूर (ग्रमीण)	
		14.नागपूर (शहरी)	
5.	यवतमाळ	15.यवतमाळ (ग्रमीण)	7. शासकीय निरिक्षण गृह आणि बालगृह
		16.यवतमाळ (शहरी)	
		17.उमरखेड	
		18.वाणी	
6.	बीड	19.बीड 2	8.शासकीय निरिक्षण गृह
		20.बीड (ग्रमीण)	
		21.अष्टी (ग्रमीण)	
7.	उस्मानाबाद	22.उस्मानाबाद (ग्रमीण)	
		23.तुळजापूर	
8.	अहमदनगर	24.अहमदनगर -1(ग्रमीण)	9.भिक्षेकरी गृह, घायपतवाडी (B)
		25.जामखेड	10.किशोरवयीन/कुमारवयीन मुलींसाठी शासकीय बालगृह, राहुरी (C)
		26. रहाटा	
		27.पाथर्डी	
		28.कर्जत	
9.	पुणे	29.खेड	11. किशोरवयीन मुलांसाठी शासकीय निरिक्षण गृह, येरवडा (C)
		30.पुरंदर	12.पंडीत जवाहरलाल नेहरु निरिक्षण गृह, येरवडा
		31.हवेली	
		32.वडगाव मावळ	
		33.जुन्नर	
		34. उरळी कांचन	

प्रतिनिधीक वर नमूद केल्या व्यतिरिक्त, प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी आणि एक उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (मुंबई शहर आणि उपनगर जिल्ह्या व्यतिरिक्त) ह्यांच्या अभिलेख्यांची सुध्दा चाचणी तपासणी केली गेली.

परिच्छेद क्रमांक ४.१.७.२

विवरण क्रमांक ३

परिशिष्ट 4.1.3

(संदर्भ : परिच्छेद-4.1.7.2; पृष्ठ 83)

DWCDOs कडून बालगृहांचे केलेले सविस्तर निरीक्षण, अचानक निरीक्षण दर्शविणारे विवरणपत्र

प्रकल्पाचे नाव	2008-09			2009-10			2010-11			2011-12			एकूण		
	T	A	S	T	A	S	T	A	S	T	A	S	T	A	S (टक्केवारी)
DWCDO अहमदनगर															
सविस्तर	12	104	0	12	58	0	12	33	0	12	32	0	48	229	0 (0)
अचानक	48	59	0	48	44	4	48	132	0	48	64	0	192	299	0 (0)
DWCDO अमरावती															
सविस्तर	12	6	6	12	5	7	12	0	12	12	0	12	48	11	37 (77.0)
अचानक	48	20	28	48	41	7	48	5	43	48	11	37	192	77	115 (59.9)
DWCDO बीड															
सविस्तर	12	12	0	12	0	12	12	0	12	12	0	12	48	12	36 (75.0)
अचानक	48	41	7	48	0	48	48	0	48	48	0	48	192	41	151 (78.6)
DWCDO मुंबई शहर															
सविस्तर	12	7	5	12	0	12	12	0	12	12	0	12	48	7	41 (85.4)
अचानक	48	34	14	48	0	48	48	0	48	48	4	44	192	38	154 (80.2)
DWCDO मुंबई उपनगर															
सविस्तर	12	39	0	12	0	12	12	0	12	12	0	12	48	39	9 (18.75)
अचानक	48	0	48	48	0	48	48	0	48	48	0	48	192	0	192 (100)
DWCDO नागपूर															
सविस्तर	12	6	6	12	1	11	12	0	12	12	4	8	48	11	37 (77.0)
अचानक	48	19	29	48	36	12	48	0	48	48	23	25	192	78	114 (59.4)
DWCDO उस्मानाबाद															
सविस्तर	12	7	5	12	3	9	12	2	10	12	0	12	48	12	36 (75.0)
अचानक	48	51	0	48	62	0	48	36	12	48	35	13	192	184	8 (4.17)
DWCDO पुणे															
सविस्तर	12	11	1	12	8	4	12	0	12	12	37	0	48	56	0 (0.0)
अचानक	48	26	22	48	58	0	48	0	48	48	57	0	192	141	51 (26.6)
DWCDO यवतमाळ															
सविस्तर	12	1	11	12	0	12	12	0	12	12	0	12	48	1	47 (97.92)
अचानक	48	49	0	48	36	12	48	10	38	48	45	3	192	140	52 (27.0)

स्त्रोत : संबंधीत कार्यालयांकडून, क्षेय भेटीच्या वेळी संकलन केलेली माहिती

T= लक्ष्य; A= साध्य; S= तूट

परिच्छेद क्रमांक ४.१.७.३

विवरण क्रमांक ४

परिशिष्ट 4.1.4
(संदर्भ: परिच्छेद:4.1.7.3; पृष्ठ 84)
CDPOs कडून निरीक्षणात झालेली तूट दर्शविणारे विवरणपत्र

प्रकल्पाचे नाव		2007-08		2008-09		2009-10		2010-11		2011-12		Total			
	वार्षिक लक्ष्य	साध्य	तूट	साध्य	तूट	साध्य	तूट	साध्य	तूट	साध्य	तूट	वार्षिक लक्ष्य	साध्य	तूट	टक्केवारी
(1)	(2)	(3)	(4)	(5)	(6)	(7)	(8)	(9)	(10)	(11)	(12)	(13)	(14)	(15)	(16)
1.CDPO, वडगाव मावळ, जिल्हा पुणे	216	0	216	293	0	423	0	298	0	20	196	1080	1034	46	4
2.CDPO, पुरंदर, जिल्हा पुणे	216	178	38	191	25	168	48	199	17	205	11	1080	941	139	13
3.CDPO, जुन्नर, जिल्हा पुणे	216	189	27	239	0	124	92	131	85	171	45	1080	854	226	21
4.CDPO, बीड ग्रामीण -1 जिल्हा बीड	216	116	100	105	111	57	159	139	77	168	48	1050	585	495	46
5.CDPO, बीड ग्रामीण -2 जिल्हा बीड	216	0	0	0	0	0	0	76	140	181	35	432	257	175	41
6.C.D.P.O., आष्टी., जिल्हा बीड	216	34	182	45	171	21	195	15	201	97	119	1080	212	868	80
7.CDPO, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद	216	413	0	325	0	54	162	164	52	233	0	1080	1189	0	0
8.CDPO, उस्मानाबाद, ग्रामीण	216	138	78	161	55	147	69	168	48	105	111	1080	719	361	33
9.CDPO, दर्यापूर, जिल्हा अमरावती	216	216	0	216	0	216	0	216	0	216	0	1080	1080	0	0
10.CDPO, धारणी., जिल्हा अमरावती.	216	200	16	210	6	180	36	203	13	209	7	1080	1002	78	7
11.CDPO., धामणगाव, जिल्हा अमरावती	216	216	0	216	0	214	2	210	6	213	3	1080	1069	11	1

परिशिष्ट 4.1.4 (चालू)

(1)	(2)	(3)	(4)	(5)	(6)	(7)	(8)	(9)	(10)	(11)	(12)	(13)	(14)	(15)	(16)
12.CDPO. बोरीवली-2, मुंबई	216	48	168	0	216	46	168	36	180	24	192	1080	156	924	86
13.CDPO. धारावी, मुंबई	216	222	0	219	0	210	6	205	11	215	1	1080	1071	9	1
14.CDPO रेडलाईट क्षेत्र, वरळी, मुंबई.	216	60	156	63	153	83	133	60	156	81	135	1080	347	733	68
15.CDPO., उरळीकांचन, पुणे.	216	59	157	183	33	179	37	191	25	182	34	1080	794	286	26
16.CDPO. गोवंडी (U), मुंबईउपनगर	216	433	0	199	17	155	61	162	54	244	0	1080	1193	0	0
17.CDPO. उमरखेड (ग्र), यवतमाळ	216	480	0	280	0	260	0	240	0	380	0	1080	1640	0	0
18.CDPO. अंधेरी (श), मुंबई उपनगर	216	0	216	0	216	61	155	40	176	10	206	1080	111	969	90
19.CDPO. गोरेगाव (प), मुंबई उपनगर	216	30	186	36	180	57	159	30	186	25	191	1080	178	902	84
20. CDPO, हवेली, पुणे	216	75	141	172	44	176	40	167	49	83	133	1080	673	407	38
21. CDPO, कर्जत जिल्हा अहमदनगर	216	219	0	217	0	220	0	221	0	232	0	1080	1109	0	0
22. CDPO, रहाटा, अहमदनगर	216	283	0	541	0	504	0	489	0	521	0	1080	2338	0	0

परिशिष्ट 4.1.4 (समाप्त)

(1)	(2)	(3)	(4)	(5)	(6)	(7)	(8)	(9)	(10)	(11)	(12)	(13)	(14)	(15)	(16)
23. CDPO, जामखेड, अहमदनगर	216	228	0	234	0	356	0	240	0	257	0	1080	1315	0	0
24. CDPO, पाथर्डी, अहमदनगर	216	227	0	220	0	224	0	271	0	290	0	1080	1232	0	0
25. CDPO, वणी, यवतमाळ	216	475	0	479	0	474	0	480	0	470	0	1080	2378	0	0
26. CDPO, खेड, पुणे	216	54	162	58	166	75	141	80	136	98	118	1080	365	715	34
27. CDPO, कुर्ला (U), मुंबई	216	386	0	0	216	300	0	305	0	163	53	1080	1154	0	0
28. CDPO, यवतमाळ (U)	216	0	216	0	216	310	0	330	0	260	0	1080	900	180	17
29. CDPO, अहमदनगर, ग्रामीण	216	240	0	267	0	250	0	261	0	222	0	1080	1240	0	0
30. CDPO, कामटी, नागपूर	216	240	0	200	16	210	6	190	26	260	0	1080	1100	0	0
31. CDPO, यवतमाळ, ग्रामीण-I	216	240	0	240	0	242	0	236	0	240	0	1080	1204	0	0

स्त्रोत : संबंधीत CDPOs नी सादर केलेली माहिती

टीप : परशीवनी, नागपूर ग्रामीण आणि नागपूर शहर या तीन CDPOs कडून माहिती प्रतिक्षाधीन होती

परिच्छेद क्रमांक ४.१.७.३

विवरण क्रमांक ५

बाल विकास प्रकल्प अधिकारी (ना.) गट-अ संवर्गातील विभाग निहाय रिक्त पदाचा तपशिल दिनांक १.५.२०१५ ची सद्यस्थिती

अ.क्र	कार्यालयाचे नांव	पदनाम	जिल्हा
कोकण विभाग,मुंबई			
१	बाल विकास प्रकल्प अधिकारी,कुलाबा	बाविप्रअ	मुंबई शहर
२	बाल विकास प्रकल्प अधिकारी,प्रभादेवी	बाविप्रअ	मुंबई शहर
३	बाल विकास प्रकल्प अधिकारी,बांद्रा	बाविप्रअ	मुंबई उपनगर
४	बाल विकास प्रकल्प अधिकारी,बोरिवली-२	बाविप्रअ	मुंबई उपनगर
५	बाल विकास प्रकल्प अधिकारी,विक्रोळी-कांजूर	बाविप्रअ	मुंबई उपनगर
६	बाल विकास प्रकल्प अधिकारी, माहिम	बाविप्रअ	मुंबई उपनगर
७	बाल विकास प्रकल्प अधिकारी, अंधेरी-२	बाविप्रअ	मुंबई उपनगर
८	बाल विकास प्रकल्प अधिकारी,अंधेरी ३	बाविप्रअ	मुंबई उपनगर
९	बाल विकास प्रकल्प अधिकारी,गोरेगांव (((पूर्व)	बाविप्रअ	मुंबई उपनगर
१०	बाल विकास प्रकल्प अधिकारी,शिवाजीनगर मुंबई	बाविप्रअ	मुंबई उपनगर

११	बाल विकास प्रकल्प अधिकारी, गोवंडी	बाविप्रअ	मुंबई उपनगर
१२	बाल विकास प्रकल्प अधिकारी,आरे जोगेश्वरी	बाविप्रअ	मुंबई उपनगर
१३	बाल विकास प्रकल्प अधिकारी, वरळी	बाविप्रअ	मुंबई उपनगर
१४	बाल विकास प्रकल्प अधिकारी, भांडूप (पूर्व)	बाविप्रअ	मुंबई उपनगर
१५	बाल विकास प्रकल्प अधिकारी, बोरीवली-१	बाविप्रअ	मुंबई उपनगर
१६	बाल विकास प्रकल्प अधिकारी,भांडूप (((पश्चिम)	बाविप्रअ	मुंबई उपनगर
१७	बाल विकास प्रकल्प अधिकारी, तुंबा-मोहिली	बाविप्रअ	मुंबई उपनगर
१८	बाल विकास प्रकल्प अधिकारी, चेंबूर	बाविप्रअ	मुंबई उपनगर
१९	बाल विकास प्रकल्प अधिकारी, ट्रॉम्बे	बाविप्रअ	मुंबई उपनगर
२०	बाल विकास प्रकल्प अधिकारी, मिरा-भाईंदर	बाविप्रअ	मुंबई उपनगर
२१	बाल विकास प्रकल्प अधिकारी, मुलूंड (पूर्व)	बाविप्रअ	मुंबई उपनगर
२२	बाल विकास प्रकल्प अधिकारी, भिवंडी	बाविप्रअ	ठाणे
२३	बाल विकास प्रकल्प अधिकारी, रत्नागिरी	बाविप्रअ	रत्नागिरी

	नाशिक विभाग		
१	बाल विकास प्रकल्प अधिकारी, नाशिक-२	बाविप्रअ	नाशिक
२	बाल विकास प्रकल्प अधिकारी, जळगांव	बाविप्रअ	जळगांव
	पुणे विभाग		
१	बाल विकास प्रकल्प अधिकारी, पुणे क्र.२	बाविप्रअ	पुणे
२	बाल विकास प्रकल्प अधिकारी, पिंपरी -चिंचवड पुणे	बाविप्रअ	पुणे
३	बाल विकास प्रकल्प अधिकारी, कोथरुड,पुणे	बाविप्रअ	पुणे
४	बाल विकास प्रकल्प अधिकारी,सांगली	बाविप्रअ	सांगली
५	बाल विकास प्रकल्प अधिकारी,सातारा	बाविप्रअ	सातारा
	औरंगाबाद विभाग		
१	बाल विकास प्रकल्प अधिकारी,बीड	बाविप्रअ	बीड
२	बाल विकास प्रकल्प अधिकारी,औरंगाबाद-१	बाविप्रअ	औरंगाबाद
	अमरावती विभाग		
१	बाल विकास प्रकल्प अधिकारी,अमरावती (नवीन)	बाविप्रअ	अमरावती
२	बाल विकास प्रकल्प अधिकारी,अकोला	बाविप्रअ	अकोला

३	बाल विकास प्रकल्प अधिकारी,वाशिम	बाविप्रअ	वाशिम
नागपूर विभाग			
१	बाल विकास प्रकल्प अधिकारी,ग्रा.प.क्र.२, नागपूर	बाविप्रअ	नागपूर
२	बाल विकास प्रकल्प अधिकारी,बल्लारपूर	बाविप्रअ	चंद्रपूर
३	बाल विकास प्रकल्प अधिकारी,नागपूर-१	बाविप्रअ	नागपूर
४	बाल विकास प्रकल्प अधिकारी,नागपूर-२	बाविप्रअ	नागपूर
५	बाल विकास प्रकल्प अधिकारी,गोंदिया	बाविप्रअ	गोंदिया
६	बाल विकास प्रकल्प अधिकारी,ग्रा.प्र.क्र.३ नागपूर-	बाविप्रअ	नागपूर
७	बाल विकास प्रकल्प अधिकारी, गडचिरोली	बाविप्रअ	गडचिरोली

बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण), जिल्हा परिषद यांचे वर्ग २ पदाबाबतची माहिती दिनांक ३०/११/२०१५ अखेर रिक्त पदांचा तपशिल सोबत जोडला आहे.

बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण), जिल्हा परिषद यांचे वर्ग-२ पदावावतचा माहितीं
दिनांक ३०.११.२०१५ अखेर

अ.क्र	जिल्हा	मंजूर पदे	भरलेली पदे	रिक्त पदे
१	मुंबई शहर	०	०	०
२	मुंबई उपनगर	०	०	०
३	ठाणे	९	०	९
४	पालघर	१३	४	९
५	रायगड	१७	७	१०
६	रत्नागिरी	१३	०	१३
७	सिंधुदुर्ग	७	०	७
	एकूण	५९	११	४८
८	पुणे	२१	६	१५
९	सातारा	१९	२	१७
१०	सांगली	१३	०	१३
११	कोल्हापूर	१५	१	१४
१२	सोलापुर	१६	१	१५
	एकूण	८४	१०	७४
१३	नाशिक	२६	९	१७
१४	नंदुरबार	१२	३	९
१५	जळगाव	१९	६	१३
१६	धुळे	१०	०	१०
१७	अहमदनगर	२१	४	१७
	एकूण	८८	२२	६६
१८	अमरावती	१४	३	११
१९	अकोला	८	२	६
२०	वाशिम	६	०	६
२१	यवतमाळ	१६	१	१५
२२	बुलढाणा	१४	२	१२
	एकूण	५८	८	५०
२३	नागपुर	१३	२	११
२४	गोंदिया	९	०	९
२५	गडचिरोली	१२	०	१२
२६	भंडारा	७	०	७
२७	चंद्रपुर	१५	२	१३
२८	वर्धा	९	०	९
	एकूण	६५	४	६१
२९	औरंगाबाद	१४	४	१०
३०	जालना	१२	३	९
३१	परभणी	१२	१	११
३२	हिंगोली	५	२	३
३३	बीड	१३	३	१०
३४	नांदेड	१६	२	१४
३५	लातूर	१३	३	१०
३६	उस्मानाबाद	१०	१	९
	एकूण	९५	१९	७६
	एकूण	४४९	७४	३७५

बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण) पदांबाबतची माहिती

अ.क्र	जिल्हा	प्रकल्पाचे नांव	अधिकाऱ्यांचे नांव	S/P	मंजूर पदे	भरलेली पदे	रिक्त पदे
१	ठाणे	भिवंडी	रिक्त		1	0	1
२	ठाणे	भिवंडी-२	रिक्त		1	0	1
३	ठाणे	कल्याण	रिक्त		1	0	1
४	ठाणे	शहापूर (डोळखांब)	रिक्त		1	0	1
५	ठाणे	ठाणे	श्री.मेघःश्याम नवार	PT	1	0	1
६	ठाणे	अंबरनाथ	श्री.अरुण शिंदे	PT	1	0	1
७	ठाणे	मुरबाड-२	रिक्त		1	0	1
